# छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका
## महापालिका सचिव विभाग

**मा.प्रशासक यांच्या कार्यकाळातील घेण्यात आलेले प्रस्ताव व ठरावाचे इतिवृत्तांत**
**विषय/ठराव क्रमांक-1901 ते विषय/ठराव क्रमांक-2000**

**दि.:-26.04.2025 ते दि.:-21.07.2025**

**प्रस्ताव क्रमांक 1901/2025:-** **(यांत्रिकी विभाग)** **(दि.28.04.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभाग शासन निर्णय क्र. स्वमअ-2024/सीएन-853129 (25)/नवि-34 दि.04.10.2024 नुसार स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) 2.0 अंतर्गत छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेस एम.आर.एफ.सेंटर उभारणी करण्यासाठी र.रु.12,64,26,091/- रक्कमेच्या निधीला मान्यता प्राप्त आहे. त्यानुषंगाने छत्रपती संभाजीनगर शहरा मध्ये तीन ठिकाणी एम.आर.एफ.सेंटर्सच्या उभारणीसाठी मशिनरी पुरवठा करणे, मशिनरीची उभारणी करणे एक वर्ष वॉरंटीसह (स्थापत्य कामाशिवाय) या कामासाठी र.रु.3,34,88,400/- रक्कमेच्या अंदाज पत्रकास सर्वसाधारण सभा ठराव क्र.1706 दि.27.11.2024 प्रमाणे मान्यता घेण्यात आली आहे.

मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेनंतर जाहिर निविदा मागविण्यात आल्या असता, निविदेच्या दुसऱ्या वेळी 03 तांत्रिकदृष्ट्या पात्र निविदा प्राप्त झाल्या असुन निविदाधारकांनी सादर केलेले दर खालील प्रमाणे आहेत.

1. M/s Advanced Renewable Energy -- Rs.2,69,49,000/-
2. M/s New Sai Fiber -- Rs.3,30,00,000/-
3. M/s Meera Steel Fabrication and Fiber -- Rs.3,76,50,000/-

उपरोक्त प्रमाणे प्राप्त 03 निविदांपैकी M/s Advanced Renewable Energy यांची निविदा तुलनात्मक दृष्ट्या कमी दराची असुन ही निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा 19.52 टक्के कमी दराची आहे.

करीता न्युनतम दराची व अंदाजपत्रकीय दरापेक्षा 19.52 टक्के कमी दराची र.रु.2,69,49,000/- रक्कमेची M/s Advanced Renewable Energy यांची निविदा स्विकृत करण्यासाठी प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव क्रमांक 1901/2025:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहरात तीन ठिकाणी एम.आर.एफ.सेंटर्सच्या उभारणीसाठी मशिनरी पुरवठा करणे, मशिनरीची उभारणी करणे-एक वर्ष वॉरंटीसह (स्थापत्य कामाशिवाय) या कामासाठी न्युनतम दराची व अंदाजपत्रकीय दरापेक्षा 19.52 टक्के कमी दराची र.रु.2,69,49,000/- ची M/s Advanced Renewable Energy यांची निविदा स्विकृत करण्यास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1902/2025:-** **(आस्थापना -1 विभाग)** **(दि.02.05.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शासन निर्णय क्र.सफाई-2018/प्र.क्र.48/सआक, दि.24.02.2023 मधील अ.क्र.7 नुसार सफाई कामगारांच्या वारसांची शैक्षणिक अर्हता विचारात घेऊन त्या आधारे त्यांची नेमणुक वर्ग-4 किंवा वर्ग-3 मध्ये करावी अशी तरतुद आहे. मात्र वर्ग-3 चे पद उपलब्ध असल्यास व संबंधीत वारसाची इच्छा असल्यास त्याला प्राधान्याने वर्ग-3 च्या पदावर नियुक्ती करावी. तथापि वर्ग-3 चे पद रिक्त नसेल तर संबंधीत वारसास भविष्यात वर्ग-3 च्या रिक्त पदावर नियुक्ती मिळण्याच्या अधिन राहून वर्ग-4 मधील रिक्त पदावर वारसा हक्काने नियुक्ती द्यावी व तसे नियुक्ती आदेशात नमुद करावे अशी तरतुद आहे. या तरतुदीनुसार दि.16.09.2024 ते दि.21.03.2025 या कालावधीत गट-क ची शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या उमेदवारांना त्या त्या पदावर नियुक्ती देण्यात आलेली आहे. वास्तविक पाहता, अनुसूचित जाती प्रवर्गातील उमेदवार असल्याने अनुसूचित जातीच्या रिक्त पदावर तसेच विहित मर्यादेत नियुक्ती देणे आवश्यक होते. जे उमेदवार असल्याने वर्ग-3 च्या पदाची शैक्षणिक अर्हता धारण करतात त्यांना पदांच्या उपलब्धते अभावी सफाई कामगार या

पदावर नियुक्ती देणे आवश्यक आहे. भविष्यात वर्ग-3 मध्ये पदे उपलब्ध झाल्यानंतर ज्येष्ठतेनुसार व पदांच्या उपलब्धते प्रमाणे विहित मर्यादेत सदर उमेदवारांना त्यांच्या शैक्षणिक अर्हतेनुसार वर्ग-3 मधील पदावर नियुक्ती देणेबाबत समिती सदस्यांमध्ये चर्चा झाली.

नगर विकास विभागाचा शासन निर्णय दि.15.02.2021 अन्वये छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेचा आकृतीबंध मंजुर करण्यात आलेला आहे. तसेच नगर विकास विभागाचा शासन शासन निर्णय दि.26.08.2021 अन्वये महानगरपालिकेमधील अधिकारी/कर्मचाऱ्यांचे सेवा प्रवेश नियम मंजुर करण्यात आलेले आहेत. सेवा प्रवेश नियमानुसार सरळसेवा/नामनिर्देशन, पदोन्नती, प्रतिनियुक्ती द्वारे पदे भरण्याची तरतुद आहे. त्यातील सरळसेवा/नामनिर्देशनाद्वारे जी पदे भरावयाची आहेत त्यामध्ये गट-क मधील कार्यकारी व पर्यवेक्षकीय स्वरुपाची पदे वगळता इतर पदांवर अनुकंपा तत्वावर नियुक्ती देणे, लाड-पांगे समितीच्या शिफारशीनुसार नियुक्ती देणे यांचाही समावेश होतो.

सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय क्र.अकंपा-1221/प्र.क्र.186/का-8 दि.26.08.2021 नुसार अनुकंपा तत्वावर नियुक्तीची कार्यपध्दती दर्शविलेली आहे. सदर शासन निर्णयातील अ.क्र.3 (1) (ii) नुसार सरळसेवेने पद भरतीस मान्यता असणाऱ्या पदांपैकी प्रचलित पध्दती नुसार 20 टक्के अनुकंपा तत्वावर नियुक्तीची पदसंख्या निश्चित करावी असे नमुद आहे. तसेच सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय क्र.अकंपा-1219/प्र.क्र.56/आठ दि.22.12.2021 मधील अ.क्र.2 मध्ये सरळ सेवेच्या प्रतिवर्षी रिक्त पदांची संख्या निश्चित करुन त्याच्या 20 टक्के पदे अनुकंपा नियुक्तीद्वारे भरण्यात यावीत. असे नमुद आहे.

लाड-पांगे समितीच्या शिफारशीनुसार नियुक्ती देणेबाबतचा शासन निर्णय दि.24.02.2023 मधील अ.क्र.7 नुसार सफाई कामगारांच्या वारसांची शैक्षणिक अर्हता विचारात घेऊन त्याआधारे त्यांची नेमणुक वर्ग-4 किंवा वर्ग-3 मध्ये करावी. अशी तरतुद आहे. मात्र वर्ग-3 चे पद उपलब्ध असल्यास व संबंधीत वारसांची इच्छा असल्यास त्याला प्राधान्याने वर्ग-3 च्या पदावर नियुक्ती करावी. तथापि वर्ग-3 चे पद रिक्त नसेल तर संबंधीत वारसास भविष्यात वर्ग-3 च्या रिक्त पदावर नियुक्ती मिळण्याच्या अधिन राहून वर्ग-4 मधील रिक्त पदावर वारसा हक्काने नियुक्ती द्यावी व तसे नियुक्ती आदेशात नमुद करावे, अशी तरतुद आहे. तथापि, यामध्ये किती मर्यादेपर्यंत पदे भरावीत? याबाबत स्पष्टता नाही. त्यामुळे अनुकंपा प्रमाणे लाड-पांगे समितीच्या नियुक्तीच्या मर्यादा निश्चित करणे आवश्यक आहे.

लाड-पांगे समितीच्या शिफारशीनुसार किंवा अनुकंपा तत्वावर पदे भरल्यामुळे सरळसेवेने जाहिरातीद्वारे पदभरती करावयाची झाल्यास अनुसूचित जाती प्रवर्गात एकही पद उपलब्ध होऊ शकणार नाही, तसेच खुला प्रवर्गातल्या जागांवर देखिल लाड-पांगे व अनुकंपा तत्वावरील उमेदवारांना नियुक्ती दिल्यास खुला प्रवर्गात देखिल एकही जागा शिल्लक राहणार नाही. जाहिरातीद्वारे व परिक्षा देऊन सरळसेवेने सेवेत येणाऱ्या उमेदवारांवर ही बाब अन्याय करणारी आहे. परिणामी, सामाजिक असंतुलन निर्माण होऊ शकते. याबाबत दि.21.04.2025 रोजी झालेल्या निवड समितीने खालील प्रमाणे निर्णय घेतला आहे.

समितीचा निर्णय :-

1. दि.11.04.2025 रोजी झालेल्या निवड समितीच्या बैठकीत ठरल्याप्रमाणे यापुर्वी अनुसूचित जातीमध्ये पदे उपलब्ध नसल्याने ज्यांना खुला प्रवर्गातील गट-क च्या पदांवर नियुक्ती देण्यात आलेली आहे. त्यांना सफाई कामगार या पदावर नियुक्त करण्यात यावे. तथापि, अतिप्रदान रक्कमेची वसुली करण्यात येऊ नये. ज्येष्ठतेनुसार पदांच्या उपलब्धते प्रमाणे विहित मर्यादेत त्यांना टप्प्या टप्प्याने त्या-त्या जात प्रवर्गातील रिक्त होणाऱ्या गट-क च्या पदावर नियुक्ती देण्यात यावी.
2. अनुकंपा तत्वावर नियुक्ती करतांना सरळसेवेच्या रिक्त पदांच्या 20 टक्के इतक्या प्रमाणात पदावर नियुक्ती देण्यास मान्यता आहे. याच धर्तीवर लाड-पांगे समितीच्या शिफारशीद्वारे नियुक्त करण्यात येणाऱ्या कर्मचाऱ्यांना सरळसेवेच्या रिक्त पदांपैकी 20 टक्के इतक्या प्रमाणात शैक्षणिक अर्हतेच्या आधारावर नियुक्ती देणे संयुक्तीक व तर्कसंगत राहील. ही बाब पाहता, सरळसेवेद्वारे भरण्यात येणाऱ्या एकूण पदांमध्ये रिक्त असलेल्या पदांच्या 20 टक्के इतक्या मर्यादेत लाड-पांगे समितीच्या

शिफारशीनुसार त्या-त्या जात प्रवर्गातील गट-क मधील पदे भरावीत असाही निर्णय घेण्यात येत आहे.

3. जर अनुकंपा तत्वावर व लाड-पांगे समितीच्या शिफारशीनुसार नियुक्ती देण्यासाठी उपरोक्त प्रमाणे प्रस्तावित केलेल्या प्रमाणा प्रमाणे विशिष्ट शैक्षणिक अर्हता धारण केलेली नसल्यास किंवा अशा पदांवर नियुक्तीसाठी उमेदवार उपलब्ध होत नसतील तर त्या त्या वेळेस अशी रिक्त असलेली पदे जाहिरीतीद्वारे सरळसेवेने भरण्याबाबत प्रस्तावित करण्यात येतील.
4. उपरोक्त प्रमाणे प्रस्तावित केलेले प्रमाण हे दि.01 सप्टेंबर 2024 (चालु पदोन्नती वर्ष) पासून अंमलबजावणी करणे उचित राहील. तसेच प्रस्तावित केलेले प्रमाण हे केवळ गट-क मधील सरळसेवेच्या नियुक्ती साठीच्या पदांकरीताच लागू राहील.
5. वरील निर्णयानुसार सरळसेवेच्या मंजुर पदांपैकी रिक्त असलेल्या 20 टक्क्यांच्या मर्यादेत जे कर्मचारी अनुसूचित जातीमध्ये उपलब्ध असलेल्या गट-क मधील पदांवर नियुक्ती देण्यास पात्र आहेत ते वगळता जे कर्मचारी गट-क मधील खुला प्रवर्गातील पदांवर नियुक्त झाले आहेत अशा इतर सर्व कर्मचाऱ्यांना सफाई कामगार पदावर नियुक्ती देणेबाबत निर्णय घेण्यात आला.

करीता, वरील प्रमाणे निवड समितीने घेतलेल्या निर्णयांना मान्यतेसाठीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 1902/2025:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, निवड समितीने घेतलेल्या व प्रस्तावात दर्शविलेल्या निर्णयाची अंमल बजावणी करणेस मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1903/2025:-** **(उपविभाग यांत्रिकी विभाग)** **(दि.02.05.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभाग शासन निर्णय क्र. स्वमअ-2024/सीएन-853129 (25)/नवि-34 दि.04.10.2024 नुसार स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) 2.0 अंतर्गत छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेस कन्स्ट्रक्शन ॲण्ड डिमोलेशन (सी ॲण्ड डी) प्रोसेसिंग प्लॅन्ट उभारणी करण्यासाठी र.रु.11,30,66,835/-च्या निधीला मान्यता प्राप्त आहे. त्यानुषंगाने 100 टिपीडी क्षमतेच्या प्लॅन्टची यंत्रणा 01 वर्ष वॉरंटीसह पुरवठा करणे, उभारणी करणे (स्थापत्य कामा शिवाय) या कामासाठी र.रु.3,84,23,153/- च्या अंदाजपत्रकास मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.1723 दि.13.12.2024 नुसार मान्यता घेण्यात आली आहे.

मान्यता मिळाल्यानंतर 100 टीपीडी क्षमतेच्या प्लॅन्टची यंत्रणा 01 वर्ष वॉरंटीसह पुरवठा करणे, उभारणी करणे (स्थापत्य कामाशिवाय) या कामासारठी जाहीर निविदा मागविण्यात आल्या आहेत निविदेच्या दुसऱ्या वेळी एकमेव निविदा तांत्रिकदृष्ट्या पात्र ठरली असुन पात्र निविदाधारक मे.सी. एफ.एल.ओ.वर्ल्ड लि.यांनी र.रु.4,14,00,000/- दर सादर केले आहेत. सदरील दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा 7.74 टक्के जास्त असल्यामुळे एजन्सी अंदाजपत्रकीय दराने काम करण्यास तयार आहे का? अशी विचारणा लेखी पत्राद्वारे करण्यात आली. यावर निविदाधारक मे.सी.एफ.एल.ओ.वर्ल्ड लि.यांनी अंदाजपत्रकीय दराने अर्थात र.रु.3,84,23,153/- रक्कमेत काम करण्यास तयार असल्याचे पत्र सादर केले आहे.

निविदाधारक मे.सी.एफ.एल.ओ.वर्ल्ड लि.अंदाजपत्रकीय दराने काम करण्यास तयार असल्या मुळे 100 टीपीडी क्षमतेच्या प्लॅन्टची यंत्रणा 01 वर्ष वॉरंटीसह पुरवठा करणे, उभारणी करणे (स्थापत्य कामाशिवाय) या कामासाठी मे.सी.एफ.एल.ओ. वर्ल्ड लि. यांची अंदाजपत्रकीय दराची र.रु.3,84,23,153/- खर्चाची निविदा स्विकृत करणे योग्य होइल. करीता, प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 1903/2025:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, 100 टीपीडी क्षमतेच्या प्लॅन्टची यंत्रणा 01 वर्ष वॉरंटीसह पुरवठा करणे, उभारणी करणे (स्थापत्य कामाशिवाय) या कामासाठी मे.सी.एफ.एल.ओ.वर्ल्ड लि.यांची अंदाज पत्रकीय दराची र.रु.3,84,23,153/- खर्चाची निविदा स्विकृत करणेस मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1904/2025:-</u> (पीएमएवाय विभाग)** **(दि.02.05.2025)**

मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.1659 दि.11.10.2024 अन्वये सोडत प्रक्रियेकरीता एजन्सी नियुक्तीचा निर्णय पारीत झाला असुन आयुक्त, मनपा प्रस्ताव सादर करीत आहेत की, प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) घटक क्र.03 खाजगी भागीदारीद्वारे परवडणारे गृहनिर्माण (AHP) या अंतर्गत मौजे पडेगाव गट क्र.69 मौजे तिसगाव गट क्र.225/1, मौजे तिसगाव गट क्र.227/1, मौजे हर्सुल गट क्र.216, मौजे सुंदरवाडी गट क्र.9 च 10 येथील जागेवर प्रस्तावित असलेल्या गृहप्रकल्पांकरीता पारदर्शक पध्दतीने सोडत प्रक्रिया (Lottery System) राबवुन पात्र लाभार्थ्यांची निवड करुन पुढील आवश्यक अनुषंगिक कार्यवाही करणेकरीता खाजगी एजन्सीची नियुक्ती करणेची निविदा राबविण्यात आली असुन यामध्ये एकुण चार निविदा धारकांनी सहभाग नोंदविला होता. त्यानुसार सदर निविदा धारकांचा तांत्रिक प्रस्तावाचे मुल्यमापन करण्यात आले असुन त्याबाबतचा सविस्तर तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | निविदाकाराचे नाव | तांत्रिक मुल्यमापना अंती प्राप्त गुण | निविदा अटीशर्ती 1.5 a नुसार निविदाकाराचे वाणिज्य देकार उघडण्यास पात्र/अपात्र |
|---|---|---|---|
| 1. | Trust Fintech Limited | 53 | अपात्र |
| 2. | Enhanced Software Solutions Pvt.Ltd. | 62 | अपात्र |
| 3. | Probity Software Pvt.Ltd. | 98 | पात्र |
| 4. | Tech 9 Service | 56 | अपात्र |

निविदाधारकांच्या तांत्रिक प्रस्तावाच्या मुल्यमापनाअंती निविदा अटीशर्ती 1.5 a नुसार किमान 70% गुण प्राप्त करण्याऱ्या Probity Software Pvt.Ltd.या पात्र निविदाकाराचे वाणिज्य देकार बोली (Commercial Bid) CVC मार्गदर्शक तत्वानुसार दि.11.03.2025 रोजी उघडण्यात आली असुन ती खालील प्रमाणे आहे.

| Sr. No. | Description of Word/Item (S) | No.of Qty | Units | Probity Software Pvt.Ltd. (GSNT-NA) Bid ID 6453458 | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | Rate | Amount |
| 1.00 | Design,Development,Implementation of Software Application For online Registration, Application, Payment, Online Lottery Draw, Online Scrutiny Software of the Documents and post Lottery Software Application for successful and Waitlisted Application | 1.00 | Lump Sum | 20000000.00 | 20000000.00 |
| 2.00 | Certification by the standardization Testing and Quality Certification (STQC) and Performance Testing from Cert-in- Empaneled Agency. | 1.00 | Lump Sum | 1500000.00 | 1500000.00 |
| 3.00 | Updating and Uploading data of Verified beneficiaries on PMAY MIS Prortal | 11120.00 | Per Application | 850.00 | 9452000.00 |
| 4.00 | Cost of Providing Call Centre Agent | 1.00 | Per Agent Per Month | 40000.00 | 40000.00 |
| 5.00 | Supply of Manpower for Help Desk | 1.00 | Per Month | 40000.00 | 40000.00 |
| 6.00 | Providing data Centre/Data Recovery required for hosting the applications | 36.00 | Per Month | 150000.00 | 5400000.00 |
| 7.00 | Operation and Maintenance of Applications | 3.00 | Per Annum | 750000.00 | 2250000.00 |
| 8.00 | Preparing sale deed document andprocessing e-registration of sale deed (excluding registration charges and stamp duty) | 11120.00 | Per Application to be paid online by the applicant | 6500.00 | 72280000.00 |
| | Total in Figures | | | | 110962000.00 |

| | |
|---|---|
| Quoted in Words | Eleven crores nine lacks sixty two thousand only |

Probity Software Pvt.Ltd.यांनी ई-निविदा अंतर्गत दाखल केलेले उपरोक्त नमुद दर कमी करण्यासाठी निविदा मुल्यमापन समितीद्वारे दि.27.03.2025 रोजी वाटाघाटी करण्यात आल्या आहेत. उपरोक्त नमुद दरातील अ.क्र.8 मधील लाभार्थ्यांनी करावयाचे खरेदी खताचे (Sale Deed) E-Registration करणे साठीचे शुल्क र.रु.6500/- ऐवजी र.रु.6000/- दर दाखल केले असुन E-Registration लाभार्थ्यांना बंधनकारक नसल्याचे नमुद केले आहे. वाटाघाटी अंती Probity Software Pvt.Ltd.यांनी दाखल केलेल्या दरास निविदा मुल्यमापन समितीची मान्यता आहे.

तरी Probity Software Pvt.Ltd.यांना उपरोक्त नमुद कामासाठी एकत्रित (अ.क्र.1-7) करीता र.रु.3,91,22,000/- हे दर आणि अ.क्र.08 E-Registration करीता प्रति लाभार्थी र.रु.6000/- हे दर मंजुरीस्तव व Probity Software Pvt.Ltd.या एजन्सीची नियुक्ती करण्यास, करार करण्यास, प्रस्तावित कामे करण्यास, निविदा अटी/शर्तीनुसार रक्कम अदा करण्यास प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1904/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) घटक क्र.03 (AHP) या अंतर्गत मौजे पडेगाव गट क्र.69 मौजे तिसगाव गट क्र.225/1, मौजे तिसगाव गट क्र.227/1, मौजे हर्सुल गट क्र.216, मौजे सुंदरवाडी गट क्र.9 च 10 येथील जागेवर प्रस्तावित असलेल्या गृहप्रकल्पांकरीता पारदर्शक पध्दतीने सोडत प्रक्रिया (Lottery System) राबवुन पात्र लाभार्थ्यांची निवड करुन पुढील आवश्यक अनुषंगिक कार्यवाही करणे करीता Probity Software Pvt.Ltd.या एजन्सीची नियुक्ती करण्यास, करार करण्यास, प्रस्तावित कामे करण्यास, निविदा अटी/शर्ती व प्रस्तावात नमुद नुसार रक्कम अदा करण्यास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1905/2025:-</u> (पीएमएवाय विभाग)** **(दि.02.05.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) घटक क्र.4 वैयक्तिक स्वरुपात घरकुल बांधण्यास अनुदान (BLC) अंतर्गत 55 लाभार्थ्यांच्या सविस्तर प्रकल्प अहवालास (DPR) राज्यस्तरीय सनियंत्रण समिती (SLNA) म्हाडा, मुंबई तसेच केंद्र शासनाच्या केंद्रीय मान्यता व सनियंत्रण समिती (CSMC) च्या 60 व्या बैठकीत दि.30.03.2022 रोजी मंजुरी प्राप्त आहे. या डीपीआर करीता राज्य शासनाचे र.रु.0.55 कोटी व केंद्र शासनाचे र.रु.43.80, 10.20 लक्ष व 330 लक्ष अनुदान प्राप्त झालेले आहे. परंतु या डीपीआर मधील 09 लाभार्थ्यांनी बांधकाम परवानगी विभागात दाखल केलेली नाही. यापैकी 02 लाभार्थ्यांनी योजनेचा लाभ घेणे इच्छुक नसल्याबाबत लेखी कळविले आहे. उर्वरित लाभार्थ्यांकडे वर्तमानपत्रात जाहीर प्रगटन, Text Message, सुचनापत्र, दुरध्वनीद्वारे प्रत्यक्ष जागेवर जाऊन योजनेचा लाभ घेणेसाठी पाठपुरावा करण्यात आला आहे. तरी देखील त्यांनी बांधकाम परवानगीसाठी कागदपत्रे दाखल केलेले नाहीत. या लाभार्थ्यांना प्रधानमंत्री आवास योजनेच्या सविस्तर प्रकल्प अहवाल यादीमधुन त्यांचे नाव वगळण्यात येत असल्याचे सुचना पत्राद्वारे कळविण्यात आले आहे. यानुसार 09 लाभार्थी वगळून 46 लाभार्थ्यांचा सुधारीत प्रकल्प अहवाल (Curtailment DPR) तयार करण्यात आला आहे.

सदर डीपीआर नगर परिषद प्रशासन संचालयनालय (DMA) मार्फत सक्षम समितीच्या मान्यतेसाठी सादर करणे आहे. करीता मुळ डीपीआर 55 लाभार्थ्यांपैकी 09 लाभार्थी वगळता 46 लाभार्थ्यांचा (Curtailment DPR) शासनास पाठविणे करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेत मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1905/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) घटक क्र.4 वैयक्तिक स्वरुपात घरकुल बांधण्यास अनुदान (BLC) अंतर्गत 55 लाभार्थ्यांच्या मंजुर डीपीआर मधुन 09 लाभार्थी कमी करुन उर्वरित 46 लाभार्थ्यांचा (Curtailment DPR) नगर परिषद प्रशासन संचालयनालय (DMA) मार्फत सक्षम समितीकडे मंजुरीस्तव सादर करणेसाठी मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1906/2025:-</u> (झोन क्र.09 विभाग)** **(दि.02.05.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री.बाप्पासाहेब रामराव जगदाळे, अधिक्षक, झोन क्र.09 छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका, यांच्या (Angioplasty) या आजारावर ओरिऑन केअर सुपर स्पेशालिटी हॉस्पीटल, छत्रपती संभाजीनगर येथे उपचार केलेला असुन उपचारासाठी एकुण र.रु.2,53,296/- इतका खर्च केलेला आहे.

तथापि, संबंधीताने उपचार केलेले रुग्णालय ओरिऑन केअर सुपरस्पेशालिटी हॉस्पीटल हे महाराष्ट्र शासन निर्णय क्र.सार्वजनिक आरोग्य विभाग क्र.2011/प्र.क्र.33/11/राकावि-2, मंत्रालय, मुंबई-32 दि.16.11.2011 अन्वये जारी केलेल्या परिशिष्ट-अ शासकीय कर्मचारी व त्यांच्या कुटूंबीयांनी खाजगी रुग्णालयात घेतलेल्या गंभीर व विशिष्ट खर्चावरील शासकीय रुग्णालयाच्या अद्यावत यादीत सदरच्या रुगणालयाचे नाव समाविष्ठ नाही.

सदरच्या प्रस्तावास पडताळणी करुन वैद्यकीय प्रतिपुर्तीसाठी आरोग्य वैद्यकीय अधिकाऱ्यांनी र.रु.1,00,000/- च्या 5% रक्कम मनपा फंडात जमा करण्यात येऊन उर्वरित र.रु.95,000/- संबंधीतास अदा करणेबाबत शिफारस केलेली आहे.

करीता, श्री.बाप्पासाहेब रामराव जगदाळे, अधिक्षक, झोन क्र.09 छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांना प्रत्यक्ष अनुज्ञेय र.रु.95,000/- (अक्षरी रक्कम रुपये पंच्च्यान्नव हजार फक्त) वैद्यकीय खर्चास मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1906/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.बाप्पासाहेब रामराव जगदाळे, अधिक्षक, झोन क्र.09 छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांना प्रत्यक्ष अनुज्ञेय र.रु.1,00,000/- च्या 5% र.रु.5000/-इतकी रक्कम मनपा फंडात जमा करुन देय र.रु.95,000/- (अक्षरी रक्कम रुपये पंच्च्यान्नव हजार फक्त) वैद्यकीय खर्चास मान्यता देण्याबाबतचा प्रस्तावास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1907/2025:-</u> (यांत्रिकी विभाग)** **(दि.06.05.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, छत्रपती संभाजीनगर शहरातील मान्सुनपुर्व नालेसफाई करण्यासाठी 03 पोकलेन मशिन्स-210 व 06 ट्रॅक्टर्स दररोज 08 तास प्रमाणे 40 दिवसांसाठी किरायाने घेण्याकरीता र.रु.47,01,120/- (जीएसटीसह) रक्कमेच्या अंदाजपत्रकास मा.स्थायी समिती सभा विषय क्र.1895 दि.21.04.2025 अन्वये मान्यता घेण्यात आली आहे. अंदाजपत्रकास मान्यता मिळाल्यानंतर 18% जीएसटी वगळून (निविदा र.रु.39,84,000/-) अल्प मुदतीची जाहिर निविदा मागविण्यात आल्या असता, निविदेच्या पहिल्या वेळी र03 निविदा तांत्रिकदृष्ट्या पात्र ठरल्या आहेत. पात्र निविदाधारकांची व्यापारी निविदा उघडण्यात आली असता खालीलप्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| अ.क्र. | एजन्सीचे नाव | प्राप्त दर |
|---|---|---|
| 1. | मे.न्यु साधना इंजि.वर्क्स | र.रु.39,80,016/- |
| 2. | मे.तिरुपती इलेक्ट्रिकल्स सेल्स ॲण्ड सर्व्हिसेस | र.रु.40,43,760/- |
| 3. | मे.ॲक्टीव्ह मोटर्स | र.रु.41,43,360/- |

उपरोक्त नुसार मे.न्यु साधना इंजिनिअरिंग वर्क्स यांची निविदा तुलनात्मकदृष्ट्या कमी दराची प्राप्त झाली असुन ती अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा र.रु.3984/- (0.1%) ने कमी दराची आहे. त्यामुळे त्यांची निविदा स्विकृत करणे योग्य होईल.

करीता, छत्रपती संभाजीनगर शहरातील मान्सुनपुर्व नालेसफाई करण्यासाठी 03 पोकलेन मशिन्स-210 व 06 ट्रॅक्टर्स दररोज 08 तास प्रमाणे 40 दिवसांसाठी किरायाने घेण्याकरीता मे.न्यु साधना इंजिनिअरिंग वर्क्स यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 0.1% कमी दराची र.रु.39,80,016/- खर्चाची (जीएसटी शिवाय) निविदा स्विकृत करणे बाबत प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1907/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहरातील मान्सुनपुर्व नालेसफाई करण्यासाठी 03 पोकलेन मशिन्स -210 व 06 ट्रॅक्टर्स दररोज 08 तास प्रमाणे 40 दिवसांसाठी किरायाने घेण्याकरीता मे.न्यु साधना

इंजिनिअरिंग वर्क्स यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 0.1% कमी दराची र.रु.39,80,016/- खर्चाची (जीएसटी शिवाय) निविदा स्विकृती करण्यास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1908/2025:-** **(कार्य.अभि.ड्रेनेज विभाग)** **(दि.07.05.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या स्थापत्य विषयक कामात जसे की, रस्ते, पुल व इमारतींच्या संकल्पनांसाठी, बांधकामासाठी अपुऱ्या तांत्रिक कर्मचारी संख्येमुळे अथवा काही प्रसंगी गुंतागुंतीचे तांत्रिक प्रश्न, आधुनिक तंत्रज्ञानाची गरज, पर्यावरण विषयक अभ्यास व तत्सम बाबी, सुसाध्यतेची पडताळणी, संशोधनात्मक अभ्यास तसेच खाजगीकरणातुन करावयाच्या प्रकल्पांसाठी कायदे विषयक, अर्थविषयक अन्वेषन अशा बाबींसाठी सल्लागार किंवा तज्ञ नेमण्याची आवश्यकता भासते. त्यानुषंगाने विषय क्र.902/2023 दि.08.08.2023 नुसार ठराव क्र. 1442/2024 दि.25.06.2024 ठराव क्र.1477/2024 दि.10.07.2024 व ठराव क्र.1621/2024 दि.01.10.2024 अन्वये नियुक्ती बाबत ठराव मंजुर करण्यात आले आहेत.

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेने शासन निर्णयातील 2.1.1 सर्वसाधारण सल्लागार सेवा साठी महापालिका कार्यक्षेत्रासाठी नामिका प्रवेशाकरीता (Empanelment) सल्लागारांकडून जाहीर प्रस्तावाद्वारे विहित नमुन्यात माहिती मागवून वर्गनिहाय सल्लागार सुची तयार करण्यासाठी निविदा सुचना क्र.2023_AMCA_918785_1 अन्वये महानगरपालिकेस आवश्यक असलेल्या खालील 10 बाबींसाठी पीएमसी/आर्किटेक्ट व इतर सल्लागार/तज्ञांची नियुक्ती पाच वर्षासाठी करण्याकरीता RFQ निविदा मागविण्यात आल्या होत्या.

| Sr.No. | Consultancy Services |
|---|---|
| 11. | Structural Designer (Building) |
| 12. | Structural Designer (Road) |
| 13. | Road/Bridge Survey, Design Drawing leveling and surveying Expert |
| 14. | Architect |
| 15. | Landscaping designer, Gardening Horticulture |
| 16. | Mechanical,Electrical and Plumbing (MEP) & Heating, Ventilation & Air Conditioning (HVAC) Consultant |
| 17. | Green Building Consultants With Rainwater Harvesting |
| 18. | Water supply, Sanitary and seweage treatement consultant |
| 19. | H.A.M./P.P.P.Project Specialist/Annuity/Annuity & Toll/V.G.F. Consultant |
| 20. | Quantity surveyand valuer Expert |

यासाठी मागविण्यात आलेल्या निविदेच्या अनुषंगाने व तद्नंतर प्राप्त प्रस्तावांबाबत निविदतील अटी शर्तीनुसार छाननी करुन त्या-त्या सर्व्हिसेससाठी नियुक्त करण्यात आलेल्या कन्सलटंटची संख्या खालील प्रमाणे आहे.

| Sr. No. | Consultancy Service | ठराव क्र.902/2023 दि.08.08.2023 अन्वये नियुक्त | ठराव क्र.1442/2024 दि.25.06.2024 अन्वये नियुक्त | ठराव क्र.1477/2024 दि.10.07.24 अन्वये नियुक्त | ठराव क्र.1621/2024 दि.01.10.2024 अन्वये नियुक्त |
|---|---|---|---|---|---|
| 11. | Structural Designer (Building) | 10 | 1 | -- | -- |
| 12. | Structural Designer (Road) | 9 | 1 | -- | -- |
| 13. | Road/Bridge Survey, Design Drqwing Levelling snd Sruveying Expert | 21 | 1 | -- | -- |
| 14. | Architect | 27 | 4 | 1 | 2 |
| 15. | Landscaping Designer, Garadeninig | 16 | 1 | -- | -- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | Horticulture | | | | |
| 16. | Mechanical, Electrical and Plumbing (MEP) & Heating, Ventilation & Air Conditioning | 06 | 0 | -- | -- |
| 17. | Green Building Consultants with Rainwater Harvesting | 02 | 1 | -- | -- |
| 18. | Water Supply, Sanitary and Sewage Treatment Consultant | 14 | 0 | -- | -- |
| 19. | H.A.M./P.P.P. Project Specialist/Annuity/ Annuity & Toll/V.G.F. Consultant | 06 | 0 | -- | -- |
| 20 | Quantity Survey and Valuer Expert | 15 | 0 | -- | -- |

सदर पात्र ठरलेल्या प्रकल्प सल्लागारांच्या नियुक्तीस ठराव क्र.902/2023 दि.08.08.2023 ठराव क्र.1442/2024 दि.25.06.2024 ठराव क्र.1477/2024 दि.10.07.2024 व ठराव क्र.1621/ 2024 दि.01.10.2024 नुसार मंजुरी प्राप्त झाल्यानंतर या प्रकल्प सल्लागारांना नियुक्तीचे पत्र देण्यात आली आहेत. परंतु त्यानंतर खालील प्रमाणे प्रकल्प सल्लागार सुचीमध्ये समाविष्ठ करण्या करीता विनंती अर्ज सादर केला आहे

| Sr. No. | अर्जदाराचे नाव | वर्ग |
|---|---|---|
| 1. | Space Architect Interior Designer (आर्की, गणेश म्हारोळकर) | आर्किटेक्ट |
| 2. | ग्रीनलँड ग्रुप, पुणे | iii Landscape Designer, Gardening Horticulture<br>iv आर्किटेक्ट |
| 3. | Ingrain Mumbai | आर्किटेक्ट |
| 4. | सय्यद ताहेरुद्दीन बियाबानी | सर्व्हेयर |
| 5. | बियाबानी ॲण्ड असोसिएट्स | आर्किटेक्ट |

करीता उपरोक्त अर्जदारांचा अनुभव लक्षात घेऊन त्यांना महानगरपालिकेमार्फत येणाऱ्या विविध प्रकल्पांसाठी प्रकल्प सल्लागार सुचीमध्ये समाविष्ट करणे योग्य वाटते. यापूर्वीच्या मंजुर ठरावा नुसार सल्लागारांची कन्सल्टन्सी चार्जेस म्हणुन Pre Tender Activity साठी Project Cost च्या 0.60% व Post tender Activity साठी Project Cost च्या 0.90% असे एकुण Project Cost च्या 1.50% च्या मर्यादत शुल्क अदा करण्यात येतील. करीता छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या सल्लागारांची निवडसूचीत Space Architect Interior Designer (आकी. गणेश म्हारोळकर), Ingrain, Mumbai व बियाबानी ॲण्ड असोसिएट्स यांची आर्कीटेक्ट स्वरुपाने, ग्रीनलैंड ग्रुप, पुणे यांची आर्कीटेक्ट आणि Landscape Designer, Gardening Horticulture स्वरुपाने तसेच सय्यद ताहेरुद्दीन बियाबानी यांची सर्व्हेयर म्हणून समावेश करण्यास मान्यतेचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1908/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, उपरोक्त नमुद केल्यानुसार उपरोक्त अर्जदारांचा अनुभव लक्षात घेऊन त्यांना महानगरपालिकेमार्फत येणाऱ्या विविध प्रकल्पांसाठी प्रकल्प सल्लागार सुचीमध्ये समाविष्ट करणे योग्य वाटते. यापूर्वीच्या मंजुर ठरावानुसार सल्लागारांची कन्सल्टन्सी चार्जेस म्हणून Pre Tender Activity साठी Project Cost च्या 0.60% व Post tender Activity साठी Project Cost च्या 0.90% असे एकुण Project Cost च्या 1.50% च्या मर्यादित शुल्क अदा करण्यात येतील. करीता छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या सल्लागारांची निवडसुचीत Space Architect Interior

Designer (आर्की, गणेश म्हारोळकर), Ingrain, Mumbai व बियाबानी ॲण्ड असोसिएट्स यांची आर्कीटेक्ट स्वरुपाने, ग्रीनलँड ग्रुप, पुणे यांची आर्किटेक्ट आणि Landscape Designer, Gardening Horticulture स्वरुपाने तसेच सय्यद ताहेरुद्दीन बियाबानी यांची सर्व्हेयर म्हणून समावेश करण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1909/2025:-</u> (कार्यकारी अभियंता रस्ते विभाग)** **(दि.08.05.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शासन निर्णय क्र.सिआयडी-3324/प्र.क्र.231/नवि-10 दि.05.02.2025 नुसार केंद्र शासनाच्या 'राज्यांना भांडवली गुंतवणुकीसाठी विशेष सहाय्य 2024-25 या योजनेच्या भाग-5 औद्यागिक वाढीसाठी चालना' अंतर्गत राज्य शासनास भांडवली गुंतवणुक प्रकल्पांसाठी 50 वर्षाच्या बिनव्याजी कर्जाच्या स्वरुपात विशेष आर्थिक सहाय्य प्रदान करण्यात येऊन महानगरपालिका क्षेत्रात विविध कॉँक्रीट/डांबरी रस्त्यांची कामे करण्यासाठी केंद्र शासनाकडून छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेस र.रु.40.00 कोटी निधी मंजुर करण्यात आला असून निधी वितरित करण्यास सदर शासन निर्णयाव्दारे मान्यता प्रदान करण्यात आली आहे. परंतु नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासनाचे दि.29.04.2025 रोजीच्या पत्रान्वये उक्त नमूद शासन निर्णयानुसार वितरित करण्यात आलेल्या र.रु.40.00 कोटी निधीचे एकत्र उपयोगिता प्रमाणपत्र (Utilization Certificate) तातडीने शासनास सादर करणे बाबत कळविले आहे.

यापुर्वी छत्रपती संभाजीनगर शहरातील विकसित करावयाच्या आवश्यक रस्ते कामांची निविदा प्रक्रिया करण्यात आली असून यापैकी सद्यास्थितीत काही कामे पूर्ण झालेली असून काही कामे अंतिम टप्प्यात आहेत. तसेच महानगरपालिका अर्थसंकल्पातील भांडवली खर्च या लेखाशिर्ष अंतर्गत इतर विकास कामे पूर्ण करण्यात आली आहे. या अनुषंगाने आज पावेतो झालेल्या कामांचे धावते व दरम्यानचे देयके मंजुरीस्तव प्रस्तावित करण्यात आलेली आहे. परंतू महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती चांगली नसल्यामुळे संबंधीत कंत्राटदारांना सदर देयक अदा करण्यास अडचण निर्माण होत आहे.

सबब, उक्त नमूद शासन निर्णयानुसार व नगर विकास विभागाच्या पत्रानुसार तातडीने उपयोगिता प्रमाणपत्र (Utilization Certificate) सादर करणे आवश्यक असल्याने महानगरपालिकेस प्राप्त झालेल्या र.रु.40.00 कोटी शासन निधीतून वरील नमूद महानगरपालिका फंडातून/महानगरपालिका अर्थसंकल्पातील भांडवली खर्च या लेखाशिर्ष अंतर्गत झालेल्या व अंतिम टप्प्यात असलेल्या कामांची प्रलंबित देयके अदा करणे व त्याप्रमाणे शासनास उपयोगिता प्रमाणपत्र (Utilization Certificate) सादर करणे बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर आहे.

**<u>ठराव क्रमांक 1909/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, नमूद शासन निर्णयानुसार केंद्र शासनाच्या 'भांडवली गुंतवणुकी साठी राज्यांना विशेष सहाय्य 2024-25 या योजनेच्या भाग-5 औद्योगिक वाढीसाठी चालना अंतर्गत महानगरपालिका क्षेत्रात विविध कॉँक्रीट/डांबरी रस्त्यांची कामे करण्यासाठी छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेस र.रु.40.00 कोटी निधी मंजुर करण्यात आला असून निधी वितरित करण्यास मान्यता प्रदान करण्यात आली आहे. परंतु नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासनाचे दि.29.04.2025 रोजीच्या पत्रान्वये उक्त नमूद शासन निर्णयानुसार वितरित करण्यात आलेल्या र.रु.40.00 कोटी निधीचे एकत्र उपयोगिता प्रमाणपत्र (Utilization Certificate) तातडीने शासनास सादर करणे बाबत कळविले आहे.

तसेच महानगरपालिकेची आर्थिक स्थिती पाहता यापुर्वी महानगरपालिका फंडातून/ महानगरपालिका अर्थसंकल्पातील भांडवली खर्च या लेखाशिर्ष अंतर्गत झालेल्या व अंतिम टप्पयात असलेल्या कामांची प्रलंबित देयके अदा करण्यास अडचण निर्माण होत असल्याचे नमूद आहे.

करीता, प्रस्तावात नमूद शासन निर्णयानुसार महानगरपालिकेस प्राप्त झालेल्या र.रु.40.00 कोटी शासन निधीतून वरील नमूद महानगरपालिका फंडातून/महानगरपालिका अर्थसंकल्पातील भांडवली खर्च या लेखाशिर्ष अंतर्गत झालेल्या व अंतिम टप्प्यात असलेल्या कामांची प्रलंबित देयके अदा करण्यास मान्यता प्रदान करण्यात येते व त्याप्रमाणे शासनास उपयोगिता प्रमाणपत्र (Utilization

Certificate) सादर करण्यास मान्यता प्रदान करण्यात येते. तसेच तद्नुषंगाने पुढील कार्यवाही करण्याचे व त्यासाठी आवश्यक सर्व बाबींचा निर्णय घेण्याचे संपूर्ण अधिकार आयुक्तांना प्रदान करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1910/2025:-** **(कार्यकारी अभियंता रस्ते विभाग)** **(दि.08.05.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, छत्रपती संभाजीनगर शहर व लगतच्या भागामध्ये वाढती नागरी वसाहत व त्या प्रमाणात वाढती रहदारी लक्षात घेता, रस्ते विकसित करणे आवश्यक आहे. यामुळे जुने शहर व शहरालगत विकसित होणाऱ्या भागांमध्ये रस्त्यांच्या माध्यमातून सुलभ व सुरळीत वाहतुकीस फायदा होणार आहे.

या अनुषंगाने शहरातील सातारा परिसर, कांचनवाडी, पडेगाव, मिटमिटा इत्यादी भागातील महत्वाच्या एकूण 08 रस्त्यांची यादी तयार करण्यात आली आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजीत खर्च (रु.कोटी) |
|---|---|---|
| 1. | मुंबई हायवेलगत चिनार गार्डन ते भावसिंगपूरा दक्षिण भागातील गट नं.27 पर्यंत रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीट करणे. | 7,64,40,711.00 |
| 2. | मिटमिटा येथील गट नं.148 ते गट नं.263 पर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण करणे. | 8,98,29,982.00 |
| 3. | मिटमिटा भागातील गट नं.138, 139 व 155 येथील रस्त्याचे डांबरी करण करणे. | 5,01,75,837.00 |
| 4. | गट नं.42 कांचनवाडी गावठाण ते गट नं.55 कांचनवाडी मनपा हद्दी पर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करणे. | 7,40,38,370.00 |
| 5. | वार्ड क्र.115 सातारा अंतर्गत बीड बायपास अथर्व क्लासिक ते संग्राम नगर पुलापर्यंत रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीट करणे. | 6,79,75,581.00 |
| 6. | शेळी मेंढी पालन ते गट क्र.62 पडेगाव ते गट क्र.63 पडेगाव (L Shape) पर्यंत डांबरी रस्ता तयार करणे. | 7,95,59,191.00 |
| 7. | गट क्र.47 पडेगाव ते गट क्र.61 पडेगाव ते 59 पडेगाव (L Shape) पर्यंत डांबरी रस्ता तयार करणे. | 5,01,28,955.00 |
| 8. | पडेगाव सबस्टेशन ते सफारी पार्क या 30 मी.रुंद विकास योजना रस्त्याचे कॉंक्रीट करणे, | 14,18,80,359.00 |
| | **एकुण** | **63,00,28,986.00** |

उक्त नमूद रस्ते कॉंक्रीट/डांबरी पध्दतीने विकसित करणेकरीता अंदाजे र.रु.63.01 कोटी निधी ची आवश्यकता असून केंद्र शासनाच्या राज्यांना भांडवली खर्चासाठी विशेष सहाय्य योजना 2025-26 अंतर्गत शासनाकडून निधी उपलब्धतेच्या अधीन राहून सदर रस्त्यांची कामे करण्याचे नियोजन आहे. तसेच मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.902/2023 दि.08.08.2023 अन्वये महानगरपालिका पॅनलवर नियुक्त प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांचे मार्फत प्रथम प्राधान्याने करावयाच्या रस्ते कामांचा विस्तृत प्रकल्प अहवाल मंजूर शासन निधीच्या मर्यादेत तयार करण्याचे नियोजन आहे.

करीता, उपरोक्त प्रमाणे छत्रपती संभाजीनगर शहर व लगतच्या भागातील एकूण 08 रस्ते डांबर /कॉंक्रीटव्दारे विकसित करणेकरीता र.रु.63.01 कोटी केंद्र शासनाच्या राज्यांना भांडवली खर्चासाठी विशेष सहाय्य योजना 2025-26 अंतर्गत निधी प्राप्त होण्यासाठी महाराष्ट्र शासनाकडे मंजूरीसाठी पाठविणे करीता मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर आहे.

**ठराव क्रमांक 1910/2025:-**

प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे, छत्रपती संभाजीनगर शहर व लगतच्या भागातील एकूण 08 रस्ते डांबर/कॉंक्रीटव्दारे विकसित करणेच्या कामांकरीता केंद्र शासनाच्या राज्यांना भांडवली खर्चासाठी विशेष सहाय्य योजना 2025-26 अंतर्गत निधी उपलब्धतेसाठी शासनास प्रस्ताव सादर करणे, मंजूर शासन निधीच्या मर्यादत महानगरपालिका पॅनलवर नियुक्त प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांचे मार्फत

विस्तृत प्रकल्प अहवाल तयार करणे व तद्नुषंगीक पुढील कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1911/2025:- (यांत्रिकी वाहने विभाग)** **(दि.14.05.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, अग्निशमन विभागाच्या सक्षमीकरणाच्या दृष्टीकोनातुन वाहने खरेदीच्या संदर्भाने दि.11.04.2025 रोजी बैठक संपन्न झाली. त्यानुषंगाने मुख्य अग्निशमन अधिकारी यांनी खालील प्रमाणे वाहने/मशिनरी खरेदी करुन देण्याचे कळविले आहे.

| अ.क्र. | वाहनाचा प्रकार | संख्या |
|---|---|---|
| 1. | फायर टेंडर (2000 लि) | 02 |
| 2. | फायर टेंडर (5500 लि) | 06 |
| 3. | फायर टेंडर (8500 लि) | 02 |
| 4. | फोम टेंडर (5000 + 500 लि.) | 02 |
| 5. | रेस्क्यु टेंडर | 01 |
| 6. | क्विक रिस्पॉन्स व्हेईकल | 02 |
| | **एकुण** | **15** |

सदरील वाहने व मशिनरी जीईएम पोर्टलवर उपलब्ध नसल्याने ही वाहने खरेदी करण्यासाठी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन विविध वाहने उत्पादक कंपन्यांकडून दरपत्रके मागविण्यात आले असता, ती दरपत्रके खालील प्रमाणे आहेत.

| अ क्र | वाहनाचा प्रकार | संख्या | मे.हायटेक सर्व्हीसेस | मे.बिजबासी फायर सिस्टीम प्रा.लि. | मे.वाडीया बॉडी बिल्डर्स | मे.देवी फायर सर्व्हीसेस | मे.दत्त मोटर बॉडी बिल्डर्स |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | फायर टेंडर (2000 लि.) | 02 | 97,91,280/- | 1,06,20,000/- | 1,15,56,000/- | 1,52,22,000/- | 1,49,86,000/- |
| 2. | फायर टेंडर (5500 लि.) | 06 | 1,46,84,240/- | 1,56,94,000/- | 1,84,08,000/- | 2,57,24,000/- | 2,56,06,000/- |
| 3. | फायर टेंडर (8500 लि.) | 02 | ---- | 1,77,00,000/- | 2,00,60,000/- | 2,60,78,000/- | 2,59,60,000/- |
| 4. | फोम टेंडर (5000+500 लि.) | 02 | 1,53,21,440/- | 1,57,76,600/- | 1,94,70,000/- | 2,56,06,000/- | 2,19,00,000/- |
| 5. | रेस्क्यु टेंडर | 01 | 5,99,25,440/- | 2,50,04,200/- | 5,95,00,000/- | 7,06,82,000/- | 7,04,46,000/- |

| **अ. क्र.** | **वाहनाचा प्रकार** | **संख्या** | **मे.आर्यन पंप्स ॲण्ड इन्व्हायरो सोल्युशन्स प्रा.लि.** | **मे.नागेश्वर कार्पोरेशन** | **मे.ओम गणेश इंजिनिअरींग वर्कस** |
|---|---|---|---|---|---|
| 1. | क्विक रिस्पॉन्स व्हेईकल | 02 | 1,56,42,000/- | 1,66,06,000/- | 1,75,55,097/- |

उपरोक्त प्राप्त दरपत्रकातुन न्युनतम दराचे दरपत्रके ग्राह्य धरुन त्यानुषंगाने अंदाजपत्रक तयार केले असता, ते खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | वाहनाचा प्रकार | संख्या | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1. | फायर टेंडर (2000 लि) | 02 | 97,91,280/- | 1,95,82,560.00 |
| 2. | फायर टेंडर (5500 लि) | 06 | 1,46,84,240/- | 8,81,05,440.00 |
| 3. | फायर टेंडर (8500 लि) | 02 | 1,77,00,000/- | 3,54,00,000.00 |
| 4. | फोम टेंडर (5000 + 500 लि.) | 02 | 1,53,21,440/- | 3,06,42,880.00 |
| 5. | रेस्क्यु टेंडर | 01 | 2,50,04,200/- | 2,50,04,200.00 |
| 6. | क्विक रिस्पॉन्स व्हेईकल | 02 | 1,56,42,000/- | 3,12,84,000.00 |
| | **एकुण** | **15** | | **23,00,19,080.00** |

उपरोक्त प्रमाणे अग्निशमन विभागाच्या बळकटीकरणासाठी विविध प्रकारची 15 वाहने व मशिनरी खरेदी करण्यासाठी र.रु.23,00,19,080/- खर्च अपेक्षित आहे.

तथापि, सद्यस्थितीत “अग्निशनम वाहने खरेदी” या लेखाशिर्षात र.रु.20.00 कोटी तरतुद आहे. अर्थसंकल्पाच्या आठ माही आढाव्यामध्ये वाढीव तरतुद समाविष्ठ करण्याच्या अधिन राहून र.रु.23,00,19,080/- रक्कमेचे अंदाजपत्रक मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर. अंदाज पत्रकास मान्यता मिळाली तर महा-टेंडरद्वारे जाहिर निविदा मागवुन सदरील वाहने खरेदी करण्याची प्रक्रिया राबविण्यात येईल.

**<u>ठराव क्रमांक 1911/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अग्निशमन विभागाच्या बळकटीकरणा साठी विविध प्रकारची 15 वाहने/मशिनरी “अग्निशनम वाहने खरेदी” या लेखाशिर्षातून खरेदी करण्यास व त्यासाठी अपेक्षित र.रु.23,00,19,080/- रक्कमेच्या अंदजपत्रकास अर्थसंकल्पाच्या आठ माही आढाव्यामध्ये वाढीव तरतुद समाविष्ठ करण्याच्या अधिन राहून मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1912/2025:-</u> (कार्यकारी अभियंता पा.पु विभाग)** **(दि.16.05.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शहर पाणी पुरवठा योजनेअंतर्गत फारोळा येथे 100 व 56 दलली प्रतिदिन क्षमतेचे दोन जलशुध्दीकरण केंद्र असुन या दोन्ही जलशुध्दीकरण केंद्रात दररोज 150 दलली पाण्यावर प्रक्रिया केली जाते. तसेच 56 दलली योजनेच्या पुनरुज्जीवन अंतर्गत 20 दलली पाणी परिमाण वाढलेले असल्याने फारोळा येथे जलशुध्दीकरण केंद्रात दररोज 170 दलली पाण्यावर प्रक्रिया केली जाते. जलशुध्दीकरण प्रक्रियेत प्रामुख्याने तुरटी, ब्लिचींग पावडर व क्लोरीन गॅस चा वापर विविध टप्प्यांवर केला जातो. अशुध्द पाण्यात गढुळतेचे प्रमाण जास्त असते. पाण्यातील गढुळता कमी करण्यासाठी प्रामुख्याने तुरटी ग्रेड-1 चा वापर केला जातो. जायकवाडी उद्भवावरुन येणाऱ्या पाण्यात गढुळतेचे प्रमाण कमी असते. तथापि, सरासरी 10 पीपीएम इतकी तुरटी मात्रा वर्षभर द्यावी लागते. पावसाळ्याच्या दिवसात धरणात नवीन पाण्याची आवक वाढल्यानंतर पाण्याच्या गढुळतेत प्रचंड वाढ होते. त्यावेळेस तुरटीची मात्रा वाढवावी लागते. या सर्व बाबींचा विचार करता फारोळा जलशुध्दीकरण केंद्राची 6 महिन्यांची मागणी ही 510 मे टन इतकी आहे.

पाणी पुरवठा विभागाने प्रायोगिक तत्वावर तुरटी ग्रेड-1 ऐवजी द्रवरुप तुरटी ग्रेड-5 चा वापर करण्यासाठी 110 मे. टनाची निविदा कार्यवाही पूर्ण केली असून पुरवठा प्रगतीपथावर आहे. घनरुप तुरटी ऐवजी द्रवरुप तुरटीचा वापर ठरावीक कालावधीत फायदेशिर ठरल्यास द्रवरुप तुरटी पुरवठ्याचे सविस्तर अंदाजपत्रक सादर करण्यात येईल. यामुळे वार्षिक तुरटी पुरवठ्याऐवजी 6 महिन्याकरीता आवश्यक असलेल्या पुरवठ्याच्या या अंदाजपत्रकात समावेश करण्यात आलेला आहे.

सदरील कामाचे अंदाजपत्रक मजिप्रा मंडळाच्या सन 2023-24 च्या दरसुचीतील साहित्य पुरवठ्याच्या दरानुसार तयार केले असून अंदाजपत्रकीय र.रु.51,93,534/- इतकी आहे. सदरील कामाचा खर्च पाणी पुरवठा रसायन खरेदी या लेखाशिर्षकातुन प्रस्तावीत करण्यात आला आहे. सदरील प्रस्तावास मा.सर्वसाधारण समेने विषय क्र.1779/2025 दि.22.01.2025 अन्वये मान्यता प्रदान केलेली आहे.

सदरील कामाची ई-निविदा कार्यवाही केली असता निविदा कार्यवाहीचा तपशील खालीलप्रमाणे

संदर्भ : टेंडर आय.डी.क्र.2025_AMCA_1143418_1

| | | |
|---|---|---|
| 1. | खात्याचे नाव | कार्यकारी अभियंता (पाणीपुरवठा विभाग) |
| 2. | कामाचे स्वरुप | शहर पाणी पुरवठा योजना फारोळा जलशुध्दीकरण केंद्रा करोता तुरटी ग्रेड-1 चा पुरवठा करणे. |
| 3. | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रक्कमेचे मान्यतेचे ठराव? | होय, रु.51,93,534/-<br>मा. सर्वसाधारण सभेने विषय क्र.1779/2025 दि.22.01.2025 |
| | आ) त्यापैकी किती रक्कमेचे निविदा मागविण्यात आले? | र.रु. 44,01,300/- |
| 4. | ज्या वृत्तपत्रात जाहिरात देण्यात आली होती त्यांची नावे व | "ई निविदा मार्फत" |

| | | |
|---|---|---|
| | प्रसिध्दीची दिनांक | प्रसिध्दीचा दि.29.01.2025 |
| 5. | अ) निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत | दि.05.02.2015 |
| | ब) निविदा उघडल्याचा दिनांक | 07.02.2025 |
| 6. | निविदा किती वेळेस मागविल्या? | एक वेळेस |
| 7. | एकुण किती निविदा आल्या? | दोन |
| 8. | निविदा प्राप्त दर | रु.8,600 मे.टन (अं.प.दरापेक्षा 0.35% कमी दराने) |

(त्यापैकी पात्र निविदाधारकांची माहिती खालीलप्रमाणे )

| अ. क्र. | गुत्तेदाराचे नाव व पत्ता | दाखल निविदा रक्कम रुपये | अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी/जास्त |
|---|---|---|---|
| 1. | सार्क केमिकल्स छत्रपती संभाजीनगर | र.रु.43,86,000/- | 0.35% कमी दराने |

| | | |
|---|---|---|
| 9. | सर्वात कमी रक्कमेच्या निविदेची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या निविदेची शिफारस करण्यात आली आहे काय? असल्यास कारणे नमुद करावीत. | नाही |
| 10. | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमुद करावे. | पाणी पुरवठा रसायन सामग्री खरेदी सन 2024-25 |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | होय |
| 11. | सदरचे काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा केली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर- पान क्रमांक द्यावा) | लागु नाही |
| 12. | सोबत मान्य पूर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे? | होय |

तरी फारोळा जलशुध्दीकरण केंद्राकरीता तुरटी ग्रेड-1 चा पुरवठा करण्याचे काम सार्क केमिकल्स, छत्रपती संभाजीनगर यांचेकडून र.रु.8,600/- प्रति मे.टन (जीएसटी वगळून) या दराने अंदाजपत्रकीय दरापेक्षा 0.35% कमी दराने र.रु.43,86,000/- (जीएसटी वगळून) च्या खर्चासह करुन घेण्यास व करार करण्यास मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 1912/2025:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहर पाणी पुरवठा योजने अंतर्गत फारोळा जलशुध्दिकरण केंद्राकरीता तुरटी ग्रेड-1 चा पुरवठा घेणे या कामाची सार्क केमिकल्स, छत्रपती संभाजीनगर यांची र.रु.8,600/- प्रति मे.टन (जी.एस.टी वगळून) या दराने अंदाजपत्रकीय दरापेक्षा 0.35% कमी दराने र.रु.43,86,000/- (जी.एस.टी वगळून) च्या खर्चासह करुन घेण्यास व करार करण्यास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1913/2025:-** **(कार्यकारी अभियंता रस्ते विभाग)** **(दि.16.05.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मा.लोकसभा सदस्य श्री.संदिपानराव भुमरे यांनी छत्रपती संभाजीनगर या लोकसभा मतदार संघातील महानगरपालिकेच्या विविध वार्डामध्ये खालील नमूद एकूण 11 रस्त्यांची कामे करणे अत्यंत गरजेचे असल्याने या कामांकरीता केंद्र शासनाच्या राज्यांना भांडवली खर्चासाठी विशेष सहाय्य योजना 2025-26 या योजने अंतर्गत मंजुरी मिळणेकरीता प्रस्ताव सादर करणे बाबत कळविले आहे.

उक्त नमूद प्रमाणे महानगरपालिका क्षेत्रात विकसित करावयाच्या रस्त्यांच्या भागामध्ये वाढती नागरी वसाहत व त्या प्रमाणात वाढती रहदारी लक्षात घेता रस्ते विकसित करणे आवश्यक आहे. सदर रस्ते विकसित झाल्यास या भागांमध्ये रस्त्यांच्या माध्यमातून सुलभ व सुरळीत वाहतुकीस फायदा होणार आहे.

या अनुषंगाने शहरातील महत्वाच्या एकूण 09 रस्त्यांची यादी तयार करण्यात आली आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजीत खर्च र.रु |
|---|---|---|
| 1. | वार्ड क्र.15 मिटमिटा अंतर्गत देवगिरी व्हॅली येथील 12 मी. व 09 मी. रुंद वि.यो.रस्त्याचे सिमेंट काँक्रीट करणे. | र.रु.2,70,54,950.00 |
| 2. | महानुभाव आश्रम चौक, पैठण रोड ते महानगरपालिका हद्दीपर्यंत देवळाई चौक मार्गे पर्यंतच्या 12 मी. रुंद सर्व्हिस रोडचे (दक्षिण व उत्तर बाजू) सिमेंट काँक्रीट करणे. | र.रु.59,91,86,404.00 |
| 3. | वार्ड क्र.14 पडेगांव अंतर्गत मुंबई-नाशिक हायवे ते सायली कॉलेज पर्यंतच्या 12 मी. रुंद वि. यो. रस्त्याचे सिमेंट काँक्रीट करणे, | र.रु.2,20,36,996.00 |
| 4. | झोन क्र.02 अंतर्गत महात्मा ज्योतीबा फुले चौक औरंगपूरा ते सावरकर चौक, समर्थनगर मार्गे बाबुराव काळे चौक, निराला बाजार पर्यंतच्या 24 मी. रुंद वि.यो.रस्त्याचे सिमेंट काँक्रीट करणे. | र.रु.6,11,02,903.00 |
| 5. | झोन क्र.02 अंतर्गत महात्मा ज्योतीबा फुले चौक औरंगपूरा ते मिलकॉर्नर पर्यंतच्या 24 मी. रुंद वि. यो, रस्त्याचे सिमेंट काँक्रीट करणे. | र.रु.7,56,42,705.00 |
| 6. | मा. उच्च न्यायालय ते मुकुंदवाडी पोलीस स्टेशन ते म्हाडा कॉलनी, सिडको पर्यंतच्या 15 मी. रुंद सेवा रस्त्याचे सिमेंट काँक्रीट करणे, | र.रु.14,03,75,352.00 |
| 7. | सोलापुर हायवे ते सातारा तांडा वस्ती मार्गे गट नं.238 व 246 या 24 मी.रुंद वि.यो.रस्त्याचे डांबरीकरण करणे व पुल बांधणे. | र.रु.8,82,14,266.00 |
| 8. | मिटमिटा येथील गट नं.138, 139 व 155 भागातील 15 मी. रुंद वि.यो. रस्त्याचे डांबरीकरण करणे, | र.रु.3,52,60,224.00 |
| 9. | सातारा परिसरातील कमलनयन बजाज हॉस्पिटल ते सुधाकरनगर या 24 मी. रुंद वि.यो.रस्त्याचे सिमेंट काँक्रीट करणे व पुल बांधणे, | र.रु.10,39,35,259.00 |
| | एकुण | र.रु.1,15,28,09,059.00 |

उक्त नमूद रस्ते काँक्रीट/डांबरी पध्दतीने विकसित करणेकरीता अंदाजे र.रु.115.28 कोटी निधीची आवश्यकता असून केंद्र शासनाच्या राज्यांना भांडवली खर्चासाठी विशेष सहाय्य योजना 2025-26 अंतर्गत शासनाकडून निधी उपलब्धतेच्या अधीन राहून सदर रस्त्यांची कामे करण्याचे नियोजन आहे. तसेच मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.902/2023 दि.08.08.2023 अन्वये महानगरपालिका पॅनलवर नियुक्त प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांचे मार्फत करावयाच्या रस्ते कामांचा विस्तृत प्रकल्प अहवाल मंजूर शासन निधीच्या मर्यादेत तयार करण्याचे नियोजन आहे.

करीता, उपरोक्त प्रमाणे छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका हद्दीतील एकूण 09 रस्ते डांबर /कॉक्रीटव्दारे विकसित करणे करीता र.रु.115.28 कोटी केंद्र शासनाच्या राज्यांना भांडवली खर्चासाठी विशेष सहाय्य योजना 2025-26 अंतर्गत निधी प्राप्त होण्यासाठी महाराष्ट्र शासनाकडे मंजूरीसाठी पाठविणे करीता मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव क्रमांक 1913/2025:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका हद्दीतील एकूण 09 रस्ते डांबर/काँक्रीटव्दारे विकसित करणेच्या कामांकरीता केंद्र शासनाच्या राज्यांना भांडवली खर्चासाठी विशेष सहाय्य योजना 2025-26 अंतर्गत र.रु.115.28 कोटी निधी उपलब्धतेसाठी शासनास प्रस्ताव सादर करणे, मंजूर शासन निधीच्या मर्यादेत महानगरपालिका पॅनलवर नियुक्त प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांचे मार्फत विस्तृत प्रकल्प अहवाल तयार करणे व तद्नुषंगीक पुढील कार्यवाही करण्यास मान्यता प्रदान करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1914/2025:-** **(झोन क्र.01 विभाग)** **(दि.26.05.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्रीमती कडुबाई विजय शिंदे, सफाई मजूर, झोन क्र.1. छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांनी त्यांच्या स्वतःच्या मुलाच्या नामे श्री.अमोल विजय शिंदे Viral Encephalitis, Hypothyroidism, Alcohol Withdrawal (मज्जारज्जु संबंधिचे आजार) या

आजारावर ओरियन सिटी केअर सुपरस्पेशालिटी हॉस्पीटल, छत्रपती संभाजीनगर येथे उपचार केलेला असून उपचारासाठी रु.2,54,673/- इतका खर्च केलेला आहे.

तथापि, संबंधिताने उपचार केलेले ओरियन सिटी केअर सुपरस्पेशालिटी हॉस्पीटल, छत्रपती संभाजीनगर, हे शासकीय रुग्णालय नसून संबंधितास अनुज्ञेय र.रु.1,88,191/- आहे. तसेच ओरियन सिटी केअर सुपरस्पेशालिटी हॉस्पीटल, छत्रपती संभाजीनगर महाराष्ट्र शासन निर्णय क्र.सार्वजनिक आरोग्य विभाग क्र.2011/प्र.क्र.33/11/राकावि-2/मंत्रालय, मुंबई-32 दि.16.11.2011 अन्वये जारी केलेल्या परिशिष्ट-अ शासकीय कर्मचारी व त्यांच्या कुटूंबियांनी खाजगी रुग्णालयात घेतलेल्या गंभीर व विशिष्ट खर्चावरील शासकीय रुग्णालयाच्या अद्यावत यादीत सदरच्या रुग्णालयाचे नांव समाविष्ट नाही. तथापि, दि.14.05.2013 च्या परिपत्रकानुसार शासन मान्य आजारासाठी खाजगी रुग्णालयात उपचार घेतल्यास र.रु.1,00,000/- पर्यंतचा वैद्यकीय परतावा देता येतो व उपरोक्त खर्च र.रु.1,00,000/- च्या आत असून अनुज्ञेय र.रु.1,00,000/-आहे.

सदरच्या प्रस्तावास पडताळणी करून वैद्यकीय प्रतिपूर्तीसाठी आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी र.रु.1,00,000/-च्या 5% र.रु.5000/- मनपा फंडात जमा करण्यात येऊन उर्वरित र.रु.95,000/- संबंधितास अदा करणेबाबत शिफारस केलेली आहे.

**ठराव क्रमांक 1914/2025:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्रीमती कडुबाई विजय शिंदे, सफाई मजूर, झोन क्र.1, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांना प्रत्यक्ष अनुज्ञेय र.रु.95,000/- (अक्षरी रक्कम रुपये पंच्यान्नव हजार फक्त) वैद्यकीय खर्चास मान्यता देण्याबाबतचा प्रस्तावास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1915/2025:- (उद्यान विभाग)** **(दि.26.05.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, ज्योतीनगर, एस.बी.एच. कॉलनी परिसरात बँकर्स ग्राऊंड या नावाने महानगरपालिकेची खुली जागा आहे. जागेवर एक बॅडमिंटन हॉल असून, उर्वरीत जागा खुली आहे. छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका आणि छत्रपती संभाजीनगर फर्स्ट, अप्लाईड इनोव्हेशन ॲण्ड टेक्नॉलॉजी यांच्या मध्ये झालेल्या द्विपक्षीय सामंजस्य करारानुसार, जागेचा सर्वांगीन विकास करणे साठी महानगरपालिकेतर्फे आवश्यक स्थापत्य विषयक कामे प्रस्तावीत करण्यात येत आहे. त्यानुसार बँकर्स ग्राऊंड ला संरक्षक भिंत बांधणे, पाथवे तयार करणे, दगडी बांधकामातील ओटा, चैनलिक फेन्सींग, गेट व संपूर्ण रंगकाम करणे इत्यादी कामाच्या र.रु.49.08.981/- च्या अंदाजपत्रकास मा. स्थायी समिती सभा प्रस्ताव क्र.1797/2025 नुसार मान्यता प्राप्त आहे.

प्राप्त मान्यतेनुसार सदर कामासाठी ई-निविदा मागविण्यात आल्या. ई-निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखे पर्यंत दोन निविदा प्राप्त झाल्या आहेत. निविदेच्या कागदपत्रांची तपासणी केली असता, दोनही निविदाधारक पात्र होते. त्यानुसार सर्व निविदेचे देकार (Price bid) उघडण्यात आले, त्याचा तुलनात्मक तपशील खालील प्रमाणे.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नांव | प्राप्त दर (अंदाजपत्रकीय दरापेक्षा) |
|---|---|---|
| 1 | श्री.प्रभाकर मोहीते | 2.86% कमी |
| 2 | श्री.मुजीब उर रहेमान | 2.50% कमी |

करीता मनपाचे बँकर्स ग्राऊंड, SBH कॉलनी, ज्योतीनगर येथील खुल्या जागेत स्थापत्य विषयक कामे करणे या कामासाठी प्राप्त उक्त दोन निविदांपैकी श्री.प्रभाकर मोहीते यांचे दर सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा 2.86% कमी आहे. करीता श्री प्रभाकर मोहीते यांच्या अंदाजपत्रकीय दरापेक्षा 2.86% कमी दराच्या निविदेस तसेच सदर कामाचा खर्च महानगरपालिका अर्थसंकल्प सन 2025-26 मधील बागा देखभाल दुरुस्ती या लेखाशिर्ष अंतर्गत भागविण्याचा प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर

**ठराव क्रमांक 1915/2025:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मनपाचे बॅकर्स ग्राऊंड, SBH कॉलनी, ज्योतीनगर येथील खुल्या जागेत स्थापत्य विषयक कामे करणे (अं.प.र.रु.49.08.981/-) या कामासाठी ई-निविदा द्वारे प्राप्त सर्वात

कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा 2.86% कमी दरोच्या श्री.प्रभाकर मोहीते यांच्या निविदेस तसेच सदर कामाचा खर्च महानगरपालिका अर्थसंकल्प सन 2025-26 मधील बागा देखभाल दुरुस्ती या लेखाशिर्ष अंतर्गत भागविण्यास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1916/2025:-</u> (कार्यकारी अभियंता रस्ते विभाग) (दि.26.05.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिका फंडातून शहराच्या विविध भागातील रस्त्यांचे सिमेंट कॉंक्रीट करणेच्या (Package A) प्रकल्पांतर्गत मंजूर निविदेनुसार सातारा देवळाई भागातील एकूण 12 रस्ते कामांचा समावेश आहे. यापैकी बहुतांश रस्त्यांची कामे प्रकल्पाकरीता नियुक्त पीएमसी यश इन्नोव्हेटिव्ह सोल्युशन एल.एल.पी. यांच्या तांत्रिक मार्गदर्शनाखाली पूर्ण करण्यात आलेली आहेत.

तसेच निविदेतील अनुक्रमांक 07 व 09 या रस्त्यांच्या कामांकरीता सार्वजनिक बांधकाम विभागास नाहरकत प्रमाणपत्र देण्यात येऊन आमदार स्थानिक विकास निधीतून सदर रस्त्यांची पूर्ण करण्यात आलेली असून अनुक्रमांक 08 वरील रस्ते कामासाठी स्थानिक नागरिकांचा विरोध असल्याने व अभावी रस्ते कामासाठी प्रत्यक्ष स्थळी जागा उपलब्ध होत नसल्यामुळे या रस्त्याचे काम करणे शक्य होत नाही.

दरम्यान मंजुर निविदेतील अनुक्रमांक 06 वरील वार्ड क्र.114 सातारा देवळाई अंतर्गत संभाजी राजे चौक ते भारतनगर कडे जाणाऱ्या 1250 मीटर लांबीच्या रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीट करण्याचे काम सुरु करण्यात आले असता, मा.लोकप्रतिनिधी यांनी सदर रस्त्याची लांबी व रुंदी वाढवून बीड बायपास पासून देवळाई गावा पर्यंत या प्रमाणे रस्त्याचे काम करणे बाबत सुचविले आहे.

उक्त नमूद रस्त्यालगत महानगरपालिकेमार्फत ड्रेनेज लाईन टाकणे व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यालया मार्फत पाणी पुरवठा लाईन टाकणे करीता मोठ्या प्रमाणात खोदकाम करण्यात आलेले असल्याने अस्तित्वातील रस्ता अत्यंत खराब झालेला आहे. सदर रस्ता हा बीड बायपास ते देवळाई गावाकडे जाणारा महत्वाचा मुख्य रस्ता असल्याने या रस्त्याचे काम करणे आवश्यक आहे.

या अनुषंगाने उक्त नमूद अनुक्रमांक 07 व 09 वरील रस्त्याचे काम सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत पूर्ण करण्यात आले असल्याने व अ.क्र.08 वरील रस्त्याचे काम जागे अभावी करणे शक्य नसल्याने या रस्ते कामांमध्ये अंदाजे र.रु.3.75 कोटीची बचत होत असून मुळ मंजुर निविदेत समाविष्ट अनुक्रमांक 06 वरील रस्ते कामाची र.रु.3.80 कोटी असे एकूण र.रु.7.55 कोटी रक्कमेतून मा.लोकप्रतिनिधी यांनी सुचविल्या प्रमाणे मुळ मंजुर निविदेत समाविष्ट वार्ड क्र.114 सातारा देवळाई अंतर्गत संभाजी राजे चौक ते भारतनगर या रस्त्याची लांबी 1650 मीटर व रुंदी 7.50 मीटर करून बीड बायपास ते देवळाई गाव या प्रमाणे रस्ता विकसित करण्याचे नियोजन आहे. त्यानुसार संबंधीत पीएमसी यांच्या मार्फत या रस्त्याचे सुधारित अं.प.र.रु.7,66,96,038/- चे तयार करुन घेण्यात आले असून सदर अतिरिक्त लांबी व रुंदीच्या कामाकरीता लागणारा खर्च हा मुळ मंजूर अंदाजत्रकीय रक्कमेच्या मर्यादेत होणार असून या करीता अतिरिक्त आर्थिक तरतूदीची आवश्यकता भासणार नाही.

करीता, उक्त नमूद प्रमाणे मंजुर निविदेतील अनुक्रमांक 07 व 09 वरील रस्त्यांचे काम सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत पूर्ण झालेले असल्याने यामुळे होणारी बचत रक्कम तसेच अ.क्र.08 वरील रस्त्याचे काम करणे शक्य नसल्याने या रस्त्याचे स्थळ बदल करणेच्या मान्यतेस्तव तसेच या रस्ते कामाची रक्कम बीड बायपास ते देवळाई गाव या 1650 मीटर लांबी व 7.50 रुंद रस्ते कामांसाठी वळती करणे बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1916/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिका फंडातून शहराच्या विविध भागातील रस्त्यांचे सिमेंट कॉंक्रीट करणेच्या (Package A) प्रकल्पांतर्गत मंजुर निविदेनुसार अनुक्रमांक 07 व 09 वरील रस्त्यांचे काम सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत आमदार स्थानिक विकास निधीतून पूर्ण झालेले असल्याने यामुळे होणारी बचत रक्कम तसेच अ.क्र.08 वरील रस्त्याचे काम करणे शक्य नसल्याने या रस्त्याचे स्थळ बदल करून सदर कामाची रक्कम बीड बायपास ते देवळाई गाव या 1650 मीटर लांबी व 7.50 रुंद रस्ते कामांसाठी वळती करणे बाबतच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येते. तसेच

पुढील कार्यवाही करण्याचे व त्यासाठी आवश्यक सर्व बाबींचा निर्णय घेण्याचे संपूर्ण अधिकार आयुक्तांना प्रदान करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1917/2025:- (कार्यकारी अभियंता रस्ते विभाग) (दि.26.05.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, छत्रपती संभाजीनगर, सिडको येथे स्व.मा.बाळासाहेब ठाकरे स्मारक व स्मृतीवन उभारणे या कामास शासन निर्णय दि.09 मार्च 2020 नुसार र.रु.25.49 कोटीस प्रशासकीय मान्यता प्राप्त असुन त्यानुसार कामे प्रगतीपथावर आहेत.

शासन निर्णयानुसार मा. पालकमंत्री हे या प्रकल्पाचे अध्यक्ष असुन त्यांच्या अध्यक्षतेखाली गठीत समितीची या प्रकल्पातील कामासंदर्भाने दि.27.02.2025 रोजी छत्रपती संभाजीनगर येथे बैठक संपन्न झाली. या बैठकीत झालेल्या चर्चेनुसार आतापर्यंत वेळोवेळी मा. पालकमंत्री व समिती सदस्य यांनी प्रकल्प स्थळी दिलेल्या भेटी दरम्यान दिलेल्या सुचनेनुसार या स्मारकामध्ये येणाऱ्या पर्यटकांसाठी ई-व्हेइकल (Golf Cart), ई-व्हि चार्जींग स्टेशन उभारणे, पर्यटकांसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे, चिल्ड्रन पार्क तसेच म्युझिअममध्ये अद्यावत नविन इंटेरिअरची कामे करणे, उद्यान विकसीत करणे इत्यादी बाबत सुचना प्राप्त आहेत. या सुचनेनुसार या वाढीव कामाचे अं.प.र.रु.10.00 कोटीचे तयार करण्यात आलेले आहे व त्यास र.रु.10.00 कोटी हा अतिरीक्त खर्च लागणार आहे. वाढीव कामासाठी लागणारा अतिरीक्त निधी शासनाकडुन मिळणेस्तव शासनाकडे प्रस्ताव सादर करुन शासनाची मान्यता प्राप्त करावी असे दि.27.02.2025 च्या बैठकीत सुचविल्यानुसार या कामाच्या र.रु.10.00 कोटीच्या अंदाजपत्रकास मान्यता मिळणे व निधीसाठी शासनाकडे मागणी करणे बाबतचा प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर

**ठराव क्रमांक 1917/2025:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, स्व.मा.बाळासाहेब ठाकरे स्मृतीवन व स्मारक उभारणे या प्रकल्पा तील वरील प्रमाणे वाढीव कामे करण्यास र.रु.10.00 कोटीच्या अंदाजपत्रकास मान्यता व या कामासाठी शासन अनुदान मिळणे करीता शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1918/2025:- (प्रधानमंत्री आवास योजना विभाग) (दि.26.05.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) घटक क्र.4 वैयक्तिक स्वरूपात घरकुल बांधण्यास अनुदान (BLC) अंतर्गत 392 लाभार्थ्यांच्या सविस्तर प्रकल्प अहवालास (DPR) राज्यस्तरीय सनियंत्रण समिती (SLNA) म्हाडा, मुंबई तसेच केंद्र शासनाच्या केंद्रीय मान्यता व सनियंत्रण समिती (CSMC) च्या 66 व्या बैठकीत दि.05.05.2023 रोजी मंजुरी प्राप्त आहे. या डीपीआर करिता राज्य शासनाचे र.रु.2.924 व 0.98 कोटी व केंद्र शासनाचे र.रु.349.2, 17.40 व 31.20 लक्ष अनुदान प्राप्त झालेले आहे. परंतु या डीपीआर मधील 30 लाभार्थीनी बांधकाम परवानगी प्राप्त करून विभागात दाखल केलेली नाही. उर्वरित लाभार्थ्यांकडे वर्तमानपत्रात जाहीर प्रगटन, Text Message, सुचनापत्र, दुरध्वनीद्वारे प्रत्यक्ष जागेवर जाऊन योजनेचा लाभ घेणेसाठी पाठपुरावा करण्यात आला आहे. तरीदेखील त्यांनी बांधकाम परवानगीसाठी कागदपत्रे दाखल केलेली नाहीत. या लाभार्थ्यांना प्रधानमंत्री आवास योजनेच्या सविस्तर प्रकल्प अहवाल यादीमधुन त्यांचे नाव वगळण्यात येत असल्याचे सुचनापत्राद्वारे कळविण्यात आले आहे. यानुसार 30 लाभार्थी वगळुन 362 लाभार्थ्यांचा सुधारीत प्रकल्प अहवाल (Curtailment DPR) तयार करण्यात आला आहे.

सदर डीपीआर नगरपरिषद, प्रशासन, संचालनालय (DMA) मार्फत सक्षम समितीच्या मान्यते साठी सादर करणे आहे. करिता मुळ डीपीआर 392 लाभार्थ्यांपैकी 30 लाभार्थी वगळता 362 लाभार्थ्यांचा (Curtailment DPR) शासनास पाठविणे करीता मान्यतेसाठी मा.सर्वसाधारण सभेत प्रस्ताव सादर.

**ठराव क्रमांक 1918/2025:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) घटक क्र.4 वैयक्तिक स्वरूपात घरकुल बांधण्यास अनुदान (BLC) अंतर्गत 392 लाभार्थ्यांच्या मंजुर डीपीआर मधुन 30 लाभार्थी कमी

करुन उर्वरित 362 लाभार्थ्यांचा (Curtailment DPR) नगरपरिषद प्रशासन संचालनालय (DMA) मार्फत सक्षम समितीकडे मंजुरीस्तव सादर करणेसाठी मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1919/2025:-</u> (घरकुल विभाग)** **(दि.26.05.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, रमाई आवास योजना शहरी अंतर्गत वर्ष 2010-11 ते 2022-23 या वर्षापर्यंत एकुण 10266 घरकुलांना मंजुरी असल्याचे दिसुन येते. त्यापैकी आजमितीस 4644 घरकुलांचे बांधकाम पुर्ण झाले असुन सद्यस्थितीमध्ये 1919 घरकुलाचे बांधकाम प्रगतीपथावर आहेत. वर्ष 2010-11 ते 2022-23 या वर्षापर्यंत ज्या लाभार्थ्यांनी अद्याप त्यांच्या घरकुलांची बांधकामे सुरु केलेले नाहीत, अशा लाभार्थ्यांची नावे मंजुर यादीतुन वगळणेबाबतचा निर्णय दि.13.03.2025 व दि.26.03.2025 रोजी झालेल्या घरकुल निर्माण समितीच्या बैठकीत घेण्यात आला आहे. त्यानुसार वर्ष 2010-11 ते 2022-23 या वर्षापर्यंत घरकुलांचे बांधकामास सुरुवात न केलेल्या लाभार्थ्यांची नावे मंजुर यादी मधुन वगळणेच्या मान्यतेसाठी मा.सर्वसाधारण सभेत प्रस्ताव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1919/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, रमाई आवास योजना शहरी अंतर्गत वर्ष 2010-11 ते 2022-23 या वर्षापर्यंत मंजुरी प्राप्त असलेल्या परंतु घरकुलांच्या बांधकामास सुरुवात न केलेल्या लाभार्थ्यांची नावे मंजुर यादीमधुन वगळणेसाठी मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1920/2025:-</u> (यांत्रिकी विभाग)** **(दि.26.05.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शासन निर्णय क्र.एमव्हीआर-0522/प्र.क्र.41 भाग-1/ परि-2 मंत्रालय, मुंबई-32 दि.27 जानेवारी 2023 नुसार महानगरपालिकेच्या 15 वर्ष पेक्षा जास्त वयोमान असलेल्या वाहनांचे निष्कासन करुन लिलाव करणे आवश्यक आहे. तसेच कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन यांच्याकडील पत्र क्र.संकीर्ण 2024/प्र.क्र.56/नवि-20 दि.02 मे 2025 व मा.परिवहन आयुक्त यांचे कार्यालयाकडील पत्र क्र.एमव्हीआर-1118/सीआर-464ए/का-2(03)/जा.क्र/5692 दि.14 मे 2024 च्या पत्रानुसार सदरील वाहनांचा लिलाव हा मेटल स्क्रॅप ट्रेड कॉर्पोरेशन, मुंबई (MSTC) या शासनमान्य संस्थेमार्फत ऑनलाईन (E-Auction) करण्याबाबत कळविण्यात आलेले आहे.

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेचे एकूण 55 वाहनांचा लिलाव मेटल स्क्रॅप ट्रेड कॉर्पोरेशन, मुंबई (MSTC) यांच्यामार्फत करण्यासाठी प्रस्तावित करण्यात आले होते. त्यानुसार महानगरपालिकेने आपल्या स्तरावर वाहनाच्या कर्बवेट (वजन) च्या 65% वजन धरुन प्रचलित बाजार भावानुसार वाहनांचे मुल्यांकन र.रु.94,28,286/- इतके करुन दिले, तथापि,मेटल स्क्रॅप ट्रेड कॉर्पोरेशन, मुंबई (MSTC) यांच्या मार्फत दि.13.03.2025 रोजी करण्यात आलेल्या लिलावात सदरील मुल्यांकनास र.रु.42,60,610/- म्हणजे एकुण मुल्यांकनाच्या 55% कमी दर मिळाला. त्यामुळे दि.09.04.2025 रोजी फेरलिलाव करण्यात आला असता, लॉट क्र.01 मधील 15 वाहनांना र.रु,12,51,000/- इतकी किंमत आली. उर्वरीत तीन लॉट विकले गेले नाहीत.

महापालिका स्तरावरील मुल्यांकन ऐवजी उर्वरित तीन लॉटमधील 40 वाहनांचा प्रादेशिक परिवहन विभागा मार्फत मुल्यांकन करण्यात आले व दि.05.05.2025 रोजी फेर लिलाव करण्यात आला ह्या लिलावात उर्वरित तीन लॉट विकले गेले. एकूण चारही लॉटचे विवरण खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | लॉट क्र. | लिलावची तारीख | लॉटचे मुल्यांकन | लिलावात प्राप्त दर | एजन्सीचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| 1. | लॉट क्र.01 | 09.04.2025 दुसरी वेळ | 9,56,966/- | 12,51,500/- | मे. भाग्यलक्ष्मी रोलिंग मिल प्रा.लि. जालना, |
| 2. | लॉट क्र.2 | 05.05.2025 तिसरी वेळ | 13,62,000/- | 20,81,002/- | मे.टाटा इंटरनॅशनल व्हेईकल ॲप्लीकेशन्स प्रा.लि पुणे |
| | लॉट क्र.3 | | 10,87,300/- | 15,78,005/- | |
| | लॉट क्र.4 | | 3,70,500/- | 4,51,002/- | |
| **एकुण किंमत** | | | **28,19,800/-** | **41,10,009/-** | |

करिता, वरीलप्रमाणे महागरपालिकेच्या 55 वाहनांचा लिलाव हा मेटल स्क्रॅप ट्रेड कॉर्पोरेशन, मुंबई (MSTC) यांच्या मार्फत लॉट क्र. 01 भाग्यलक्ष्मी रोलिंग मिल प्रा.लि. जालना व उर्वरित 02 ते 04

हे तीन लॉट मे.टाटा इंटरनॅशन व्हेईकल ॲप्लीकेशन्स प्रा.लि.पुणे यांच्या मार्फत उपरोक्त प्रमाणे लिलावात मिळालेल्या किंमतीनुसार करण्यासाठीचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव क्रमांक 1920/2025:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, 15 वर्षावरील वयोमानाचा 55 वाहनांचा मे.मेटल स्क्रॅप ट्रेड कॉर्पोरेशन, मुंबई (MSTC) या शासनमान्य संस्थेमार्फत केलेल्या लिलावातील प्राप्त दरास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1921/2025:-** **(घनकचरा व्यवस्थापन विभाग)** **(दि.26.05.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शहराच्या विविध भागातील बाजारपेठा, व्यावसायीक क्षेत्र परिसरातील वाहतुक सुरळीत ठेवणे, ठेले/हातगाडी अतिक्रमण, अवैध पार्किंग इत्यादींवर कार्यवाही करणेसाठी बाह्यस्त्रोत माध्यमातुन ट्रैफिक वार्डन (Traffic Warden) कामी 55 माजी सैनिकांची सेवा दि.11.04.2025 घेण्यात येत आहेत. घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत सफाई कामी विविध महिला बचत गटांमार्फत कर्मचाऱ्यांचा सेवा सद्यस्थितीत घेण्यात येत आहेत. बचत गटाचा सेवाकाळ संपुष्टात आलेला असल्याने, पुढील कालावधीसाठी बचत गटामार्फत कर्मचाऱ्यांच्या सेवा घेणेची कार्यवाही (ई-निविदे) प्रस्तावीत आहेत. दरम्यानच्या काळात ट्रॅफिक वार्डन (Traffic Warden) ची सेवा तातडी विचारात घेता, प्रस्तावित निविदे अंतर्गत नवीन बचत गटाची नियुक्ती होईपर्यंत, कार्यरत बचत गटा मार्फत नियुक्त 55 ट्रॅफिक वार्डन (Traffic Warden) च्या मान्यतेचा प्रस्ताव आहे.

त्यानुसार (1) आदर्श स्वयंम सहाय्यता महिला बचत गट (2) पंचशिला महिला बचतगट (3) वैशाली महिला बचत गट या तीन बचत गटामार्फत प्रत्येकी 15. तर भिमाई महिला बचत गटामार्फत 10 ट्रॅफिक वार्डन (Traffic Warden) च्या सेवा घेण्यात येत आहेत. कार्यरत माजी सैनिकाचे किमान मासीक वेतन (Gross salary) प्रत्येकी रुपये 27,083/- प्रमाणे 55 माजी सैनिकांचे मासीक वेतन र.रु.14,89,565/- आणि 55 माजी सैनिकांच्या मासीक वेतनावर (Gross salary) बचत गट यांना अदा करावयाचे 4% सेवा शुल्क (Service Charge) र.रु.59,583/- असा एकत्रीत र.रु.15,49,148/- मासिक खर्च अपेक्षीत आहे. त्यानुसार मासीक वेतन व सेवाशुल्कापोटी र.रु.1,85,89,776/- वार्षीक खर्च अपेक्षीत आहे. सदरचा खर्च महानगरपालिका अर्थसंकल्प सन 2025-26 मधील लेखाशिर्ष "क"-सार्वजनिक आरोग्य व इतर सुखसोयी मधील क-1 घनकचरा व्यवस्थापन विभाग अनु.02 खाजगी तत्वावर बचतगटांमार्फत कचरा उचलणे व साफसफाई करणे अंतर्गत भागविण्यास प्रस्तावीत करण्यात येते.

करीता (1) आदर्श स्वयंम सहाय्यता महिला बचत गट (2) पंचशिला महिला बचतगट (3) वैशाली महिला बचत गट या तीन बचत गटामार्फत प्रत्येकी 15, तर भिमाई महिला बचत गटामार्फत 10 अशा एकुण 55 ट्रॅफिक वार्डन (Traffic Warden) च्या सेवा घेण्यास आणि ट्रॅफिक वार्डन (Traffic Warden) यांचे मासीक वेतन बचत गटाचे सेवा शुल्क अदाईचे वार्षीक खर्च र.रु.1,85,89,776/- ला कार्योत्तर मान्यता होणे तसेच सदर चा खर्च महानगरपालिका अर्थसंकल्प सन 2025-26 मधील लेखाशिर्ष "क-सार्वजनिक आरोग्य व इतर सुखसोयी मधील क-1 घनकचरा व्यवस्थापन विभाग अनु.02 खाजगी तत्वावर बचतगटांमार्फत कचरा उचलणे व साफसफाई करणे" अंतर्गत भागविण्याचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 1921/2025:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, (1) आदर्श स्वयंम सहाय्यता महिला बचत गट (2) पंचशिला महिला बचतगट (3) वैशाली महिला बचत गट या तीन बचत गटामाफत प्रत्येकी 15, तर भिमाई महिला बचत गटामार्फत 10 अशा एकुण 55 ट्रॅफिक वार्डन (Traffic Warden) च्या सेवा घेण्यास आणि ट्रॅफिक वार्डन (Traffic Warden) यांचे मासीक वेतन बचत गटाचे सेवा शुल्क अदाईचे वार्षीक खर्च र.रु.1,85,89,776/- ला कार्योत्तर मान्यता होणे तसेच सदर चा खर्च महानगरपालिका अर्थसंकल्प सन 2025-26 मधील लेखाशिर्षक सार्वजनिक आरोग्य व इतर सुखसोयी मधील क-1 घनकचरा व्यवस्थापन

विभाग अनु.02 खाजगी तत्वावर बचतगटांमार्फत कचरा उचलणे व साफ़सफ़ाई करणे" अंतर्गत भागविण्याचा प्रस्तावास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1922/2025:- (घनकचरा व्यस्थापन विभाग)** **(दि.26.05.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, घनकचरा व्यवस्थापन विभागामध्ये स्वच्छ भारत अभियान 2.0 मधील घटकांव्यतिरिक्त वेगवेगळ्या प्रकल्पांचे तपासणी अहवाल, घनकचरा संकलन व वाहतुक, आवश्यके नुसार विविध प्रकल्पांची निविदा तयार करणे, निविदा प्रक्रिया राबविणे, निविदा प्रसिद्ध करणे, प्रकल्प उभारणी, नियंत्रण ठेवणे, घनकचरा व्यवस्थापन विभागासाठी लागणाऱ्या वाहनांची खरेदी करणे व इतर तांत्रिक कामे करण्यात येतात.

सद्यस्थितीत कार्यरत खाजगी कचरा संकलन व वाहतुक करणारी पी.गोपीनाथ रेड्डी या एजन्सीचा करार माहे जानेवारी 2026 मध्ये संपुष्टात येत असल्यामुळे मा.आयुक्त तथा प्रशासक महोदय यांनी या कामासाठी तात्काळ निविदा प्रक्रिया राबवुन येत्या सहा महिन्यात निविदा अंतिम करणे बाबत निर्देश दिले आहे. परंतु या कामासह वरील कामांची निविदा तयार करण्यासाठी प्रकल्प सल्लागार नियुक्त नसल्यामुळे अडचण निर्माण होत आहे.

उपरोक्त कामांच्या निविदा प्रक्रिया राबविणे तसेच स्वच्छ भारत अभियान 2.0 च्या व्यतिरीक्त घनकचरा व्यवस्थापनातील इतर बाबींवर कार्यवाही करण्यासाठी घनकचरा व्यवस्थापनात तज्ञ असणारी तसेच स्वच्छ भारत अभियानांचा अनुभव असणा-या एजन्सीची अभिव्यक्ती स्वारस्य (Expression of Intrest) द्वारे किमान 1 वर्षाकरीता नियुक्ती करणे आवश्यक आहे.

त्याअनुषंगाने अभिव्यक्ती स्वारस्य प्रगटन (Expression of Intrest) प्रसिद्ध करण्यात आले त्यानुसार (1) MaRsPlaninig and Engineering Services (2) Eco-Pro Environmental Services (3) Nirman India या 3 (तीन) एजन्सीने प्रतिसाद दिला. Nirman India या एजन्सीने अटी व शर्ती नुसार सर्व कागदपत्रांची पुर्तता केली नसल्याने त्यांना अपात्र ठरविले आहे. तांत्रिक दृष्ट्या पात्र झाले उर्वरीत दोन एजन्सींचे वाणिज्यक देयकार उघडण्यात आले त्या बाबतचा तपशील खालील प्रमाणे.

| अ.क्र. | एजन्सींचे नाव | प्राप्त दर (प्रति माहे) |
|---|---|---|
| 1. | MaRsPlaninig and Engineering Services | 7,90,000/- |
| 2. | Eco-Pro Environmental Services | 5,25,000/- |

उपरोक्त प्रमाणे पात्र एजंन्सींचे दर प्राप्त झाले त्यानुसार Eco-Pro Environmental Services यांनी कमी दर सादर केले आहे. प्रकरणात Eco-Pro Environmental Services यांनी सादर केलेल्या दरांमध्ये वाटाघाटी करुन र.रु.3,46,000/- प्रतिमाह इतक्या दराने काम करण्यास सहमती दर्शविली आहे.

उपरोक्त प्रमाणे Eco-Pro Environmental Services यांचे अंतिम दर र.रु.3.46,000/- प्रतिमाह विचारात घेता या कामाचे वार्षिक खर्च र.रु.3,46,000 x 12=41,52,000/- इतका खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च महानगरपालिका अर्थसंकल्प सन 2025-26 मधील लेखाशिर्ष "क-सार्वजनिक आरोग्य व इतर सुखसोयी मधील क-1 घनकचरा व्यवस्थापन विभाग अनु.01 घनकचरा व्यवस्थापना साठी विविध कामे करणे" अंतर्गत भागविण्यात येईल.

करिता घनकचरा व्यवस्थापनांतर्गत Eco-Pro Environmental Services यांची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) म्हणून नियुक्ती करणेसाठी प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव क्रमांक 1922/2025:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, र.रु.3,46,000/- प्रतिमाह नुसार 1 (एक) वर्षाच्या कालावधीसाठी Eco-Pro Environmental Services यांना प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) म्हणून नियुक्ती करण्यास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1923/2025:- (पाणी पुरवठा जायकवाडी विभाग)** **(दि.26.05.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, यंत्र देखभाल दुरुस्ती जायकवाडी विभाग या लेखाशीर्षका अंतर्गत महानगरपालिकेच्या नवीन जायकवाडी पंपगृह येथे 1600 के.व्ही.ए. ट्रान्सफॉर्मर खरेदी करणे,

बसविणे व यशस्वीरित्या चाचणी देणे बाबतच्या कामासाठी एकुण र.रु.39,93,752/-+र.रु.7,18,875/- (GST 18%) = र.रु.47,12,627/- च्या अंदाजपत्रकास मा.प्रशासक यांची मान्यता प्राप्त आहे. अंदाजपत्रकास मान्यता मिळाल्या नंतर ई-निविदा विभागमार्फत जाहीर निविदा मागविण्यात आल्या असता एकूण 3 निविदा प्राप्त झाल्या प्राप्त 3 निविदाधारक तांत्रिक दृष्टया पात्र असल्यामुळे त्यांची व्यापारी निविदा उघडण्यात आली. व्यापारी निविदे मध्ये प्राप्त दर खालील प्रमाणे आहेत.

| अ. क्र. | एजन्सीचे नाव | प्राप्त निविदा रक्कम (रुपये) | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1. | मे. ओंकार इंटरप्रायजेस, छत्रपती संभाजीनगर, | 39,89,758.25/- | 0.10% ने कमी |
| 2. | मे. तिरुपती ईलेक्ट्रीकल्स सेल्स ॲण्ड सर्व्हिसेस, छत्रपती संभाजीनगर | 40,13,720.76/- | 0.50% ने जास्त |
| 3. | मे. अमित इंजिनीअर्स, छत्रपती संभाजीनगर, | 41,89,445.85/- | 4.90% ने जास्त |

वरील प्रमाणेच्या प्राप्त 03 निविदांपैकी तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी दराची निविदा मे.ओंकार इंटरप्रायजेस, छत्रपती संभाजीनगर यांची असुन, अंदाजपत्रकीय दरापेक्षा 0.10% ने कमी म्हणजेच र.रु.39,89,758.25/-ची आहे. करीता कमी दराची निविदा स्विकृत करणे बाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1923/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, ई-निविदा विभागामार्फत मागविण्यात आलेल्या जाहीर निविदेतील प्राप्त न्युनतम दराची मे.ओंकार इंटरप्रायजेस, छत्रपती संभाजीनगर यांची अंदाजपत्रकीय दराप्रमाणे र.रु.39,89,758.25/- ची निविदा स्विकृतीस मान्यता देण्यात येत आहे. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1924/2025:-</u> (पाणी पुरवठा, यांत्रिकी विभाग)** **(दि.26.05.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका पाणी पुरवठा योजने वरील विश्वभारती पंपगृह येथे 40 अ.श.क्षमतेचे दोन सेन्ट्रीफ्युगल पंपसेट कार्यरत असुन, याव्दारे ज्योती नगर येथील जलकुंभ भरणे व आसपासच्या परिसरात पाणी पुरवठा करण्याचे काम केले जाते. सदरील ठिकाणी 2.00 लक्ष लिटर क्षमतेचे बैठे जलकुंभ (GSR) नव्याने उभारण्यात आले असून, या जलकुंभा मधुन विश्वभारती जलकुंभ भरण्याचे नियोजन आहे. यासाठी 32 Mtr.हेड, 200 $M^3$/Hr. डिस्चार्ज क्षमतेचे दोन सबमर्शियल विद्युत पंप (एक कार्यरत व एक स्टॅण्डबाय) व त्यासाठी पुरक क्षमतेचे एक एटीएस पॅनल बसविणे गरजेचे असून, यामुळे एकाचवेळी ज्योतीनगर येथील जलकुंभ भरणे व आसपासच्या परिसरात नियमीत पाणी पुरवठा करणे शक्य होणार आहे.

उपरोक्त नमूद कामासाठी नामांकीत पंप व एटीएस पॅनल यांच्या उत्पादकांमार्फत बजेटरी ऑफर्स मागवून, प्राप्त न्युनतम दर व DSR/MJP/PWD/Ele/Mech/Civil 2023-24 नुसार अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून, अंदाजपत्रकानुसार एटीएस पॅनलसहीत नविन 40 अ.श. क्षमतेचे दोन हॉरीझॉन्टल सबमर्ज्ड सेन्ट्रीफ्युगल मोटार पंपसेट आवश्यक उपकरणांसह पुरवठा करणे, बसविणे व यशस्वीरित्या चाचणी देणे या कामासाठी अं.प.र.रु.38,24,890/- (GST सहीत) ला मान्यता मिळाल्यानंतर ई-निविदे मार्फत निविदा मागविण्यात आल्या असता, एकुण तीन निविदा प्राप्त झाल्या. त्यापैकी दोन निविदा तांत्रिकदृष्टया पात्र असल्यामुळे त्यांची व्यापारी निविदा उघडण्यात आली. व्यापारी निविदेमध्ये खालील प्रमाणे दर प्राप्त झाले.

| अ.क्र. | एजन्सीचे नाव | दर |
|---|---|---|
| 1. | मे.तिरुपती इलेक्ट्रिकल्स सेल्स ॲण्ड सर्व्हिसेस, छत्रपती संभाजीनगर | र.रु.32,31,847/- (अं.प.दरापेक्षा 0.29% ने कमी) |
| 2. | मे.श्री.ईलेक्ट्रिकल्स ॲण्ड रेफ्रिजिरेशन, छत्रपती संभाजीनगर | र.रु.33,33,000/- (अं.प.दरापेक्षा 2.82% ने जास्त) |

वरील प्रमाणे प्राप्त दोन निविदाधारकापैकी मे.तिरुपती ईलेक्ट्रिकल्स सेल्स ॲण्ड सर्व्हिसेस, छ. संभाजीनगर यांचे दर तुलनात्मकदृष्टया 0.29% कमी होते. तथापि, वाटाघाटी अंती अं.प. र.रु.32,41,432/- (+18% GST) पेक्षा 1.20% ने कमी (+18% GST) असे दर निश्चित करण्यात

आले. त्यानुसार नमुद 40 अ.श.क्षमतेचे दोन हॉरीझॉन्टल सबमर्ज्ड सेन्ट्रीफ्युगल मोटार पंपसेट आवश्यक उपकरणांसह पुरवठा करणे, बसविणे व यशस्वीरित्या चाचणी देणे या कामासाठी अं.प. र.रु.32,41,432/- पेक्षा 1.20% ने कमी दराने म्हणजेच र.रु.32,02,535 + 18% GST र.रु.5,76,456/- या प्रमाणे एकत्रीत र.रु.37,78,991/- खर्च अपेक्षीत आहे.

करीता मे.तिरुपती इलेक्ट्रिकल्स सेल्स ॲण्ड सर्व्हिसेस, छ. संभाजीनगर यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 1.20 % ने कमी + 18% GST दराची एकूण र.रु.37,78.991/- खर्चाची निविदा स्विकृत करणे बाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1924/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, ई-निविदा विभागामार्फत मागविण्यात आलेल्या जाहीर निविदेतील न्युनतम दराची में. तिरुपती ईलेक्ट्रिकल्स संल्स ॲण्ड सर्व्हिसेस, छत्रपती संभाजीनगर यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 1.20% ने कमी + 18% GST दराची एकुण र.रु.37,78,991/- खर्चाची निविदा स्विकृतीस मान्यता देण्यात येत आहे. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1925/2025:-</u> (उपअभियंता ड्रेनेज व इमारत विभाग)** **(दि.26.05.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेसाठी मॅनहोल क्लिनिंग मशीन खरेदी करणे, या कामास मा सर्वसाधारण सभा ठराव क्र.1897/2025 दि.21 एप्रिल 2025 अन्वये प्रशासकीय मान्यता झाली आहे. सदर कामाचा खर्च आर्थिक वर्ष 2025-26 मध्ये नाविन्यपूर्ण कामे या लेखाशिर्षकांतर्गत करण्यात येणार आहे.

या कामासाठी शासनाच्या संकेतस्थळावरून निविदा मागविल्या असता, प्रथम वेळेस अंतिम दिनांक पर्यंत तीन निविदा प्राप्त झाल्या आहेत. निविदेच्या अटी व शर्तीनुसार निविदाधारक यांनी सादर केलेल्या कागदपत्रांची पडताळणी केली असता, प्राप्त दोन निविदाधारकांपैकी एक निविदाधारक Genrobotics Innovations Pvt. Ltd., केरळ यांनी दस्तऐवजांची पूर्तता न केल्याने ते तांत्रिक दृष्ट्या अपात्र ठरल्याने उर्वरित दोन निविदाधारक तांत्रिकदृष्ट्या पात्र ठरले आहेत. पात्र दोन निविदा धारकांपैकी सर्वात कमी दराची निविदा सोलिनास इंटिग्रिटी प्रायव्हेट लिमिटेड यांची असून ती अंदाज पत्रकीय दरापेक्षा 0.5% कमी दराची प्राप्त झाली आहे.

संदर्भ:- TENDER ID : 2025_AMCA_1173385_1

| अ.क्र. | विवरण | शेरा |
|---|---|---|
| 1. | विभागाचे नाव | कार्यकारी अभियंता जलनि:स्सारण |
| 2. | कामाचे स्वरुप | छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेसाठी मेनहोल क्लिनिंग मशीन खरेदी करणे |
| 3. | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रक्कमेचे मान्यतेचे ठराव? | होय, अं.प.र.रु.1,13,28,000/- मा.सर्वसाधारण सभा मंजुर ठराव क्र.1897/2025 दि.21.04.2025 |
| | त्यापैकी किती रक्कमेचे निविदा मागविण्यात आले? | र.रु.96,00,000/- |
| 4. | अ) निविदा स्विकारण्याची मुदत | दि.23.04.2025 ते 30.04.2025 |
| | ब) निविदा उघडल्याचा दिनांक (वाणिज्य देकार) | दि.14.05.2025 |
| | क) निविदा काढण्याची वेळ | प्रथम |
| | ड) एकुण प्राप्त निविदा | तीन (पात्र-2 अपात्र-1) |

(त्यापैकी पात्र निविदाधारकांची यादी खालील प्रमाणे आहे.)

| अ. क्र. | कंत्राटदाराचे नाव | निविदा रक्कम रुपये | पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त | |
|---|---|---|---|---|
| | | | रक्कम रुपये | टक्केवारी |
| 1. | Solinas Integrity Pvt.Ltd. | र.रु.96,00,000/- | र.रु.95,52,000/- | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 0.50% कमी दराने |
| 2. | Planys Technoloies Pvt.Ltd. | र.रु.96,00,000/- | र.रु.1,00,89,600/- | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 5.10% जास्त दराने |

| अ. क्र. | संक्षिप्त तपशिल | शेरा |
|---|---|---|
| 1. | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | क) असल्यास कारणे नमुद करावीत. | --- |
| 2. | सदरचा खर्च कोणत्या अर्थशिर्षकातुन करण्यात येणार आहे? ते शिर्षक नमुद करावे. | आर्थिक वर्ष 2025-26 मध्ये नाविन्यपुर्ण कामे या लेखाशिर्षकांतर्गत |
| 3. | सदर कामास खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | होय |
| 4. | सदर काम डिपॉझिट मधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | नाही |
| 5. | सोबत मान्य पुर्वगणक पत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे काय? | होय |

उक्त निविदाधारकां पैकी सर्वात कमी दराची निविदा ही सोलिनास इंटिग्रिटी प्रायव्हेट लिमिटेड यांची असून ती अंदाजपत्रकीय दरापेक्षा 0.50% कमी दराची आहे करिता सर्वात कमी सोलिनास इंटिग्रिटी प्रायव्हेट लिमिटेड यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 0.50% कमी दराची निविदा विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1925/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सर्वात कमी दराची सोलिनास इंटिग्रिर्टी प्रायव्हेट लिमिटेड यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 0.50% कमी दराच्या निविदेस मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1926/2025:-</u> (कार्यकारी अभियंता रस्ते विभाग)** **(दि.29.05.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सी.ए.असोसिएशन ऑफिस ते श्रेयश कॉलेज पर्यंत मार्गे एस.आर.पी.एफ,कॅम्प हा रस्ता अंदाजे चार कि.मी.लांबीचा सातारा परिसरात जुन्या बीड बायपासला सोलापुर-धुळे बायपासला जोडणारा तसेच सातारा तांड्याला सोलापुर-धुळे बायपासला जोडणारा महत्वाचा रस्ता आहे. सातारा परिसरात एम.आय.टी.कॉलेज ते खंडोबा मंदिर पर्यंतचा भाग हा बहुतांश रहिवाशी क्षेत्र असुन यामध्ये मागील काही वर्षात झपाट्याने वाढ झालेली आहे. तसेच सोलापुर-धुळे बायपास ते श्रेयश कॉलेज, सातारा तांडा हा भाग सुध्दा विकसीत होत आहे.

सदर रस्ता महानगरपालिका क्षेत्रातील महत्वाचा विकसित करावयाचा रस्ता असल्याने महानगरपालिका पॅनलवर नियुक्त प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यश इन्नोव्हेटिव्ह सोल्युशन्स एल.एल.पी. यांच्या मार्फत या कामाचे अंदाजपत्रक र.रु.13,44,03,290/- चे तयार करुन घेण्यात आले आहे. सदर अंदाजपत्रक हे सार्वजनिक बांधकाम राज्य दरसुची सन 2022-2023 नुसार तयार करण्यात आले असुन यामध्ये सिमेंट काँक्रीट रस्त्यासाठी जी.एस.बी.डी.एल.सी., पी.क्यु.सी.एम-40 आणि रोड फर्निचरच्या बाबींचा समावेश करण्यात आलेला आहे. सदर कामाकरीता लागणारा खर्च महानगरपालिका अर्थसंकल्प सन 2025-26 मधील विकास योजनेअंतर्गत रस्ते मजबुतीकरण करणे या लेखाशिर्षकातून भागविण्यात येणार आहे.

करीता, सी.ए.असोसिएशन ऑफिस ते श्रेयश कॉलेज पर्यंत मार्गे एस.आर.पी.एफ,कॅम्प या रस्त्याचे सिमेंट काँक्रीटीकरण करण्याच्या कामाचे अंदाजपत्रक र.रु.13,44,03,290/- मंजुरीबाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1926/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सी.ए.असोसिएशन ऑफिस ते श्रेयश कॉलेज पर्यंत मार्गे एस.आर.पी.एफ,कॅम्प हा रस्ता महानगरपालिका क्षेत्रातील महत्वाचा विकसित करावयाचा रस्ता असल्याने महानगरपालिका पॅनपलवर नियुक्त प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यश इन्नोव्हेटिव्ह सोल्युशन्स एल.एल.पी.यांच्या मार्फत या कामाचे अं.प.र.रु.13,44,03,290/- चे तयार करुन घेण्यात आले आहे.

करीता, सी.ए.असोसिएशन ऑफिस ते श्रेयश कॉलेज पर्यंत मार्गे एस.आर.पी.एफ,कॅम्प या रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटीकरण करण्याच्या कामाचे अं.प.र.रु.13,44,03,290/- यास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येते. तसेच पुढील कार्यवाही करण्याचे व त्यासाठी आवश्यक सर्व बाबींचा निर्णय घेण्याचे संपुर्ण अधिकार आयुक्तांना प्रदान करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1927/2025:- (आस्थापना-1 विभाग) (दि.29.05.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, जलनि:स्सारण विभागा अंतर्गत सातारा देवळाई व महानगरपालिकेच्या हद्दीतील Uncoverd Area मध्ये जलनि:स्सारण वाहिन्या टाकण्याचे कामासाठी तयार करणे DPR या विवक्षित कामाकरीता उपअभियंता (स्थापत्य) (जलनि:स्सारण) 01 पदासाठी स्थानिक वृत्तपत्रात जाहिरात देऊन पात्रता अनुभवानुसार सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा करार पध्दतीने घेण्याकरीता दि.10.03.2023 रोजी मुलाखत घेण्यात आली होती.

त्यानुषंगाने मुलाखतीमध्ये उपअभियंता (स्थापत्य) (जलनि:स्सारण) या पदासाठी पात्र झालेले श्री.अफसर सिद्दीकी यांना उक्त विवक्षित कामासाठी प्रथमत: सहा महिन्याच्या कालावधीकरीता करार पध्दतीने जाहिरातीत नमुद अटी व शर्तीच्या अधिन राहून नेमणुक देण्यास मा.स्थायी समितीचा ठराव क्र.743 दि.27.03.2023 अन्वये शिफारस केली होती. त्यानुसार संबंधीतास आदेश जा.क्र.मनपा/आस्था-1/2023/429 दि.27.03.2023 नुसार प्रथमत: सहा महिन्याच्या कालावधीकरीता करार पध्दतीने नियुक्ती करण्यात आलेली आहे.

सदर आदेशाची मुदत दि.26.09.2023 रोजी संपल्याने तसेच शहर अभियंता यांनी संबंधीतांची सेवा पुढील सहा महिन्यासाठी आवश्यक असल्याने मुदतवाढ देण्याबाबत अभिप्राय दिलेला होता. त्यानुसार संबंधीतांना मा.सर्वसाधारण सभेचा ठराव क्र.1018 दि.17.10.2023 अनुषंगाने आदेश जा.क्र. मनपा/आस्था-1/2023/1555 दि.18.10.2023 नुसार दि.03.10.2023 ते दि.02.04.2024 पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली होती.

तथापि, सदर आदेशाची मुदत दि.02.04.2024 रोजी संपल्याने तसेच शहर अभियंता यांनी संबंधीतांची सेवा पुढील सहा महिन्यासाठी आवश्यक असल्याने मुदतवाढ देण्याबाबत अभिप्राय दिलेला होता. त्यानुषंगाने संबंधीतास मा.सर्वसाधारण सभेचा ठराव क्र.1391 दि.15.03.2024 नुसार आदेश जा.क्र.मनपा/आस्था-1/2024/836 दि.15.03.2024 अन्वये दि.04.04.2024 ते दि.03.10.2024 पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. सदर आदेशाची मुदत दि.03.10.2024 रोजी संपत असल्याने तसेच शहर अभियंता यांनी संबंधीतांची सेवा पुढील सहा महिन्यासाठी आवश्यक असल्याने मुदतवाढ देण्याबाबत अभिप्राय दिलेला होता.

त्यानुसार संबंधीतास मा.सर्वसाधारण सभेचा ठराव क्र.16.08 दि.24.09.2024 नुसार आदेश जा.क्र.मनपा/आस्था-1/2024/2444 दि.03.10.2024 नुसार दि.07.10.2024 ते दि.06.04.2025 पर्यंत नियुक्ती देण्यात आलेली आहे. दि.03.10.2024 रोजीच्या आदेशाची मुदत दि.06.04.2025 रोजी संपल्याने तसेच शहर अभियंता यांनी संबंधीताची सेवा पुढील सहा महिन्यासाठी आवश्यक असल्याने मुदतवाढ देण्याबाबत अभिप्राय दिलेला आहे.

करीता "जलनि:स्सारण विभागाअंतर्गत सातारा देवळाई प्रकल्प प्रगतीपथावर असुन कार्यादेश निर्गमित करण्यात आलेले असून प्रकल्पासाठी निधी प्राप्त करुन घेणे तसेच कमल तलावाचे पुनरुज्जीवन करणे" या विवक्षित कामाकरीता श्री.अफसर सिद्दीकी,उपअभियंता (सेवानिवृत्त) यांची सेवा करार पध्दतीने दि.10.03.2023 रोजीच्या जाहितीमध्ये व कार्यालीन आदेश दि.27.03.2023 मध्ये नमुद अटी व शर्तीच्या अधिन राहून दि.09.04.2025 पासुन पुढील 06 महिन्यांच्या कालावधी करीता करार पध्दतीने नियुक्ती देण्याबाबत प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 1927/2025:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, "जलनि:स्सारण विभागाअंतर्गत सातारा देवळाई प्रकल्प प्रगती पथावर असुन कार्यादेश निर्गमित करण्यात आलेले असून प्रकल्पासाठी निधी प्राप्त करुन घेणे तसेच कमल तलावाचे पुनरुज्जीवन करणे" या विवक्षित कामाकरीता श्री.अफसर सिद्दीकी, उप अभियंता (सेवानिवृत्त) यांची सेवा करार पध्दतीने दि.10.03.2023 रोजीच्या जाहितीमध्ये व कार्यालीन आदेश

दि.27.03.2023 मध्ये नमुद अटी व शर्तीच्या अधिन राहून दि.09.04.2025 पासुन पुढील 06 महिन्यांच्या कालावधी करीता करार पध्दतीने नियुक्ती देण्याबाबतच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1928/2025:-</u> (यांत्रिकी विभाग)** **(दि.05.06.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेची वाहने व औरंगाबाद स्मार्टसिटीच्या बसेसकरीता Digitalized Fleet management Software System चा अवलंब करावयाचा आहे. सद्यस्थितीत यांत्रिकी विभाग व औरंगाबाद स्मार्टसिटी बस विभागातील वाहनांचे Management, Maintenance, History Book Record Keeping, Insurance, Registration इ.सर्व कामे ही Manual पध्दतीने होत आहेत. ही सर्व कामे Digitalized पध्दतीने करण्यासाठी Digitalized Fleet Management Software System विकसीत करणे आवश्यक आहे. Digitalized Fleed Management Software System चा अवलंब केल्यास वाहनांच्या नियोजनावर योग्य नियंत्रण ठेवणे शक्य होईल. तसेच सर्व कामे Digitalized पध्दतीने झाल्यामुळे कार्यालयीन कामाचा वेग वाढून कार्यक्षमता वाढणार आहे.

उपरोक्त प्रमाणे Digitalized Fleet Management Software System या प्रणालीने काम सुरु करण्यासाठी औरंगाबाद स्मार्टसिटीने Maha Infotech Pvt.Ltd. (MIPL) या Project Management Counsultant (PMC) यांची नियुक्ती केली असून PMC ने या कामासाठी दरपत्रके घेऊन न्युनतम दराच्या दरपत्रकानुसार र.रु.5,21,06,700/- रक्कमेचे अंदाजपत्रक सादर केले आहे. यापैकी स्मार्टसिटीच्या बसेस करीता Digitalized Fleet Management Software System ला र.रु.2,38,37,500/- चा अंदाजपत्रकीय खर्च लागणार आहे. सदरील खर्च हा स्मार्टसिटी मार्फत करण्यात येणार आहे व निविदा प्रक्रिया महानगरपालिकेतर्फे राबविण्यात येणार आहे. त्याबाबतचे सहमती पत्र स्मार्टसिटी ने सादर केले आहे.

महानगरपालिकेच्या वाहनांसाठी Fleet Management Software System ला लागणारा र.रु.2,7247,500/- चा खर्च महानगरपालिका फंडातून करावयाचा आहे. करीता महानगरपालिकेच्या वाहनांसाठी Fleet Management Software System चा Digitalized अवलंब करावयास र.रु.2,72,47,500/- रक्कमेचे अंदाजपत्रक मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1928/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेच्या वाहनांचे योग्य नियंत्रण करणेसाठी Fleet Management Software System कार्यपध्दती राबविणे व त्यासाठी महानगरपालिकेच्या फंडातून करण्यात येणाऱ्या र.रु.2,72,47,500/- च्या अंदाजपत्रकीय खर्चास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1929/2025:-</u> (कार्यकारी अभियंता इमारत विभाग)** **(दि.05.06.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजने अंतर्गत राज्यातील शाळेचा कायापालट करण्याचा निर्णय झाल्यानुसार छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका हद्दीतील नारेगाव येथील शाळेची निवड झालेली असुन त्यासाठी शासन निर्णय क्र. आदर्श-2023/प्र.क्र.81/एसडी-6 दि.09 जानेवारी 2024 नुसार र.रु.3,20,27,750/- कोटी इतका निधी प्राप्त झालेला आहे. त्यामधुन वॉर्ड क्र.35 नारेगाव अंतर्गत महानगरपालिका केंद्रीय शालेय इमारत (माध्यमिक व उच्च माध्यमिक) बांधण्याचे प्रस्तावित आहे.

सदर कामासाठी वास्तुविशारद श्री.गणेश म्हारोळकर यांच्या मार्फत अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन त्यांना Post Tender Activites साठी एकुण प्रकल्प किंमतीच्या 1.50% इतके शुल्क अदा करण्याचे प्रस्तावित आहे. तसेच Structural Engineers Consultancy चार्जेस साठी एकुण प्रकल्प किंमतीच्या 0.50% इतके अदा करण्याचे प्रस्तावित आहे.

करीता, वास्तुविशारद श्री.गणेश म्हारोळकर यांना Pre Tender Activites करीता एकुण प्रकल्प किंमतीच्या 0.60% व Post Tender Activites साठी एकुण प्रकल्प किंमतीच्या 0.90% व GST 18% प्रमाणे शुल्क अदा करणे तसेच Structural Engineers Consultancy चार्जेस

साठी एकुण प्रकल्प किंमतीच्या 0.50% व GST 18% प्रमाणे शुल्क देऊन नकाशे, आराखडे व इतर निविदा विषयक कामे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार संदर्भाने शासन निर्णयातील विहित अटी व शर्तीच्या अधिन राहून करुन घेण्याच्या मंजुरी बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव क्रमांक 1929/2025:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.35, नारेगाव अंतर्गत महानगरपालिका केंद्रीय शालेय इमारत (माध्यमिक व उच्च माध्यमिक) बांधण्याच्या कामासाठी वास्तुविशारद श्री.गणेश म्हारोळकर यांना Pre Tender Activites साठी प्रकल्प किंमतीच्या 0.60% व Post Tender Activites साठी एकुण प्रकल्प किंमतीच्या 0.90% व GST 18% प्रमाणे शुल्क अदा करणे तसेच Structural Engineers Consultancy चार्जेससाठी एकुण प्रक्लप किंमतीच्या 0.50% व GST 18% प्रमाणे इतके शुल्क अदा करणे, देऊन नकाशे, आराखडे व इतर निविदा विषयक कामे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार संदर्भाने शासन निर्णयातील विहित अटी व शर्तीच्या अधिन राहून करुन घेण्याच्या मंजुरी बाबतच्या प्रस्तावास मा.सर्वसाधारण सभेची मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1930/2025:-** **(कार्यकारी अभियंता इमारत विभाग)** **(दि.05.06.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजनेअंतर्गत राज्यातील शाळेचा कायापालट करण्याचा शासन निर्णय झाल्यानुसार छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका हद्दीतील नारेगाव येथील शाळेची निवड भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा म्हणुन झालेली आहे.

शासन निर्णय क्र.आदर्श-2023/प्र.क्र.81/एसडी-6 दि.09 जानेवारी 2024 नुसार र.रु.3,20,29,000/- कोटी आर्थिक निधी महानगरपालिकेस प्राप्त झालेला आहे. सदर प्राप्त निधी मधुन वॉर्ड क्र.35 नारेगाव अंतर्गत महानगरपालिका केंद्रीय शालेय इमारत (माध्यमिक व उच्च माध्यमिक) बांधण्याचे प्रस्तावित आहे. तद्नुसार भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा अंतर्गत वॉर्ड क्र.35 नारेगाव मधील महानगरपालिका केंद्रीय शालेय इमारत (माध्यमिक व उच्च माध्यमिक) बांधण्याचे कामाचे र.रु.3,20,27,750/- चे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन 2022-23 च्या एस.एस.आर.नुसार तयार करण्यात आलेले आहे.

सदरील प्रारुप शालेय इमारत नकाशे अंतर्गत तळ मजला व पहिल्या मजल्याचे बांधकाम प्रस्तावित असुन या बाबतचे संक्षिप्त विवरण खालील प्रमाणे आहे.

| FLOOR PLAN | BUILT UP AREA | CLASS ROOM NO | CLASS ROOM SIZE | GIRLS TOILET NO | BOYS TOILET NO |
|---|---|---|---|---|---|
| GROUND FLOOR PLAN | BUILT UP AREA 399.55 SQ.MTR. | CLASS ROOM 5 | CLASS ROOM SIZE 5.50X6.70 SQ.MTR. | GIRLS TOILET 4 WC | BOYS TOILET 4 WC |
| FIRST FLOOR PLAN | BUILT UP AREA399.55 SQ.MTR. | CLASS ROOM 5 | CLASS ROOM SIZE5.50X6.70 SQ.MTR. | GIRLS TOILET 4 WC | BOYS TOILET 4 WC |
| TOTAL | 799.10 SQ.MTR. | 10 | 36.85 SQ.MTR.PER ROOM | 8 WC | 8WC |

करीता र.रु.3,20,27,750/- चे वरील नुसारचे अंदाजपत्र्क प्रशासकीय मान्यतेस्तव मा.सर्वसाधारण सभेसमोर विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 1930/2025:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शासन निर्णय क्र.आदर्श-2023/प्र.क्र.81/एसडी-6 दि.09 जानेवारी 2024 नुसार र.रु.3,20,29,000/- कोटी आर्थिक निधी महानगरपालिकेस प्राप्त निधीमधुन भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा अंतर्गत वॉर्ड क्र.35 नारेगाव मधील महानगरपालिका केंद्रीय शालेय इमारत (माध्यमिक व उच्च माध्यमिक) बांधणे या कामाचे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन

2022-23 च्या एस.एस.आर.नुसार तयार करण्यात आलेल्या र.रु.3,20,27,750/- च्या अंदाजपत्रकास मा.सर्वसाधारण सभेची सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1931/2025:-</u> (आस्थापना-1 विभाग)** **(दि.05.06.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, "पाणीपट्टी कर निर्धारण अंतिम करणेसाठी झोन अधिकारी यांना सहाय्य करणे" या विवक्षित कामासाठी ठराव क्र.372/2022 दि.11.05.2022 अन्वये सहाय्यक म्हणुन श्री.गणपत व्यंकटराव जाधव, उपआयुक्त (सेवानिवृत्त), महानगरपालिका परभणी यांची आदेश जा.क्र.मनपा/आस्था-1/2022/516 दि.11.05.2022 नुसार सेवा करार पध्दतीने विहित अटी व शर्तीच्या अधिन राहून प्रथमत: 06 महिन्यांच्या कालावधीकरीता करार पध्दतीने, सेवानिवृत्त अधिकाऱ्यांना दरमहा सेवानिवृत्तीपुर्वी मिळत असलेल्या एकूण वेतनातुन (मुळ वेतन व महागाई भत्ता धरुन) त्यांना आता मिळत असलेले एकुण निवृत्तीवेतन (महागाई भत्ता आणि अंशराशीकृत निवृत्तीवेतनासह) वजा केल्यानंतर होणारी रक्कम त्यांचे मासिक पारिश्रमिक म्हणुन निश्चित करण्यात येईल. परंतु या पारिश्रमिक रक्कमेची कमाल मासिक मर्यादा र.रु.40,000/- (अक्षरी रक्कम रुपये चाळीस हजार फक्त) इतक्या मर्यादित राहील या अटीवर नियुक्ती करण्यात आलेली असून ते सदर पदावर दि.20.06.2022 रोजी रुजु झाले.

दि.11.05.2022 रोजीच्या आदेशाची मुदत दि.19.12.2022 रोजी संपल्याने उपआयुक्त (कर) यांनी तुर्तास संबंधीताची सेवा वसुली कामी इतर तांत्रिक कामासाठी आवश्यकता असल्याने 06 महिन्यासाठी मुदतवाढ देण्याबाबत अभिप्राय दिलेला होता. त्यानुषंगाने मा.सर्वसाधारण सभेचा ठराव क्र.637 दि.10.01.2023 अन्वये संबंधीताना आदेश जा.क्र.मनपा/आस्था-1/2023/52 दि.10.01.2023 नुसार 02 दिवसांचा तांत्रिक खंड देऊन दि.22.12.2022 ते दि.21.06.2023 पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती.

दि.10.01.2023 रोजीच्या आदेशाची मुदत दि.21.06.2023 रोजी संपल्याने उपआयुक्त (कर) यांनी संबधीताद्वारे झोन कार्यालयातील कर्मचाऱ्यांच्या कामाचा आढावा घेणे, बील वाटप, जप्ती कामे नियंत्रण ठेवणे शक्य असल्याने त्यांन 06 महिन्यांकरीता मुदतवाढ देण्याबाबत अभिप्राय दिलेला होता. त्यानुषंगाने मा.सर्वसाधारण सभेचा ठराव क्र.894 दि.31.07.2023 अन्वये संबंधीतांना आदेश जा.क्र. मनपा/आस्था-1/2023/1163 नुसार 02 दिवसांचा तांत्रिक खंड देऊन दि.26.06.2023 ते दि.25.12.2023 पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली होती.

तथापि सदर आदेशाची मुदत दि.25.12.2023 रोजी संपल्याने उपआयुक्त (कर) यांनी सध्या वसुली कामी महत्वपुर्ण कार्यवाही संबंधीताकडून काम उत्तम प्रकारे होत असल्याने त्यांना पुढील मुदत वाढ देण्याबाबत अभिप्राय दिलेला होता त्यानुषंगाने मा.सर्वसाधारण सभेचा ठराव क्र.1176/2024 दि.16.01.2024 अन्वये संबंधीतांना आदेश मनपा/आस्था-1/2024/88 दि.17.01.2024 अन्वये दि.28.12.2023 ते दि.27.06.2024 पर्यंत नियुक्ती देण्यात आलेली होती. दि.17.01.2024 रोजीच्या आदेशाची मुदत दि.27.06.2024 रोजी संपल्याने उपआयुक्त (कर) यांनी त्यांना पुढील मुदतवाढ देण्याबाबत अभिप्राय दिलेला होता.

मा.सर्वसाधारण सभेचा ठराव क्र.1495/2024 दि.18.07.2024 अन्वये संबंधीतांना आदेश जा.क्र.मनपा/आस्था-1/2024/2371 दि.18.07.2024 अन्वये दि.01.07.2024 ते दि.31.12.2024 पर्यंत नियुक्ती देण्यात आलेली होती. तथापि, दि.18.07.2024 रोजीच्या आदेशाचीमुदत दि.31.12.2024 रोजी संपल्याने उपआयुक्त (कर) यांनी त्यांना पुढील मुदतवाढ देण्याबाबत अभिप्राय दिलेला होता.

मा.सर्वसाधारण सभेचा ठराव क्र.1495/2024 दि.18.07.2024 अन्वये संबंधीतांना आदेश जा.क्र.मनपा/आस्था-1/2024/2371 दि.18.07.2024 अन्वये दि.01.07.2024 ते दि.31.12.2024 पर्यंत नियुक्ती देण्यात आलेली होती तथापि, दि.18.07.2024 रोजीच्या आदेशाची मुदत दि.31.12.2024 रोजी संपल्याने उपआयुक्त (कर) यांनी त्यांना पुढील मुदतवाढ देण्याबाबत अभिप्राय दिलेला होता.

त्यानुसार मा.सर्वसाधारण सभेचा ठराव क्र.1794 दि.30.01.2025 अन्वये संबंधीतांना आदेश जा.क्र.मनपा/आस्था-1/2025/270 दि.07.02.2025 अन्व्ये दि.03.01.2025 ते दि.31.03.2025 पर्यंत

नियुक्ती देण्यात आलेली होती. तथापि, दि.30.01.2025 रोजीच्या आदेशाची मुदत दि.31.03.2025 रोजी संपल्याने उपआयुक्त (कर) यांनी त्यांना पुढील मुदतवाढ देण्याबाबत अभिप्राय दिलेला होता.

करीता, "छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या हद्दीतील मालमत्ता कर आणि पाणीपट्टी निर्धारण अंतिम करणे करीता समन्वयक/सहाय्यक व इतर अनुषंगीक कार्य करणे" या विवक्षित कामाकरीता श्री.गणपत व्यंकटराव जाधव, उपआयुक्त (सेवानिवृत्त), महानगरपालिका परभणी यांची आदेश सेवा करार पध्दतीने आदेश जा.क्र.मनपा/आस्था-1/2022/516 दि.11.05.2022 रोजीच्या आदेशामध्ये नमुद अटी व शर्तीच्या अधिन राहून आदेश जा.क्र.मनपा/आस्था-1/2023/761 दि.31.05.2023 अन्वये मंजुर केलेल्या मासिक पारिश्रमिक मानधन, वाहन भत्ता व एच.आर.ए.सह आदेश निर्गमनाच्या तारखेपासुन पुढील 06 महिन्यांच्या कालावधीकरीता करार पध्दतीने नियुक्ती देण्याबाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 1931/2025:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे**,** "छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या हद्दीतील मालमत्ता कर आणि पाणीपट्टी कर निर्धारण अंतिम करणेसाठी झोन अधिकारी यांना सहाय्य करणे" या विवक्षित कामा करीता श्री.गणपत व्यंकटराव जाधव, उपआयुक्त (सेवानिवृत्त), महानगरपालिका परभणी यांची आदेश सेवाकरार पध्दतीने आदेश जा.क्र.मनपा/आस्था-1/2022/516 दि.11.05.2022 साठी ठराव क्र.372/ 2022 दि.1.05.2022 रोजीच्या आदेशामध्ये नमुद अटी व शर्तीच्या अधिन राहून आदेश जा.क्र. मनपा/ आस्था-1/2023/761 दि.31.05.2023 अन्वये मंजुर केलेल्या मासिक पारिश्रमिक मानधन, वाहन भत्ता व एच.आर.ए.सह आदेश निर्गमनाच्या तारखेपासुन पुढील 06 महिन्यांच्या कालावधीकरीता करार पध्दतीने नियुक्ती देण्याबाबतच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते**.** वैधानिक कार्यवाही व्हावी**.**

**प्रस्ताव क्रमांक 1932/2025:- (यांत्रिकी विभाग)** **(दि.05.06.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर कार्यरत वाहन चालकांना शासन निर्णय वित्त विभाग क्र.अकाभ-1311 प्र.क्र.9/सेवा-6 दि.09.09.2011 नुसार व कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/आस्था-1/2011/1462 दि.18.10.2011 नुसार विहीत 09 तास 45 मिनिटाच्या कामाच्या वेळेपेक्षा जास्त काम केल्यास र.रु.40.00 प्रतितास या दराने अतिकालीक भत्ता लागु करण्यात आलेला आहे.

शासन निर्णय क्र.अकाभ-2022 प्र.क्र.7/सेवा-6 दि.07.08.2023 अन्वये वाहनचालकांना 09 तास 45 मिनिटापेक्षा जास्त वेळ काम केल्यास व रविवार व सुट्टीच्या दिवशी सुध्दा काम केल्यास दर तासाला र.रु.100/- (अर्धातास किंवा जास्त काम केल्यास तो पुर्ण तास धरण्यात येईल) या प्रकारे अतिकालीक भत्ता मंजुर करण्यात आला आहे. तथापि, वाहन चालकास एक महिन्यात मिळणारी अतिकालीक भत्याची रक्कम त्यांच्या एकुण पगाराच्या 30% पेक्षा जास्त असु नये अशी अट टाकण्यात आली आहे.

दि.7 ऑगस्ट 2023 च्या शासन निर्णयानुसार शासन निर्णयात समाविष्ठ अटीच्या अधिन राहून छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील वाहनचालकांना 09 तास 45 मिनिटा पेक्षा जास्त काम केल्यास व रविवार व सुट्टीच्या दिवशी काम केल्यास प्रतितास र.रु.100/- अतिकालीक भत्ता देण्याचा व त्यासाठी लागणाऱ्या वाढीव आर्थिक तरतुदीस मान्यता देण्याचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या समोर विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 1932/2025:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर कार्यरत वाहन चालकांना शासन निर्णय वित्त विभाग क्र.अकाभ-1311 प्र.क्र.9/सेवा-6 दि.09.09.2011 नुसार शासन निर्णयात समाविष्ठ अटीचा अधिन राहून 09 तास 45 मिनिटा पेक्षा जास्त काम केल्यास व रविवार व सुट्टीच्या दिवशी काम केल्यास प्रतितास र.रु.100/- अतिकालीक भत्ता त्यांच्या एकुण पगाराच्या 30% पेक्षा जास्त असुन नये. या अटीच्या आधारे देण्यास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1933/2025:-</u> (शिक्षण विभाग)** **(दि.06.06.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्रीमती राहिला नियामतुल्ला पिरजादे, सहशिक्षिका, प्रा.शा. नारेगाव उर्दु, केंद्रीय प्राथमिक शाळा नारेगाव (म.) महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर या शाळेवर सहशिक्षिका म्हणुन सद्यस्थितीत कार्यरत असुन त्यांनी त्यांची सेवा महानगरपालिका सोलापुर येथील आस्थापनेवर एकतर्फी आंतरजिल्हा बदलीने वर्ग करण्यासाठी प्रस्ताव सादर करुन विनंती केली आहे.

करीता, श्रीमती राहिला नियामतुल्ला पिरजादे, सहशिक्षिका, प्रा.शा. नारेगाव उर्दु, केंद्रीय प्राथमिक शाळा नारेगाव (म.) महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर यांची सेवा महानगरपालिका सोलापुर शिक्षण विभागाच्या आस्थानेवर एकतर्फी आंतरजिल्हा बदलीने वर्ग करण्यास ना-हरकत प्रमाणपत्र देण्याकरीता व महानगरपालिका सोलापुर यांच्याकडून एकतर्फी आंतरजिल्हा बदलीने सेवेत रुजु करुन घेण्याबाबत संमतीपत्र प्राप्त झाल्यानंतर संबंधतीस महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर शिक्षण विभागाच्या आस्थापनेवरुन कार्यमुक्त करण्याची कार्यवाही करण्याकरीता मा.सर्वसाधारण सभेसमोर प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1933/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्रीमती राहिला नियामतुल्ला पिरजादे, सहशिक्षिका, प्रा.शा. नारेगाव उर्दु, केंद्रीय प्राथमिक शाळा नारेगाव (म.) महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर यांची एकतर्फी आंतरजिल्हा बदलीने सेवा महानगरपालिका सोलापुर शिक्षण विभागाच्या आस्थापनेवर वर्ग करण्यासाठी ना-हरकत प्रमाणपत्र देण्यासाठी व सोलापुर महानगरपालिकेने त्यांची सेवा वर्ग करण्यास संमती दिल्यानंतर त्यांना महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर शिक्षण विभागाच्या आस्थापनेवरुन कार्यमुक्त करण्याची कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1934/2025:-</u> (कार्यकारी अभियंता, ड्रेनेज विभाग)** **(दि.10.06.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सैनिकी शाळा व विधी विद्यापीठ, कांचनवाडी येथे R.C.C.Compound Wall बांधणे, या कामाचे र.रु.1,85,08,456/- चे अंदाजपत्रक SSR 2022-23 च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले आहे.

प्रकरणी माजी महापौर श्री.नंदकुमार घोडेले यांचे पत्र प्राप्त झाले असुन सदर पत्रात त्यांनी कांचनवाडी येथील राजे संभाजी सैनिकी शाळापासुन नॅशनल विधी विद्यापीठ समोरील नाल्याच्या दोनही बाजुंना संरक्षक भिंत नसल्याने, नाल्यामध्ये डुकरे, जनावरे तसेच दुषित पाण्यामुळे दुर्गंधी पसरली असुन यामुळे नागरीकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे या ठिकाणी संरक्षित भिंत बांधुन देणे बाबत त्यांनी विनंती केली आहे.

त्यानुसार सदर ठिकाणी स्थळपाहणी करुन या कामाचे अंदाजपत्रक र.रु.1,85,08,456/- चे तयार करण्यात आले आहे. सदरील कामाचा खर्च जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत प्रस्तावित करण्यात येत आहे.

करीता, सैनिकी शाळा व विधी विद्यापीठ, कांचनवाडी येथे R.C.C.Compound Wall बांधणे या कामाचे र.रु.1,85,08,456/- चे अंदाजपत्रक मान्यतेस्तव तसेच या कामाच्या निधी करीता जिल्हा वार्षिक नियोजन समितीस प्रस्ताव सादर करण्याच्या मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1934/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सैनिकी शाळा व विधी विद्यापीठ, कांचनवाडी येथे R.C.C. Compound Wall बांधणे या कामाचे र.रु.1,85,08,456/- चे अंदाजपत्रकास तसेच या कामाच्या निधी करीता जिल्हा वार्षिक नियोजन समितीस प्रस्ताव सादर करणे या बाबीस मंजुरी प्रदान करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1935/2025:-</u> (शिक्षण विभाग)** **(दि.10.06.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, व्यवस्थापक मे.अन्नामृत फाऊंडेशन एम.आय.डी.सी.एरिया चिकलठाणा छत्रपती संभाजीनगर यांच्या विनंती अर्जानुसार महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर शिक्षण विभाग अंतर्गत 56 शाळा असुन सदर शाळांना सन 2012 पासुन मे.अन्नामृत फाऊंडेशन शालेय पोषण आहार शिजवुन पुरवठा करीत आहे. सदर संस्थेचे काम चांगले व शासन निर्णयास अनुसरून

आहे. संस्थेच्या कामाबाबत सन 2024-25 पर्यंत एकही गंभीर तक्रार या कार्यालयास प्राप्त नाही. संस्था शासनाच्या नियमानुसार व वेळोवेळी प्राप्त होणाऱ्या आदेशांचे काटेकोरपणे पालन करुन योजना राबविते. त्यामुळे विद्यार्थ्यांना योजनेचा पुरेपुर लाभ मिळतो. तसेच सर्व प्रकारचे अभिलेखे संस्था व शाळा स्तरावर अद्यावत असते. विद्यार्थी, पालक, मुख्याध्यापक तसेच महानगरपालिका अधिकारी व समाजातील मान्यवरांनी संस्थेच्या कामाबाबत चांगले अभिप्राय नोंदवले आहे.

त्यामुळे मनपा शाळांतील विद्यार्थ्यांना उच्च दर्जाचा शालेय पोषण आहार मिळण्यासाठी व शाळे मधील विद्यार्थी संख्या वाढविण्याच्या दृष्टिने मे.अन्नामृत फाऊंडेशन, छत्रपती संभाजीनगर संस्थेस काम देणे योग्य वाटते प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजना अंतर्गत संस्थेस शासन निर्णयानुसार संबंधीत कामाचे देयक व इतर खर्च शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, महाराष्ट्र शासन यांच्याकडून देण्यात येतो.

करीता, प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजना अंतर्गत संदर्भ क्र.1 मधील मुद्दा क्र.5 नुसार मे.अन्नामृत फाऊंडेशन या संस्थेकडून महानगरपालिका शाळांना शालेय पोषण आहाराचा पुरवठा करण्याचे काम देण्यासाठी प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1935/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मे.अन्नामृत फाऊंडेशन एम.आय.डी.सी.एरिया चिकलठाणा यांना महानगरपालिका व्यवस्थापनाच्या सर्व शाळा सन 2025-26 शैक्षणिक वर्षासाठी प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजना अंतर्गत शालेय पोषण आहार शिजवुन पुरवठा करण्याचे काम देणेसाठी व संस्थेस शासन निर्णयानुसार संबंधीत कामाचे देयक व इतर खर्च शालेय शिक्षण व क्रिडा विभाग महाराष्ट्र शासन यांच्याकडून देण्यासाठी योग्य ती कार्यवाही करण्यासाठी मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**स्वाक्षरित/-**
महापालिका सचिव
महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर

**<u>प्रस्ताव क्रमांक 1936/2025:-</u> (शिक्षण विभाग)** **(दि.10.06.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिकेच्या मराठी व उर्दु माध्यमाच्या 107 बालवाडी वर्ग भरतात त्या वर्गांना शिकविण्यासाठी 107 बालवाडी शिक्षिका यांना प्रतिमाह र.रु.12500/- मानधनावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देण्यात येते. त्याचप्रमाणे 09 बालवाडी सेविका यांना प्रतिमाह र.रु.7500/-मानधनावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देण्यात येते.

श्रीमती रेखा उमेश बकले यांनी केलेला विनंती अर्ज व शिक्षण विभाग प्रमुख यांनी मा.अतिरीक्त आयुक्त-2 यांच्याशी दि.25.03.2025 रोजी झालेल्या चर्चेनुसार संबंधीत शिक्षिका ही मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणाअंतर्गत प्रशिक्षणार्थी म्हणुन प्रा.शा.हर्सुल या शाळेवर प्रशिक्षणार्थी म्हणुन काम करीत आहे. संबंधीताचे शिक्षण बी.ए.बी.एड.पुर्ण झालेले असुन संबंधीताने प्रा.शा.हर्सुल या शाळेवर बालवाडी शिक्षिका या पदासाठी विनंती अर्ज केला आहे.

करीता, प्रा.शा.हर्सुल या शाळेमध्ये बालवाडीसाठी श्रीमती रेखा उमेश बकले यांना प्रतिमाह र.रु.12500/- मानधना तत्वावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देण्यात येत आहे.

**<u>ठराव क्रमांक 1936/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्रीमती रेखा उमेश बकले यांना बालवाडी शिक्षिका म्हणुन प्रा.शा. हर्सुल येथे मानधन तत्वावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देण्याकरीता प्रस्ताव सादर करण्यात येत आहे. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1937/2025:-</u> (महिला व बालकल्याण विभाग)** **(दि.10.06.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शासन निर्णय क्र.संकीर्ण-2009/1443/प्र.क्र.175/09/ नवि-20 दि.08 जानेवारी 2010 च्या शासन निर्णयानुसार महानगरपालिका मध्ये महिलांना संरक्षण पुरविण्या करीता समुपदेशन/मदत केंद्र स्थापन करण्यात यावी. असे निर्देश देण्यात आलेले आहे. समुपदेशन केंद्रांमध्ये कुटूंबातील मारहाण, लैंगिक छळ व इतर समस्यांनी त्रासलेल्या समस्या ग्रस्त व पिडीत महिलांना समुपदेशन करण्यात यावे अशा शासनाकडून सुचना प्राप्त आहे.

त्या अनुषंगाने महानगरपालिका हद्दीत सद्यस्थितीत एकुण पाच ठिकाणी समुपदेशन केंद्र सुरु करणे करीता दि.10.01.2025 रोजी समितीच्या बैठकीमध्ये जागा उपलब्धते बाबत झालेल्या चर्चेनुसार निश्चित केलेल्या जागांचा तपशील खालील प्रमाणे.

1) मा.पोलीस उपआयुक्त, परिमंडळ-1, झाशीची राणी चौक, नागेश्वरवाडी कार्यालय,
2) मा.पोलीस उपआयुक्त परिमंडळ-2, संभाजी कॉलनी एन-6 मध्यवर्ती जकात नाका, सिडको,
3) मा.पोलीस निरिक्षक, भरोसा सेल, सिल्लेखाना, छत्रपती संभाजीनगर
4) महानगरपालिकेचे मेल्ट्रॉन आरोग्य केंद्र
5) मनपाचे आरोग्य केंद्र, रिलायन्स मॉल पाठीमागे, गारखेडा छत्रपती संभाजीनगर.

उपरोक्त प्रमाणे मा.पोलीस उपआयुक्त परिमंडळ-1 व मा.पोलीस उपआयुक्त परिमंडळ-2, तसेच भरोसा सेल, सिल्लेखाना येथे समुपदेशन केंद्र सुरु करणे करीता जागा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. तसेच मेल्ट्रॉन आरोग्य केंद्र व गारखेडा येथील रिलायन्स मॉलच्या पाठीमागे इमारती मधील मनपाचे आरोग्य केंद्र येथे समुपदेशन केंद्र सुरु करणे करीता उपआयुक्त तथा विभाग प्रमुख मालमत्ता व्यवस्थापन यांनी चर्चेदरम्यान जागा उपलब्धते बाबत संमती दर्शविली आहे.

शासन निर्णय क्र.समुप-2022/प्र.क्र.112/का-10 दि.19 नोव्हेंबर 2013 अन्वये एका समुपदेशना करीता खालील प्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

1) मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळता इतर जिल्ह्यात (1 एमएस डब्ल्यु व 1 विधी सल्लागार) समुपदेशकांचे मानधन प्रतिमाह र.रु.12000/- प्रमाणे (र.रु.12000 X 2 X 12) वार्षिक खर्च र.रु.2,88,000/-
2) प्रशासकीय खर्च (प्रकरणाच्या नोंदी ठेवण्यासाठी)
   प्रतिमाह र.रु.1000/- प्रमाणे (र.रु.1000 X12) वार्षिक खर्च र.रु.12000/-

-------------------------------------------------------------------------------------

एका समुदपदेशन केंद्रासाठी वार्षिक खर्च र.रु.300000/-

त्या अनुषंगाने एका समुपदेशन केंद्राकरीता र.रु.300000/- (अक्षरी रक्कम रुपये तीन लक्ष) इतका) खर्च आहे. याप्रमाणे पाच ठिकाणी समुपदेशन केंद्राकरीता र.रु.300000X5 = 1500000/- (अक्षरी रक्कम रुपये पंधरालक्ष फक्त) इतका अपेक्षित आहे.

करीता, महिला व बाल कल्याण विभागामार्फत पाच ठिकाणी समुपदेशन केंद्र सुरु करणे करीता एकुण खर्च र.रु.1500000/- (अक्षरी रक्कम रुपये पंधरा लक्ष फक्त) बाबतच्या खर्चास मंजुरी मिळणे बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 1937/2025:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महिला व बाल विकास विभागामार्फत कुटूंबातील मारहाण, लैंगिक छळ व इतर समस्यांनी त्रासलेल्या समस्याग्रस्त व पिडीत महिलांना समुपदेशन करण्या करीता महानगरपालिका हद्दीत पाच ठिकाणी समुपदेशन केंद्र सुरु करणे करीता एकुण र.रु.1500000/- (अक्षरी रक्कम रुपये पंधरा लक्ष फक्त) बाबतच्या खर्चास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1938/2025:-** **(आस्थापना-1 विभाग)** **(दि.10.06.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, अवर सचिव, नगर विकास विभाग, नवि-24, मंत्रालय मुंबई यांचे पत्र) क्र.छसंमनपा-2024/प्र.क्र.266/नवि-24 दि.21.06.2024 अन्वये श्री.हंसराज बन्सवाल यांनी दि.24.05.2024 रोजी त्यांना महानगरपालिकेत क्युरेटर या पदावर नियमित समावेशन करण्याबाबत केलेल्या विनंती अर्जाच्या अनुषंगाने प्रकरणी वस्तुस्थिती पडताळून आपल्या स्तरावर नियमानुसार उचित कार्यवाही करावी व आवश्यक असल्यास प्रस्ताव शासनास सादर करण्याबाबत कळविल्यानुसार प्रस्ताव सादर करण्यात येतो की, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या टाऊन हॉलमध्ये कलादालनाची दैनंदिन देखभाल व कामे पार पाडण्यासाठी क्युरेटर (काळजीवाहक) या पदासाठी दि.29.11.2007 रोजी जाहिरात देण्यात आली होती. सदर पदाच्या थेट मुलाखतीमध्ये गुणवत्तेनुसार उत्कृष्ठ ठरलेले श्री.हंसराज नारायण बन्सवाल यांना कला दालन येथे क्युरेटर (काळजीवाहक) यांना मानधन तत्वावर नियुक्ती देण्यात आलेली आहे. त्यांना मा.स्थायी समिती सभेच्या ठरावान्वये वेळोवेळी मुदतवाढ देण्यात आलेली असुन आजपावेतो कार्यरत आहे.

यापुर्वी त्यांनी महानगरपालिकेच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र व भारत माता मंदिराची पुर्ण जबाबदारी व तेथील फोटो गॅलरीची निर्मातीच्या कामात मोलाचे सहकार्य जी-20 आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये शहरातील विविध ठिकाणी चित्र काढण्यासाठी सहकार्य, वर्ल्ड सिनेमा प्रदर्शनाच्या कार्यक्रमाचे आयोजन, पर्यावरण संवर्धनासाठी मनपातर्फे निर्मिती 'Can We' या लघुचित्रपटाची निर्मितीच्या कामात मोलाचे काम चलचित्राचे जनक Eadweard Muybridge यांच्या स्मृती प्रित्यार्थ चर्चासत्र आयोजन करणे, 'हर घर तिरंगा व मेरा माटी मेरा देश' या राष्ट्रीय कार्यक्रमाच्या आयोजनाचे कामे केलेली आहेत.

तसेच ते मागील 17 वर्षात महानगरपालिकेतील चारशे वर्षे जुन्या पुरातन कलादालन वास्तुचे जतन व देखरेख करणे, कलादालनात सांस्कृतिक कार्यक्रमात सहभाग घेणे, शिल्प व हस्तकला यांचे वेगवेगळे कलात्मक प्रदर्शन आयोजन करणे, वेगवेगळ्या विषयावर राज्यस्तरीय पोस्टर स्पर्धा आयोजन करणे, प्रसिध्द कलावंतांना आमंत्रित करुन कार्यशाळा व व्याख्यान आयोजित करुन प्रदर्शन भरविणे, दिव्यांग व स्थानिक कलावंतांना व लहान मुलांच्या कला गुणांना वाव देण्यासाठी वेळोवेळी विविध कार्यक्रमांचे (पेंटींग, रांगोळी, इको फ्रेंडली गणपती तयार करणे, लहान मुलांसाठी समर कॅम्प इ.) आयोजन करणे इ.कामे करीत आहे. उक्त कामांमध्ये त्यांचा मोलाचा वाटा आहे. तथापि, ते मानधन तत्वावर काम करीत असुन त्यांना महानगरपालिकेच्या आस्थापनेवर नियमित सेवेत सामावून घेतल्यास त्याचा फायदा महानगरपालिकेस होईल.

श्री.हंसराज नारायण बन्सवाल, क्युरेटर यांची शैक्षणिक अर्हता खालीलप्रमाणे आहे.

1. Bachelor in Fine Arts (BFA)
2. Master in fine arts (MFA)
3. Diploma in Art Teacher
4. P.G Certificate Course in Museum Studies (02 Years)

5. Computer Aided Illustrations & Page Making
6. Diploma in Computer Application

नगर विकास विभागाचे शासन निर्णय दि.15.02.2021 अन्वये महानगरपालिकेच्या मंजुर आकृतीबंधा मध्ये संग्रहालय अभिरक्षक (Museum Curator)-1 पद मंजुर असून सद्यस्थितीत पद रिक्त नाही. तसेच नगर विकास विभागाचे शासन निर्णय दि.26.08.2021 नुसार मंजुर सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम 2021 सदर पदाची अर्हता व नेमणूकीची पध्दत खालीलप्रमाणे आहे

वेतनश्रेणी (एस-8) 25500-81100

| पदनाम व श्रेणी | नेमणूकीची पध्दत व टक्केवारी | नमणूकीच्या पध्दती व नेमणूकीकरिता अर्हता |
|---|---|---|
| संग्रहालय अभिरक्षक (म्युझियम क्युरेटर) (श्रेणी-3 प्रशासकीय सेवा) | नामनिर्देशन/ सरळसेवा 100% | अ) मान्यता प्राप्त विद्यापीठाची फाईन आर्टमधील पदवी अथवा रसायनशास्त्र या विषयाची पदवी<br>ब) वस्तुसंग्रहालयातील संबंधित कामाचा किमान 3 वर्षांचा अनुभव आवश्यक<br>क) मराठी,हिंदी व इंग्रजी भाषेवर प्रभुत्व. |

श्री.हंसराज बन्सवाल हे सेवा प्रवेश नियमानुसार संग्रहालय अभिरक्षक या पदाची अर्हता धारण करीत आहे.

करिता वरीलप्रमाणे संग्रहालय अभिरक्षक (Museum Curator) हे एक अधिसंख्य पद नव्याने निर्माण करण्यास व मानधन तत्वावर कार्यरत श्री.हंसराज नारायण बन्सवाल, क्युरेटर यांना सदर पदावर सामावुन घेण्याबाबत मा.सर्वसाधारण सभेची मान्यता घेवून तसा प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठविणे बाबत प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1938/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, संग्रहालय अभिरक्षक (Museum Curator) हे एक अधिसंख्य पद नव्याने निर्माण करण्यास व मानधन तत्वावर कार्यरत श्री.हंसराज नारायण बन्सवाल, क्युरेटर यांना सामावुन घेण्याबाबत व तसा प्रस्ताव राज्य शासनाकडे मान्यतेस्तव पाठविण्याबाबतच्या प्रस्तावास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1939/2025:-</u> (महिला व बालकल्याण विभाग)** **(दि.10.06.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, छत्रपती संभाजीनगर शहरातील विविध भागात शिक्षण विभागा मार्फत एकुण 80 बालवाड्या चालविल्या जातात. या बालवाडी वर्गात 3 वर्ष ते 6 वर्ष वयोगटातील साधारणत: 3500 ते 4000 विद्यार्थी आहेत. हे विद्यार्थी साधारणपणे कमी उत्पन्न गटातील पालकांचे असतात. ह्या वयोगटातील मुलांच्या शारिरिक व बौध्दीक विकासासाठी सकस आहाराची अत्यंत आवश्यकता असते. तो त्यांना न मिळाल्यास ह्या वयात कुपोषण होऊन त्यांच्या शारिरिक व बौध्दीक विकास खुंटण्याची शक्यता असते. त्या नंतरच्या वयात खुंटलेला विकास भरुन निघणे अवघड असते. या बाबींचा विचार करुन महानगरपालिकेच्या शिक्षण विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या बालवाडीतील मुलांना सन-2012 पासुन पोषण आहार सुरु करण्यात आलेला आहे. अन्नामृत फाऊंडेशन द्वारे पोषण आहार पुरवठा करण्यात येत आहे.

महिला व बालविकास विभाग शासन निर्णय क्र.एबावि/2008/प्र.क्र.59/का-5 दि.24 ऑगस्ट 2009 अन्वये एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत नागरी प्रकल्पातील सर्व अंगणवाडी केंद्रातील लाभार्थ्यांकरीता पुरक पोषण आहाराच्या प्रमाणात सुधारणा करण्यात आलेली आहे. त्यानुसार वय वर्ष 3 ते वय वर्ष 6 या वयातील बालकांसाठी 500 उष्मांक आणि 12 ते 15 ग्रॅम प्रथिनेयुक्त पुर्तता करणारा सकाळचा नाश्ता व गरम ताजा सकस आहार बालवाडीतच खाऊ घालणे अभिप्रेत आहे.

सदर शासन निर्णयासोबत परिशिष्ट-2 मध्ये काही मार्गदर्शनात्मक पाककृती दिली आहेत. त्यामध्ये नमुद पाककृती (3 ते 6 वर्ष) या वयोगटातील विद्यार्थ्यांसाठी मा.जिल्हास्तरीय सकस आहार पुरवठा समितीने दि.10.12.2021 रोजीच्या आदेशाद्वारे संपुर्ण आठवड्याच्या खालील प्रमाणे दर निश्चित केला आहे.

| अ. क्र. | लाभार्थी प्रकार | आहाराचे प्रमाण व स्वरुप | प्रति दिन प्रति लाभार्थी अनुज्ञेय दर |
|---|---|---|---|
| 1. | 3 ते वय वर्ष 6 वयोगटातील बालके | 500 किलो कॅलरीज उष्मांक आणि 12 ते 15 ग्रॅम प्रथिने | र.रु.8/- |

उपरोक्त प्रमाणे समितीने निश्चित करण्यात आलेल्या पाककृती व दरानुसार पुरवठा करण्यासाठी नव्याने निविदा प्रसिध्द करणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने उपरोक्त विवरण पत्रानुसार नमुद पाककृती व प्रति विद्यार्थी दर र.रु.8/- (अक्षरी रक्कम रुपये आठ फक्त) या आधारभूत दराने निविदा प्रसिध्द करण्यात येत आहे.

बालवाडी पोषण आहारास लागणारे साहित्य (तांदुळ, दाळ, भाज्या, तुप, मसाला, इ.आवश्यक साहित्य) खरेदी करणे किंवा उपलब्ध करुन घेणे, तो शिजवणे तसेच बालवाडी पर्यंत पोहचवणे अशी संपुर्ण जबाबदारी पुरवठाधारक यांची राहिल. ह्या संपुर्ण जबाबदारी साठी महानगरपालिकेने र.रु.8/- (अक्षरी रक्कम रुपये आठ फक्त) प्रतिदिन प्रति लाभार्थी असे दर ठरविले आहे.

त्या प्रमाणे अंदाजे 4000 विद्यार्थी X 8 = 32000/- (अक्षरी रक्कम रुपये बत्तीस हजार फक्त) प्रति दिन यानुसार एकुण वर्षभरात अंदाज कार्य दिवस 220 (सुट्ट्यांचे दिवस वगळता कार्य दिवस हे कमी जास्त होऊ शकतात) पोषण आहार द्यावा लागतो. त्यानुसार 220 X 32000 =70,40,000/- (अक्षरी रक्कम रुपये सत्तर लाख चाळीस हजार फक्त) इतका अंदाजित खर्च अपेक्षित आहे.

प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे सन 2025-56 या कालावधीसाठी पोषण आहार पुरवठा करणे संबंधीत अंदाजित अपेक्षित खर्च र.रु.70,40,000/- (अक्षरी रक्कम रुपये सत्तर लाख चाळीस हजार फक्त) इतक्या खर्चास मान्यते करीता प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

**ठराव क्रमांक 1939/2025:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, बालवाडी विद्यार्थ्यांना पोषण आहार पुरवठा करण्यासाठी र.रु.70,40,000/- (अक्षरी रक्कम रुपये सत्तर लाख चाळीस हजार फक्त) इतक्या खर्चास तसेच ई-निविदा प्रक्रिया करणे करीता मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1940/2025:- (यांत्रिकी विभाग)** **(दि.16.06.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सद्यस्थितीत यांत्रिकी विभागात 12 बॅकहोलोडर्स (जेसीबी) व 05 एक्सकॅव्हेटर्स कार्यरत आहेत. सदरील मशीनद्वारे शहरातील नालेसफाई करणे एकुण 10 झोन अंतर्गत ग्रीनवेस्ट व डेब्रिज उचलणे, ओपनस्पेस सपाटीकरण करणे, अतिक्रमण निष्काशीत करणे, घनकचरा प्रक्रिया केंद्रावरील कचऱ्याचे व्यवस्थापन करणे, खामनदी स्वच्छता करणे इ.कामे करण्यात येतात.

सदरील मशिनरींच्या देखभाल दुरुस्तीसाठी सन 2024-25 या आर्थिक वर्षात मे.न्यु साधना इंजिनिअरींग वर्क्स यांच्याशी वार्षिक दर करार करण्यात आलेला आहे. पुढील करार करण्यासाठी निविदा कार्यवाही पुर्ण होईपर्यंत मे.न्यु साधना इंजिनिअरींग वर्क्स यांच्याकडून मंजुर दराप्रमाणे स्पेअरपार्टस व दुरुस्ती कामे करुन घेणे योग्य राहील. सन 2025-26 मध्ये एकुण 12 जेसीबी व 05 पोकलेन वाहनांच्या देखभाल दुरुस्तीसाठी मागील वर्षातील झालेला खर्च लक्षात घेऊन र.रु.54.28 लक्षचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. अंदाजपत्रकीय खर्चास मान्यता मिळाली तर जाहीर निविदा मागवून एजन्सीची नियुक्ती करण्यात येईल व दर करार करण्यात येईल. सदरील खर्च हा “वाहने देखभाल दुरुस्ती” या लेखाशिर्षातून भागविण्यात येईल.

बॅकहोलोडर्स (जेसीबी) व एक्सकॅव्हेटर्सच्या देखभाल दुरुस्ती व स्पेअरपार्टस पुरवठा कामासाठी मागविण्यात येणाऱ्या जाहीर निविदेत जेसीबी/बॉबकॅट/टाटा हिताची इ.सर्व्हिस डीलर/सब डिलर किंवा स्पेअर पार्टस व जॉब वर्क कामाचा अनुभव असणारे एजन्सीज पात्र असतील. करीता महानगरपालिकेच्या 12 बॅकहोलोडर्स व 05 एक्सकॅव्हेटर्सच्या देखभाल दुरुस्ती (स्पेअरपार्टससह) कामाचा वार्षिक दर करार करण्यासाठी र.रु.54.28 लक्षचे अंदाजपत्रक मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 1940/2025:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेच्या 12 बॅकहोलोर्ड (जेसीबी) व 05 एक्सकॅव्हेटर्स च्या देखभाल दुरुस्ती (स्पेअरपार्टससह) कामाचा वार्षिक दर करार करण्यासाठी नवीन एजन्सीची नियुक्ती होईपर्यंत सद्यस्थितीतील एजन्सीकडून कामे करुन घेण्यास तसेच आगामी वर्षासाठी र.रु.54.28 लक्षच्या अंदाजपत्रकास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1941/2025:- (यांत्रिकी विभाग)** **(दि.16.06.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेकडे 06 ट्रक माऊंटेड स्वीपींग मशिन्स, 03 बोलेरो माऊंटेड स्विपींग मशिन्स, 07 अशोक लेलँड बडा दोस्त माऊंटेड मिनी रोड स्विपींग मशिन्स अशा एकुण 16 स्विपींग मशिन्स कार्यरत आहेत. ट्रक माऊंटेड स्विपींग मशिन्सद्वारे शहरातील मुख्य रस्त्यांची झाडाई करण्यात येते. बोलेरो माऊंटेड स्विपींग मशिन्स व मिनी रोड स्विपींग मशिन्सद्वारे झोन अंतर्गत छोट्या रस्त्यांची झाडाई करण्यात येते.

सदरील मशिनरीज या स्पेशलाईज्ड मशिनरी असल्याने त्यांची कार्यक्षमता टिकविण्यासाठी सेन्टर ब्रश चेंज करणे, पीटीओ दुरुस्ती करणे, फिल्टर्स बदलणे, हायड्रॉलीक ऑईल बदलणे, इ.कामे वारंवार करावी लागतात. उपरोक्त कामे वारंवार करावी लागत असल्यामुळे सदरील कामाचा वार्षिक दर करार करुन एक वर्षभरासाठी एजन्सी नियुक्त करणे आवश्यक आहे.

सन 2024-25 मध्ये 06 ट्रक माऊंटेड स्वीपींग मशिन्स, 03 बोलेरो माऊंटेड स्विपींग मशिन्सच्या देखभाल दुरुस्तीसाठी साधारणत: र.रु.20.00 लक्ष खर्च झालेला आहे. नव्याने खरेदी करण्यात आलेल्या 07 मिनी रोड स्विपींग मशिन्स गृहीत धरुन एकुण 16 स्विपींग मशिन्स आगामी आर्थिक वर्ष सन 2025-26 मधील देखभाल दुरस्तीसाठी र.रु.30.30 लक्षचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. अंदाज पत्रकास मान्यता मिळाली तर ई-टेंडरद्वारे जाहीर निविदा मागवुन नवीन एजन्सीची नियुक्ती करण्यात येईल व वार्षिक दर करारद्वारे काम करुन घेण्यात येईल. सदरील खर्च हा “वाहने देखभाल दुरुस्ती” या लेखाशिर्षातून भागविण्यात येईल.

करीता, महानगरपालिकेच्या एकुण 16 स्विपींग मशिन्सच्या देखभाल दुरुस्ती (स्पेअरपार्टससह) कामासाठी अपेक्षित र.रु.30.30 लक्षचे अंदाजपत्रक मा.स्थायी समिती सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 1941/2025:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेच्या एकुण 16 स्विपींग मशिन्सच्या देखभाल दुरुस्ती (स्पेअरपार्टससह) नवीन एजन्सीची नियुक्ती होईपर्यंत सद्यस्थितीत एजन्सीकडून कामे करुन घेण्यास तसेच आगामी वर्षासाठी अपेक्षित र.रु.30.30 लक्षच्या अंदाजपत्रकास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी

**प्रस्ताव क्रमांक 1942/2025:- (यांत्रिकी विभाग)** **(दि.16.06.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेकडे ट्रक/टिप्पर्स/ हुकलोडर्स/टँकर्स/हॉपर्स इ.टाटा कंपनीची विविध प्रकारची 85 वाहने कार्यरत आहेत. सन 2024-25 या आर्थिक वर्षात या वाहनांना लागणाऱ्या टाटा कंपनीच्या स्पेअरपार्टसचा पुरवठा करण्यासाठी मे.जैन ट्रेडर्स यांच्याशी वार्षिक दर करार करण्यात आलेला आहे. आगामी आर्थिक वर्ष सन 2025-26 साठी महानगरपालिकेचा टाटा कंपनीच्या वाहनांना लागणाऱ्या स्पेअरपार्टसचा पुरवठा करणसाठी नव्याने जाहीर निविदा मागवुन एजन्सीची नियुक्ती करणे व वार्षिक दर करार करणे आवश्यक आहे. पुढील करार करण्यासाठी निविदा कार्यवाही पुर्ण होईपर्यंत मे.जैन ट्रेडर्स यांच्याकडून मंजुर दराप्रमाणे स्पेअरपार्टसचा पुरवठा करणे योग्य राहील.

सन 2025-26 या आर्थिक वर्षात टाटा कंपनीच्या ट्रक/टिप्पर्स/ हुकलोडर्स/टँकर्स/हॉपर्स इ.टाटा कंपनीची विविध प्रकारच्या 85 वाहनांच्या देखभाल दुरुस्तीसाठी मागील आर्थिक वर्षातील झालेला खर्च लक्षात घेऊन र.रु.50.00 लक्ष चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील खर्च हा “वाहने देखभाल दुरुस्ती” या लेखाशिर्षातून भागविण्यात येईल.

अंदाजपत्रकीय खर्चास मान्यता मिळाली तर जाहीर निविदा मागवुन एजन्सीची नियुक्ती करण्यात येईल व दर करार करण्यात येईल. करीता छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या टाटा

कंपनीच्या विविध प्रकारच्या वाहनांसाठी स्पेअरपार्टस पुरवठा करणे कामाचा वार्षिक दर करार करण्यासाठी र.रु.50.00 लक्षचे अंदाजपत्रक मा.स्थायी समिती सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 1942/2025:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेच्या टाटा कंपनीच्या विविध प्रकारच्या वाहनांसाठी स्पेअरपार्टस पुरवठा करणे कामाचा वार्षिक दर करार करण्यासाठी नवीन एजन्सीची नियुक्ती होईपर्यंत सद्यस्थितीतील एजन्सीकडून कामे करुन घेण्यास तसेच आगामी वर्षासाठी र.रु.50.00 लक्षच्या अंदाजपत्रकास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1943/2025:-** **(यांत्रिकी विभाग)** **(दि.16.06.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेकडे विविध प्रकारची एकुण 218 वाहने कार्यरत आहेत. सदरील वाहनांचे सर्व ऑटो इलेक्ट्रिकल दुरुस्ती कामे (स्पेअर पार्टस सह) जसे की, सेल्फ स्टार्टर दुरुस्ती, अल्टरनेटर दुरुस्ती, वायपर ब्लेड दुरुस्ती तसेच हेड लाईट व टेल लाईट दुरुस्ती व संपुर्ण वायरिंग चेकिंग इ.वारंवार करावी लागतात जेणेकरुन सर्व वाहने सुस्थितीत राहतात.

ऑटो इलेक्ट्रिकल दुरुस्ती कामासाठी गतवर्षी मे.ॲक्टिव्ह मोटर्स छत्रपती संभाजीनगर यांच्याशी वार्षिक दर करार करुन एक वर्ष कालावधीसाठी एजन्सीची नियुक्ती करण्यात आली होती. आगामी आर्थिक वर्ष सन 2025-26 साठी जाहीर निविदा मागवुन नव्याने एजन्सीची नियुक्ती करणे आवश्यक आहे. पुढील करार करण्यासाठी निविदा कार्यवाही पुर्ण होईपर्यंत मे.ॲक्टिव्ह मोटर्स यांच्याकडून मंजुर दराप्रमाणे स्पेअरपार्टस व दुरुस्ती कामे करुन घ्यावी लागतील.

सन 2024-25 मध्ये महानगरपालिकेच्या वाहनांच्या ऑटो इलेक्ट्रिकल कामासाठी र.रु.30.00 लक्ष खर्च झालेला आहे. आगामी आर्थीक वर्षात नवीन खरेदी केलेली वाहने गृहीत धरुन सर्व ऑटो इलेक्ट्रिकल दुरुस्ती कामासाठी र.रु.32.00 लक्षचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. अंदाजपत्रकास मान्यता मिळाली तर जाहीर निविदा मागवून एजन्सीची नियुक्ती करण्यात येईल व वार्षिक दर करार करण्यात येईल. सदरील खर्च हा “वाहने देखभाल दुरुस्ती” या लेखाशिर्षातून भागविण्यात येईल.

उपरोक्त प्रमाणे महानगरपालिकेच्या 218 विविध प्रकारच्या वाहनांच्या ऑटो इलेक्ट्रिकल दुरुस्ती साठी र.रु.32.00 लक्षचे अंदाजपत्रक मा.स्थायी समिती सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 1943/2025:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेच्या 218 विविध प्रकारच्या वाहनांच्या ऑटो इलेक्ट्रिकल दुरुस्तीसाठी नवीन एजन्सीची नियुक्ती होईपर्यंत सद्यस्थितीतील एजन्सीकडून कामे करुन घेण्यास तसेच आगामी वर्षासाठी र.रु.32.00 लक्षच्या अंदाजपत्रकास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1944/2025:-** **(यांत्रिकी विभाग)** **(दि.16.06.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सद्यस्थितीत महानगरपालिकेकडे एकुण 18 जेटिंग मशिन्स, 03 पॉवर रोडींग मशिन्स, 09 डिसेल्टींग मशिन्स, 05 व्हॅक्युम मशिन्स व 02 बँडिक्युट रोबोट अशी एकुण 37 ड्रेनेज विभागाशी संबंधीत वाहने व मशिनरी कार्यरत आहेत. सदरील मशिनरीद्वारे शहरातील ड्रेनेज चोकअप काढणे, ड्रेनेज लाईन्स सुरळीत करणे, सेप्टिक टँक स्वच्छ करणे, घनकचरा प्रकल्प ठिकाणचे लिचेड उपसा करणे, पावसाळ्यात साचलेले पाणी उपसा करणे इ.कामे करण्यात येतात. ड्रेनेज दुरुस्ती करणे, सेफ्टी व्हॉल्व्ह दुरुस्ती करणे, जेट नोझल दुरुस्ती करणे, जॉईंट क्रॉस इ.दुरुस्ती करणे ही कामे वारंवार करावी लागतात.

सदरील मशिनरीज या स्पेशलाईज्ड मशिनरी आहेत. त्यामुळे वारंवार ही दुरुस्ती कामे करावी लागतात. जेणे करुन मशिनरींची कार्यक्षमता जास्त वेळ टिकून राहते व शहरातील ड्रेनेज संदर्भातील तक्रारींचे निवारण विहित मुदतीत करणे शक्य होते. सन 2024-25 या आर्थिक वर्षात या वाहनांच्या स्पेअरपार्टस व दुरुस्तीसह कामासाठी मे.न्यु साधना इंजिनिअरींग वर्क्स यांच्याशी वार्षिक करार करण्यात आलेला आहे. पुढील करार करण्यासाठी निविदा कार्यवाही पुर्ण होईपर्यंत मे.न्यु साधना

इंजिनिअरींग वर्क्स यांच्याकडून मंजुर दराप्रमाणे स्पेअरपार्टस पुरवठा व दुरुस्ती कामे करुन घ्यावी लागतील.

ड्रेनेज विभागाशी संबंधीत एकुण 37 वाहनांवर मागील आर्थिक वर्षात झालेला खर्च लक्षात घेऊन सन 2025-26 या आर्थिक वर्षात देखभाल दुरुस्तीसाठी अपेक्षित र.रु.50.00 लक्ष चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. अंदाजपत्रकास मान्यता मिळाली तर जाहीर निविदा मागवून नव्याने एजन्सीची नियुक्ती करण्यात येईल व दर करार करण्यात येईल. सदरील खर्च हा “वाहने देखभाल दुरुस्ती” या लेखाशिर्षातून भागविण्यात येईल. करीता महानगरपालिकेच्या एकुण 37 ड्रेनेज विभागाशी संबंधीत वाहनांच्या स्पेअरपार्टससह देखभाल दुरुस्तीसाठी र.रु.50.00 लक्षचे अंदाजपत्रक मा.स्थायी समिती सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1944/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेच्या एकुण 37 ड्रेनेज विभागाशी संबंधीत वाहनांच्या स्पेअरपार्टससह देखभाल दुरुस्तीसाठी नवीन एजन्सीची नियुक्ती होईपर्यंत सद्यस्थितीतील एजन्सीकडून कामे करुन घेण्यास तसेच आगामी आर्थिक वर्षासाठी र.रु.50.00 लक्षच्या अंदाजपत्रकास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1945/2025:-</u> (यांत्रिकी विभाग)** **(दि.16.06.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागात 08 फायर वॉटर टेंडर्स, 01 रेस्क्यु टेंडर, 01 मिनी फोम टेंडर, 02 बोलेरो जीप, 01 चॅम्पर गोल्ड व 01 इनोव्हा कार कार्यरत आहेत. सदरील वाहनांचा वापर शहारातील आगीच्या दुर्घटना हाताळणे, रेस्क्यु ऑपरेशन करणे, मंत्री महोदयांच्या दौऱ्यात सहभागी होणे, शासकीय /धार्मिक कार्यक्रम ठिकाणी आपत्कालीन सेवा पुरविणे इ.आवश्यक कामांसाठी केल जातो.

तसेच महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाकडे 15 ट्रेलर पंप व 15 पोर्टेबल पंप कार्यरत असुन हे पंप पावसाळ्यात साचलेले पाणी उपसा करण्यासाठी तसेच कचरा प्रकल्पावर वारंवार लागणारी आग विझविण्यासाठी वापरली जातात. सदरील वाहने व मशिनरीज या अत्यावश्यक सेवेसाठी वापरण्यात येत असुन त्या पुर्ण क्षमतेने चांगल्या स्थितीत काम करण्यासाठी वाहनांची सर्व्हिसींग करणे, होजरील पाईप दुरुस्ती करणे, होजरील गन दुरुस्ती करणे इ.कामे वारंवार करावी लागतात.

सन 2025-26 मध्ये सदरील अग्निशमन वाहने, ट्रेलर व पोर्टेबल पंपच्या देखभाल दुरुस्तीसाठी साधारणपणे र.रु.28.00 लक्ष खर्च झालेला आहे. 10% नैसर्गिक वाढ गृहीत धरुन सन 2025-26 या आर्थिक वर्षासाठी साधारणत: र.रु.30.80 लक्षचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. अंदाज पत्रकास मान्यता मिळाली तर जाहिर निविदा मागवून एजन्सीची नियुक्ती करण्यात येईल व वार्षिक दर कराराद्वारे काम करुन घेण्यात येईल. सदरील खर्च हा “अग्निशमन वाहने व पंप दुरुस्ती” या लेखाशिर्षा तून भागविण्यात येईल.

करीता, महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागातील वाहने व पंपाच्या देखभाल दुरुस्तीसाठी (स्पेअरपार्टससह) कामाचा वार्षिक दर करार करण्यासाठी र.रु.30.80 लक्षचे अंदाजपत्रक मा.स्थायी समिती सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1945/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागातील वाहने व पंपाच्या देखभाल दुरुस्तीसाठी (स्पेअरपार्टससह) कामाचा वार्षिक दर करार करण्यासाठी नवीन एजन्सीची नियुक्ती होईपर्यंत सद्यस्थितीतील एजन्सीकडून कामे करुन घेण्यास तसेच आगामी वर्षासाठी र.रु.30.80 लक्षच्या अंदाजपत्रकास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1946/2025:-</u> (जलनि:स्सारण विभाग)** **(दि.16.06.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, छावणी नगर परिषद येथे हिरवळ वाढीकरीता सिध्दार्थ उद्यान येथील 4 MLD क्षमतेच्या STP मधुन प्रक्रिया युक्त पाण्याचा पुरवठा करणे या कामास मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.1878/2025 दि.27.03.2025 अन्वये प्रशासकीय मान्यता झाली आहे. सदर कामाचा खर्च

महानगरपालिका अर्थसंकल्प् सन 2024-25 मधील शुध्द हवा नियंत्रण कार्यक्रम (NCAP) या लेखाशिर्षकाअंतर्गत करण्यात येणार आहे.

या कामासाठी शासनाच्या संकेतस्थळावरुन निविदा मागविल्या असता, प्रथम वेळेस अंतिम दिनांका पर्यंत तीन निविदा प्राप्त झाल्या आहेत. निविदेच्या अटी व शर्तीनुसार निविदाधारक यांनी सादर केलेल्या कागदपत्रांची पडताळणी केली असता, प्राप्त तीन निविदाधारकांपैकी एक निविदाधारक प्रभाकर मोहिते यांनी दस्तऐवजांची पुतर्ता न केल्याने ते तांत्रिकदृष्ट्या अपात्र ठरल्याने उर्वरित दोन निविदाधारक तांत्रिकदृष्ट्या पात्र ठरले आहेत. पात्र दोन निविदाधारकांपैकी सर्वात कमी दराची निविदा Lifefirst Concepts & Technologies Pvt.Ltd. यांची असून ती अंदाजपत्रकीय दरापेक्षा 0.30% कमी दराची प्राप्त झाली आहे.

| **संदर्भ:- TENDER ID : 2025_AMCA_1169653_1** | | | |
|---|---|---|---|
| **अ.क्र.** | **विवरण** | **शेरा** | |
| 1. | विभागाचे नाव | कार्यकारी अभियंता – जलनि:स्सारण | |
| 2. | कामाचे स्वरुप | छावणी नगर परिषद येथे हिरवळ वाढीकरीता सिध्दार्थ उद्यान येथील 4 MLD क्षमतेच्या STP मधुन प्रक्रिया युक्त पाण्याचा पुरवठा करणे | |
| 3. | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रक्कमेचे मान्यतेचे ठराव? | होय, अं.प.र.रु.30,36,801/-<br>मा.सर्वसाधारण सभा मंजुर ठराव क्र.1878/2025 दि.27.03.2025 | |
| | त्यापैकी किती रक्कमेचे निविदा मागविण्यात आले? | र.रु.24,98,117/- | |
| 4. | अ) निविदा स्विकारण्याची मुदत | | दि.09.04.2025 ते 16.04.2025 |
| | ब) निविदा उघडल्याचा दिनांक (वाणिज्य देकार) | | दि.23.05.2025 |
| | क) निविदा काढण्याची वेळ | | प्रथम |
| | ड) एकुण प्राप्त निविदा | | 03 (पात्र-2 अपात्र-1) |

(त्यापैकी पात्र निविदाधारकांची यादी खालील प्रमाणे आहे.)

| **अ. क्र.** | **कंत्राटदाराचे नाव** | **निविदा रक्कम रुपये** | **पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त** | |
|---|---|---|---|---|
| | | | रक्कम रुपये | टक्केवारी |
| 1. | Lifefirst Concepts & Technologies Pvt.Ltd. | र.रु.24,98,117/- | र.रु.24,90,623/- | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 0.30% कमी दराने |
| 2. | Ideal Systems and Services | र.रु.24,98,117/- | र.रु.25,23,098/- | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 1.00% जास्त दराने |

| **अ. क्र.** | **संक्षिप्त तपशिल** | | **शेरा** |
|---|---|---|---|
| 1. | सर्वात कमी रक्कमेच्या निविदेची शिफारस करण्यात आली आहे काय? | | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | | होय |
| | ब) जास्त दराच्या निविदाची शिफारस करण्यात आली आहे काय? | | नाही |
| | क) असल्यास कारणे नमुद करावीत. | | --- |
| 2. | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमुद करावे. | महानगरपालिका अर्थसंकल्प् सन 2024-25 मधील शुध्द हवा नियंत्रण कार्यक्रम (NCAP) या लेखाशिर्षकाअंतर्गत | |
| 3. | सदर कामास खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | | होय |
| 4. | सदर काम डिपॉझिट मधुन करण्यात येणार आहे काय? | | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? | | नाही |

| | | |
|---|---|---|
| | (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | |
| 5. | सोबत मान्य पुर्वगणक पत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे काय? | होय |

उक्त निविदाधारकांपैकी सर्वात कमी दराची निविदा ही Lifefirst Concepts & Technologies Pvt.Ltd. यांची ती अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराची आहे. करीता सर्वात कमी Lifefirst Concepts & Technologies Pvt.Ltd. यांची असून ती अंदाजपत्रकीय दरापेक्षा 0.30% कमी दराची निविदा विचारार्थ मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1946/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सर्वात कमी Lifefirst Concepts & Technologies Pvt. Ltd. यांची असून ती अंदाजपत्रकीय दरापेक्षा 0.30% कमी दराच्या निविदेस मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1947/2025:-</u> (पाणी पुरवठा शहर यांत्रिकी विभाग) (दि.16.06.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका पाणी पुरवठा योजने वरील सिडको एन-5 पंपगृह हे शहरातील मुख्य पंपगृह असुन येथून शहरातील बहुतांश भागात पाणी पुरवठा केला जातो. येथे 120 अ.श.क्षमतेचे एकुण 02 व्ही.टी. पंप कार्यरत असुन हे पंप सन 1984 मध्ये बसविण्यात आलेले आहेत. यापैकी एक पंप चालविण्यात येतो व एक पंप स्टॅण्डबाय ठेवण्यात येतो. सदरील पंपांची 39 वर्षे सर्व्हीस झाली असल्याने पंपाच्या बाऊल असेंब्ली मधील मुख्य पार्टस घर्षणाने खराब होऊन पंपांचा डिस्चार्ज कमी झाला आहे. तसेच सी.आय.कास्टींग बनावटीचे केसींग व डिफ्युजर सतत पाण्यात राहील्याने गंजले आहे.

छत्रपती संभाजीनगर शहरास वाढीव पाणी पुरवठा करण्यासाठी नव्याने सुरु होत असलेल्या 900 मी.मी.व्यासाच्या जलवाहिनीद्वारे पाण्याची आवक वाढणार असल्याने वरील प्रमाणे नमुद 120 अ.श.क्षमतेचे एकुण 02 व्ही.टी.पंप बदलुन नवीन पंप बसविणे गरजेचे आहे. तथापि 2500 मी.मी.व्यासाच्या जलवाहिनीचे नवीन पाणी पुरवठा योजनेचे काम देखील प्रगतीपथावर असल्याने नवीन पंप बसविण्याऐवजी सद्यस्थितीत कार्यरत असलेल्या पंपांची बाऊल असेंब्ली बदलणे तुलनात्मकदृष्ट्या कमी खर्चाचे असल्यामुळे केवळ बाऊल असेंब्ली बदलणे उचित होईल.

या करीता सदरील पंपांची उत्पादक कंपनी मे.WPIL Ltd. आणि Budgenary Offer यांची प्राप्त करण्यात आली असुन त्यानुसार अंदाजपत्रक तयार केले आहे. अंदाजपत्रकानुसार 120 अ.श. क्षमतेच्या 02 व्ही.टी.पंपांसाठी नवीन बाऊल असेंब्ली पुरवठा करणे, बसविणे व यशस्वीरित्या चाचणी देणे या कामासाठी एकुण र.रु.41,66,744/- + र.रु.7,50,014 (18% GST) = र.रु.49,16,758/-खर्च अपेक्षित आहे. सदरील खर्च “यंत्र देखभाल दुरुस्ती-शहर” या लेखाशिर्षातून करावा लागेल.

त्यावेळी सार्वत्रिक लोकसभा निवडणुक-2024 ची आदर्श आचारसंहिता सुरु होती व उन्हाळ्याचे दिवस असल्याने शहराचे पाणी पुरवठा प्राधान्य लक्षात घेता सदरील काम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 67 (3) (क) अंतर्गत मे.तिरुपती इलेक्ट्रिकल्स सेल्स ॲण्ड सर्व्हिसेस यांचे मार्फत करुन घेण्यात आले असून त्याबाबतचे एकुण देयक र.रु.49,16,758/- संबंधीतास अदा करण्यात आले आहे. करीता प्रकरण मा.स्थायी समिती सभेच्या अवलोकनास्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1947/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सिडको एन-5 पंपगृह येथील 120 अ.श. क्षमतेच्या 02 व्ही.टी. पंपांसाठी बाऊल असेंब्लीचा पुरवठा करणे व बसविणे बाबतचे काम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 67 (3) (क) अंतर्गत करुन घेण्यात आले असून त्याबाबतचे र.रु.49,16,758/- रक्कमेचे देयक अदाई करण्यात आली आहे. करीता प्रस्तावास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1948/2025:-</u> (पाणी पुरवठा, शहर यांत्रिकी विभाग) (दि.16.06.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका पाणी पुरवठा योजने वरील सिडको एन-5 पंपगृह हे शहरातील मुख्य पंपगृह असुन येथून शहरातील बहुतांश भागात पाणी पुरवठा केला जातो. येथे 60 अ.श.क्षमतेचे एकुण 03 व्ही.टी.पंप असुन त्यापैकी दोन व्ही.टी.पंप सन

1984 मध्ये व 01 व्ही.टी.पंप सन 2009 मध्ये बसविण्यात आलेला आहे. यापैकी दोन पंप चालविण्यात येतात व एक पंप स्टॅण्डबाय ठेवण्यात येतो. सन-1984 पासुन कार्यरत असलेल्या पंपांची 39 वर्षांची सर्व्हिस झाली असल्याने पंपाच्या बाऊल असेंब्ली मधील मुख्य पार्टस घर्षणाने खराब होऊन पंपांचा डिस्चार्ज कमी झाला आहे.

छत्रपती संभाजीनगर शहरास वाढीव पाणी पुरवठा करण्यासाठी नव्याने सुरु होत असलेल्या 900 मी.मी.व्यासाच्या जलवाहिनीद्वारे पाण्याची आवक वाढणार असल्याने वरील प्रमाणे नमुद 60 अ.श.क्षमतेचे 02 व्ही.टी.पंप बदलुन नवीन पंप बसविणे गरजेचे आहे. तथापि, 2500 मी.मी. व्यासाच्या जलवाहिनीचे नवीन पाणी पुरवठा योजनेचे काम देखील प्रगतीपथावर असल्याने नवीन पंप बसविण्या ऐवजी सद्यस्थितीत कार्यरत असलेल्या पंपांची बाऊल असेंब्ली बदलणे तुलनात्मकदृष्ट्या कमी खर्चाचे असल्यामुळे केवळ बाऊल असेंब्ली बदलणे उचित होईल.

याकरीता सदरील पंपांची उत्पादक कंपनी मे.WPIL Ltd. यांची Budgetary offer प्राप्त करण्यात आली असुन त्यानुसार अंदाजपत्रक तयार केले आहे. अंदाजपत्रकानुसार 60 अ.श.क्षमतेच्या 02 व्ही.टी.पंपांसाठी नवीन बाऊल असेंब्ली पुरवठा करणे, बसविणे व यशस्विरित्या चाचणी देणे या कामासाठी एकुण र.रु.31,09,254/- + र.रु.5,59,666/- (18% GST) = र.रु.36,68,920/- खर्च अपेक्षित आहे. सदरील खर्च "यंत्र देखभाल दुरुस्ती शहर" या लेखाशिर्षातून करावा लागेल.

त्यावेळी सार्वत्रिक लोकसभा निवडणुक-2024 ची आदर्श आचारसंहिता सुरु होती व उन्हाळ्याचे दिवस असल्याने शहराचे पाणी पुरवठा प्राधान्य लक्षात घेता, सदरील काम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 67 (3) (क) अंतर्गत मे.तिरुपती इलेक्ट्रिकल्स सेल्स ॲण्ड सर्व्हिसेस यांचे मार्फत करुन घेण्यात आले असुन त्याबाबतचे एकुण देयक र.रु.36,68,920/- संबंधीतास अदा करण्यात आले आहे. करीता, प्रकरण मा.स्थायी समिती सभेच्या अवलोकनार्थ सादर.

**<u>ठराव क्रमांक 1948/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सिडको एन-5 पंपगृह येथील 60 अ.श.क्षमतेच्या 02 व्ही.टी. पंपांसाठी बाऊल असेंब्लीचा पुरवठा करणे व बसविणे बाबतचे काम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 67 (3) (क) अंतर्गत करुन घेण्यात आले असुन त्याबाबतचे र.रु.36,68,920/- रक्कमेचे देयक अदाई करण्यात आली आहे. करीता प्रस्तावास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1949/2025:-</u> (आस्थापना-1 विभाग)** **(दि.17.06.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका आरोग्य विभागा मार्फत 41 आरोग्य संस्था कार्यरत आहे. यामध्ये 6 रुग्णालये 35 आरोग्य केंद्रामार्फत आरोग्य सेवा शहरा तील नागरीकांना देण्यात येत आहे.

आरोग्य विभागामध्ये सद्यस्थितीत 11 आरोग्य अधिकारी कार्यरत आहेत. आरोग्य अधिकाऱ्यांची संख्या अत्यंत कमी असुन आरोग्य विषयी कामे पार पाडण्यासाठी अनुभवी अधिकाऱ्यांची आवश्यकता आहे. सद्यस्थितीत एन.यु.एच.एम.कार्यरत कंत्राटी आरोग्य अधिकारी हे केव्हाही आरोग्य पदाचा राजीनामा देतात यामुळे कामात अडथळा निर्माण होत आहे. 12 आरोग्य केंद्राच्या ठिकाणी 6 आरोग्य अधिकारी हे एक दिवसाआड आरोग्य सेवा देत आहे.

डॉ.प्रेमलता कराड, आरोग्य अधिकारी ह्या दि.30.09.2023 रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले असुन त्यांना महानगरपालिका आरोग्य विभागातील आरोग्य सेवेचा प्रदिर्घ अनुभव असल्याने त्यांच्या सेवेचा लाभ होऊ शकतो.

त्याअनुषंगाने मा.स्थायी समितीचा ठराव क्र.1223 दि.13.02.2024 नुसार कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/आस्था-1/2024/350 दि.16.02.2024 नुसार "आरोग्य विभागातील औषधी भांडार, 6 मॅटर्निटी होम सुरु करणे, मल्टी स्पेशालिटी हॉस्पीटल सुरु करणे व आरोग्य रुग्णालयाची सिव्हील कामे करणे तसेच आरोग्य केंद्रातील इतर कामे" या विवक्षित कामासाठी डॉ.प्रेमलता कराड, आरोग्य अधिकारी (सेवानिवृत्त) यांची नियुक्ती विहित अटी व शर्तीच्या अधिन राहून प्रथमत: 06 महिन्यांच्या कालावधी करीता करार पध्दतीने नेमणुक देण्यात आली होती. तथापि, सदर आदेशाची मुदत

दि.15.08.2024 रोजी संपल्याने तसेच वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांनी संबंधीतांना पुढील मुदतवाढ देण्याबाबत शिफारस केली आहे.

त्यानुषंगाने मा.सर्वसाधारण सभेचा ठराव क्र.1578 दि.05.09.2024 नुसार कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/आस्था-1/2024/3371 दि.20.09.2024 नुसार “आरोग्य विभागातील औषधी भांडार, 6 मॅटर्निटी होम सुरु करणे, मल्टी स्पेशालिटी हॉस्पीटल सुरु करणे व आरोग्य रुग्णालयाची सिव्हील कामे करणे तसेच आरोग्य केंद्रातील इतर कामे” या विवक्षित कामासाठी डॉ.प्रेमलता कराड, आरोग्य अधिकारी (सेवानिवृत्त) यांची नियुक्ती विहित अटी व शर्तीच्या अधिन राहून प्रथमत: 06 महिन्यांच्या कालावधीकरीता करार पध्दतीने नेमणुक देण्यात आली होती. तथापि, सदर आदेशाची मुदत दि.19.02.2025 रोजी संपल्याने तसेच वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांनी संबंधीतांना पुढील मुदतवाढ देण्याबाबत शिफारस केली आहे.

करीता, “आरोग्य विभागातील औषधी भंडार, 6 मॅटर्निटी होम सुरु करणे, मल्टी स्पेशालिटी हॉस्पीटल सुरु करणे व आरोग्य रुग्णालयाची सिव्हील कामे करणे तसेच आरोग्य केंद्रतील इतर कामे” या विवक्षित कामासाठी डॉ.प्रेमलता कराड, आरोग्य अधिकारी (सेवानिवृत्त) यांना कार्यालयीन आदेश दि.16.02.2024 च्या आदेशामध्ये नमुद अटी व शर्तीच्या अधिन राहून दि.22.02.2025 ते दि.25.08.2025 पर्यंत सेवा करार पध्दतीने नियुक्ती देण्याबाबत प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1949/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, “आरोग्य विभागातील औषधी भांडार, 6 मॅटर्निटी होम सुरु करणे, मल्टी स्पेशालिटी हॉस्पीटल सुरु करणे व आरोग्य रुग्णालयाची सिव्हील कामे करणे तसेच आरोग्य केंद्रातील इतर कामे” या विवक्षित कामासाठी डॉ.प्रेमलता कराड, आरोग्य अधिकारी (सेवानिवृत्त) यांना कार्यालयीन आदेश दि.16.02.2024 च्या आदेशामध्ये नमुद अटी व शर्तीच्या अधिन राहून दि.22.02.2025 ते दि.25.08.2025 पर्यंत सेवा करार पध्दतीने नियुक्ती देण्याबाबतच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1950/2025:-</u> (कार्यकारी अभियंता रस्ते विभाग) (दि.17.06.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.115 सातारा अंतर्गत गट नं.238 ते 267 (मार्गे गट नं.279, 275 व 275) हा रस्ता अंदाजे 1200 मी.लांबीचा सातारा तांड्याला श्रेयस कॉलेज मार्गे सोलापुर-धुळे बायपास ला जोडणारा महत्वाचा रस्ता आहे. सातारा तांडा परिसरात बऱ्याच प्रमाणात रहिवाशी क्षेत्र असुन यामध्ये मागील काही वर्षात झपाट्याने वाढ झालेली आहे.

सदर रस्ता हा महानगरपालिका क्षेत्रातील महत्वाचा विकसीत करावयाचा रस्ता असुन MRTP ACT 1966 चे कलम 30 नुसार दि.30.01.2025 रोजी प्रसिध्द झालेल्या विकास योजना आराखड्यात सदर रस्ता हा 24 मी.रुंद विकास योजना रस्ता म्हणुन दर्शविण्यात आलेला आहे. तसेच सदर रस्ता हा सोलापुर-धुळे बायपास ला जोडणारा महत्वाचा रस्ता असल्याने स्थानिक नागरीक सदर रस्ता विकसीत करणे बाबत मागणी करीत आहेत.

उक्त नमुद प्रमाणे वस्तुस्थिती पाहता, सदरील रस्त्याचे काम करणे आवश्यक ठरत असल्याने महानगरपालिका पॅनलवर नियुक्त प्रकल्प व्सस्थापन सल्लागार यश इन्नोव्हेटिव्ह सोल्युशन्स एल.एल.पी. यांच्या मार्फत या कामाचे अंदाजपत्रक र.रु.5,33,31,110/- चे तयार करुन घेण्यात आले आहे. सदर अंदाजपत्रक हे सार्वजनिक बांधकाम राज्य दरसुची सन 2022-23 नुसार तयार करण्यात आले असुन यामध्ये सिमेंट काँक्रीट रस्त्यासाठी जी.एस.बी., डी.एल.सी., पी.क्यु.सी.एम-40 आणि रोड फर्निचरच्या बाबींचा समावेश करण्यात आलेला आहे.

सदर कामाकरीता लागणारा खर्च हा महानगरपालिका अर्थसंकल्प सन 2025-26 मधील विकास योजने अंतर्गत रस्ते मजबुतीकरण करणे या लेखाशिर्ष खाली उपलब्ध आर्थिक तरतुदीतून करण्याचे नियोजन आहे.

करीता, वॉर्ड क्र.115 सातारा अंतर्गत गट नं.238 ते 267 (मार्गे गट नं.279,275 व 275) या रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटीकरण करण्याच्या कामाचे अंदाजपत्रक र.रु.5,33,31,110/- मंजुरी बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1950/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.115 सातारा अंतर्गत गट नं.238 ते 267 (मार्गे गट नं.279, 275 व 275) हा रस्ता महानगरपालिका क्षेत्रातील महत्वाचा विकसीत करावयाचा रस्ता असुन MRTP ACT 1966 चे कलम 30 नुसार दि.30.01.2025 रोजी प्रसिध्द झालेल्या विकास योजना आराखड्यात सदर रस्ता हा 24 मी.रुंद विकास योजना रस्ता म्हणुन दर्शविण्यात आलेला आहे.

करीता, महानगरपालिका पॅनलवर नियुक्त प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यश इन्नोव्हेटिव्ह सोल्युशन्स एल.एल.पी.यांच्या मार्फत तयार करुन घेण्यात आलेले वॉर्ड क्र.115 सातारा अंतर्गत गट नं.238 ते 267 (मार्गे गट नं.279, 275 व 275) या रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटीकरण करण्याचे कामाचे अं.प. र.रु.5,33,31,110/- यास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येते. तसेच पुढील कार्यवाही करण्याचे व त्यासाठी आवश्यक सर्व बाबींचा निर्णय घेण्याचे संपुर्ण अधिकार आयुक्तांना प्रदान करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1951/2025:-</u> (कार्यकारी अभियंता रस्ते विभाग)** **(दि.17.06.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिका क्षेत्रात वाढती लोकसंख्या, निवासी विस्तारी करण, शहरालगत शेंद्रा, बिडकीन, वाळूज येथील औद्योगिक विस्तारीकरण, शैक्षणिक, पर्यटन, व्यावसायीक दृष्ट्या शहर व शहरालगत वाहतुक रहदारी वाढली आहे. यामुळे महानगरपालिका हद्दी तील विविध लांबी/रुंदीचे विकास योजना रस्त्यांचे जाळे (Road Network) विकसीत करणे गरजेचे ठरत आहे. जेणे करुन नागरीकांना सुरळीत व सुलभ वाहतूक करणे सोईचे होईल. परंतु नमुद प्रमाणे विकास आराखड्या नुसार रस्त्यांबाबत नागरीकांना अवगत नसल्यामुळे या भागात अतिक्रमणे वाढत आहेत. त्यामुळे विकास योजना रुंदीप्रमाणे रस्ते विकसित करतांना अडचण निर्माण होऊन रस्त्याच्या कामास विलंब होऊन नागरीकांना सुलभ व सुरळीत वाहतुकी करीता रस्ते उपलब्ध होत नाहीत.

मंजुर विकास योजना आराखडा 2001 नुसार तसेच नव्याने लागू होणाऱ्या मंजुर विकास योजना आराखड्यानुसार शहरातील विविध विकास योजना रस्ते विकसित करणे करीता प्रत्यक्ष स्थळावर आखणी करतांना बहुतांश भागात बाधीत मिळकती, विद्युत डी.पी./खांबे तसेच अतिक्रमणे इ.अडथळे निर्माण होतात व Right of Way (Row) उपलब्ध होत नसल्यामुळे उपलब्ध लांबी/रुंदी नुसार भागश: रस्ते विकसित करावे लागतात.

या समस्येवर उपाय योजना करणे करीता मंजुर विकास आराखडा व नव्याने लागु होणा-या विकास आराखड्यातील 15 मी., 18 मी, 24 मी., 30 मी.,36 मी., 40 मी., इ.रुंदीचे विकास योजना रस्ते नगर रचना विभागाच्या समन्वयाने Row आरेखित करुन या ठिकाणी Precast RCC Boundary Pole करुन यावर विकास योजना रस्ता लांबी/रुंदी, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका इ.तपशिल पेंट करण्याचे महानगरपालिकेचा मानस आहे. जेणे करुन या विकास योजना रस्त्याच्या बाधीत भागा बाबत नागरीकांना अवगत होईल व या ठिकाणी अतिक्रमण होणार नाही.

उक्त नमुद कामाकरीता 2.10 मी.उंचीचे Precast RCC Boundary Pole चे दर प्रचलित PWD SSR 2022-23 मध्ये उपलब्ध नसल्यामुळे विभागाने महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर या बाबीसाठी दरपत्रक प्रसिध्द करुन खुल्या बाजारातून पुरवठा दर मागवून सर्वात कमी दराचे दरपत्रक र.रु.1112.73 च्या आधारे दरपृथ:करण करुन व अंदाजपत्रकातील इतर बाबींचा दर PWD SSR 2022-23 प्रमाणे घेऊन या र.रु.1,87,64,527/- (18% GST सह) चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

करीता, छत्रपती संभाजीनगर शहरातील पश्चिम विधानसभा मतदार संघातील विविध विकास योजना रस्त्यांचे एकुण अंदाजीत लांबी 27 कि.मी. प्रत्येकी 15 मी. अंतरावर Precast RCC Boundary Pole उभारणेच्या कामाचे PWD SSR 2022-23 नुसार अंदाजपत्रक

र.रु.1,87,64,527/- (18% GST सह) यास प्रशासकीय मंजुरी बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 1951/2025:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिका क्षेत्रात शहराची वाढती लोकसंख्या पाहता मंजुर विकास योजना आराखडा सन-2001 व नव्याने लागु होणाऱ्या विकास योजना आराखड्यानुसार विकास योजना रस्ते विकसीत करणे गरजेचे आहे. परंतु सद्यस्थितीत नागरीकांना विकास योजना रस्त्यांची रुंदी/लांबी अवगत नसल्यामुळे या भागात अतिक्रमणे होतात व विकास योजना रस्ते विकसित करतांना अडचण निर्माण होते.

या समस्येवर उपाय योजना करणे करीता छत्रपती संभाजीनगर शहरातील विधानसभा 'पश्चिम मतदार संघातील' विविध विकास योजना रस्त्यांचे जाळे (Road Network Connectivity) विकसित करणे करीता प्रथम नगर रचना विभागाच्या समन्वयाने नमुद प्रमाणे 15 मी., 18 मी, 24 मी., 30 मी.,36 मी., 40 मी., इ.लांबी/रुंदीचे Row आरेखित करुन घेऊन या ठिकाणी Precast RCC Boundary Pole च्या बाजारभाव दराच्या आधारे दरपृथ:करण करुन PWD SSR 2022-23 नुसार अंदाजपत्रक र.रु.1,87,64,527/- (18% GST सह) चे अंदाज पत्रक तयार करण्यात आले असून यास प्रशासकीय मान्यता देण्यात येते. तद्नुषंगाने पुढील कार्यवाही करण्याचे व त्यासाठी आवश्यक सर्व बाबींचा निर्णय घेण्याचे संपुर्ण अधिकार आयुक्तांना प्रदान करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1952/2025:- (कार्य.अभि.रस्ते विभाग)** **(दि.17.06.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिका क्षेत्रात वाढती लोकसंख्या, निवासी विस्तारीकरण, शहरालगत शेंद्रा, बिडकीन, वाळूज येथील औद्योगिक विस्तारीकरण, शैक्षणिक, पर्यटन, व्यावसायीक दृष्ट्या शहर व शहरालगत वाहतुक रहदारी वाढली आहे. यामुळे महानगरपालिका हद्दीतील विविध लांबी/रुंदीचे विकास योजना रस्त्यांचे जाळे (Road Network) विकसीत करणे गरजेचे ठरत आहे. जेणे करुन नागरीकांना सुरळीत व सुलभ वाहतूक करणे सोईचे होईल. परंतु नमुद प्रमाणे विकास आराखड्या नुसार रस्त्यांबाबत नागरीकांना अवगत नसल्यामुळे या भागात अतिक्रमणे वाढत आहेत. त्यामुळे विकास योजना रुंदीप्रमाणे रस्ते विकसित करतांना अडचण निर्माण होऊन रस्त्याच्या कामास विलंब होऊन नागरीकांना सुलभ व सुरळीत वाहतुकी करीता रस्ते उपलब्ध होत नाहीत.

मंजुर विकास योजना आराखडा 2001 नुसार तसेच नव्याने लागू होणाऱ्या मंजुर विकास योजना आराखड्या नुसार शहरातील विविध विकास योजना रस्ते विकसित करणे करीता प्रत्यक्ष स्थळावर आखणी करतांना बहुतांश भागात बाधीत मिळकती, विद्युत डी.पी./खांबे तसेच अतिक्रमणे इ.अडथळे निर्माण होतात व Right of Way (Row) उपलब्ध होत नसल्यामुळे उपलब्ध लांबी/रुंदी नुसार भागश: रस्ते विकसित करावे लागतात.

या समस्येवर उपाय योजना करणे करीता मंजुर विकास आराखडा व नव्याने लागु होणा-या विकास आराखड्यातील 15 मी., 18 मी, 24 मी., 30 मी.,36 मी., 40 मी., इ.रुंदीचे विकास योजना रस्ते नगर रचना विभागाच्या समन्वयाने Row आरेखित करुन या ठिकाणी Precast RCC Boundary Pole करुन यावर विकास योजना रस्ता लांबी/रुंदी, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका इ.तपशिल पेंट करण्याचे महानगरपालिकेचा मानस आहे. जेणे करुन या विकास योजना रस्त्याच्या बाधीत भागा बाबत नागरीकांना अवगत होईल व या ठिकाणी अतिक्रमण होणार नाही.

उक्त नमुद कामाकरीता 2.10 मी.उंचीचे Precast RCC Boundary Pole चे दर प्रचलित PWD SSR 2022-23 मध्ये उपलब्ध नसल्यामुळे विभागाने महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर या बाबीसाठी दरपत्रक प्रसिध्द करुन खुल्या बाजारातून पुरवठा दर मागवून सर्वात कमी दराचे दरपत्रक र.रु.1112.73 च्या आधारे दरपृथ:करण करुन व अंदाजपत्रकातील इतर बाबींचा दर PWD SSR 2022-23 प्रमाणे घेऊन या र.रु.1,87,63,837/- (18% GST सह) चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

करीता, छत्रपती संभाजीनगर शहरातील 'पुर्व विधानसभा मतदार संघातील' विविध विकास योजना रस्त्याचे एकुण अंदाजीन लांबी 27 कि.मी. प्रत्येकी 15 मी. अंतरावर Precast RCC

Boundary Pole उभारणेच्या कामाचे PWD SSR 2022-23 नुसार अंदाजपत्रक र.रु.1,87,63,837/- (18% GST सह) यास प्रशासकीय मंजुरी बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 1952/2025:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिका क्षेत्रात शहराची वाढती लोकसंख्या पाहता मंजुर विकास योजना आराखडा सन-2001 व नव्याने लागु होणाऱ्या विकास योजना आराखड्यानुसार विकास योजना रस्ते विकसीत करणे गरजेचे आहे. परंतु सद्यस्थितीत नागरीकांना विकास योजना रस्त्यांची रुंदी / लांबी अवगत नसल्यामुळे या भागात अतिक्रमणे होतात व विकास योजना रस्ते विकसित करतांना अडचण निर्माण होते.

या समस्येवर उपाय योजना करणेकरीता छत्रपती संभाजीनगर शहरातील विधानसभा 'पुर्व मतदार संघातील' विविध विकास योजना रस्त्यांचे जाळे (Road Network Connectivity) विकसित करणे करीता प्रथम नगर रचना विभागाच्या समन्वयाने नमुद प्रमाणे 15 मी., 18 मी, 24 मी., 30 मी.,36 मी., 40 मी., इ.लांबी/रुंदीचे Row आरेखित करुन या ठिकाणी Precast RCC Boundary Pole च्या बाजारभाव दराच्या आधारे दरपृथःकरण करुन PWD SSR 2022-23 नुसार अंदाजपत्रक र.रु.1,87,63,837/- (18% GST सह) चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून यास प्रशासकीय मान्यता देण्यात येते. तद्नुषंगाने पुढील कार्यवाही करण्याचे व त्यासाठी आवश्यक सर्व बाबींचा निर्णय घेण्याचे संपुर्ण अधिकार आयुक्तांना प्रदान करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1953/2025:-** **(कार्य.अभि.रस्ते विभाग)** **(दि.17.06.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिका क्षेत्रात वाढती लोकसंख्या, निवासी विस्तारीकरण, शहरालगत शेंद्रा, बिडकीन, वाळूज येथील औद्योगिक विस्तारीकरण, शैक्षणिक पर्यटन, व्यावसायीक दृष्ट्या शहर व शहरालगत वाहतुक रहदारी वाढली आहे. यामुळे महानगरपालिका हद्दीतील विविध लांबी/रुंदीचे विकास याजना रस्त्यांचे जाळे (Road Network) विकसित करणे गरजेचे ठरत आहे. जेणे करुन नागरीकांना सुरळीत व सुलभ वाहतुक करणे सोईचे होईल. परंतु नमुद प्रमाणे विकास आराखड्यानुसार रस्त्यांबाबत नागरीकांना अवगत नसल्यामुळे या भागात अतिक्रमणे वाढत आहेत. यामुळे विकास योजना रुंदीप्रमाणे रस्ते विकसित करतांना अडचण निर्माण होऊन रस्त्याच्या कामास विलंब होऊन नागरीकांना सुलभ व सुरळीत वाहतुकी करीता रस्ते उपलब्ध होत नाहीत.

मंजुर विकास योजना आराखडा-2001 नुसार तसेच नव्याने लागू होणाऱ्या मंजुर विकास योजना आराखड्यानुसार शहरातील विविध विकास योजना रस्ते विकसित करणे करीता प्रत्यक्ष स्थळावर आखणी करतांना बहुतांश भागात बाधीत मिळकती, विद्युत डी.पी./खांबे तसेच अतिक्रमणे इ.अडथळे निर्माण होतात व Right of Way (Row) उपलब्ध होत नसल्यामुळे उपलब्ध लांबी/रुंदीनुसार भागश: रस्ते विकसित करावे लागतात.

या समस्येवर उपाय योजना करणे करीता मंजुर विकास आराखडा व नव्याने लागु होणाऱ्या विकास आराखड्यातील 15 मी., 18 मी, 24 मी., 30 मी.,36 मी., 40 मी., इ.रुंदीचे विकास योजना रस्ते नगर रचना विभागाच्या समन्वयाने Row आरेखित करुन या ठिकाणी Precast RCC Boundary Pole करुन यावर विकास योजना रस्ता लांबी/रुंदी छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका इ.तपशिल पेंट करण्याचे महानगरपालिकेचा मानस आहे. जेणे करुन या विकास योजना रस्त्याच्या बाधीत भागाबाबत नागरीकांना अवगगत होईल व या ठिकाणी अतिक्रमण होणार नाही.

उक्त नमुद कामाकरीता 2.10 मी. उंचीचे Precast RCC Boundary Pole चे दर प्रचलित PWD SSR 2022-23 मध्ये उपलब्ध नसल्यामुळे विभागाने महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर या बाबीसाठी दरपत्रक प्रसिध्द करुन खुल्या बाजारातून पुरवठा दर मागवून सर्वात कमी दराचे दरपत्रक र.रु.1112.73 च्या आधारे दरपृथःकरण करुन व अंदाजपत्रकातील इतर बाबींचा दर PWD SSR 2022-23 प्रमाणे घेऊन या र.रु.1,94,66,818/- (18% GST सह) चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

करीता, छत्रपती संभाजीनगर शहरातील 'मध्य विधानसभा मतदार संघातील' विविध विकास योजना रस्त्याचे एकुण अंदाजीत लांबी 28 कि.मी. प्रत्येकी 15 मी. अंतरावर Precast RCC Boundary Pole उभारणेच्या कामाचे PWD SSR 2022-23 नुसार अंदाजपत्रक र.रु.1,94,66,818/- (18% GST सह) यास प्रशासकीय मंजुरी बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 1953/2025:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिका क्षेत्रात शहराची वाढती लोकसंख्या पाहता मंजुर विकास योजना आराखडा सन-2001 व नव्याने लागु होणाऱ्या विकास योजना आराखड्यानुसार विकास योजना रस्ते विकसीत करणे गरजेचे आहे. परंतु सद्यस्थितीत नागरीकांना विकास योजना रस्त्यांची रुंदी/लांबी अवगत नसल्यामुळे या भागात अतिक्रमणे होतात व विकास योजना रस्ते विकसित करतांना अडचण निर्माण होते.

या समस्येवर उपाय योजना करणेकरीता छत्रपती संभाजीनगर शहरातील विधानसभा 'मध्य मतदार संघातील' विविध विकास योजना रस्त्यांचे जाळे (Road Network Connectivity) विकसित करणे करीता प्रथम नगर रचना विभागाच्या समन्वयाने नमुद प्रमाणे 15 मी., 18 मी, 24 मी., 30 मी.,36 मी., 40 मी., इ.लांबी/रुंदीचे Row आरेखित करुन घेऊन या ठिकाणी Precast RCC Boundary Pole च्या बाजारभाव दराच्या आधारे दरपृथःकरण करुन PWD SSR 2022-23 नुसार र.रु.1,94,66,818/- (18% GST सह) चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून यास प्रशासकीय मान्यता देण्यात येते. तद्नुषंगाने पुढील कार्यवाही करण्याचे व त्यासाठी आवश्यक सर्व बाबींचा निर्णय घेण्याचे संपुर्ण अधिकार आयुक्तांना प्रदान करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1954/2025:- (कार्य.अभि.रस्ते विभाग)** **(दि.17.06.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, छत्रपती संभाजीनगर शहरामध्ये पॅकेज-बी अंतर्गत विविध रस्त्यांचे कॉंक्रीटींग करण्याचे काम प्रगतीपथावर आहेत. पॅकेज-बी मधील एकुण 17 कामांपैकी रस्ता क्र.08,09,10,15 व 16 मध्ये खालील प्रमाणे बचत झालेली आहे.

| अ. क्र. | पॅकेज-बी मधील अ.क्र. | कामाचे नाव | बचत झालेली रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|
| 1. | 08 | वॉर्ड क्र.10 सिध्दार्थनगर अंतर्गत तातेराव तुपे यांच्या घरापासून ते भिमराव अंभोरे यांच्या घरापर्यंत रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे | र.रु.18,34,378/- | बचत झालेले 110 मी.लांबीचा रस्ता आमदार निधीतून पुर्ण झाला आहे. |
| 2. | 09 | वॉर्ड क्र.11 फाजलपुरा अंतर्गत सिमेंट कॉंक्रीट रस्ता करणे बाबत | र.रु.4,92,469/- | प्रस्तावित फाजलपुरा अंतर्गत रस्त्याचे काम पुर्ण झाले आहे. |
| 3. | 10 | वॉर्ड क्र. 12 अंतर्गत हनुमान टेकडी येथे रस्त्यांचे सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे | र.रु.18,87,436/- | बचत झालेले 140 मी.लांबीचा रस्ता आमदार निधीतून पुर्ण झाला आहे. |
| 4. | 15 | वॉर्ड क्र.48 गुलमंडी अंतर्गत अंगुरीबाग येथील सिमेंट कॉंक्रीट रस्ता करणे | र.रु.23,95,373/- | सदरील रस्त्याचे काम आमदार निधीतून पुर्ण झाला आहे. |
| 5. | 16 | वॉर्ड क्र.67 सिल्लेखाना येथील सिमेंट कॉंक्रीट रस्ता करणे | र.रु.28,29,025/- | बचत झालेले 170 मी.लांबीचा रस्ता |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | आमदार निधीतून पुर्ण झाला आहे. |
| | | एकुण | | र.रु.94,38,681/- | |

सदर बचतीमधुन वॉर्ड क्र.12 पहाडसिंगपुरा बेगमपुरा येथील सैनिक कॉलनी ते शेळके शॉप पर्यंतच्या नवीन वाढीव रस्त्याचे सिमेंट काँक्रीटीकरण करणे बाबतचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन 2022-23 च्या एसएसआर नुसार तयार करण्यात आलेले असुन अंदाजपत्रकीय र.रु.82,20,623/- इतकी होत आहे.

तसेच सदर पॅकेज मध्येच समाविष्ठ असलेले रस्ता क्र.04 व 07 हे रस्ते अस्तित्वातील रस्त्यावर केल्यास त्यांची उंची वाढून पावसाळ्यामध्ये पावसाचे पाणी दुकानात शिरण्याची शक्यता असल्याने सदर रस्त्याचे पुर्ण खोदकाम करुन आहे त्या पातळीवर करणे आवश्यक असल्याने सदर रस्त्याचे सुधारित अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन 2022-23 नुसार तयार करण्यात आलेले आहे. अंदाजपत्रकीय रक्कम रुपये खालील प्रमाणे होत आहेत.

| अ. क्र. | पॅकेज-बी मधील अ.क्र. | कामाचे नाव | मुळ अं.प.र.रु. | सुधारित अं.प.र.रु. | फरक रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|
| 1. | 04 | गायत्री चाट भांडार ते पिया मार्केट पर्यंतच्या रस्त्याचे काँक्रीटीकरण करणे | 49,78,964/- | 61,36,29 2/- | 11,57,328/- |
| 2. | 07 | वॉर्ड क्र.48, कुंभारवाडा येथे महावीर भवन समोरील रस्त्याचे सिमेंट काँक्रीटीकरण करणे | 42,96,506/- | 43,47,62 5/- | 51,119/- |
| | | एकुण | | | 12,08,447/- |

एकुण होणारी बचत र.रु.94,38,681/- इतकी आहे. प्रस्तावित कामाचा खर्च र.रु.82,20,623/- + र.रु.12,08,447/- = 94,29,070/- इतका आहे. सदर बचतीमधून प्रस्तावित कामे करणे शक्य आहे.

सदर रस्ते उपलब्ध मुळ मंजुर तरतुदीमधुनच करण्यात येणार असल्याने त्यासाठी वाढीव खर्च लागणार नाही. करीता उक्त नमुद कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मंजुरीबाबत प्रस्ताव तसेच सदर काम मुळ कंत्राटदारामार्फत मुळ मंजुर दराने करण्याचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**<u>ठराव क्रमांक 1954/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, पॅकेज-बी मधील एकुण 17 कामांपैकी रस्ता क्र.08,09,10,15 व 16 मधील होणाऱ्या बचतीमधुन वॉर्ड क्र.12 पहाडसिंगपुरा, बेगमपुरा येथील सैनिक कॉलनी ते शेळके शॉप पर्यंतच्या रस्त्याचे सिमेंट काँक्रीटीकरण करणे या नवीन वाढीव कामाच्या र.रु.82,20,623/- इतकेच्या अंदाजपत्रकास तसेच गायत्री चाट भांडार पासून ते पिया मार्केट पर्यंतच्या रस्त्याचे काँक्रीटीकरण करणे या कामाच्या र.रु.61,36,292/- च्या व वॉर्ड क्र. 48 कुंभारवाडा येथे महावीर भवन समोरील रस्त्याचे काँक्रीटीकरण करणे या कामाच्या र.रु.43,47,625/- इतकेच्या सुधारित अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1955/2025:-</u> (यांत्रिकी विभाग)** **(दि.18.06.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 208 प्रमाणे रस्त्यांच्या कडेला किंवा रस्त्यावर इतर वाहनांना व पादचाऱ्यांना अडथळा निर्माण होणार नाही. यासाठी प्रतिबंध करण्याचा महानगरपालिकेला अधिकार आहे. त्यानुषंगाने रस्त्यावर बेशिस्तपणे पार्किंग केलेल्या वाहनांवर ट्राफीक वार्डन (माजी सैनिक) यांच्या सहाय्याने दंडात्मक कारवाई करण्यास मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.1677 दि.14.10.2024 नुसार मान्यता प्राप्त आहे.

सदरील कार्यवाही करीता 05 टो-क्रेन वाहने खरेदी करणे गरजेचे आहे. टो-क्रेन खरेदी करण्या साठी जी.ई.एम.पोर्टल वर तपासणी केली असता, टाटा योध्दा चेसिस वर उभारणी केलेल्या टो-क्रेनसाठी एकमेव खालील प्रमाणे दरपत्रक प्राप्त झाले आहे.

| | | |
|---|---|---|
| 1 | M/s ARP Motors | Rs. 23,50,000/ Per (with GST) |

त्यामुळे एजन्सीधारकांकडुन दरपत्रके मागविली असता, खालील प्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| Sr. No. | Agency | Amount (for one vehicle) |
|---|---|---|
| 1 | M/s Maniar & Co. | Rs. 21,30,000/-Per (with GST) |
| 2 | M/s Western Envirotech Pvt. Ltd. | Rs 23,50,000/Per (with GST) |
| 3 | M/s Ranks Pharma Machinery | Rs. 25,50,000/Per (with GST) |

उपरोक्त नुसार M/s Maniar & Co. यांचे दर तुलनात्मकदृष्ट्या कमी असुन, ते प्रतिनग र.रु.21,30,000/- प्रमाणे आहेत. सदरील न्युनतम दर ग्राहय धरुन 05 टो-क्रेन वाहने खरेदी करण्यासाठी र.रु.1,06,50,000/- रक्कमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. अंदाजपत्रकास मान्यता मिळाली तर जाहिर निवीदा मागवुन 05 टो क्रेन वाहने खरेदी करण्यात येतील. सदरील खर्च "नवीन वाहने खरेदी" या लेखाशीर्षकातून भागविण्यात येईल.

करीता रस्त्यावर बेशिस्तपणे पार्कींग केलेल्या वाहनांवर ट्राफीक वार्डन (माजी सैनिक) यांच्या सहाय्याने दंडात्मक कारवाई करण्यासाठी लागणारी 05 टो-क्रेन वाहने खरेदी करण्यासाठी र.रु.1,06,50,000/- चे अंदाजपत्रक मा. सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1955/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, स्त्यावर बेशिस्तपणे पार्किंग केलेल्या वाहनांवर ट्राफीक वार्डन (माजी सैनिक) यांच्या सहाय्याने दंडात्मक कारवाई करण्यासाठी लागणारी 05 टो-क्रेन वाहने खरेदी करणे करीता र.रु.1,06,50,000/- च्या अंदाजपत्रकास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1956/2025:-</u> (यांत्रिकी विभाग)** **(दि.18.06.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या विविध विभागातील सर्व प्रकारचे भंगार साहित्य एकत्रित जमा करुन ई-लिलाव करण्याचे मा.आयुक्त महोदयांचे आदेश आहेत. सदरील सर्व विभागातील भंगार साहित्य हे हर्सुल पाणी फिल्टर येथे जमा करण्यात आलेले आहे.

सर्व भंगार साहित्याची पाहणी केली असता, महानगरपालिकेच्या विविध विभागातील साहित्य जसे की, विना वापर पडून असलेल्या गाद्या, तुटलेले पलंग, लोखंडी कपाट, टेबल, चेअर, स्टॅन्ड, बेंचेस, लाकडी कपाट, जुने पंप, फायर पाईप, रॉड, मोडलेली खेळणी, कंपाऊंड ग्रिल, इतर लोखंडी वस्तू, इ.साहित्य निदर्शनास येते. या सर्व भंगार साहित्याची पाहणी करुन स्थानिक बाजारपेठेतून दरपत्रके मागविली असता सर्वात जास्त दर मे.ए.आर.एन्टरप्रायझेस यांचे र.रु.8,02,799/- चे प्राप्त झाले आहे.

उपरोक्त मे.ए.आर.एन्टरप्रायझेस यांचे दर सर्वात जास्त असल्याने अंदाजपत्रक तयार करण्या साठी ग्राह्य धरुन सदरील कामासाठी र.रु.8,02,799/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. अंदाजपत्रकास मान्यता मिळाली तर जाहीर निविदा मागवून सर्व भंगार साहित्याचा ई लिलाव करण्यात येईल.

करीता महानगरपालिकेच्या विविध विभागातील सर्व प्रकारच्या भंगार साहित्याचा ई-लिलाव करण्यासाठी र.रु.8,02,799/- चे अंदाजपत्रक मा. सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1956/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेच्या विविध विभागातील सर्व प्रकारच्या भंगार साहित्याचा ई-लिलाव करण्यासाठी र.रु.8,02,799/- च्या अंदाजपत्रकालामान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1957/2025:-</u> (आस्थापना-1 विभाग)** **(दि.19.06.2025)**

आयुक्त, महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर यांच्याकडून प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शासन मंजूर विकास योजना सन 1991 (वाढीव हदद) मध्ये बीडबायपास ते पैठणरोड 60.00 मीटर रुंद विकास योजना रस्ता नियोजित करण्यात आला होता. सदरील रस्त्याचे महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम-37 अन्वये फेरबदल करण्यात येऊन 60.00 मीटर रुंद विकास योजना रस्त्याची रुंदी कमी करुन ती 30.00 मीटर रुंद करण्यात आली आहे. या बाबत राज्य शासनाने अधिसूचना क्र. टी.पी.एस./3014/674/सीआर-231/2014/युडी-30 दि.21.08.2015 अन्वये अधिसुचना व सोबतचा फेरबदलाचा मंजुरीचा नकाशा प्रसिध्द केला आहे.

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या संपूर्ण क्षेत्रासाठी शासनाचे नियुक्त अधिकारी यांनी उक्त अधिनियमाच्या कलम-26 (1) अन्वये प्रसिध्द केलेल्या प्रारुप विकास योजनेत सदरील विकास योजना रस्त्याची रुंदी 30.00 मीटर कायम ठेवलेली आहे. तसेच उक्त अधिनियमच्या कलम 30 अन्वये शासनास प्रारुप विकास योजना मंजुरीसाठी सादर करतांना सदरील 30.00 मीटर रुंद विकास योजना रस्त्याच्या रुंदीमध्ये उक्त अधिनियमाच्या कलम-28(4) अन्वये कोणताही फेरबदल सुचविण्यात आलेले नाही.

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या संपूर्ण क्षेत्रासाठी प्रसिध्द करण्यात आलेल्या व कलम-28/4 अन्वये काही फेरबदलासह अंतिम मंजुरीसाठी शासनास सादर करण्यात आलेल्या प्रारुप विकास योजनेस राज्य शासनाने अधिसूचना क्र. टीपीएस-3025/प्र.क्र.06/2025/भागशः/मंजुरी/नवि-30 दि.15.04.2025 अन्वये भागशः अंतिम मंजुरी दिलेली आहे. तसेच सदरील भागशः मान्यते सोबत उक्त अधिनियमाच्या कलम-31(1) अन्वये वगळलेले क्षेत्र (ई.पी) SCHEDULE-B नुसार प्रसिध्द केलेले आहे. सदरील SCHEDULE-B सेक्टर- X मधील अनुक्रमांक-11 फेरबदल EP(X)-11(M-11) सदरील फेरबदल क्रमांकातील कॉलम-7 मध्ये परि-2 मध्ये पुढील प्रमाणे नमुद करण्यात आलेले आहे.

30 m wide road staring from Survey No. 62/2 (near NH-53AB) to Survey No. 83 near NH-152 Beed bypass is proposed to be reduced up to 18.00 m. Accordingly alignment for the said road is propsed to be shown at eastern boundary of Itkheda along Strearm, as shown on plan.

वरील प्रमाणे प्रस्तावित फेरबदल हे उक्त अधिनियमाच्या कलम-31(1) अन्वये शासन स्तरावरुन सुचविण्यात आलेले आहेत. तथापी मंजुर विकास योजनेतील विद्यमान 30.00 मीटर रुंद विकास योजना रस्त्याच्या आखणीनुसार भागशः रस्त्याचे बाधीत मिळकतीचे टी.डी. आर. च्या स्वरुपात मोबदला देवून रस्त्या रुंदीकरणाची जागा संपादीत करण्यात आलेली आहे. तसेच सद्यस्थितीत इकडील कार्यालयाकडे टी.डी. आर चे प्रस्ताव कार्यवाही अंतर्गत आहेत.

करीता नियोजनाच्या दृष्टिने व कायदेशीर गुंतागुंत टाळण्यासाठी शासन मंजुर विकास योजने तील 30.00 मीटर रुंद विकास योजना रस्त्याची आखणी कयम ठेवण्यात यावी या करीता शासनास कळविणे आवश्यक आहे. करीता प्रस्ताव मान्यतेसठी सादर. मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1957/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शासन मंजुर विकास योजना 1991 (वाढीव हदद) यामध्ये शासन अधिसूचना क्र.टी.पी.एस./3014/674/सीआर-231/2014/युडी-30 दि.21.08.2015 नुसार उक्त अधिनियमाच्या कलम-37 अन्वये फेरबदल करुन 30.00 मीटर रुंद विकास योजना रस्ता पैठणरोड गट क्रमांक 62/2 ते गट कमांक 83 बीडबायपास पर्यंत 30.00 मीटर रस्त्यासाठी रुंदी कायम करण्यात आलेली आहे. सदरील रस्त्याच्या शासन मंजुर विकास योजनेतील आखणीनुसार भागशः टी.डी.आर.च्या स्वरुपात मोबदला देवून रस्ता रुंदीकरणातील बाधीत जमीनी संपादीत करण्यात आलेल्या आहेत. तसेच या आखणी नुसार काही टी.डी.आर. प्रस्ताव महानगरपालिकेकडे कार्यवाही अंतर्गत आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम-205 व 206 नुसार महानगरपालिकेस प्राप्त अधिकारा नुसार सदरचा विकास योजना रस्ता नविन सार्वजनिक रस्ता म्हणुन 30.00 मीटर रुंदीचा ठेवावा या करीता धोरणात्मक निर्णय घेण्यात येत आहे. अशा परिस्थितीत भविष्यातील कायदेशीर गुंतागुत व रस्त्याच्या नियोजनातील अडचण टाळण्यासाठी मंजुर विकास योजनेतील 30.00 मीटर रुंद विकास योजना रस्त्याची आखणी कायम करण्यास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1958/2025:-</u> (उद्यान विभाग)** **(दि.20.06.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सिध्दार्थ उद्यान येथील मुख्य प्रवेशद्वाराचे बांधकाम पडून अपघात झालेला आहे. सिध्दार्थ उद्यान न.भु.क्र.20723 येथील बी.ओ.टी. तत्वावर बांधण्यात आलेल्या इमारत व डोमसह मुख्य प्रवेशद्वाराचे Structural Audit यश इन्नोव्हेटीव सोल्युशन्स यांच्यामार्फत करण्यात येत आहे. या संदर्भाने दि.14.06.2025 रोजी प्रत्यक्ष जागेवर स्थळ पाहणी करुन निरीक्षण केले.

पाहणीमध्ये प्रवेशद्वारावरील प्रथम दर्शनी डोमच्या उंचीमुळे तीव्र वाऱ्याच्या गतीमुळे डोम असुरक्षित असल्याचे आढळून आले असल्याने सार्वजनिक वापराच्या दृष्टीने सदरील डोम असुरक्षित असून हा डोम निष्काशीत करणे योग्य असल्याने या संदर्भाने निर्णय घेणे बाबत कळविले आहे.

सिध्दार्थ उद्यान येथील प्रवेशद्वाराचा वापर मोठ्या प्रमाणात नागरीक करत असल्याने डोमसह त्याकरिता असणारे बांधकाम निष्काशीत करणे आवश्यक आहे. करीता सदर बांधकाम निष्काशीत करणेच्या मंजुरी बाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**<u>ठराव क्रमांक 1958/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सिध्दार्थ उद्यान न.भु.क्र.20723 येथील मुख्य प्रवेशद्वारावरील प्रथम दर्शनी डोमच्या उंचीमुळे तीव्र वा-याच्या गतीमुळे डोम असुरक्षित असल्याचे आढळून आले असल्याने सार्वजनिक वापराच्या दृष्टीने सदरील डोम असुरक्षित असल्याने सदर डोम व त्या करिताचे बांधकाम निष्काशीत करणेस मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1959/2025:-</u> (यांत्रिकी विभाग)** **(दि.23.06.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभाग शासन निर्णय क्र. स्वमअ-2024/सीएन-853129 (25)/नवि-34 दि.4.10.2024 नुसार स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) 2.0 अंतर्गत छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेस ट्रान्सफर स्टेशन उभारणी करण्यासाठी रुपये 32,04,43,962/- च्या निधीला मान्यता प्राप्त आहे. त्याअनुषंगाने छत्रपती संभाजीनगर शहरात 06 ठिकाणी ट्रान्सफर स्टेशनची यंत्रणा एक वर्ष वॉरंटीसह पुरवठा करणे, उभारणी करणे, टेस्ट व ट्रायल देणे (स्थापत्य कामा शिवाय) यासाठी र.रु.22,78,63,080/- च्या अंदाजपत्रकास मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र 1740 दि.01.01.2025 अन्वये मान्यता घेण्यात आली आहे.

अंदाजपत्रकास मान्यता मिळाल्या नंतर शहरात 06 ठिकाणी ट्रान्सफर स्टेशनची यंत्रणा एक वर्ष वॉरंटीसह पुरवठा करणे, उभारणी करणे, टेस्ट व ट्रायल देणे (स्थापत्य कामा शिवाय) या कामासाठी जाहिर निविदा मागविण्यात आल्पा असता, निविदेच्या पहिल्या वेळी 02 निविदा तांत्रिकदृष्ट्या पात्र ठरल्या आहेत. पात्र निविदाधारकांची व्यापारी निविदा उघडण्यात आली असता, खालील प्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| अ.क्र. | एजन्सीचे नांव | प्राप्त दर |
|---|---|---|
| 1. | मे. हायवा इंडिया प्रा.लि. | र.रु.17,58,38,400/- |
| 2. | मे. टीपीएस इनफ्रास्ट्रक्चर लि. | र.रु.19,13,52,000/- |

उपरोक्त नुसार मे. हायवा इंडिया प्रा.लि. यांची निविदा तुलनात्मकदृष्ट्या कमी दराची असुन, ती अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा र.रु.5,20,24,680/- (22.83%) ने कमी आहे. त्यामुळे त्यांची निविदा स्विकृत करणे योग्य होईल.

करीता छत्रपती संभाजीनगर शहरामध्ये एकुण 06 ठिकाणी ट्रान्सफर स्टेशनची यंत्रणा एक वर्ष वॉरंटीसह पुरवठा करणे, उभारणी करणे, टेस्ट व ट्रायल देणे (स्थापत्य कामा शिवाय) यासाठी मे.हायवा इंडिया प्रा.लि. यांची अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा 22.83% ने कमी दराची र.रु.17,58,38,400/- (जीएसटीसह) रक्कमेची निविदा स्विकृत करणे बाबत प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1959/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, छत्रपती संभाजीनगर शहरा मध्ये एकुण 06 ठिकाणी ट्रान्सफर स्टेशनची यंत्रणा एक वर्ष वॉरंटीसह पुरवठा करणे, उभारणी करणे, टेस्ट व ट्रायल देणे (स्थापत्य कामा शिवाय) साठी मे.हायवा इंडिया प्रा.लि.यांची अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा रुपये 22.83% ने कमी दराची र.रु.17,58,38,400/-(जीएसटीसह) रक्कमेची निविदा स्विकृत करण्यास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1960/2025:-</u> (कार्यकारी अभियंता रस्ते विभाग)** **(दि.23.06.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, बीड बायपास रोडवरील श्रीकृष्ण मंदिर महानुभाव आश्रम चौक ते रामचंद्र मेडिकल कॉलेज महानगरपालिका हद्दीपर्यंत चा रस्ता हा विकास योजना आराखड्या

नुसार 60 मीटर रुंद विकास योजना रस्ता आहे. छत्रपती संभाजीनगर शहर व शहरालगत ऑटोमोबाईल क्षेत्रात जलद गतीने होणाऱ्या गुंतवणुकीमुळे शहराच्या प्रगतीमध्ये मोठ्या प्रमाणात वेग दिसून येत आहे. यामुळे शहर व शहरालगतची वाढती लोकसंख्या पाहता, अडथळा विरहीत रुंद रस्ते उपलब्ध होणे अत्यंत आवश्यक ठरत आहे. परंतु मागील काही वर्षात बीड बायपास रोडवर मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकामे झालेली असल्याने रस्त्याची रुंदी कमी होऊन वाहतुकीस अडचण निर्माण होत आहे. या अनुषंगाने महानगरपालिकेतर्फे बीड बायपास रोडवरील अतिक्रमणे निष्काशीत करण्यात आलेली असून भविष्यात अतिक्रमणे होऊ नये. यासाठी कायम स्वरुपी उपाय योजना म्हणून रस्त्याची हद्द दर्शविणार Precast RCC Pole बसविणे आवश्यक आहे.

उक्तनुसार विषयांकीत कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या राज्य दरसुची नुसार र.रु.30,82,152/- (18% GST सह) चे तयार करण्यात आले असून सदर काम अडथळा विरहीत होणेच्या दृष्टीने कामाची तातडी व तत्परता पाहता सदर काम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 67 3 (सी) अंतर्गत उपलब्ध कंत्राटदार मार्फत तातडीने सुरू करण्याचे नियोजन आहे.

करीता वरील नमूद प्रमाणे सदर काम उपलब्ध कंत्राटदार मार्फत करून घेणेच्या मंजुरीस्तव व अं.प.र.रु.30,82,152/- (18% GST सह) चे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 67-3 (सी) अंतर्गत मा. स्थायी समिती सभेच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर आहे. मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1960/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, बीड बायपास रोडवरील श्रीकृष्ण मंदिर महानुभाव आश्रम चौक ते रामचंद्र मेडिकल कॉलेज पर्यंतच्या 60 मीटर रुंद विकास योजना रस्त्यावरील अतिक्रमणे

निष्काशीत करण्यात आलेली असून भविष्यात अतिक्रमणे होऊ नये. यासाठी कायम स्वरुपी उपाय योजना म्हणून रस्त्याची हद्द दर्शविणार Precast RCC Pole बसविणे आवश्यक असल्याने सदर कामाचे अं.प.र.रु.30,82,152/- (18% GST सह) यास प्रशासकीय मान्यता व सदर काम उपलब्ध कंत्राटदार मार्फत करुन घेण्यास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1961/2025:-</u>** **(कार्यकारी अभियंता ड्रेनेज विभाग)** **(दि.26.05.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या स्थापत्य विषयक कामात जसे की, रस्ते, पुल व इमारतींच्या संकल्पनांसाठी, बांधकामासाठी अपुऱ्या तांत्रिक कर्मचारी संख्येमुळे अथवा काही प्रसंगी गुंतागुंतीचे तांत्रिक प्रश्न, आधुनिक तंत्रज्ञानाची गरज, पर्यावरण विषयक अभ्यास व तत्सम बाबी, सुसाध्यतेची पडताळणी, संशोधनात्मक अभ्यास तसेच खाजगीकरणातुन करावयाच्या प्रकल्पांसाठी कायदेविषयक, अर्थविषयक अन्वेषण अशा बाबीसाठी सल्लागार किंवा तज्ञ नेमण्याची आवश्यकता भासते. त्यानुषंगाने विषय क्र.902/2023 दि.08.08.2023 नुसार, ठराव क्र.1442/2024 दि.25.06.2024, ठराव क्र.1477/2024 दि.10.07.2024 व ठराव क्र.1621/2024 दि.01.10.2024 अन्वये नियुक्तीबाबत ठराव मंजुर करण्यात आले आहेत.

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेने शासन निर्णयातील 2.1.1 सर्वसाधारण सल्लगार सेवा साठी महापालिका कार्यक्षेत्रासाठी नामिका प्रवेशाकरीता (Empanelment) सल्लागारांकडुन जाहीर प्रस्तावाव्दारे विहीत नमुन्यात माहिती मागवून वर्गनिहाय सल्लागार सुची तयार करण्यासाठी निविदा सुचना क्र.2023_AMCA_918785_1 अन्वये महानगरपालिकेस आवश्यक असलेल्या खालील 10 बाबी साठी पीएमसी/आर्किटेक्ट व इतर सल्लागार तज्ञांची नियुक्ती पाच वर्षासाठी करण्याकरीता RFQ निविदा मागविण्यात आल्या होत्या.

| Sr. No. | Consultancy Services |
|---|---|
| 11 | Structural designer (Building) |
| 12 | Structural designer (Road) |
| 13 | Road/Bridge Survey, design drawing levelling and surveying Expert |
| 14 | Architect |
| 15 | Landscaping designer, Gardening Horticulture |

| | |
|---|---|
| 16 | Mechanical, Electrical and Plumbing (MEP) & Heating, Ventilation & Air Conditioning (HVAC) Consultant |
| 17 | Green Building consultants With Rainwater Harvesting |
| 18 | Water supply, Sanitary and sewage treatment Consultant. |
| 19 | H.A.M./P.P.P Project Specialist /Annuity/Annuity &Toll/V.G.F. Consultant |
| 20 | Quantity Survey and Valuer Expert |

यासाठी मागविण्यात आलेल्या निविदेच्या अनुषंगाने व तद्नंतर प्राप्त प्रस्तावांबाबत निविदेतील अटी शर्तीनुसार छाननी करुन त्या-त्या सर्विसेससाठी नियुक्त करण्यात आलेल्या कन्सलटंटची संख्या खालीलप्रमाणे आहेत.

| Sr. No. | Consultancy Services | ठराव क्र 902/2023 दि.08.08.23 अन्वये नियुक्त | ठराव क्र 1442/2024 दि. 25.06.24 अन्वये नियुक्त | ठराव क्र 1477/2024 दि 10.07.24 अन्वये नियुक्त | ठराव क्र 1621/2024 दि 01.10.24 अन्वये नियुक्त | ठराव क्र 1908/2024 दि. 07.05.24 अन्वये नियुक्त |
|---|---|---|---|---|---|---|
| 11. | Structural designer (Building) | 10 | 1 | --- | --- | --- |
| 12. | Structural designer (Road) | 9 | 1 | --- | --- | --- |
| 13. | Road /Bridge Survey,design drawing levelling and surveyingExpert | 21 | 1 | --- | --- | --- |
| 14. | Architect | 27 | 4 | 1 | 2 | 4 |
| 15. | Landscaping designer, Gardening Horticulture | 16 | 1 | --- | --- | 1 |
| 16. | 17. Mechanical, Electrical and Plumbing (MEP) & Heating, Ventilation & Air Conditioning (HVAC) Consultant | 6 | 0 | --- | --- | 1 |
| 17. | 18. Green Building consultants With Rainwater Harvesting | 2 | 1 | --- | --- | --- |
| 18. | Water supply, Sanitary and sewage treatment Consultant. | 14 | 0 | --- | --- | --- |
| 19. | HAM/P.P.P Project Specialist /Annuity/Annuity &Toll/V.G.F. Consultant | 6 | 0 | --- | --- | --- |
| 20. | Quantity Survey and Valuer Expert | 15 | 0 | --- | --- | --- |
| 21. | Surveyer | - | - | --- | --- | 1 |

सदर पात्र ठरलेल्या प्रकल्प सल्लागाराच्या नियुक्तोस ठराव क्र.902/2023 दि.08.08.2023, ठराव क्र.1442/2024 दि.25.06.2024, ठराव क्र.1477/2024 दि.10.07.2024, ठराव क्र.1621/2024 दि.01.10.2024 व ठराव क्र.1908/2024 दि.07.05.2025 नुसार मंजुरी प्राप्त झाल्यानंतर या प्रकल्प सल्लागारांना नियुक्तीचे पत्र देण्यात आली आहेत. परंतु त्यानंतर श्री. रितेश रमेश बडजाते यांचा Interior Designer & Landscape Designer स्वरुपाने प्रकल्प सल्लागार सुचीमध्ये समाविष्ट करण्याकरीता विनंती अर्ज सादर केला आहे.

करीता श्री.रितेश रमेश बडजाते यांचा अनुभव लक्षात घेऊन त्यांना महानगरपालिकेमार्फत येणाऱ्या विविध प्रकल्पांसाठी प्रकल्प सल्लागार सुचीमध्ये Interior Designer & Landscape Designer स्वरुपाने समाविष्ट करणे योग्य वाटते. यापूर्वीच्या मंजुर ठरावानुसार सल्लागारांची कन्सल्टन्सी चार्जेस म्हणुन Pre Tender Activity साठी Project Cost च्या 0.60% व Post tender Activity साठी Project Cost च्या 0.90% असे एकुण Project Cost च्या 1.50% च्या मर्यादेत शुल्क अदा करण्यात येतील. करीता छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या सल्लागारांची निवडसूचीत श्री. रितेश रमेश बडजाते यांचा Interior Designer & Landscape Designer स्वरुपाने समावेश करण्यास मान्यतेचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1961/2025:-</u>**

प्रस्तावात नमुद केल्यानुसार, श्री.रितेश रमेश बडजाते यांचा अनुभव लक्षात घेऊन त्यांना महानगरपालिकेमार्फत येणाऱ्या विविध प्रकल्पांसाठी प्रकल्प सल्लागार सुचीमध्ये Interior Designer & Landscape Designer स्वरुपाने समाविष्ट करणे योग्य वाटते. यापूर्वीच्या मंजुर ठरावानुसार सल्लागारांची कन्सल्टन्सी चार्जेस म्हणून Pre Tender Activity साठी Project Cost च्या 0.60% व Post tender Activity साठी Project Cost च्या 0.90% असे एकुण Project Cost च्या 1.50% च्या मर्यादेत शुल्क अदा करण्यात येतील, करीता छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या सल्लागारांची निवड सूचीत श्री.रितेश रमेश बडजाते यांचा Interior Designer & Landscape Designer स्वरुपाने समावेश करण्यास मान्यतेचा प्रस्तावास मंजुरी प्रदान करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1962/2025:-</u> (यांत्रिकी विभाग)** **(दि.23.06.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेकडे २१८ वाहने कार्यरत असुन या वाहनांचे नियोजन व दुरुस्ती चे काम यांत्रिकी विभागा मार्फत करण्यात येते. त्यासाठी यांत्रिकी विभागात गॅरेज युनिट, ऑटो इलेक्ट्रिक युनिट, वेल्डिंग युनिट, सर्व्हिसिंग युनिट, टायर पंक्चर युनिट इत्यादी वेगवेगळे उपविभाग आहेत. वेल्डिंग वर्कशॉप मध्ये दररोज सरासरी 2 ते 3 वाहनांच्या वेल्डिंग पॅचवर्क ची कामे, व्हील बदलणे, बेअरिंग्स बदलणे, कलरिंग इत्यादी कामे करण्यात येतात व पंक्चर युनिट मध्ये दररोज साधारणपणे 8 ते 10 वाहनांच्या टायर पंक्चर दुरुस्तीची कामे केली जातात.

सदरील उपविभागांना लागणारे साहित्य खरेदी करण्यासाठी सन 2024-25 या आर्थिक वर्षात मे. तिरुपती इलेकट्रीकल्स सेल्स अँड सर्व्हिसेस यांच्याशी वार्षिक दर करार करण्यात आलेला आहे. आगामी आर्थिक वर्ष सन 2025-26 मध्ये लागणारे साहित्य खरेदीसाठी नव्याने जाहीर निविदा मागवून एजन्सीची नियुक्ती करणे व वार्षिक दर करार कारणे आवश्यक आहे. पुढील करार करण्यासाठी निविदा कार्यवाही पूर्ण होईपर्यंत मे. तिरुपती इलेकट्रीकल्स सेल्स अँड सर्व्हिसेस यांच्याकडुन मंजूर दराप्रमाणे साहित्य खरेदी करावे लागेल.

सन 2024-25 मध्ये वेल्डिंग युनिट व पंक्चर युनिटसाठी लागणारे साहित्य खरेदी करण्यासाठी रु. २६.०० लक्ष खर्च झालेला आहे. या वर्षी अपेक्षित 10% नैसर्गिक वाढ गृहीत धरुन एकूण र.रु.28.00 लक्ष खर्च अपेक्षित आहे. सदरील खर्च हा "वाहने देखभाल दुरुस्ती" या लेखाशिर्षातुन भागविण्यात येईल. करिता महानगरपालिकेच्या वेल्डिंग युनिट व पंक्चर युनिट साठी साहित्य खरेदी करणे कामाचा वार्षिक दर करार करण्यासाठी र.रु.28.60 लक्ष चे अंदाजपत्रक मा.स्थायी समिती सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1962/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेच्या वेल्डिंग युनिट व पंक्चर युनिटसाठी लागणारे साहित्य खरेदी करणे कामाचा वार्षिक दर करार करण्यासाठी नवीन एजन्सीची नियुक्ती होईपर्यंत सध्यस्थितीतील एजन्सीकडुन कामे करून घेण्यास तसेच आगामी वर्षासाठी र.रु.28.60 लक्षच्या अंदाजपत्रकास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1963/2025:-</u> (पाणी पुरवठा विभाग)** **(दि.23.06.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शहर पाणी पुरवठा योजने अंतर्गत फारोळा येथे 100 व 56 दलली प्रतिदिन क्षमतेचे 2 जलशुध्दीकरण केंद्र आहेत. तसेच 56 दलली योजनेच्या पुनरुज्जीवन अंतर्गत

20 दलली पाणी परिमाण वाढलेले असल्याने फारोळा येथे जलशुध्दीकरण केंद्रात दररोज 170 दलली पाण्यावर प्रक्रिया केली जाते. जलशुध्दीकरण प्रक्रियेत विविध टप्यांवर तुरटी ग्रेड-1 ब्लिचिंग पावडर ग्रेड-1 व क्लोरीनचा वापर केला जातो. पाणी गाळण प्रक्रियेनंतर पाण्याचे निर्जंतुकीकरण करुन पाणी पिण्या योग्य करण्यासाठी क्लोरीनचा व ब्लिचिंग पावडर ग्रेड-1 चा वापर प्रि-क्लोरीनेशन व पोस्ट क्लोरीनेशनच्या स्वरुपात केला जातो प्रि-क्लोरीनेशन करीता 1 पीपी एम व पोस्ट क्लोरीनेशन करीता 3 पीपी एम इतक्या मात्रेची आवश्यकता आहे. फारोळा जलशुध्दीकरण केंद्र येथे ब्लिचिंग पावडरचा वापर प्रि-क्लोरीनेशन करीता केला जातो. या करीता 1 पीपीएम इतकी मात्रा वापरावी लागते. पावसाळयाच्या दिवसात तसेच धरणातील पाणी पातळी कमी झाल्यानंतर वापरावयाची मात्रा आवश्यकतेनुसार वाढविण्यात येते. शहर वितरण प्रणाली अंतर्गत हर्सुल जलशुध्दीकरण केंद्र असून या केंद्रातून दररोज 11 दलली पाण्यावर प्रक्रिया केली जाते. त्याचप्रमाणे सिध्दार्थ जलतरण तलाव व वितरण प्रणाली अंतर्गत विविध जलकुंभांवर देखील ब्लिचिंग पावडरचा वापर केला जातो. दैनंदिन प्रक्रिया करण्यात येणारे पाणी परिमाण व आवश्यक मात्रा लक्षात घेता जलशुध्दीकरण केंद्र व इतर बाबींची वार्षिक मागणी 262 मे. टन इतकी आहे. या मागणीअंतर्गत 56 दलली योजनेचे पुनरुज्जीवन झाल्यानंतर वाढ होणाऱ्या पाणी परिमाणाचा समावेश केलेला नाही.

सदरील कामाचे अंदाजपत्रक मजिप्रा मंडळाच्या सन 2023-24 च्या दरसुचीतील साहित्य पुरवठ्या करीता असलेल्या दरानुसार तयार केले असून अंदाजपत्रकीय रक्कम रु. 83,47,320/- इतकी आहे. सदरील काम रसायन सामुग्री खरेदी या लेखा शिर्षकातुन प्रस्तावीत करण्यात आली आहे. सदरील अंदाजप्रत्रकास मा. सर्वसाधारण सभेने विषय क्र. 1778/2025 दि. 22.01.2025 अन्वये मान्यता प्रदान केली आहे.

सदरील कामाची ई-निविदा कार्यवाही केली असता निविदा कार्यवाहीचा तपशील खालीलप्रमाणे
संदर्भ : टेंडर आय.डी.क्र.2023_AMCA_934785_1

| अ.क्र. | खात्याचे नाव | कार्यकारी अभियंता (पाणीपुरवठा विभाग) |
|---|---|---|
| 1. | कामाचे स्वरुप/कामाचे नाव | शहर पाणी पुरवठा योजना फारोळा जलशुध्दीकरण केंद्रा करीता ब्लिचिंग पावडर ग्रेड-1 चा पुरवठा करणे. |
| 2. | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रक्कमेचे ? मान्यतेचा ठराव. | होय, र.रु. 83,47,320/-<br>मा. सर्वसाधारण सभेने विषय क्र.1778/2025 |
| | आ) त्यापैकी किती रक्कमेचे टेंडर्स / निविदा मागविण्यात आली. | र.रु. 70,74,000/ - |
| 3. | ज्या वृत्तपत्रात निविदेची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नावे व प्रसिध्दीची दिनांक | "ई निविदा मार्फत"<br>दि.29.01.2025 |
| 4. | अ) निविदा स्विकारण्याची अंतीम मुदत | दि.05.02.2025 |
| | ब) निविदा उघडल्याचा दिनांक | दि.07.02.2025 |
| 5. | निविदा किती वेळेस मागविल्या? | एक वेळेस |
| 6. | एकुण किती निविदा आल्या? | चार, 3 पात्र,1 अपात्र |
| 7. | निविदा प्राप्त दर | रु. 16,004/-प्रति मे.टन |

त्यापैकी पात्र निविदाधारकाची माहिती खालीलप्रमाणे

| अ. क्र. | गुत्तेदाराचे नाव व पत्ता | दाखल निविदा रक्कम | अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी/जास्त |
|---|---|---|---|
| 1. | श्री. नागनाथ महाराज केमिकल्स, चाकुर | र.रु.41,93,048/- | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 40.72% कमी |

| | | | |
|---|---|---|---|
| 8. | सर्वात कमी रक्कमेच्या निविदेची शिफारस करण्यात आली आहे काय? | | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | | होय |
| | ब) जास्त दराच्या निविदेची शिफारस करण्यात आली आहे काय? असल्यास कारणे नमुद करावीत. | | नाही |
| 9. | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमुद करावे. | पाणी पुरवठा रसायन सामग्री खरेदी | |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | | होय |
| 10. | सदरचे काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा केली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर- पान क्रमांक द्यावा) | | लागु नाही |
| 11. | सोबत मान्य पूर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे? | | होय |

तरी फारोळा जलशुध्दीकरण केंद्राकरीता ब्लिचिंग पावडर ग्रेड-1 चा पुरवठा करण्यासाठी श्री. नागनाथ महाराज केमिकल्स, चाकुर यांचेकडून मान्यतेनुसार र.रु.16,004/- प्रति मे.टन व र.रु.41,93,048/-(जी.एस.टी. वगळून) किंमतीची निविदा मान्यतेस्तव व करार करण्यास मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 1963/2025:-**

प्रस्तावीत शहर पाणी पुरवठा योजने अंतर्गत फारोळा जलशुध्दीकरण केंद्रा करीता ब्लिचिंग पावडर ग्रेड-1 चा पुरवठा करण्यासाठी श्री.नागनाथ महाराज केमिकल्स, चाकुर यांचेकडून अंदाज पत्रकीय दरापेक्षा 40.72% कमी दराची तसेच र.रु.16,004/- प्रती मे टन दराची व र.रु.41,93,048/- (जी.एस.टी.वगळून) किंमतीची निविदा मंजुर करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1964/2025:-** **(भांडार विभाग)** **(दि.24.06.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार ई-ऑफीस प्रणाली कार्यान्वयीत करणे तसेच RTS पोर्टलवर सुलभतेने कार्यालनीन कामकाज करण्यासाठी महानगरपालिकेतील सर्व कार्यालयामध्ये संगणक, लॅपटॉप व प्रिंटर खरेदी करावे लागणार आहे. त्यासाठी सन 2025-26 मध्ये "संगणक साहित्य खरेदी (संगणक व लॅपटॉप)" या लेखाशिर्षात र.रु.1.00 कोटीची तरतुद करण्यात आलेली आहे. सदर साहित्य खरेदीसाठी स्थानिक बाजारपेठेतून दरपत्रक मागविण्यात आली असुन त्यानुसार सर्वात कमी प्राप्त दरानुसार सदर साहित्य खरेदीस खालील प्रमाणे खर्च होणार आहे.

| अ. क्र. | साहित्याचे नाव | खरेदी संख्या | प्राप्त कमी दर सर्व करांसहित | प्रमाण | एकुण खर्च |
|---|---|---|---|---|---|
| 1. | संगणक व संगणक साहित्यासह संपुर्ण संच (Core i-5.12th Gen., 8GB Ram, 22" LED Screen Keyboard, Mouse, Win 11 Pro.) With 3 years warranty | 100 | 84000/- | नग | 8400000/- |
| 2. | लॅपटॉप (Core i-5.12th /13th Gen., 8GB Ram, 512 GB SSD, Integrated 15.6" FHD with Unm Pad, Win 11 pro.) with 3 years warranty | 10 | 8700/- | नग | 870000/- |
| 3. | प्रिंटर HP-M202 DW (Print+Wi-Fi Network Duplex) | 113 | 17500/- | नग | 1977500/- |
| | | | | **एकुण** | **11247500/-** |

उपरोक्त संगणक, लॅपटॉप व प्रिंटर खरेदीसाठी अंदाजे र.रु.1,12,47,500/- इतका खर्च अपेक्षित आहे. तथापि, "संगणक साहित्य खरेदी (संगणक व लॅपटॉप)" या (सांकेतांक

क्र.03141700014) या लेखाशिर्षात र.रु.1.00 कोटीची तरतुद असुन उपलब्ध तरतुदीच्या अंदाज पत्रकीय रक्कमेतुन प्रथम संगणक संच-100 नग व लॅपटॉप-10 नग खरेदी करणे व प्रस्तावित केलेले सर्व साहित्याचे निविदा काढून वार्षिक दर मंजुर करण्यासाठीची मान्यता प्राप्त झालेली आहे.

करीता, संगणक, लॅपटॉप व प्रिंटर खरेदीसाठी अंदाजे र.रु.1,12,47,500/- इतका खर्च अपेक्षित आहे. तथापि, "संगणक साहित्य खरेदी (संगणक व लॅपटॉप)" या (सांकेतांक क्र.03141700014) या लेखाशिर्षातून तरतुद उपलब्ध होणे व सदर साहित्य खरेदीसाठी निविदा मागविताना एका वर्षाकरीता उपरोक्त साहित्याचे वार्षिक दर मंजुर करण्यासाठी ई-निविदा पध्दतीचा अवलंब करुन साहित्य खरेदीचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 1964/2025:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, संगणक, लॅपटॉप व प्रिंटर खरेदी करण्यासाठी "संगणक साहित्य खरेदी" (सांकेतांक क्र.03141700014) या लेखाशिर्षातून र.रु.1.00 कोटीच्या (अक्षरी रक्कम रुपये एक कोटी फक्त) च्या अंदाजपत्रकास व एका वर्षासाठी उपरोक्त साहित्याच्या दरास मंजुरी देण्यात येऊन उपलब्ध तरतुदीच्या मर्यादित मंजुर दरानुसार व आवश्यकतेनुसार कमी जास्त प्रमाणात साहित्य खरेदी करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत असुन विहित ई-निविदा पध्दतीचा अवलंब करुन साहित्य खरेदी करण्यास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1965/2025:-** **(उपअभियंता झोन क्र.1 विभाग)** **(दि.25.06.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर मुख्यालयातील उपायुक्त-2, उपायुक्त-3, उपायुक्त-4, उपायुक्त-5 दक्षता कक्ष व जनसंपर्क अधिकारी कक्ष या दालनांचे नुतनीकरण करणे या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दरसुची सन 2022-23 नुसार र.रु.1,50,22,980/- चे तयार करण्यात आले आहे. सदर अंदाजपत्रकास तांत्रिक मंजुरी प्राप्त झाली आहे.

सदरील कामाचा खर्च सन 2025-26 मधील प्रशासकीय इमारत Zone No.01 Other Captial Work-1 Sr.no.10 इमारती तरतुद र.रु.07.00 कोटी मधुन करण्यात येईल. तरी सदरील कामाचे अंदाजपत्रक र.रु.1,50,22,980/- मंजुरी बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव क्रमांक 1965/2025:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर मुख्यालयातील उपायुक्त-2, उपायुक्त-3, उपायुक्त-4, उपायुक्त-5, दक्षता कक्ष व जनसंपर्क अधिकारी कक्ष या दालनांचे नुतनीकरण करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रु.1,50,22,980/- च्या अंदाजपत्रकास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1966/2025:-** **(शिक्षण विभाग)** **(दि.25.06.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्रीमती शकिला बेगम शेख रफिक अहेमद, सहशिक्षिका, प्राथमिक शाळा, यशोधरा कॉलनी, के.प्रा.शा.किराडपुरा नं.1 यांनी स्वतःच्या (गर्भाशय पिशवीची शस्त्रक्रिया) या आजारपणावर युनायटेड सिग्मा हॉस्पीटल, छत्रपती संभाजीनगर येथे दि.29.12.2024 ते दि.04.01.2025 या दरम्यान उपचार केला असुन त्यासाठी र.रु.2,05,026/- (अक्षरी रक्कम रुपये दोन लक्ष पाच हजार सव्वीस फक्त) इतका खर्च केला आहे.

त्यापैकी प्रत्यक्ष अनुज्ञेय शिल्लक र.रु.1,39,385/- असुन सदर रक्कमेच्या 90% र.रु.1,25,446/- आहे. त्यापैकी 5% र.रु.10,251/- (एकुण दाखल केलेले देयके र.रु.2,05,026/- च्या 5% प्रमाणे) महानगरपालिका फंडात जमा करुन उर्वरित निव्वळ देय र.रु.1,15,195/- (अक्षरी रक्कम रुपये एक लाख पंधरा हजार एकशे पंच्च्यान्नव फक्त) देय आहे .

सदरील आजार (स्त्रीरोग व प्रसुतीशास्त्र संबंधीचे आजार ) या शासनमान्य आकस्मिक आजारा मध्ये येतो. परंतु संबंधितांननी उपचार घेतलेले युनायटेड सिग्मा हॉस्पिटल, छत्रपती संभाजीनगर हे रुग्णालय शासन मान्य असलेल्या रुग्णालयांच्या यादीत समाविष्ठ नाही.

तथापि, जा.क्र./मनपा/आस्था-1/2024/3312 दि.12.09.2024 नुसार कर्मचारी/अधिकारी यांची वैद्यकिय उपचाराकरीता अग्रिम व वैद्यकिय देयके र.रु.1,50,000/- पर्यंत मंजुर करणे बाबतचे अधिकार अतिरिक्त आयुक्त-1 यांना देण्यात आले आहेत. तसेच र.रु.1,50,000/- पेक्षा जास्त वैद्यकिय देय रक्कमेस मा.स्थायी समितीची मंजुरी घेणे आवश्यक आहे.

करिता, श्रीमती शकिला बेगम शेख रफिक अहेमद, सहशिक्षक, प्राथमिक शाळा यशोधरा कॉलनी, केंद्रियय प्राथमिक शाळा किराडपूरा नं.1यांना शासन निर्णयामधील तरतुदीच्या अधिन राहून निव्वळ देय र.रु.1,00,000/-मधुन 5% र.रु.5,000/-वजा जाता रक्कम रु.95,000/-(अक्षरी रुपये-पंच्च्यान्नव हजार मात्र) वैद्यकिय खर्चास मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1966/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, श्रीमती शकिला बेगम शेख रफिक अहेमद, सहशिक्षिका, प्राथमिक शाळा, यशोधरा कॉलनी, के.प्रा.शा.किराडपुरा नं.1 यांनी स्वतःच्या (गर्भाशय पिशवीची शस्त्रक्रिया) या आजारपणावर युनायटेड सिग्मा हॉस्पीटल, छत्रपती संभाजीनगर येथे उपचार केला असुन संबंधीतास शासन निर्णयामधील तरतुदीच्या अधिन राहून निव्वळ देय र.रु.1,00,000/- मधुन 5% र.रु.5,000/-वजा जाता र.रु.95,000/-(अक्षरी रुपयेपंच्च्यान्नव हजार मात्र) वैद्यकिय खर्च अदा करण्यास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1966-1/2025:-</u> (कार्यकारी अभियंता/ इमारत विभाग)** **(दि.26.06.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, छत्रपती संभाजीनगर शहर हे पर्यटन, औद्योगिक, शैक्षणिक, वैद्यकीय दृष्ट्या महत्वाचे शहर असुन शहरालगत शेंद्रा, वाळूज, बिडकीन इ.भागांमध्ये वाढत्या औद्योगिकीकरणामुळे शहरास पर्यटक, अभ्यास, उद्योजक इ.भेटी देत असतात. यात या क्षेत्राशी निगडीत नोकरदार, कार्यरत महिलांचा समावेश आहे. याकरीता नोकरदार/कार्यरत महिलांसाठी प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1966-1/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1967/2025:-</u> (आरोग्य विभाग)** **(दि.28.06.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका आरोग्य विभागा अंतर्गत येणाऱ्या सर्व गरजु रुग्णांसाठी लागणाऱ्या आवश्यक Inj.ARV (Anti Raies Vaccine) लस खरेदी करावयाचे आहे. मा.वैद्यकीय आरोग्य अधिकारी महोदय व मा.आरोग्य अधिकारी तथा कार्यक्रम प्रमुख National Rabies Control Programme यांच्या सोबत झालेल्या चर्चेनुसार व आरोग्य विभागातील सद्यस्थितीत अत्यल्प साठा लक्षात घेता, लसीचे 8000 Vials ई-निविदेद्वारे खरेदी करावयाचे आहे. सदरील लसीचे दर प्रस्तुत कार्यालयास उपलब्ध नसुन स्थानिक बाजारपेठेतून दर मागविले असता, खरेदी करावयाच्या लसींचे अंदाजीत दर व खरेदी करावयाची लसींची संख्या याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | औषधी/लसीचे नाव | खरेदी करावयाची अंदाजीत संख्या | स्थानिक बाजार पेठेतील अंदाजीत दर (Including All Taxes) | एकुण अपेक्षित रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1. | INJ ARV ID/IM 1ml | 8000 Vials | 385/- | 30,80,000/- |
| | | | Total | 30,80,000/- |

सदरील खरेदीसाठी उक्त तक्त्यामधील अंदाजीत दर र.रु.385/- प्रति Vials या दराने एकुण 8000 Vials खरेदी करण्यासाठी अंदाजीत र.रु.30,80,000/- (अक्षरी रक्कम रुपये तीस लक्ष ऐंशी हजार फक्त) एवढा खर्च अपेक्षित आहे.

**प्रस्तावित खरेदीचा खर्च सन 2025-26**
**च्या अर्थसंकल्पामधील लेखाशिर्ष,**
**क-6 रोगप्रतिबंधक योजना विभाग**

**अ.क्र.1 लस खरेदी (तरतुद र.रु.50/- लक्ष)**
**सांकेतांक क्रमांक-61725320000**

यामधुन करणेबाबत प्रस्तावित करण्यात आलेले आहे.

उपरोक्त प्रस्तावित नुसार अंदाजीत र.रु.30,80,000/- (अक्षरी रक्कम रुपये तीस लक्ष ऐंशी हजार फक्त) एवढा खर्च अपेक्षित आहे. सदरील खर्चाचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 1967/2025:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सर्व आरोग्य केंद्र व रुग्णालय करीता निविदेद्वारे INJ ARV लस खरेदीसाठी अंदाजीत र.रु.30,80,000/- (अक्षरी रक्कम रुपये तीस लक्ष ऐंशी हजार फक्त) खर्चाच्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1968/2025:- (आस्थापना-1 विभाग) (दि.30.06.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेअंतर्गत तांत्रिक विभाग हा कार्यान्वयन व अंमलबजावणी करणारा विभाग असुन शहरातील विविध महत्वाच्या योजना, प्रकल्प राबविणे, विकासाची कामे करणे, नागरीकांच्या तक्रारींचे निरसण करणे, इ.ची जबाबदारी तांत्रिक संवर्गावर येऊन पडते. भारतीय राज्य घटनेतील अनुसुची 12 मध्ये नमुद स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कर्तव्यापैकी बहुतांश कर्तव्यांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी ही तांत्रिक विभागाची आहे.

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका महत्वापुर्ण आणि महत्वाकांक्षी प्रकल्प पुर्ण करण्या साठी सक्षम तांत्रिक अधिकारी असणे गरजेचे आहे. सद्यस्थितीत महानगरपालिकेच्या आस्थापनेवर तांत्रिक अधिकाऱ्यांवर अतिरीक्त ताण निर्माण होत आहे. तसेच उक्त तांत्रिक कामे पुर्ण करण्यासाठी जाणकार आणि अनुभवी तांत्रिक अधिकाऱ्यांची अत्यंत कमतरता भासत आहे.

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेअंतर्गत सद्यस्थितीत विविध तांत्रिक कामे सुरु असुन शहरासाठी नवीन पाणी पुरवठा योजना व नो-नेटवर्क झोनमध्ये मलनि:स्सारण वाहिन्यांचे जाळे निर्माण करणे हे प्रकल्प सुरु आहेत. श्री.अविनाश देशमुख हे दि.31.03.2024 रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेले असुन त्यांना तांत्रिक कामांचा प्रत्यक्ष अनुभव असल्याने त्यांच्या सेवेचा लाभ होऊ शकत असल्याने "छत्रपती संभाजीनगर महानगरपालिके अंतर्गत सातारा देवळाई भागात भुमिगत गटार योजना, शहरात विविध रस्त्यांचे पॅकेजनिहाय सिमेंट काँक्रीटींग करणे, घनकचरा व्यवस्थापनाअंतर्गत साठवणुक कचऱ्यावर बायोमायनिंग प्रक्रिया करणे, नेहरु भवन येथे व्यापारी संकुल विकसित करणे, शहरात विविध ठिकाणी Aspirational Toilet बांधणे इ.कामे" या विवक्षित कामाकरीता श्री.अविनाश भास्करराव देशमुख, अतिरीक्त शहर अभियंता यांना त्यांच्या सेवानिवृत्तीनंतर त्यांची नियुक्ती विहित अटी व शर्तीच्या अधिन राहून 06 महिन्यांच्या कालावधीकरीता मा.स्थायी समितीचा ठराव क्र.1214/2024 दि.12.02.2024 व आदेश दि.01.03.2024 अन्वये दि.01.04.2024 पासुन तात्पुरती नियुक्ती देण्यात आलेली होती.

सदर आदेशाची मुदत दि.30.09.2024 रोजी संपल्याने व तांत्रिक अधिकाऱ्यांची संख्या लक्षात घेता, त्यांच्या सेवेची आवश्यकता असल्याने मा.सर्वसाधारण सभेचा ठराव क्र.1584/2024 दि.13.09.2024 व दि.13.09.2024 रोजीच्या आदेशान्वये श्री.अविनाश भास्करराव देशमुख, अतिरीक्त शहर अभियंता (सेवानिवृत्त) यांना दि.30.10.2024 पासुन उक्त विवक्षित कामासाठी 06 महिन्यांच्या कालावधीकरीता तात्पुरती नियुक्ती देण्यात आलेली होती.

सदर आदेशाची मुदत दि.02.04.2025 रोजी संपल्याने मा.सर्वसाधारण सभेचा ठराव क्र.1887/2025 दि.03.04.2025 व दि.03.4.2025 रोजीच्या आदेशान्वये त्यांना दि.04.04.2025 पासुन विवक्षित कामासाठी दि.04.04.2025 व दि.30.06.2025 या कालावधीकरीता तात्पुरती नियुक्ती देण्यात आलेली असुन सदर आदेशाची मुदत दि.30.06.2025 रोजी संपलेली आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 53 (1) नुसा महानगरपालिकेचा जो अधिकारी सहाय्यक आयुक्त या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर आहे.-मग असे

अधिकारी तात्पुरते असोत किंवा कायम असोत-त्यांची नेमणुक करण्याचा अधिकार महानगरपालिके मध्ये निहित असेल.

परंतु, आयुक्ताला (महानगरपालिकेचा सहाय्यक आयुक्त या पदाशी समतुल्या असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर असलेल्या) कर्जविषयक कामांसाठी करावयाच्या कोणत्याही अस्थायी नेमणुका सहा महिन्यांहून अधिक नसलेल्या कालावधीसाठी स्थायी समितीच्या पुर्व मंजुरीने या अटीवर करता येतील की, आयुक्ताने अशी प्रत्येक नेमणूक करतांना त्याविषयी महानगरपालिकेस ताबडतोब कळविले पाहिजे आणि उक्त सहा महिन्यांचा कालावधी संपल्यानंतर महानगरपालिकेच्या पुर्व मंजुरी वाचून अशा कोणत्याही नेमणुकीचे नवीनकरण करता येणार नाही.

करीता, श्री.अविनाश भास्करराव देशमुख, अतिरीक्त शहर अभियंता (सेवानिवृत्त) यांची शहरा साठी नवीन पाणीपुरवठा योजना व मलनिःस्सारण वाहिन्यांचे विशेष प्रकल्प या संदर्भातील पर्यवेक्षण व देखभाल करणे तसेच या योजनांची योग्यरित्या अंमलबजावणी करणे या विवक्षित कामासाठी दि.01.07.2025 पासुन 03 महिने इतक्या कालावधीसाठी तात्पुरती नियुक्ती देण्याबाबत व त्यांना दि.01.03.2024 रोजीच्या आदेशामधील नमुद अटी व शर्तींच्या अधिन राहून व त्यांच्या नियुक्तीच्या वेळी महागाई भत्त्यासह मिळत असलेल्या निवृत्तीवेतनाएवढी रक्कम (अंशराशीकृत निवृत्ती वेतन वगळून) त्यांचे मासिक पारिश्रमिक म्हणुन निश्चित करण्यात येईल या बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 1968/2025:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.अविनाश भास्करराव देशमुख, अतिरीक्त शहर अभियंता (सेवानिवृत्त) यांची शहरासाठी नवीन पाणीपुरवठा योजना व मलनिःस्सारण वाहिन्यांचे विशेष प्रकल्प या संदर्भातील पर्यवेक्षण व देखभाल करणे तसेच या योजनांची योग्यरित्या अंमलबजावणी करणे या विवक्षित कामासाठी दि.01.07.2025 पासुन 03 महिने इतक्या कालावधीसाठी तात्पुरती नियुक्ती देण्याबाबत व त्यांना दि.01.03.2024 रोजीच्या आदेशामधील नमुद अटी व शर्तींच्या अधिन राहून व त्यांच्या नियुक्तीच्या वेळी महागाई भत्त्यासह मिळत असलेल्या निवृत्तीवेतनाएवढी रक्कम (अंशराशीकृत निवृत्ती वेतन वगळून) त्यांचे मासिक पारिश्रमिक म्हणुन निश्चित करण्यात येईल या बाबतच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1969/2025:-** **(घनकचरा व्यवस्थापन विभाग)** **(दि.30.06.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, छत्रपती संभाजीनगर शहराची सन-2011 च्या जनगणनेनुसार जनसंख्या सुमारे 11,75,116 इतकी होती. परंतु 2025 पर्यंत ही लोकसंख्या अंदाजे 16 ते 17 लाखांच्या दरम्यान पोहोचली असुन सुमारे 03 लक्ष इतकी निवासी मालमत्ता आहे व 75 लक्ष व्यावसायीक मालमत्ता आहेत. शहराचे प्रशासकीय व्यवस्थापन अधिक चांगल्या प्रकारे होण्यासाठी संपुर्ण शहराला 10 झोनमध्ये विभागले आहे. तसेच या झोनमध्ये एकुण 115 वॉर्ड आहेत. सवाढती लोकसंख्या आणि शहरीकरण लक्षात घेता, प्रशासन विविध क्षेत्रांमध्ये नागरी सुविधा आणि सेवा देण्यात येतात.

छत्रपती संभाजीनगर शहरात दररोज सरासरी 450 ते 500 मे.टन घनकचऱ्याची उत्पत्ती होते. महानगरपालिका कार्यक्षेत्रात घनकचऱ्याचे संकलन व त्याची वाहतूक प्रक्रिया केंद्रापर्यंत पाठविणे ही एक अत्यावश्यक सेवा आहे. छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेकडील या कामासाठी अपुऱ्या यंत्रणेमुळे संदर्भ क्र.01 नुसार शहरातील कचरा संकलन व वाहतुक या कामी निविदा प्रक्रिया राबविण्यात आली. संदर्भ क्र.02 नुसार निर्माण होणाऱ्या घनकचरा घरोघरी जाऊन संकलन करुन प्रक्रिया केंद्रापर्यंत वाहतुक करुन पाठविण्यासाठी सन-2019 मध्ये श्री.पी.गोपीनाथ रेड्डी, बंगलुरु या एजन्सीची सात (7) वर्षासाठी खालील तक्त्यामध्ये दर्शविल्यानुसा प्रमाणे दर ठरविण्यता येऊन करारनामा करुन नियुक्ती करण्यात आली आहे.

| Sr.No. | Quated Rate | Increment |
|---|---|---|
| 1. | First Year | Quated Rate=A |
| 2. | Second Year | A X 1.02=B |
| 3. | Third Year | B X 1.03=C |
| 4. | Fourth Year | C X 1.04=D |

| | | |
|---|---|---|
| 5. | Fifth Year | D X 1.05= E |
| 6. | Sixth Year | E X 1.05 = F |
| 7. | Seventh Year | F X 1.05 |

वरील तक्त्यानुसा मे.पी.गोपीनाथ रेड्डी खाजगी कचरा संकलन व वाहतुक अभिकर्ता यांना कचरा संकलन व वाहतुकी करीता प्रतिवर्ष, प्रति मेट्रिक टन दर निश्चिती खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | कालावधी (वर्ष) | Quated Rate | देय रेट |
|---|---|---|---|
| 1. | First Year<br>04.02.2019 to 03.02.2020 | A र.रु.1863 प्रति मे.टन | 1863/- प्रति मे.टन |
| 2. | Second Year<br>01.02.220 to 03.02.2021 | 1863X1.02=1900.26(B) | 1900.26 प्रति मे.टन |
| 3. | Third Year<br>04.02.2021 to 03.02.2022 | 1900.26X1.03=1967.26(C) | 1957.26 प्रति मे.टन |
| 4. | Fourth Year<br>04.02.2022 to 03.02.2023 | 1957.26X1.04=2035.55(D) | 2035.55 प्रति मे.टन |
| 5. | Fifth Year<br>04.02.2023 to 03.02.2024 | 2035.55X1.05=2137.32(E) | 2137.32 प्रति मे.टन |
| 6. | Sixth Year<br>04.02.2024 to 03.02.2025 | 2137.35X1.05=2244.18(F) | 2244.18 प्रति मे.टन |
| 7. | Seventh Year<br>04.02.2025 to 03.02.2026 | 2244.18X1.05=2356.38 | 2356.38 प्रति मे.टन |

उपरोक्त तक्त्यानुसार दि.04.02.2025 पासुन (Seventh Year) FX1.05=F.F म्हणजेच र.रु.2244.18X1.05=2356.38 प्रति मेट्रिक टन या दरानुसार आजमितीस पी.गोपीनाथ रेड्डी बंगलुरु काम करत आहे.

सदरील एजन्सीद्वारे 09 झोन मध्ये 300 घंटागाड्याच्या सहाय्याने घरोघरी जाऊन कचरा संकलनाचे काम करतात व 30 Compactor/Tippar च्या सहाय्याने प्रक्रियेसाठी चिकलठाणा, पडेगाव, हर्सुल व कांचनवाडी प्रक्रिया केंद्रावर तसेच शहरातील 3 MRF सेंटरवर पाठविण्यात येतो. सदरील एजन्सीचा कालावधी माहे फेब्रुवारी-2026 मध्ये करारनामा संपुष्टात येते आहे.

सद्यस्थितीत कार्यरत एजन्सीचा करारनामा संपुष्टात आल्यास महानगरपालिकेकडे या कार्या साठी पुरेशी नवीन यंत्रणा, यंत्रसामुग्री व तांत्रिक साधने उपलब्ध नसल्यामुळे घनकचरा व्यवस्थापनात अडथळे येण्याची शक्यता नाकारता येत नाही. शहरातील निर्माण होणाऱ्या घनकचरा घरोघरी कचरा संकलन व वाहतुक करण्यासाठी एजन्सी नियुक्त करण्याकरीता शहराची आजची व पुढील 10 वर्षाची वाढती लोकसंख्या व वाढता विस्तार लक्षात घेऊन नव्याने निविदा प्रक्रिया राबविणे आवश्यक आहे.

प्रस्तावित निविदेनुसार नियुक्त एजन्सीच्या कामामध्ये सुसुत्रता आणण्यासाठी खालील चार (4) भागामध्ये खालील प्रमाणे कामांचे स्वरुप दर्शविण्यात येत आहे.

भाग-(A):- Door to Door नगरपालिका घनकचरा (MSW) संकलन व Rrefuse Transfer Station (RTS) पर्यंत वाहतुक:- छत्रपती संभाजीनगरमहानगरपालिका हद्दीत Solid Waste Management-2016 च्या अनुषंगाने स्वत:च्या बंद बॉडी वाहनाद्वारे, टिपींग व कामगारांसह घराघरातुन किंवा गेट पातळीवरुन घनकचरा संकलन आणि तो Refuse Transfer Station (RTS) पर्यंत वाहून नेणे अशा कार्यासाठी 10 वर्षाच्या सवलतीच्या कालावधीसाठी काम करणे.

भाग-(B):- घनकचरा Compactor यंत्रणा/मशिनरी व वाहने चालवणे व देखभाल करणे:- Rrefuse Transfer Station (RTS) वर प्राप्त होणाऱ्या नगरपालिका घनकचऱ्याचे प्रक्रिया केंद्रापर्यंत नेण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या यंत्रणा/मनिशरी व वाहनांची कार्यवाही आणि देखभाल करणे तसेच Officer-in-Charges CSMC यांच्या निर्देशानुसार RTS वरुन Compacted घनकचरा डंपिंग साईट/प्रक्रिया केंद्राकडे नेणे, या कार्यासाठी 10 वर्षाच्या सवलतीच्या कालावधीसाठी Solid Waste Management Rules-2016 च्या अनुषंगाने काम करणे.

भाग-(C):- MRF (Material Recovery Facility) यंत्रणेचे संचालन व देखभाल:- छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या हद्दीत Solid Waste Management Rules-2016च्या मार्गदर्शक तत्वानुसार MRF प्रणालीचे संचालन व देखभाल, तसेच त्यामार्फत कचऱ्याचे वर्गीकरण, प्रक्रिया व पुनर्वापर करण्याचे काम 10 वर्षाच्या सवलतीच्या कालावधी साठी करणे.

भाग-(D):- IEC (माहिती, शिक्षण व संवाद) व जनसंपर्क (PR) उपक्रम राबविणे:- स्वच्छ भारत मिशनच्या मार्गदर्शक सुचनांनुसार छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या वतीने आणि (IEC Information, Education & Communication) आणि PR (Public Relations) उपक्रम 10 वर्षाच्या कालावधीसाठी राबविणे. यामध्ये घनकचऱ्याचे वर्गीकरण संबंधी जनजागृती, प्रचार, शालेय कार्यक्रम, जनसंपर्क उपक्रम, स्वच्छता अभियान व नागरीक सहभाग वाढविण्याचे विविध उपक्रमांचा समावेश असणे.

उपरोक्त प्रमाणे घरोघरी कचरा संकलन व वाहतुक करण्यासाठी एजन्सी नियुक्त करण्याकरीता निविदेत घनकचरा संकलन व वाहतुक, ट्रान्सफर स्टेशन, मटेरियल रिकव्हरी फॅसिलीटी व प्रचार प्रसार व जनजागृती अशा चार बाबी नमुद करण्यात येणार आहे.

करीता शहरातील निर्माण होणारा घनकचरा संकलन व वाहतुक करण्यासाठी एजन्सी नियुक्त करण्याकरीता शहराची वाढती लोकसंख्या व वाढता विस्तार लक्षात घेता, नव्याने निविदा प्रक्रिया राबविण्यासाठीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1969/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहराची वाढती लोकसंख्या व वाढता विस्तार लक्षात घेता, निर्माण होणारा घनकचरा घरोघरी जाऊन संकलन व वाहतुक करण्यासाठी एजन्सी नियुक्त करण्याकरीता नव्याने निविदा प्रक्रिया राबविण्यासाठीच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1970/2025:-</u> (आस्थापना-1 विभाग) (दि.02.07.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, "छत्रपती संभाजीनगर शहराची वाढीव पाणी पुरवठा योजनेच्या कामासाठी छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेमार्फत समन्वयक म्हणुन काम करणे शहरातील वितरण व्यवस्था व जायकवाडीपासून शहरापर्यंतची योजनेची कामे, सातारा-देवळाई, पशिचम, पुर्व व मध्य मतदार संघातील ड्रेनेज योजनेचे कामे इ." या विवक्षित कामाकरीता मा.स्थायी समितीचा ठराव क्र.1454/2024 दि28.06.2024 अन्वये आदेश जा.क्र.मनपा/आस्था-1/2024/2257 दि.01.07.2024 अन्वये श्री.काशीनाथ मुरलीधर फालक, कार्यकारी अभियंता (स्थापत्य) (सेवानिवृत्त) यांना सेवा करार पध्दतीने अटी व शर्तीच्या अधिन राहून प्रथमत: 06 महिन्याच्या कालावधीकरीता नियुक्ती करण्यात आली होती. तथापि, सदर आदेशाची मुदत दि.31.12.2024 रोजी संपलेली होती.

उक्त कामासाठी पर्यायी व्यवस्था होईपर्यंत त्यांच्या सेवेची आवश्यकता असल्याचा अभिप्राय शहर अभियंता यांनी दिलेला होता. त्यानुषंगाने मा.सर्वसाधारण सभेचा ठराव क्र.1739 दि.30.12.2024 अन्वये व आदेश जा.क्र.मनपा/आस्था-1/2025/07 दि.01.01.2025 नुसार "छत्रपती संभाजीनगर शहराची वाढीव पाणी पुरवठा योजनेच्या कामासाठी छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेमार्फत समन्वयक म्हणुन काम करणे शहरातील वितरण व्यवस्था व जायकवाडीपासून शहरापर्यंतची योजनेची कामे, सातारा-देवळाई, पशिचम, पुर्व व मध्य मतदार संघातील ड्रेनेज योजनेचे कामे इ." या विवक्षित कामासाठी दि.30.01.2025 ते दि.02.07.2025 पर्यंत नियुक्ती देण्यात आलेली होती.

तथापि, त्यांना कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/आस्था-1/2025/620 दि.09.04.2025 अन्वये "छत्रपती संभाजीनगर शहराची वाढीव पाणी पुरवठा योजनेच्या कामासाठी छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेतर्फे समन्वयक म्हणुन काम करणे, शहरातील वितरण व्यवस्था व जायकवाडीपासून शहरापर्यंतची योजनेची कामामध्ये समन्वयन करणे, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व पाणी पुरवठ्याशी संबंधीत विविध कार्यालयांशी समन्वय साधणे, मा.उच्च न्यायालयातील प्रकरणासंदर्भात उपस्थित राहून आवश्यक ती कार्यवाही करणे" या विवक्षित कामाकरीता दि.03.01.2025 ते दि.02.07.2025 पर्यंत

नियुक्ती देण्यात आलेली आहे. सदर आदेशाची मुदत दि.02.07.2025 रोजी संपत असल्याने व त्याच्या वेवेची आवश्यकता आहे.

करीता, श्री.काशीनाथ मुरलीधर फालक, कार्यकारी अभियंता (स्थापत्य) (सेवानिवृत्त) यांना "छत्रपती संभाजीनगर शहराची वाढीव पाणी पुरवठा योजनेच्या कामासाठी महानगरपालिकेतर्फे समन्वयक म्हणुन काम करणे, शहरातील वितरण व्यवस्था व जायकवाडीपासून शहरापर्यंतची योजनेची कामामध्ये समन्वयन करणे, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व पाणीपुरवठ्याशी संबंधीत विविध कार्यालांशी समन्वय साधणे, मा.उच्च न्यायालयातील प्रकरणासंदर्भात उपस्थित राहूनआवश्यक ती कार्यवाही करणे" या विवक्षित कामाकरीता दि.03.07.2025 ते दि.30.09.2025 या कालावधीसाठी आदेश दि.01.07.2024 च्या आदेशात नमुद अटी व शर्तीच्या अधिन राहून नियुक्ती देण्याबाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1970/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.काशीनाथ मुरलीधर फालक, कार्यकारी अभियंता (स्थापत्य) (सेवानिवृत्त) यांना "छत्रपती संभाजीनगर शहराची वाढीव पाणी पुरवठा योजनेच्या कामासाठी छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेतर्फे समन्वयक म्हणुन काम करणे, शहरातील वितरण व्यवस्था व जायकवाडीपासून शहरापर्यंतची योजनेची कामामध्ये समन्वयन करणे, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व पाणी पुरवठ्याशी संबंधीत विविध कार्यालयांशी समन्वय साधणे, मा.उच्च न्यायालयातील प्रकरणासंदर्भात उपस्थित राहून आवश्यक ती कार्यवाही करणे" या विवक्षित कामाकरीता दि.03.07.2025 ते दि.30.09.2025 या कालावधीसाठी आदेश दि.01.07.2024 रोजीच्या आदेशात नमुद अटी व शर्तीच्या अधिन राहून नियुक्ती देण्याबाबतच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1971/2025:-</u> (आस्थापना-1 विभाग)** **(दि.02.07.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेतील अतिक्रमण विभाग हा महत्वाचा विभाग आहे. सध्या मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांनी दिलेल्या निर्णयान्वये रस्ता विकास आराखड्यानुसार केंब्रिज चौक ते मुकूंदवाडी या रस्त्याचे 60 मी. रुंदीकरणा मध्ये बाधित अनधिकृत हटविण्याची मोहिम सुरु आहे. तसेच शहरातील इतर विभागांमध्ये सदर मोहिम सुरु करण्यात येणार आहे. सद्यस्थितीत अतिक्रमण विभागात अत्यंत कमी अनुभव असलेले कर्मचारी कार्यरत आहेत.

श्री.संजय विठ्ठलराव सुरडकर, अधिक्षक तथा प्र.सहाय्यक आयुक्त, झोन क्र.1 यांनी अनधिकृत बांधकामे, अतिक्रमण, साफसफाई इ. विषयांमध्ये चांगला अनुभव असुन त्यांचे अनुभवाचा महानगरपालिकेस लाभ होऊ शकतो. तथापि, संबंधीत हे दि.30.06.2025 रोजी महानगरपालिका सेवेतून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेले आहेत.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 53(3) नुसार "नगरपालिका अधिकारी व कर्मचारी-मग ते कायम असोत किंवा तात्पुरते असोत-यांची नेमणुक करण्याचा अधिकारआयुक्तांकडे निहित असेल. परंतु कायम नेमणुकांच्या बाबतीत असा अधिकार 51 अन्वये तयार केलेल्या व मंजुर केलेल्या त्यावेळी अंमलात असलेल्या विवरणपत्राच्या अधिन असेल : आणखी असे की, आयुक्तास स्थायी समितीच्या पुर्व मंजुरीवाचुन कोणतीही तात्पुरती नेमणुक सहा महिन्याहून अधिक असेल अशा कोणत्याही कालावधीसाठी करता येणार नाही आणि (लिपीक या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदांच्या वेतनाएवढे अथवा त्याहून अधिक वेतन असलेल्या) कोणत्याही नेमणुकीचे उक्त सहा महिन्यांचा कालावधी संपल्यानंतर नवीकरण करता येणार नाही."

करीता, "छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या हद्दीतील अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणांवर कारवाई करणे" या विवक्षित कामासाठी श्री.संजय विठ्ठलराव सुरडकर, अधिक्षक तथा प्र.सहाय्यक आयुक्त (सेवानिवृत्त) यांना प्रथ्मत: 06 महिन्याच्या कालावधीकरीता सेवा करार पध्दतीने नेमणुक देण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव क्रमांक 1971/2025:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, "छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या हद्दीतील अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणांवर कारवाई करणे" या विवक्षित कामासाठी श्री.संजय विठ्ठलराव सुरडकर, अधिक्षक तथा प्र.सहाय्यक आयुक्त (सेवानिवृत्त) यांना प्रथ्मत: 06 महिन्याच्या कालावधीकरीता सेवा करार पध्दतीने नियुक्ती विहित अटी व शर्तीच्या अधिन राहून प्रथमत: 06 महिन्यांच्या कालावधी करीता करार पध्दतीने, सेवानिवृत्त शासकीय अधिकारी यांची विहित कार्यपध्दतीचे पालन करुन करार पध्दतीने नेमणुक करतांना त्यांना अशा नियुक्तीच्या वेळी महागाई भत्त्यासह मिळत असलेल्या निवृत्ती वेतना एवढी रक्कम (अंशराशीकृत निवृत्तीवेतन वगळून) त्यांचे मासिक पारिश्रमिक म्हणुन निश्चित करण्यता येईल. या अटीवर घेण्याबाबत प्रस्तावास मंजुरी मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1972/2025:-** **(आस्थापना-1 विभाग)** **(दि.02.07.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या हद्दीतील खाम नदीचे पुनरुज्जीवनाचे काम मागील 03 वर्षापासून श्री.असदउल्ला खान, स्वच्छता निरीक्षक हे करीत होते. सदर नदीची सफाई करुन 750 मे.टन प्लास्टिक व घनकचरा काढण्यात आलेला आहे. नदीचे खोलीकरण, रुंदीकरण व कठड्याचे मजबुतीकरण करण्यात आले. तसेच नदीकाठी जागोजागी शेत तळे बांधून त्यांचे स्टानेपिचींग करुन सुशोभिकरण करण्यात आले होते.

खामनदी पुनरुज्जीवन प्रकल्पामुळे दरवर्षी पावसाळ्यात उद्भवणाऱ्या परिस्थितीस आळा बसला असुन नदीकाठी राहणाऱ्या नागरीकांना जिवीत व आर्थिक नुकसानाचे प्रमाण कमी झालेले आहे तसेच नदीकाठी हॉलीबॉल मैदान, महिलांसाठी खुले व्यायाम शाळा, मुलांसाठी स्पोर्ट पार्क, ज्येष्ठ नागरीकां साठी नान-नानी पार्क, जॉगिंग ट्रॅक व इको पार्क तयार करण्यात आलेले आहे. खामनदी पुनरुज्जीवन प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर आहे. श्री.असदउल्ला खान, स्वच्छता निरीक्षक हे दि.31.05.2021 रोजी सेवानिवृत्त झाले असून त्यांनी सदर कामासाठी सेवानिवृत्तीनंतर सेवा देण्यास सहमती दिली होती. खामनदी पुनरुज्जीवन प्रकल्पासाठी श्री.असदउल्ला खान यांचा प्रत्यक्ष कामांचा अनुभव असल्याने त्यांच्या सेवेचा लाभ होऊ शकतो.

त्यानुषंगाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे 53 (3) च्या परंतुकान्वये प्राप्त अधिकाराचा वापर करुन मा.स्थायी समीचा ठराव क्र.822 दि.19.06.2023 नुसार "खामनदीचे पुनरुज्जीवन प्रकल्पचे काम व स्वच्छता करणे" या विवक्षित कामाकरीता विशेष कार्यकारी अधिकारी (ओएसडी) म्हणुन श्री.असदउल्ला खान, स्वच्छता निरिक्षक (सेवानिवृत्त) यांची आदेश जा.क्र.मनपा/ आस्था-1/2023/902 दि.20.06.2023 च्या आदेशामध्ये नमुद अटी व शर्तीच्या अधिन राहून सेवा करार पध्दतीने प्रथमत:06 महिन्यांच्या कालावधीकरीता नियुक्ती करण्यात आलेली आहे. तथापि, सदर आदेशाची मुदत दि.19.12.2023 रोजीसंपल्याने तसेच उपआयुक्त-5 तथा घनकचरा व्यवस्थापन कक्ष प्रमुख यांनी श्री.असदउल्ला खान, स्वच्छता निरीक्षक यांना मुदतवाढ देणेबाबत कळविले होते.

मा.सर्वसाधारण सभेचा ठराव क्र.1199/2024 दि.02.02.2024 नुसार आदेश जा.क्र.मनपा/ आस्था-1/2024/267 दि.08.02.2024 अन्वये त्यांना दि.22.12.2023 ते दि.21.06.2024 पर्यंत नियुक्ती देण्यात आलेली होती. सदर आदेशाची मुदत दि.21.06.2024 रोजी संपल्याने तसेच उपआयुक्त-5 तथा घनकचरा व्यवस्थापन कक्ष प्रमुख यांनी संबंधीतांना मुदतवाढ देण्याबाबत कळविले आहे.

त्यानुसार मा.सर्वसाधारण सभेचा ठराव क्र.1463/2024 दि.03.07.2024 नुसार आदेश जा.क्र. मनपा/आस्था-1/2024/2299 दि.05.07.2024 अन्वये त्यांना दि.26.06.2024 ते दि.25.12.2024 पर्यंत नियुक्ती देण्यात आलेली आहे. सदर आदेशाची मुदत दि.25.12.2024 रोजी संपलेली असुन उक्त विवक्षित कामासाठी त्यांच्या सेवेची आवश्यकता असल्याने मा.सर्वसाधारण सभेचा ठराव क्र.1776/2025 दि.22.01.2025 नुसार आदेश जा.क्र.मनपा/आस्था-1/2025/237 दि.31.01.2025 अन्वये त्यांना दि.30.12.2024 ते दि.29.06.2025 पर्यंत नियुक्ती देण्यात आलेली आहे. तथापि, सदर आदेशाची मुदत दि.29.06.2025 रोजी संपत असल्याने तसेच त्यांच्या सेवेची आवश्यकता आहे.

करीता, "खामनदीचे पुनरुज्जीवन प्रकल्पचे काम व स्वच्छता करणे" या विवक्षित कामाकरीता श्री.असदउल्ला खान, स्वच्छता निरिक्षक (सेवानिवृत्त) यांची आदेश जा.क्र.मनपा/ आस्था-1/2023/902

दि.20.06.2023 च्या आदेशामध्ये नमुद अटी व शर्तीच्या अधिन राहून दि.03.07.2025 ते दि.31.12.2025 पर्यंत नियुक्ती देण्याबाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 1972/2025:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, "खामनदीचे पुनरुज्जीवन प्रकल्पचे काम व स्वच्छता करणे" या विवक्षित कामाकरीता श्री.असदउल्ला खान, स्वच्छता निरिक्षक (सेवानिवृत्त) यांची आदेश जा.क्र.मनपा/आस्था-1/2023/902 दि.20.06.2023 च्या आदेशामध्ये नमुद अटी व शर्तीच्या अधिन राहून दि.03.07.2025 ते दि.31.12.2025 पर्यंत नियुक्ती देण्याबाबतच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1973/2025:- (बी.ओ.टी. विभाग)** **(दि.04.07.2025)**

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका प्रस्ताव सादर करीत आहे की, मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.1658/2024 दि.11.10.20244 रोजीच्या ठरावानुसार छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या मालकीची T.V.Center N-10 क्रिडा संकुल तथा वाणिज्य संकुल (Phase-3) प्रकल्प बीओटी तत्वावर राबविणेसाठी Respect For Proposal (RPF) मागविण्यात आलेले आहे. त्यामध्ये एकुण 02 एजन्सीधारकांनी सहभाग नोंदविलेला असुन सदर एजन्सीधारकांच्या दराचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

1. मे.ए.एस.सोनजी असोसिएट्स :- र.रु.2,12,000,00/-
2. मे.हर्षवर्धन इंटरप्राईजेस :- र.रु.1,85,000,00/-

वरील प्रमाणे, निविदा (RFP) धारकांना दि.09.06.2025 रोजी बैठकीसाठी बोलाविण्यात आले होते. त्यामध्ये मे.ए.एस.सोनजी असोसिएट्स यांनी डेव्हलपमेंट प्रिमीयम मध्ये र.रु.13,00,000/- ची वाढ करुन एकुण डेव्हलपमेंट प्रिमीयम र.रु.2,25,00,000/- देणेसाठी सहमती दर्शविलेली आहे. त्यानुसार मे.ए.एस.सोनजी असोसिएट्स या एजन्सीला छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या मालकीची T.V.Center N-10 क्रिडा संकुल तथा वाणिज्य संकुल (Phase-3) येथील जागा प्रकल्पातील 58 दुकान/स्टेडियमच्या आसन व्यवस्थेसह एकुण बांधीव क्षेत्र 1515 चौ.मी.या क्षेत्रावर बी.ओ.टी. तत्वावर विकसित करणेकरीता 30 वर्षाच्या कालावधीसाठी प्रकल्प राबविणेसाठीचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या मान्यतेस्तव तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव क्रमांक 1973/2025:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मे.ए.एस.सोनजी असोसिएट्स या एजन्सीला छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या मालकीची T.V.Center N-10 क्रिडा संकुल तथा वाणिज्य संकुल (Phase-3) येथील जागा डेव्हलपमेंट प्रिमीयम र.रु.2,25,00,000/- भरणा करुन घेऊन प्रकल्पातील 58 दुकान/स्टेडियमच्या आसन व्यवस्थेसह एकुण बांधीव क्षेत्र 1515 चौ.मी. या क्षेत्रावर बी.ओ.टी. तत्वावर विकसित करणेकरीता 30 वर्षाच्या कालावधीसाठी प्रकल्प राबविणे साठीच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1974/2025:- (आस्थापना-1 विभाग)** **(दि.04.07.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेतील अग्निशमन विभाग हा अत्यावश्यक सेवेतील विभाग आहे.

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या सेवाप्रवेश नियमानुसार आस्थापनेवरील मुख्य अग्निशमन अधिकारी हे पद 100 टक्के पदोन्नतीचे पद आहे. तथापि, पदोन्नतीने अधिकारी उपलब्ध न झाल्यास सदर अधिकारी उपलब्ध होईपर्यंत केंद्र/राज्य/निमशासकीय/स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या सेवेतील समकक्ष पद किमान 03 वर्षे धारण करणाऱ्या अग्निशमन सेवेतील अधिकाऱ्याची प्रतिनयुक्तीच्या प्रतिननियुक्तीच्या धोरणानुसार शासनाकडून प्रतिनियुक्तीने नियुक्ती करता येईल, असे नमुद आहे.

मुख्य अग्निशमन अधिकारी पदावर कार्यरत असलेले अधिकारी हे दि.30.06.2017 रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले आहेत. तद्नंतर सदर विभागातील उपअग्निशमन केंद्र अधिकारी यांच्याकडे सदर पदाचा तात्पुरत्या स्वरुपात अतिरीक्त कार्यभार सोपविण्यात आलेला आहे. सदर

पदावर शासनाकडून प्रतिनियुक्तीने अधिकारी पाठविण्याबाबत वेळोवेळीच्या पत्रान्वये शासनास विनंती करण्यात आलेली असून आजपावेतो प्रतिनियुक्तीने अधिकारी उपलब्ध झाले नाही.

सद्यस्थितीत मुख्य अग्निशमन अधिकारी, उपमुख्य अग्निशमन अधिकारी व अग्निशमन केंद्र अधिकारी ही वरिष्ठ पदे आहेत. त्यामुळे अग्निशमन विभागात मुख्य अग्निशमन अधिकारी या पदाचा कार्यभार देण्याबाबत सक्षम अधिकारी उपलब्ध नाही. मुख्य अग्निशमन अधिकारी यांच्याकडे शहर, जिल्हा व विभागीय स्तरावरील कामकाज असते.

सद्यस्थितीत अग्निशमन विभागात कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांची संख्या अत्यंत कमी असुन सदरील कामे पार पाडण्यासाठी उपलब्ध कर्मचाऱ्यांवर अतिरीक्त ताण निर्माण होत आहे. अग्निशमन विभागातील श्री.संपत कृष्णाथ भगत, उपअग्निशमन केंद्र अधिकारी यांचयाकडे मुख्य अग्निशमन अधिकारी या पदाचा अतिरीक्त कार्यभार सोपविण्यात आलेला आहे. तथापि, श्री.संपत कृष्णाथ भगत हे दि.30.06.2025 रोजी सेवानिवृत्त झालेले असुन त्यांना अग्निशमन विभागातील प्रत्यक्ष कामाचा दिर्घ अनुभवअसल्याने त्यांच्या सेवेचा लाभ होऊ शकतो.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 53 (3) नुसार 'नगरपालिका अधिकारी व कर्मचारी-मग ते कायम असोत किंवा तात्पुरते असोत-यांची नेमणुक करण्याचा अधिकार आयुक्तांकडे निहित असेल. परंतु कायम नेमणुकांच्याबाबतीत असा अधिकार 51 अन्वये तयार केलेल्या व मंजुर केलेल्या त्यावेळी अंमलात असलेल्या विवरणपत्राच्या अधिन असेल : आणखी असे की, आयुक्तास स्थायी समितीच्या पुर्व मंजुरीवाचून कोणतीही तात्पुरती नेमणुक सहा महिन्याहून अधिक असेल अशा कोणत्याही कालावधीसाठी करता येणार नाही आणि (लिपीक या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदांच्या वेतनाएवढे अथवा त्याहून अधिक वेतन असलेल्या) कोणत्याही नेमणुकीचे उक्त सहा महिन्यांचा कालावधी संपल्यानंतर नवीकरण करता येणार नाही'.

करीता, "छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेची अग्निशमन सेवा अधिक प्रभावीपणे राबविणे व त्यावर नियंत्रण ठेवणे तसेच आपत्ती व्यवस्थापनाचे अनुषंगाने आवश्यक कामे करणे" या विवक्षित कामासाठी श्री.संपत कृष्णाथ भगत, उपअग्निशमन केंद्र अधिकारी (सेवानिवृत्त) यांना प्रथमत: 03 महिन्यांच्या कालावधीकरीता सेवा करार पध्दतीने नेमणुक देण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थे सादर.

**<u>ठराव क्रमांक 1974/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, "छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेची अग्निशमन सेवा अधिक प्रभावीपणे राबविणे व त्यावर नियंत्रण ठेवणे तसेच आपत्ती व्यवस्थापनाचे अनुषंगाने आवश्यक कामे करणे" या विवक्षित कामाकरीता श्री.संपत कृष्णाथ भगत, उपअग्निशमन केंद्र अधिकारी (सेवानिवृत्त) यांची नियुक्ती विहिती अटी व शर्तीच्या अधिन राहून प्रथमत:03 महिन्यांच्या कालावधीकरीता करार पध्दतीने, सेवानिवृत्त शासकीय अधिकारी यांची विहीत कार्यपध्दतीचे पालन करुन करार पध्दतीने नेमणुक करतांना त्यांना अशा नियुक्तीच्या वेळी महागाई भत्त्यासह मिळत असलेल्या निवृत्तीवेतना एवढी रक्कम (अंशराशीकृत निवृत्तीवेतन वगळून) त्यांचे मासिक पारिश्रमिक म्हणुन निश्चित करण्यात येईल या अटीवर घेण्याबाबत प्रस्तावास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1975/2025:-</u> (उद्यान विभाग)** **(दि.04.07.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सि.टी.सर्व्हे नं.53 (पी), गारखेडा येथील खुल्या जागेत नवीन "सुखद सहवास उद्यान" विकसीत करण्यात आले असुन उद्यानाचे माहे जानेवारी-2025 मध्ये लोकार्पण करण्यात आले आहे. उद्यानात (1) पुर्व पश्चिम व उत्तर बाजुस संरक्षित भींत बांधणे, (2) पाथवे, मुख्या गेट व कमान तयार करणे, (3) गजिबो सिटींगची उभारणी करणे, (4) खेळण्या व कास्टींग बेंचेस उभारणे, (5) मल्टीजीमची उभारणी करणे, (6) भारतीय वंशावळीची तसेच डेटपाम, रॉयलपाम, चाफा प्रजातीची वृक्ष लागवड करणे, (7)पाथवे लगत लॉन, बाड, शोभिवंत फुलांची झाडे लागवड करणे, (8)संपुर्ण परिसराची रंगरंगोटी करणे इ.कामांसह सुसज्ज उद्यान विकसीत करण्यात आले आहे.श्

सुखद सहवास उद्यानाचे संगोपन व देखभाल कामाचे प्रायोजकत्व मिळणेसाठी स्थानिक नागरीकांची गठीत Sukhad Sahavas Residents Welfare Association यांनी दि.10.02.2025 च्या अर्जान्वये प्रस्ताव दिला आहे. Sukhad Sahavas Residents Welfare

Association करीता छत्रपती संभाजीनगर यांना सुखद सहवास उद्यानाचे संगोपन व देखभाल कामाची परवानगी/प्रायोजकत्व खालील अटी/शर्तीस राहून देण्याचे प्रस्तावित करण्यात येते.

1) प्रायोजकत्व पाच वर्षासाठी देय राहील.
2) उद्यानाची देखभाल व दुरुस्ती व संगोपन कामे स्वखर्चाने/या संदर्भातील प्रचलीत कायदे पाळून करण्याची जबाबदारी विकासकाची राहील.
3) उद्यानाची देखभाल दुरुस्ती व संगोपन करतांना किरकोळ/सर्वसाधारण स्वरुपाचे कोणतेही नागरीक करु शकतो. अशा स्वरुपाची कामे (उदा.स्वच्छता,शोभिवंत लहान स्वरुपाच्या झाडांची लागवड, संगोपन इ.)विकासकाने महानगरपालिकेच्या संबंधीत उद्यान सहाय्यक/कृषी सहाय्यक यांचे माग्रदर्शनाखाली करावीत.
4) मनुष्यबळ या करीता सर्व खर्च विकासक यांना करावा लागेल.
5) वृक्ष व हिरवळ व इतर साधन सामुग्री आणणे, लागवड करणे तसेच लागवडीसाठी लागणारे औषधी, खत, कापणीचे साहित्य, मजुर यासाठी येणारा सर्व खर्च विकासकास करावा लागेल.
6) विकासकास उद्यानात कोणत्याही प्रकारे जाहिरात/फलक लावता येणार नाही.
7) प्रायोजकास उद्यानासाठी कोणतेही प्रवेश शुल्क आकारता येणार नाही. महानगरपालिकेने निर्धारीत केलेल्या वेळेत उद्यान जनतेसाठी खुले ठेवावे लागेल
8) उद्यानात निर्माण होणाऱ्या कचऱ्याचे 'जैविक खत' निर्माण करुन त्याचा वापर उद्यानासाठी करावा लागेल.
9) उक्त परिसरातील कामे करतांना प्रचलीत कामगार कायदे पालनाची जबाबदारी विकासकाची राहील.
10) सदर पालकत्व हे अहस्तांतरणीय असुन विकासक सदर पालकत्व अन्य कोणाकडे ही हस्तांतरीत करुन शकणार नाहीत.
11) सदर कामामुळे कोणाही नागरीकांची कोणत्याही प्रकारे राजकीय, सामाजिक अथवा धार्मिक भावना दुखावली जाणार नाही अशा प्रकारे जागेचा विकास/सौंदर्यीकरण करावे लागेल.
12) विकासक यांना उक्त परिसराचा वापर कोणत्याही व्यापारी/आर्थिक फायद्यासाठी करता येणार नाही.
13) ठिकाण/परिसर विकसीत करतांना सार्वजनिक वाहतुक नियमांचा भंग होणार नाही याची दक्षता विकासक यांनी घ्यावी.
14) उक्त नमुद प्रयोजनासाठी विकासक यांना सदर उद्यान/परिसराचे पालकत्व देण्यात येत असुन त्यावर त्यांचा मालकी हक्क राहणार नाही/देण्यात येणार नाही/सांगता येणार नाही. जागेची मालकी महानगरपालिकेची राहील.
15) करार कालावधीत कोणताही वाद उद्भवल्यास छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका आयुक्त यांच्याकडे प्रकरण सादर करण्यात येईल व त्यांचा निर्णय अंतिम राहील तसेच तो उभय पक्षकारांना बंधनकारक राहील. न्यायीक स्वरुपाचे वादासाठी छत्रपती संभाजीनगर न्यायीक क्षेत्र राहील.
16) कोणत्याही कारणावरुन विकासकाचे काम समाधानकारक न वाटल्यास कामात सुधारणा करण्या संदर्भात 2 महिन्यांची नोटीस देण्यात येईल. तरीही कामात सुधारणा न झाल्यास एक महिन्याची नोटीस देऊन सदर करार संपुष्टात आणाण्यात येईल.

करीता, उक्त अटी/शर्तीस अधिन राहून विकासक श्री.स्वराज पाटील व श्री.योगेश पाटील, Sukhad Sahavas Residents Welfare Association छत्रपती संभाजीनगर यांना सि.टी.सर्व्हे नं.53(पी) गारखेडा येथे महानगरपालिकेने विकसीत केलेल्या सुखद सहवास उद्यानाची देखभाल व संगोपन कामांचे परवानगी/प्रायोजकत्व देणे तसेच आवश्यकतेनुसार अटी/शर्ती मध्ये बदल करुन निर्णय घेणे व अनुषंगीक कार्यवाही करण्यासाठी आयुक्त, महानगरपालिका यांना प्राधिकृत करण्यास मान्यता होणे बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 1975/2025:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सि.टी.सर्व्हे नं.53(पी) गारखेडा येथे महानगरपालिकेने विकसीत केलेल्या सुखद सहवास उद्यानाची देखभाल व संगोपन कामांचे परवानगी/प्रायोजकत्व विकासक श्री.स्वराज पाटील व श्री.योगेश पाटील, Sukhad Sahavas Residents Welfare Association छत्रपती संभाजीनगर यांना तसेच आवश्यकतेनुसार अटी/शर्ती मध्ये बदल करुन निर्णय घेणे व अनुषंगीक कार्यवाही करण्यासाठी आयुक्त, महानगरपालिका यांना प्राधिकृत मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1976/2025:-** **(कार्यकारी अभियंता ड्रेनेज व इमारत विभाग)** **(दि.04.07.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शहरातील विकास कामांची पाहणी करतांना स्मशानभुमींची पाहणी केली असता,असे आढळून आले की, विविध स्मशानभुमींच्या ठिकाणी आवश्यक सोई-सुविधा निर्माण करुन या स्मशानभुमींचा सर्वांगीण विकास करणे गरजेचे आहे. त्यास्तव यापुर्वी घेण्यात आलेल्या ठराव क्र.1190/2024 दि.23.01.2024 मध्ये नमुद शहरातील बेगमपुरा स्मशानभुमी पैकी एन-11 स्मशानभुमी, मुकूंदवाडी स्मशानभुमी, आंबेडकरनगर स्मशानभुमी, ईटखेडा स्मशानभुमी पैकी एन-11 स्मशानभुमीच्या जागी प्रतापनगर स्मशानभुमी येथे मोठ्या संख्येने नियमित स्वरुपात अंत्यसंस्कार केले जात असल्याने प्रतापनगर स्मशानभुमीचा विकास करणे आवश्यक आहे.

सदर स्मशानभुमींची पाहणी केली असता, या ठिकाणी अस्तित्वातील व्यवस्था अद्यावत करणे अंतर्गत स्टोअर रुम बांधणे, श्रध्दांजली वाहण्यासाठी शेड व ओटा बांधणे, परिसरात आवश्यक ठिकाणी पेव्हरब्लॉक बसविणे, स्मशानजोगी यांना राहण्यासाठी अद्यावत निवासस्थान बांधणे, शव दहनासाठी शव दाहीनी उभारणे, नागरीकांसाठी स्वच्छतागृह बांधणे व Land Sacpping करणे इ.कामे करणे आवश्यक असल्याचे निदर्शनास आले आहे.

त्यास्तव उक्त परिच्छेदात नमुद शहरातील सर्वाधिक अंत्यसंस्कार केल्या जाणाऱ्या पाच (05) स्मशानभुमतींचा सर्वांगीण विकास करणेसाठी वास्तुविशारद Urban Atelier यांच्या ऐवजी Aurangabad Smart City Development Corporation Limited (ASCDCL) यांच्या मार्फत सेवा घेण्यात येत आहे. त्यांना पत्र जा.क्र./मनपा/का.अ./इमारत/2024/54 दि.04.07.2024 नुसार नियुक्ती आदेश प्राप्त आहेत. यानुसार यांना निविदा रक्कमेच्या 1.5% (GST अतिरीक्त) या दराने त्यंचे सेवा शुल्क देण्यात येईल. ज्यामध्ये Pre-tender Activity साठी निविदा रक्कमेच्या 0.6% व Post-tender Activity साठी निविदा रक्कमेच्या 0.9% प्रमाणे सेवाशुल्क देण्यात येईल.

तरी उक्त नमुद प्रमाणे या कामाअंतर्गत नव्यने समाविष्ठ 05 स्मशानभुमीसाठीचे अंदाज पत्रक ज्यामध्ये (1) स्मशानभुमीचे स्थापत्य कामे करुन श्रेणीवाढ करणे र.रु.9,99,62,286/- एवढे होत आहे. यामध्ये रॉयल्टी चार्जेस, 18% GST, Insurance 1%, PMC Chares 2%, Third Party Inspections charges 1% व किरकोळ खर्चासाठी 5% अशी तरतुद ठेवण्यात आली आहे. सदर कामासाठी लागणाऱ्या निधीची मागणी जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन 2023-24 मधुन जिल्हाअधिकारी तथा सदस्य सचिव नियोजन समिती, छत्रपती संभाजीनगर यांच्याकडे करण्यात आली आहे.

करीता वर नमुद प्रमाणे या कामाचे तयार करण्यात आलेले अंदाजपत्रक स्मशानभुमीमध्ये स्थापत्य कामे करुन श्रेणीवाढ करणे र.रु.9,99,62,286/- देण्यासह एन-11 स्मशानभुमी ऐवजी प्रतापनगर स्मशानभुमी या स्थळ बदलास व Urban Atelier च्या ऐवजी या कामासाठी एकुण निविदा रक्कमेच्या 1.5% (GST अतिरीक्त) या दराने Aurangabad Smart City Development Corporation Limited (ASCDCL) यांची नेमणुक करण्यास तसेच ठराव क्र.902/2023 दि.08.08.2023 रोजी पारीत झालेल्या ठरावानुसार महानगरपालिकेच्या पॅनल वरील Structural Designer-Sthapati Planners and Developers Privated Limited यांची निविदा रक्कमेच्या 0.5% या दराने नेमणुक करण्यास तसेच या कामाच्या अनुषंगाने आता किंवा भविष्यात आवश्यक ते निर्णय घेणे किंवा त्यास बदल करणे बाबतचे सर्व अधिकार आयुक्त, छत्रपती संभाजीनगर

महानगरपालिका यांना प्रदान करणे या बाबीस मंजुरी देणे बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 1976/2025:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, तयार करण्यात आलेले अंदाजपत्रक स्मशानभुमीमध्ये स्थापत्य कामे करुन श्रेणीवाढ करणे र.रु.9,99,62,286/- देण्यासह एन-11 स्मशानभुमी ऐवजी प्रतापनगर स्मशान भुमी या स्थळ बदलास व Urban Atelier च्या ऐवजी या कामासाठी एकुण निविदा रक्कमेच्या 1.5% (GST अतिरीक्त) या दराने Aurangabad Smart City Development Corporation Limited (ASCDCL) यांची नेमणुक करण्यास तसेच ठराव क्र.902/2023 दि.08.08.2023 रोजी पारीत झालेल्या ठरावानुसार महानगरपालिकेच्या पॅनल वरील Structural Designer-Sthapati Planners and Developers Privated Limited यांची निविदा रक्कमेच्या 0.5% या दराने नेमणुक करण्यास तसेच या कामाच्या अनुषंगाने आता किंवा भविष्यात आवश्यक ते निर्णय घेणे किंवा त्यास बदल करणे बाबतचे सर्व अधिकार आयुक्त, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांना प्रदान करणे या बाबीस मंजुरी देणे बाबतच्या प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1977/2025:- (कार्यकारी अभियंता ड्रेनेज व इमारत विभाग) दि.04.07.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या स्थापत्य विषयक कामात जसे की, रस्ते,पुल व इमारतींच्या संकल्पनांसाठी, बांधकामासाठी अपुऱ्या तांत्रिक कर्मचारी संख्येमुळे अथवा काही प्रसंगी गुंतागुंतीचे तांत्रिक प्रश्न, आधुनिक तंत्रज्ञानाची गरज, पर्यावरण विषयक अभ्यास व तत्सम बाबी, सुसाध्यतेची पडताळणी, संशोधनात्मक अभ्यास तसेच खाजगीकरणातुन करावयाच्या प्रकल्पांसाठी कायदे विषयक, अर्थविषयक अन्वेषन अशा बाबींसाठी सल्लागार किंवा तज्ञ नेमण्याची आवश्यकता भासते. त्यानुषंगाने विषय क्र.902/2023 दि.08.08.2023 नुसार ठराव क्र. 1442/2024 दि.25.06.2024 ठराव क्र.1477/2024 दि.10.07.2024 व ठराव क्र.1621/2024 दि.01.10.2024 व ठराव क्र.1961/2025 दि.23.06.2025 अन्वये नियुक्ती बाबत ठराव मंजुर करण्यात आले आहेत.

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेने शासन निर्णयातील 2.1.1 सर्वसाधारण सल्लागार सेवा साठी महापालिका कार्यक्षेत्रासाठी नामिका प्रवेशाकरीता (Empanelment) सल्लागारांकडून जाहीर प्रस्तावाद्वारे विहित नमुन्यात माहिती मागवून वर्गनिहाय सल्लागार सुची तयार करण्यासाठी निविदा सुचना क्र.2023_AMCA_918785_1 अन्वये महानगरपालिकेस आवश्यक असलेल्या खालील 10 बाबींसाठी पीएमसी/आर्किटेक्ट व इतर सल्लागार/तज्ञांची नियुक्ती पाच वर्षासाठी करण्याकरीता RFQ निविदा मागविण्यात आल्या होत्या.

| Sr.No. | Consultancy Services |
|---|---|
| 1. | Structural Designer (Building) |
| 2. | Structural Designer (Road) |
| 3. | Road/Bridge Survey, Design Drawing leveling and surveying Expert |
| 4. | Architect |
| 5. | Landscaping designer, Gardening Horticulture |
| 6. | Mechanical,Electrical and Plumbing (MEP) & Heating, Ventilation & Air Conditioning (HVAC) Consultant |
| 7. | Green Building Consultants With Rainwater Harvesting |
| 8. | Water supply, Sanitary and seweage treatement consultant |
| 9. | H.A.M./P.P.P.Project Specialist/Annuity/Annuity & Toll/V.G.F. Consultant |
| 10. | Quantity survey and valuer Expert |

यासाठी मागविण्यात आलेल्या निविदेच्या अनुषंगाने व तद्नंतर प्राप्त प्रस्तावांबाबत निविदेतील अटी शर्तीनुसार छाननी करुन त्या-त्या सर्व्हिसेससाठी नियुक्त करण्यात आलेल्या कन्स्लटंटची संख्या खालील प्रमाणे आहे.

| Sr. No. | Consultancy Service | ठराव क्र.902/2023 दि.08.08.2023 अन्वये नियुक्त | ठराव क्र.1442/2024 दि.25.06.2024 अन्वये नियुक्त | ठराव क्र.1477/2024 दि.10.07.24 अन्वये नियुक्त | ठराव क्र.1621/2024 दि.01.10.2024 अन्वये नियुक्त | ठराव क्र.1908/2024 07.05.2025 अन्वये नियुक्त | ठराव क्र.1961/2025 दि.23.06.2025 अन्वये नियुक्त |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | Structural Designer (Building) | 10 | 1 | -- | -- | -- | -- |
| 2. | Structural Designer (Road) | 9 | 1 | -- | -- | -- | -- |
| 3. | Road/Bridge Survey, Design Drqwing Levelling snd Sruveying Expert | 21 | 1 | -- | -- | -- | -- |
| 4. | Architect | 27 | 4 | 1 | 2 | 4 | -- |
| 5. | Landscaping Designer, Garadeninig Horticulture | 16 | 1 | -- | -- | 1 | 1 |
| 6. | Mechanical, Electrical and Plumbing (MEP) & Heating, Ventilation & Air Conditioning | 06 | 0 | -- | -- | -- | -- |
| 7. | Green Building Consultants with Rainwater Harvesting | 02 | 1 | -- | -- | -- | -- |
| 8. | Water Supply, Sanitary and Sewage Treatment Consultant | 14 | 0 | -- | -- | -- | -- |
| 9. | H.A.M./P.P.P. Project Specialist/Annuity/ Annuity & Toll/V.G.F. Consultant | 06 | 0 | -- | -- | -- | -- |
| 10. | Quantity Survey and Valuer Expert | 5 | 0 | -- | -- | -- | -- |
| 11. | Surveyer | -- | -- | -- | -- | 1 | -- |

सदर पात्र ठरलेल्या प्रकल्प सल्लागारांच्या नियुक्तीस ठराव क्र.902/2023 दि.08.08.2023 ठराव क्र.1442/2024 दि.25.06.2024 ठराव क्र.1477/2024 दि.10.07.2024 व ठराव क्र.1621/ 2024 दि.01.10.2024 ठराव क्र.1908/2025 दि.07.05.2025 व ठराव क्र.1961/2025 दि.23.06.2025 नुसार मंजुरी प्राप्त झाल्यानंतर या प्रकल्प सल्लागारांना नियुक्तीचे पत्र देण्यात आली आहेत. परंतु त्यानंतर Ecosattva Environmental Solutions Pvt.Ltd यांचा Architect स्वरुपाने प्रकल्प सल्लागार सुचीमध्ये समाविष्ठ करण्या करीता विनंती अर्ज सादर केला आहे

करीता Ecosattva Environmental Solutions Pvt.Ltd यांचा अनुभव लक्षात घेऊन त्यांना महानगरपालिकेमार्फत येणाऱ्या विविध प्रकल्पांसाठी प्रकल्प सल्लागार सुचीमध्ये Architect

समाविष्ट करणे योग्य वाटते. यापूर्वीच्या मंजुर ठरावा नुसार सल्लागारांची कन्सल्टन्सी चार्जेस म्हणुन Pre Tender Activity साठी Project Cost च्या 0.60% व Post tender Activity साठी Project Cost च्या 0.90% असे एकुण Project Cost च्या 1.50% च्या मर्यादत शुल्क अदा करण्यात येतील. करीता छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या सल्लागारांची निवडसूचीत Ecosattva Environmental Solutions Pvt.Ltd यांचा Architect स्वरुपाने प्रकल्प सल्लागार सुचीमध्ये समावेश करण्यास मान्यतेचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1977/2025:-</u>**

प्रस्तावात उपरोक्त नमुद केल्यानुसार Environmental Solutions Pvt.Ltd यांचा अनुभव लक्षात घेऊन त्यांना महानगरपालिकेमार्फत येणाऱ्या विविध प्रकल्पांसाठी प्रकल्प सल्लागार सुचीमध्ये Architect स्वरुपाने समाविष्ट करणे योग्य वाटते. यापूर्वीच्या मंजुर ठरावानुसार सल्लागारांची कन्सल्टन्सी चार्जेस म्हणून Pre Tender Activity साठी Project Cost च्या 0.60% व Post Tender Activity साठी Project Cost च्या 0.90% असे एकुण Project Cost च्या 1.50% च्या मर्यादेत शुल्क अदा करण्यात येतील. करीता छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या सल्लागारांची निवडसुचीत Ecosattva Environmental Solutions Pvt. Ltd यांचा Architect स्वरुपाने प्रकल्प सल्लागार सुचीमध्ये समावेश करण्यास मान्यतेचा प्रस्तावास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1978/2025:-</u> (उप अभियंता, झोन क्र.04 विभाग)** **(दि.04.07.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजने अंतर्गत बनेवाडी येथील शाळेसाठी वर्ग खोल्या बांधणे बाबत या कामास मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.1795/2025 दि.30.01.2025 अन्वये प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. सदर कामाचा खर्च शासन निर्णय क्रमांक आदर्श-2023/प्र.क्र.81/एसडी-6 दि.09.01.2024 या लेखाशिर्षका अंतर्गत करण्यात येणार आहे.

या कामासाठी शासनाच्या संकेतस्थळावरुन निविदा मागविल्या असता प्रथम वेळेस अंतिम दिनांका पर्यंत 09 निविदा प्राप्त झाल्या आहेत. त्यामध्ये चार निविदाधारक तांत्रिकदृष्ट्या पात्र ठरले आहेत. पात्र 04 निविदाधारकांपैकी सर्वात कमी दराची निविदा मे.श्री.पी.एस.बागडे एस. यांची असुन ती अंदाजपत्रकीय दरापेक्षा 22.24% कमी दराची निविदा आहे.

| संदर्भ:- TENDER ID : 2025_AMCA_1156932_1 | | |
|---|---|---|
| **अ.क्र.** | **विवरण** | **शेरा** |
| 1. | विभागाचे नाव | कार्यकारी अभियंता झोन क्र.04 |
| 2. | कामाचे स्वरुप | शाळेसाठी वर्ग खोल्या बांधणे |
| 3. | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रक्कमेचे मान्यतेचे ठराव? | होय, अं.प.र.रु.2,35,67,100/-मा. सर्वसाधारण सभा विषय क्र.1795/2025 दि.30.04.2025 |
| | त्यापैकी किती रक्कमेचे निविदा मागविण्यात आले? | र.रु.1,89,09,410/- |
| 4. | अ) निविदा स्विकारण्याची मुदत | दि.19.03.2025 |
| | ब) निविदा उघडल्याचा दिनांक (वाणिज्य देकार) | दि.29.04.2025 |
| | क) निविदा काढण्याची वेळ | प्रथम |
| | ड) एकुण प्राप्त निविदा | 09 |

(त्यापैकी पात्र निविदाधारकांची यादी खालील प्रमाणे आहे.)

| **अ. क्र.** | **कंत्राटदाराचे नाव** | **निविदा रक्कम रुपये** | **पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त** | |
|---|---|---|---|---|
| | | | रक्कम रुपये | टक्केवारी |
| 1. | मे.श्री.पी.एस.बागडे, गर्व्हनमेंट कॉन्ट्रॅक्टर | र.रु.1,89,09,410/- | र.रु.1,47,03,957.21/- | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 22.24% कमी दराने |
| 2. | मे.नाझ डेव्हलपर्स | र.रु.1,89,09,410/- | र.रु.1,49,38,433.90/- | अंदाजपत्रकीय दरापेक्षा |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | 21.00% जास्त दराने |
| 3. | मे.रझीम इन्फ्रा | र.रु.1,89,09,410/- | र.रु.1,96,22,294.75/- | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 3.77% कमी दराने |
| 4. | मे.लक्ष्मी कन्स्ट्रक्शन | र.रु.1,89,09,410/- | र.रु.1,99,49,427.55/- | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 5.50% जास्त दराने |

| अ. क्र. | संक्षिप्त तपशिल | शेरा |
|---|---|---|
| 1. | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | क) असल्यास कारणे नमुद करावीत. | --- |
| 2. | सदरचा खर्च कोणत्या अर्थशिर्षकातुन करण्यात येणार आहे? ते शिर्षक नमुद करावे. | भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा क्रमांक आदर्श-2023/ प्र.क्र.81/एसडी-6 दि.09.01.2024 |
| 3. | सदर कामास खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | होय |
| 4. | सदर काम डिपॉझिट मधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | ---- |
| 5. | सोबत मान्य पुर्वगणक पत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे काय? | होय |

उक्त निविदाधारकांपैकी सर्वात कमी दराची निविदा ही मे.श्री.पी.एस.बागडे, यांची असून ती अंदाजपत्रकीय दरापेक्षा 22.24% कमी दराची आहे करिता सर्वात कमी मे.श्री.पी.एस.बागडे, यांची अंदाज पत्रकीय दरापेक्षा 22.24% कमी दराची निविदा विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 1978/2025:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजने अंतर्गत बनेवाडी येथील शाळेसाठी वर्ग खोल्या बांधणे बाबत या कामाच्या प्राप्त निविदाधारकांपैकी सर्वात कमी दराची निविदा ही मे.श्री.पी.एस.बागडे, यांची असून ती अंदाजपत्रकीय दरापेक्षा 22.24% कमी दराच्या निविदेस मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1979/2025:-** **(आरोग्य विभाग)** **(दि.04.07.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,आरोग्य विभागाअंतर्गत सर्व रुग्णालये, शहरी आरोग्य केंद्रे, आरोग्य वर्धिनी केंद्र तसेच हिन्दु हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना येथे येणाऱ्या गरजु रुग्णांसाठी लागणाऱ्या आवश्यक औषधी व साहित्य निविदोद्वारे खरेदी करुन उपलब्ध करुन घेण्यासाठी अंदाजीत र.55,16,875/- (अक्षरी रक्कम रुपये पंच्यान्नव लक्ष सोळा हजार आठशे पंच्याहत्तर फक्त) एवढ्या खर्चासाठी मा.सर्वसाधारण सभा प्रस्ताव क्र.1854/2025 दि.11.03.2025 रोजीच्या मान्यतेनुसार सर्व रुग्णालये, शहरी आरोग्य केंद्रे व आपला दावाखाना यासाठी औषधी खरेदी करणे बाबत Tender ID_2025_AMCA_1164739_1 दि.25.03.2025 रोजी महाराष्ट्र www.mahatender.gov.in शासनाच्या व महापालिकेच्या www.aurngabadmahapalika.org या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

सदरील निविदेमधील प्राप्त एल-1 दराचा तपशिल खालील प्रमाणे.

| Sr. No. | Name of Medicine | Total Purchase Qty | L-1 निविदा दर | एकुण अपेक्षित रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1. | Tab. Paracetamol 500mg | 500000 | 0.42 | 210000 |
| 2. | Tab. Chlorpheneramine Maleate 4 mg | 500000 | 0.11 | 55000 |
| 3. | Tab. Azithro mycin 500mg | 30000 | 11.00 | 330000 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 4. | Tab. Azithromycin250 mg | 50000 | 5.50 | 275000 |
| 5. | Tab. Ascorbic Acid 500mg | 100000 | 0.80 | 80000 |
| 6. | Tab. Pantoprazole 40mg | 50000 | 0.70 | 35000 |
| 7. | Tab. Ondansetron 4 mg | 100000 | 0.30 | 30000 |
| 8. | Tab. Fluconazole 150mg | 10000 | 2.20 | 22000 |
| 9. | Tab. Diclofenac Sodium 50mg | 100000 | 0.33 | 33000 |
| 10. | Tab. Norflox - Tinidazole | 50000 | 0.25 | 12500 |
| 11. | Tab Amox+Clave 625mg | 50000 | 7.50 | 375000 |
| 12. | Tab .Zinc Sulphate 20 mg | 100000 | 0.25 | 20000 |
| 13. | Tab.Clotrimazole VG 100mg | 5000 | 4.20 | 21000 |
| 14. | Tab.Amoxycilln 125 mg | 50000 | 1.30 | 65000 |
| 15. | Syp.Cetrizine 5 mg | 15000 | 10.00 | 150000 |
| 16. | Syp.Paracetamol 100 mg (15ml) | 50000 | 10.50 | 525000 |
| 17. | Syp.Azithromycin 100mg (15ml) | 10000 | 20.20 | 202000 |
| 18. | Syp. Ondansetron 5mg/5ml | 10000 | 10.10 | 101000 |
| 19. | Glucose Powder 75gm | 10000 | 10.00 | 100000 |
| 20. | H2O2 Solution | 250 | 7.00 | 1750 |
| 21. | Povidone Iodine Ointment | 3000 | 10.10 | 30300 |
| 22. | Gauze Roll | 8000 | 111.00 | 888000 |
| 23. | Gauze Piece (50cm x 18mtr) | 500 | 111.00 | 55500 |
| 24. | Cotton Sticking 7.5x4mtr | 1500 | 40.00 | 60000 |
| 25. | Paper Sticking 2" x 9m | 3000 | 25.00 | 75000 |
| 26. | IV Normal Saline 100ml | 5000 | 12.70 | 63500 |
| 27. | IV Set | 5000 | 6.72 | 33600 |
| 28. | SV Set 22 G | 3000 | 5.50 | 16500 |
| 29. | Paradichlorobenzene, Benzocaine, Chlorbutol & Turpentine Oil Ear Drops | 2000 | 15.20 | 30400 |
| 30. | Inj. Pheniramine Maleate 10ml | 500 | 10.80 | 5400 |
| | | | **Total** | **3901450** |

उपरोक्त तक्त्यातील बाबनिहाय औषधांचे एल-1 दर निविदा दर विचारात घेतले असता, अंदाजीत र.रु.39,01,450/- (अक्षरी रक्कम रुपये एकोणचाळीस लक्ष एक हजार चारशे पन्नास फक्त) एवढा खर्च अपेक्षीत आहे. सदरील खर्च

**सन 2024-2025 मधील लेखाशिर्ष**
**क-3 सार्वजनिक दवाखाने**
**अं.क्र.2औषध खरेदी / साहित्य खरेदी**
**सांकेतांक क्र.62125320002**

या मधुन करणेबाबत प्रस्तावित करण्यात आलेले आहे.

उपरोक्त प्रस्तावित नुसार अंदाजीत र.रु.39,01,450/- (अक्षरी रक्कम रुपये एकोणचाळीस लक्ष एक हजार चारशे पन्नास फक्त) एवढा खर्च अपेक्षीत आहे. करीता निविदे मधील प्राप्त एल-1 दरास मान्यता देण्याचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1979/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अंदाजीत र.रु.39,01,450/- (अक्षरी रक्कम रुपये एकोणचाळीस लक्ष एक हजार चारशे पन्नास फक्त) सर्व आरोग्य केंद्र व रुग्णालय करीता औषधी खरेदीसाठी खर्चाच्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1980/2025:-</u> (उप अभियंता झोन क्र.10 विभाग)** **(दि.04.07.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, झोन क्र.10 अंतर्गत कांचनवाडी येथील महानगरपालिकेच्या वेस्टप्लांट मध्ये कॉंक्रीटीकरण करणे व अप्रोच रस्ता तयार करणेच्या कामाचे र.रु.36,73,417/- चे अंदाजपत्रक SSR 2022-23 च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले आहे.

सदरील वेस्टप्लांट मध्ये माती असल्यामुळे पावसाळा ऋतुमध्ये या ठिकाणी सर्वत्र चिखल होऊन कर्मचाऱ्यांना काम करण्यास अडथळा निर्माण होत आहे. तसेच या ठिकाणी कचरा वाहतुक करण्यासाठी या ठिकाणी कांचनवाडी मुख्य रस्ता ते शेड पर्यंत कॉंक्रीटीकरण करणे आणि पावसाच्या पाण्याचा निचरा होणेसाठी पाईप लाईन टाकणे आवश्यक आहे. सदर अंदाजपत्रकात वेस्टप्लांट मध्ये कॉंक्रीटींग करणे, कांचनवाडी रस्ता ते वेस्टल्पांट पर्यंत रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे व पाण्याचा निचरा करणेसाठी पाईप लाईन टाकणेचे काम प्रस्तावित आहे.

सदरील कामाचा खर्च महानगरपालिका अर्थसंकल्प सन 2025-26 अंतर्गत पृष्ठ क्र. Other Capital Works-2 अ.क्र.1 (ii) वरील विकास योजने अंतर्गत विविध रस्ते मजबुतीकरण विकास कामे या लेखाशिर्ष अंतर्गत र.रु.45.00 कोटी तरतुद मधुन करता येईल.

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, झोन क्र.10 अंतर्गत कांचनवाडी येथील महानगरपालिकेच्या वेस्टप्लांट मध्ये कॉंक्रीटीकरण करणे व अप्रोच रस्ता तयार करण्याच्या कामाचे र.रु.36,73,417/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1980/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, झोन क्र.10 अंतर्गत कांचनवाडी येथील महानगरपालिकेच्या वेस्टप्लांट मध्ये कॉंक्रीटीकरण करणे व अप्रोच रस्ता तयार करण्याच्या कामाचे र.रु.36,73,417/- चे अंदाजपत्रक मंजुरीच्या प्रस्तास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1981/2025:-</u> (नगर रचना विभाग)** **(दि.09.07.2025)**

आयुक्त, महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर यांच्या कडून प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शासन मंजुर विकास योजना सन-1991 (वाढीव हद्द) मध्ये बाऱ्हाळे हॉस्पीटल (गट क्रमांक-10,11 मौजे कांचनवाडी) ते नाथव्हॅली (गट क्रमांक-18 मौजे ईटखेडा) व गट क्रमांक-19 मौजे सातारा येथील 36.00 मी.रुंद विकास योजना रस्ता नियोजित करण्यात आला होता.

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या संपुर्ण क्षेत्रासाठी शासनाचे नियुक्त अधिकारी यांनी उक्त अधिनियमाच्या कलम-26 (1) अन्वये प्रसिध्द केलेल्या प्रारुप विकास योजनेत सदरील विकास योजना रस्त्यांची रुंदी 36.00 मीटर कायम ठेवलेली आहे. तसेच उक्त अधिनियमाच्या कलम-30 अन्वये शासनास प्रारुप विकास योजना मंजुरीसाठी सादर करतांना सदरील 36.00 मी.रुंद विकास योजना रस्त्याच्या रुंदीमध्ये उक्त अधिनियमाचे कलम-28(4) अन्वये कोणताही फेरबदल सुचविण्यात आलेले नाही.

छत्रपती संभाजीनगर महागनरपालिकेच्या संपुर्ण क्षेत्रासाठी प्रसिध्द करण्यात आलेल्या व कलम-28(4) अन्वये काही फेरबदलासह अंतिम मंजुरीसाठी शासनास सादर करण्यात आलेल्या प्रारुप विकास योजनेस राज्य शासनाने अधिसुचना क्र.टीपीएस-3025/प्र.क्र.06/2025/भागश:/मंजुरी/नवि-30 दि.15.04.2025 अन्वये भागश: अंतिम मंजुरी दिलेली आहे. तसेच सदरील भागश:/ मान्यते सोबत उक्त अधिनियमाच्या कलम-31(1) अन्वये वगळलेले क्षेत्र (ई.पी.) SCHEDULE-B नुसार प्रसिध्द केलेले आहे. सदरील SCHEDULE-B सेक्स्टर-X मधील अनुक्रमांक-27 फेरबदल EP (X)-27 (M-34) सदरील फेरबदल क्रमांकातील कॉलम-7 मध्ये पुढील प्रमाणे नमुद करण्यात आलेले आहे.

The width of 36 m.wide road, proposed from North south NH-53 AB road in Sector X Mouje Kanchanwadi upto NH-52 Beed Bypass in Sector-VIII Mouje Shahanurwadi, is proposed to be reduced to 18 m.as shown on plan.

वरील प्रमाणे प्रस्तावित फेरबदल हे उक्त अधिनियमाच्या कलम-31(1) अन्वये शासन स्तरावरुन सुचविण्यात आलेले आहेत. तथापि, मंजुर विकास योजनेतील विद्यमान 36.00 मी.रुंद विकास योजना रस्त्याच्या आखणीनुसार भागश: रस्त्याचे बाधीत मिळकतीचे टी.डी.आर.च्या स्वरुपात मोबदला देऊन रस्ता रुंदीकरणाची जागा संपादीत करण्यात आलेली आहे. सदरील रस्त्याच्या शासन मंजुर

विकास योजनेतील आखणीनुसार काही मिळकतीवर विकास परवानगी अनुज्ञेय करण्यात आली आहे. तसेच सद्यस्थितीत इकडील कार्यालयाकडे टी.डी.आर.चे प्रस्ताव कार्यवाही अंतर्गत आहेत.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम-1949 चे कलम-205 व 206 नुसार महानगरपालिकेस प्राप्त अधिकारानुसार सदरचा विकास योजना रस्ता नवीन सार्वजनिक रस्ता म्हणुन 36.00 मीटर रुंदीचा ठेवावा या करीता धोरणात्मक निर्णय घेण्यात येत आहे.अशा परिस्थितीत भविष्यातील कायदेशीर गुंतागुंत व रस्त्याच्या नियोजनातील अडचण टाळण्यासाठी प्रारुप विकास योजना शासनस मान्यतेकरीता सादर करतांना उक्त अधिनियमाच्या कलम-28(4) नुसार फेरबदल करुन सदरील 36.00 मी.रुंद विकास योजना रस्त्याची आखणी सादर केलेली आहे. त्यानसुार 36.00 रुंद रस्त्याची आखणी कायम ठेवण्यात यावी. या करीता शासनास कळविणे आवश्यक आहे.

करीता प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1981/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शासन मंजुर विकास योजना सन-1991 (वाढीव हद्द) मध्ये बाऱ्हाळे हॉस्पीटल (गट क्रमांक-10,11 मौजे कांचनवाडी) ते नाथव्हॅली (गट क्रमांक-18 मौजे ईटखेडा) व गट क्रमांक-19 मौजे सातारा येथील 36.00 मी.रुंद विकास योजना रस्त्यासाठी 36 मी.रुंद कायम करण्यात आलेली आहे. सदरील रस्त्याच्या शासन मंजुर विकास योजनेतील आखणीनुसार काही मिळकतीवर विकास परवानगी अनुज्ञेय करण्यात आलेल्या आहेत. तसेच भागश: टी.डी.आर.च्या स्वरुपात मोबदला देऊन रस्ता रुंदीकरणातील बाधीत जमिनी संपादीत करण्यात आलेल्या आहेत. तसेच या आखणी नुसार काही टी.डी.आर.प्रस्ताव महानगरपालिकेकडे कार्यवाही अंतर्गत आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम-1949 चे कलम-205 व 206 नुसार महानगरपालिकेस प्राप्त अधिकारानुसार सदरचा विकास योजना रस्ता नवीन सार्वजनिक रस्ता म्हणुन 36.00 मीटर रुंदीचा ठेवावा या करीता धोरणात्मक निर्णय घेण्यात येत आहे.अशा परिस्थितीत भविष्यातील कायदेशीर गुंतागुंत व रस्त्याच्या नियोजनातील अडचण टाळण्यासाठी प्रारुप विकास योजना शासनस मान्यतेकरीता सादर करतांना उक्त अधिनियमाच्या कलम-28(4) नुसार फेरबदल करुन सदरील 36.00 मी.रुंद विकास योजनेत रस्त्याची आखणी सादर केलेली आहे. त्यानुसार 36.00 मी.रुंद रस्त्याची आखणी कायम करण्यात यावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1982/2025:-</u> (नगर रचना विभाग) (दि.09.07.2025)**

आयुक्त, महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर यांच्या कडून प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शासन मंजुर विकास योजना सन-1991 (वाढीव हद्द) गट क्रमांक-87 मौजे ईटखेडा ते नाथव्हॅली (गट क्रमांक-18 मौजे ईटखेडा) व गट क्रमांक-340 मौजे सातारा येथील 30.00 मी.रुंद विकास योजना रस्ता नियोजित करण्यात आला होता.

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या संपुर्ण क्षेत्रासाठी शासनाचे नियुक्त अधिकारी यांनी उक्त अधिनियमाच्या कलम-26 (1) अन्वये प्रसिध्द केलेल्या प्रारुप विकास योजनेत सदरील विकास योजना रस्त्यांची रुंदी 30.00 मीटर कायम ठेवलेली आहे. तसेच उक्त अधिनियमाच्या कलम-30 अन्वये शासनास प्रारुप विकास योजना मंजुरीसाठी सादर करतांना सदरील 30.00 मी.रुंद विकास योजना रस्त्याच्या रुंदीमध्ये उक्त अधिनियमाचे कलम-28(4) अन्वये M-8 नुसार फेरबदल सुचविण्यात आलेला आहे.

छत्रपती संभाजीनगर महागनरपालिकेच्या संपुर्ण क्षेत्रासाठी प्रसिध्द करण्यात आलेल्या व कलम-28(4) अन्वये काही फेरबदलासह अंतिम मंजुरीसाठी शासनास सादर करण्यात आलेल्या प्रारुप विकास योजनेस राज्य शासनाने अधिसुचना क्र.टीपीएस-3025/प्र.क्र.06/2025/भागश:/मंजुरी /नवि-30 दि.15.04.2025 अन्वये भागश: अंतिम मंजुरी दिलेली आहे. तसेच सदरील भागश: मान्यते सोबत उक्त अधिनियमाच्या कलम-31(1) अन्वये वगळलेले क्षेत्र (ई.पी.) SCHEDULE-B नुसार प्रसिध्द केलेले आहे. सदरील SCHEDULE-B सेक्स्टर-X मधील अनुक्रमांक-8 फेरबदल EP (X)-8 (M-8) सदरील फेरबदल क्रमांकातील कॉलम-7 (i) मध्ये पुढील प्रमाणे नमुद करण्यात आलेले आहे.

(i) Alignment of 30.00 m.wide road A-B is proposed to be reinsteated as per published plan u/s 26 of MRTP Act and width of proposed road from

Gat/S.No.340 of Mouje Satara near Nath Valley school to Gat/x.No.87 of Mouje Itkheda is proposed to be reduced to 18 m.

वरील प्रमाणे प्रस्तावित फेरबदल हे उक्त अधिनियमाच्या कलम-31(1) अन्वये शासन स्तरावरुन सुचविण्यात आलेले आहेत. तथापि, मंजुर विकास योजनेतील विद्यमान 30.00 मी.रुंद विकास योजना रस्त्याच्या आखणीनुसार भागश: रस्त्याचे बाधीत मिळकतीचे टी.डी.आर.च्या स्वरुपात मोबदला देऊन रस्ता रुंदीकरणाची जागा संपादीत करण्यात आलेली आहे. सदरील रस्त्याच्या शासन मंजुर विकास योजनेतील आखणीनुसार काही मिळकतीवर विकास परवानगी अनुज्ञेय करण्यात आली आहे. तसेच सद्यस्थितीत इकडील कार्यालयाकडे टी.डी.आर.चे प्रस्ताव कार्यवाही अंतर्गत आहेत.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम-1949 चे कलम-205 व 206 नुसार महानगरपालिकेस प्राप्त अधिकारानुसार सदरचा विकास योजना रस्ता नवीन सार्वजनिक रस्ता म्हणुन 30.00 मीटर रुंदीचा ठेवावा या करीता धोरणात्मक निर्णय घेण्यात येत आहे. अशा परिस्थितीत भविष्यातील कायदेशीर गुंतागुंत व रस्त्याच्या नियोजनातील अडचण टाळण्यासाठी प्रारुप विकास योजना शासनास मान्यते करीता सादर करतांना उक्त अधिनियमाच्या कलम-28(4) नुसार फेरबदल करुन सदरील 30.00 मी.रुंद विकास योजना रस्त्याची आखणी सादर केलेली आहे. त्यानुसार 30.00 मी.रुंद रस्त्याची आखणी पुर्वीच्या मंजुर विकास योजना (वाढीव हद्द) 1991 नुसार ठेवण्यात यावी. या करीता शासनास कळविणे आवश्यक आहे. करीता प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1982/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शासन मंजुर विकास योजना सन-1991 (वाढीव हद्द) गट क्रमांक-87 मौजे ईटखेडा ते नाथव्हॅली (गट क्रमांक-18 मौजे ईटखेडा) व गट क्रमांक-340 मौजे सातारा येथील 30.00 मी.रुंद विकास योजना रस्त्यासाठी 36 मी.रुंदी कायम करण्यात आलेली आहे. सदरील रस्त्याच्या शासन मंजुर विकास योजनेतील आखणीनुसार काही मिळकतीवर विकास परवानगी अनुज्ञेय करण्यात आलेल्या आहेत. तसेच भागश: टी.डी.आर.च्या स्वरुपात मोबदला देऊन रस्ता रुंदीकरणातील बाधीत जमिनी संपादीत करण्यात आलेल्या आहेत. तसेच या आखणीनुसार काही टी.डी.आर.प्रस्ताव महानगरपालिकेकडे कार्यवाही अंतर्गत आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम-1949 चे कलम-205 व 206 नुसार महानगरपालिकेस प्राप्त अधिकारानुसार सदरचा विकास योजना रस्ता नवीन सार्वजनिक रस्ता म्हणुन 30.00 मीटर रुंदीचा ठेवावा या करीता धोरणात्मक निर्णय घेण्यात येत आहे.अशा परिस्थितीत भविष्यातील कायदेशीर गुंतागुंत व रस्त्याच्या नियोजनातील अडचण टाळण्यासाठी प्रारुप विकास योजना शासनास मान्यतेकरीता सादर करतांना उक्त अधिनियमाच्या कलम-28(4) नुसार फेरबदल करुन सदरील 30.00 मी.रुंद विकास योजना रस्त्याची आखणी सादर केलेली आहे. करीता, पुर्वीच्या शासन मंजुर विकास योजना (वाढीव हद्द) 1991 नुसार 30.00 मी.रुंद रस्त्याची आखणी कायम करण्यात यावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1983/2025:-</u> (आस्थापना-1 विभाग)** **(दि.09.07.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मा.स्थायी समितीचा ठराव क्र.1857/2025 दि.1703.2025 नुसार महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील दैनिक वेतनावर कार्यरत असलेल्या वर्ग-3 संवर्गातील खालील कर्मचाऱ्यांना कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/आस्था-1/2025/449 दि.17.03.2025 अन्वये दि.09.12.2024 ते दि.08.06.2025 या कलावधीसाठी तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नाव | पदनाम | कार्यरत विभाग | दैनिक वेतन |
|---|---|---|---|---|
| 1. | श्रीमती जयश्री जयवंतराव झाल्टे | संगणक ऑपरेटर | घरकुल कक्ष | र.रु.525/- |
| 2. | श्री.सतिश राम जाधव | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | र.रु.525/- |

तथापि,उक्त आदेशाची मुदत दि.08.06.2025 रोजी संपलेली आहे. तसेच उक्त कर्मचा:यांची आवश्यकता असल्याने त्यांना पुढील मुदतवाढ देण्याबाबत संबंधीत शाखा प्रमुख यांच्याकडून पत्र प्राप्त झालेले आहेत.

त्यानुषंगाने श्रीमती जयश्री जयवंतराव झाल्टे, संगणक ऑपरेटर व श्री.सतिश राम जाधव, वाहन चालक या 02 कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 53(3) च्या परंतुकान्वये 02 दिवसांचा (सार्वजनिक सुट्टीचे दिवस वगळून) तांत्रिक खंड देऊन 06 महिन्यांसाठी दि.11.06.2025 ते दि.10.12.2025 पर्यंत तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 1983/2025:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्रीमती जयश्री जयवंतराव झाल्टे, संगणक ऑपरेटर व श्री.सतिश राम जाधव, वाहन चालक या 02 कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 53(3) च्या परंतुकान्वये 02 दिवसांचा (सार्वजनिक सुट्टीचे दिवस वगळून) तांत्रिक खंड देऊन 06 महिन्यांसाठी दि.11.06.2025 ते दि.10.12.2025 पर्यंत तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देण्याबाबतच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1984/2025:- (आरोग्य विभाग) (दि.09.07.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मे.प्रेस ग्रीन एनर्जी मुंबई, ठाणे यांनी (CSR) माध्यमातुन छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका हद्दीतील स्मशानभुमीत बायोमास ब्रिकेट्समध्ये एकुण 5000 मोफत अंत्यविधी (दहन) करण्यासाठी ब्रिकेट्सचा पुरवठा करण्यास परवानगी मागितलेली आहे.

मे.प्रेस ग्रीन एनर्जी फाऊंडेशन (PGEF) नवी मुंबई ठाणे हे (CSR) माध्यमातुन छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका हद्दीमधील स्मशानभुमीत बायोमास ब्रिकेटसमध्ये 5000 मोफत (दहन) अंत्यविधीसाठी बायोमास ब्रिकेटसच्या पुरवठा करण्यासाठी (CSR) निधीसाठी अर्ज करेल. त्यानंतर (CSR) निधी मिळाल्यानंतर उपक्रमाची अखंड अंमलबजावणी सुनिश्चित करेल. त्यासाठी महानगरपालिकेची परवानगी मिळाल्यानंतर (CSR) निधी मिळण्याकरीता मे.ग्रेस ग्रीन एनर्जी फाऊंडेशन हे पुढील काम प्रस्तावित करणार आहे.

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका हद्दीमधील प्रतिवर्ष अंदाजे 9000 मृत्यु होतात, त्यापैकी अंदाजे 3500 मृतदेहावर दहनसंस्कार होतील असे गृहीत धरुन प्रत्येक मृतदेहासाठी साधारणतः 300 कि.ग्रॅ चा वापर होईल. त्याअनुषगांने सद्यस्थितीत ज्याप्रमाणे मे.पंजाब रिनिव्हेबल एनर्जी सिस्टीम प्रा.लि. नवी मुबंई हे बायोमास ब्रिकेट्सचा पुरवठा स्मशानभुमी मधील स्मशानजोगी यांचेकडे करतील त्याप्रमाणे करणे अपेक्षीत आहे. बायोमास ब्रिकेट्सचा पुरवठा खालील निकष/मापदंडानुसार (PGEF) यांना करणे बंधनकारक राहील

a) The Agro Waste Briquettes should be dry [Moisture content should be less than 8%]
b) Sulphur emission should be 0.0% and Carbon Dioxide should be less than 90%.
c) Gross Calorie Value (GCV) [Kcal/Kg) should be around 3600 to 3800.
d) Size-Diameter: 90 mm
e) Shape - Solid Cylindrical of minimum 9 inches
f) Ash: 6% to 10%
g) Raw material: Soybean husk, groundnut shell, cotton or arhar stalks, shrubs, Sugarcane trash, Corn Cob, Cane Trash, Mustard Husk, etc.

तसेच प्रत्येक महिन्यासाठी पुरवठा करण्यात येणा-या बायोमास ब्रिकेट्सचा दर्जा उक्तप्रमाणे सावित्रीबाई फुले विद्यापीठ पर्यावरण विज्ञान विभाग पुणे यांचे अहवाल व प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील. तसेच दर तीन महिन्यांनी (PGEF) यांनी बायोमास ब्रिकेट्सचा गुणवत्तेबाबत तपासणी अहवाल व प्रमाणपत्र सादर करणे देखील बंधनकारक राहील.

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका हद्दीमधील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी हिंदु हृदय सम्राट मा.स्व. बाळासाहेब ठाकरे मोफत अंत्यविधी योजना सन 2013 पासून राबविण्यात येत आहे. या मोफत अंत्यविधी योजना अंतर्गत प्रत्येक स्मशान जोगीस प्रती (दहन) अंत्यविधीसाठी ब्रिकेट्सच्या खर्चापोटी र.रु.2500/-(अक्षरी रक्कम रुपये दोन हजार पाचशे रुपये फक्त) महानगरपालिकातर्फे अदा

केले जातात. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांच्या कुंटुबातील व्यक्तींचे निधन झाल्यास (BPL CARD) बीपीएल कार्ड धारक आणि दारिद्रय रेषा कार्ड आधारे मृतदेहांवर मोफत अंत्यविधी करण्यात येते.

मे.ग्रेस ग्रीन एनर्जी फाउंडेशन यांनी बायोमास ब्रिकेट्सचा पुरवठा सुरु केल्यानंतर हिंदु हृदय सम्राट मा.स्व.बाळासाहेब ठाकरे मोफत अंत्यविधी योजना जोपर्यंत सरसकट 5000 अंत्यविधी (दहन) होत नाही तोपर्यंत सदरील योजना खंडीत करणे योग्य राहिल. तसेच 5000 अंत्यविधी (दहन) साठी बायोमास ब्रिकेट्सच्या पुरवठा मिळल्यानंतर महानगरपालिकांची बचत होईल.

मे.प्रेस ग्रीन एनर्जी फाऊंडेशन (PGEF) यांनी बायोमास ब्रिकेट्सचा पुरवठा सुरु केल्यानंतर संबंधीत झोन अधिकाऱ्यांनी पुरवठा केलेल्या तसेच मोफत अंत्यविधीबाबत याचा एक स्वतंत्र रजिस्टर तयार करुन त्यामध्ये नोंद घेण व त्याचा अहवाल दरमहा आरोग्य विभागास सादर करणे बंधनकारक राहील.

स्मशानभुमीमधील दहन व्यवस्था, अंत्यविधी पत्र तपासणी, मृत्युची नोंद ठेवणे इ.कामांमध्ये मे.प्रेस ग्रीन एनर्जी फाऊंडेशन हे हस्तक्षेप करता येणार नाही. तसेच बायोमास ब्रिकेट्सचा पुरवठा केल्यानंतर व्यतिरीक्त स्मशानभुमीमध्ये कोणतीही फी/रक्कम आकारण्याचा/वसुल करण्याचा अधिकार मे.ग्रेस ग्रीन एनर्जी फाऊंडेशन यांना राहणार नाही.

मे.पंजाब रिनिव्हेबल एनर्जी सिस्टीम प्रा.लि.नवी मुंबई यांना मे.प्रेस ग्रीन एनर्जी फाऊंडेशन (CSR) माध्यमातून छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका हद्दीमधील स्मशानभुमीत 5000 अंत्यविधी (दहन) साठी बायोमास ब्रिकेट्सचा पुरवठा करणार असल्याबाबतची सुचना द्यावा लागेल.

करीता, वरील प्रस्तावित केल्यानुसार (CSR) माध्यमातुन छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका हद्दीमधील स्मशानभूमीत बायोमास ब्रिकेट्समध्ये एकुण 5000 मोफत अंत्यविधी (दहन) करण्यासाठी ब्रिकेट्सचा पुरवठा करण्यास परवानगी देणेबाबत मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1984/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मे.प्रेस ग्रीन एनर्जी फाउंडेशन (PGEF) नवी मुंबई ठाणे हे (CSR) माध्यमातुन छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका हद्दीमधील स्मशानभूमीत बायोमास ब्रिकेट्समध्ये 5000 मोफत (दहन) अंत्यविधीसाठी बायोमास ब्रिकेट्सच्या पुरवठा करण्यासाठी (CSR) निधीसाठी अर्ज करेल. त्यानंतर (CSR) निधी मिळाल्यानंतर उपक्रमाची अखंड अंमलबजावणी सुनिश्चित करेल, त्यासाठी महानगरपालिकाची परवानगी मिळल्यानंतर (CSR) निधी मिळण्या करीता मे.प्रेस ग्रीन एनर्जी फाउंडेशन हे पुढील काम प्रस्तावित करणार आहे.

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका हद्दीमधील प्रतिवर्ष अंदाजे 9000 मृत्यु होतात, त्यापैकी अंदाजे 3500 मृतदेहावर दहनसंस्कार होतील असे गृहीत धरुन प्रत्येक मृतदेहासाठी साधारणतः 300 कि.ग्रॅ चा वापर होईल. त्याअनुषगांने सद्यस्थितीत ज्याप्रमाणे में पंजाब रिनिव्हेबल एनर्जी सिस्टीम प्रा.लि. नवी मुबंई हे बायोमास ब्रिकेट्सचा पुरवठा स्मशानभुमी मधील स्मशानजोगी यांचेकडे करतील त्याप्रमाणे करणे अपेक्षीत आहे. बायोमास ब्रिकेट्सचा पुरवठा खालील निकष/मापदंडानुसार (PGEF) यांना करणे बंधनकारक राहील

a) The Agro Waste Briquettes should be dry [Moisture content should be less than 8%]
b) Sulphur emission should be 0.0% and Carbon Dioxide should be less than 90%.
c) Gross Calorie Value (GCV) [Kcal/Kg] should be around 3600 to 3800.
d) Size-Diameter: 90 mm
e) Shape - Solid Cylindrical of minimum 9 inches
f) Ash: 6% to 10%
g) Raw material: Soybean husk, groundnut shell, cotton or arhar stalks, shrubs, Sugarcane trash, Corn Cob, Cane Trash, Mustard Husk, etc.

तसेच प्रत्येक महिन्यासाठी पुरवठा करण्यात येणा-या बायोमास ब्रिकेट्सचा दर्जा उक्तप्रमाणे सावित्रीबाई फुले विद्यापीठ पर्यावरण विज्ञान विभाग पुणे यांचे अहवाल व प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील. तसेच दर तीन महिन्यांनी (PGEF) यांनी बायोमास ब्रिकेट्सचा गुणवत्तेबाबत तपासणी अहवाल व प्रमाणपत्र सादर करणे देखील बंधनकारक राहील.

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका हद्दीमधील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी हिंदु हृदय सम्राट मा.स्व. बाळासाहेब ठाकरे मोफत अंत्यविधी योजना सन 2013 पासून राबविण्यात येत आहे. या मोफत अंत्यविधी योजना अंतर्गत प्रत्येक स्मशान जोगीस प्रती (दहन) अंत्यविधीसाठी ब्रिकेट्सचा खर्चापोटी र.रु.2500/-(अक्षरी रक्कम रुपये दोन हजार पाचशे रुपये फक्त) महानगरपालिकातर्फे अदा केले जातात. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांच्या कुंटुबातील व्यक्तींचे निधन झाल्यास (BPL CARD) बीपीएल कार्ड धारक आणि दारिद्य रेषा कार्ड आधारे मृतदेहांवर मोफत अंत्यविधी करण्यात येते.

मे.प्रेस ग्रीन एनर्जी फाउंडेशन यांनी बायोमास ब्रिकेट्सच्या पुरवठा सुरु केल्यानंतर हिंदु हृदय सम्राट मा.स्व.बाळासाहेब ठाकरे मोफत अंत्यविधी योजना जोपर्यंत सरसकट 5000 अंत्यविधी (दहन) होत नाही तोपर्यंत सदरील योजना खंडीत करणे योग्य राहिल. तसेच 5000 अंत्यविधी (दहन) साठी बायोमास ब्रिकेट्सचा पुरवठा मिळल्यानंतर महानगरपालिकांची बचत होईल.

करीता, (CSR) माध्यमातुन छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका हद्दीमधील स्मशानभूमीत बायोमास ब्रिकेट्समध्ये एकुण 5000 मोफत अंत्यविधी (दहन) करण्यासाठी ब्रिकेट्सचा पुरवठा करण्यास परवानगी देणेबाबत मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1985/2025:-</u> (बी.ओ.टी. विभाग)** **(दि.09.07.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सिध्दार्थ उद्यान येथे दि.11.06.2025 रोजी उद्यानाच्या प्रवेशद्वाराचे बांधकाम पडुन अपघात झालेला आहे, या मध्ये काही नागरिक जखमी झाल्याचे समजल्याने सदर ठिकाणी प्रशासक, उद्यान अधिकारी, कार्यकारी अभियंता (यांत्रिकी)) सहाय्यक आयुक्त झोन क्र.2, उपअभियंता झोन क्र.2 व उपअभियंता (बीओटी कक्ष) यांनी प्रत्यक्ष घटना स्थळी जावुन पाहणी केली. सदर अपघाता मध्ये दोन महिला नागरिकांचा मृत्यु झाला आहे. त्यांच्या परिवारातील एका पात्र वारसदारास र.रु.5.00 लक्ष आर्थिक मदत करणेबाबत दि.11.06.2025 रोजी बैठकीमध्ये निर्णय घेण्यात आला.

करिता सदर अपघातामध्ये दोन महिला 1. स्वाती अमोल खैरनार 2. रेखा हरिभाऊ गायकवाड यांचा मृत्यु झाला आहे. त्यांच्या परिवारातील एका पात्र वारसदारास र.रु.5.00 लक्ष आर्थिक मदत अदा करणेच्या मंजुरी बाबतच्या प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**<u>ठराव क्रमांक 1985/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रस्तावात सिध्दार्थ उद्यानाच्या बांधकाम पडुन अपघातामध्ये दोन महिला 1. स्वाती अमोल खैरनार 2. रेखा हरिभाऊ गायकवाड यांचा मृत्यु झाला आहे. त्यांच्या परिवारातील एका पात्र वारसदारास र.रु.5.00 लक्ष आर्थिक मदत अदा करणेस मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1986/2025:-</u> (पाणी पुरवठा विभाग)** **(दि.09.07.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शहर पाणी पुरवठा योजनेअंतर्गत फारोळा येथे 100 व 56 दलली प्रतिदिन क्षमतेचे दोन जलशुध्दीकरण केंद्र असुन या दोन्ही जलशुध्दीकरण केंद्रात दररोज 170 दलली पाण्यावर प्रक्रिया केली जाते. जलशुध्दीकरण प्रक्रियेत प्रामुख्याने तुरटी, ब्लिचींग पावडर व क्लोरीन गॅस चा वापर विविध टप्यांवर केला जातो. अशुध्द पाण्यात गढुळतेचे प्रमाण जास्त अरणे. पाण्यातील गढुळता कमी करण्यासाठी प्रामुख्याने तुरटी ग्रेड-1 व तुरटी ग्रेड-5 चा वापर केला जातो. जायकवाडी उद्भवावरुन येणाऱ्या पाण्यात गढुळतेचे प्रमाण कमी असते. तथापि, सरासरी 10 पी पी एम इतकी तुरटी मात्रा वर्षभर द्यावी लागते. पावसाळ्याच्या दिवसात धरणात नवीन पाण्याची आवक वाढल्या नंतर पाण्याच्या गढुळतेत प्रचंड वाढ होते. पावसाळ्याचे दिवस वगळता इतर वेळेस जलशुध्दीकरण केंद्र येथे येणाऱ्या पाण्यात गढुळतेचे प्रमाण कमी असते अशा वेळेस द्रवरुप तुरटीचा वापर करणे किफायत शीर ठरते. मागील 4 महिन्यांपासुन 100 दलली जलशुध्दीकरण केंद्र येथे प्रायोगीक तत्वावर द्रवरुप

तुरटीचा वापर करण्यात येत असुन त्याचे परिणाम चांगले दिसुन आले आहेत. 56 दलली जलशुध्दीकरण केंद्र व आणीबाणीच्या परिस्थितीत वापरण्याकरीता तुरटी ग्रेड-1 पुरवठ्याचे कार्यादेश विहित कार्यवाही नंतर देण्यात आलेले आहेत.

सदरील कामाचे अंदाजपत्रक मजिप्रा मंडळाच्या सन 2023-24 च्या दरसुचीतील साहित्य पुरवठ्याच्या दरानुसार तयार केले असून अंदाजपत्रकीय र.रु.59,70,800/- इतकी आहे. सदरील कामाचा खर्च पाणी पुरवठा रसायन खरेदी या लेखाशिर्षकातुन प्रस्तावीत करण्यात आला आहे. करीता फारोळा जलशुध्दीकरण केंद्राकरीता द्रवरुप तुरटी ग्रेड-5 चा पुरवठा करण्याचे अंदाजपत्रक र.रु.59,70,800/- चा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1986/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रस्तावीत शहर पाणी पुरवठा योजने अंतर्गत फारोळा जलशुध्दी करण केंद्रा करीता तुरटी ग्रेड-5 चा पुरवठा करण्याचे अंदाजपत्रक र.रु.59,70,800/- मंजूर करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1987/2025:-</u> (मालमत्ता विभाग)** **(दि.09.07.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, आयुक्त, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका प्रस्ताव सादर करीत आहे की, महानगरपालिकेच्या मालकीचे न.भु.क्र.13976/77, पैठणगेट येथील सादीया मार्केट व्यापारी संकुलाचा तळ मजला हा पर्ल एज्युकेशन वेलफेअर सोसायटी यांना बेरोजगारांना प्रशिक्षण देण्याकरीता भाडेतत्वावर देणेसाठी मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.229, दि.20.02.2009 अन्वये मान्यता झाली आहे.

मा.स्थायी समिती सभेच्या झालेल्या मान्यतेस अधिन राहून पर्ल एज्युकेशन ॲन्ड वेलफेअर सोसायटी यांना मिर सलामी व्यापारी संकुलाचा तळ मजला चटई क्षेत्रफळ 1065.2 चौ.मी.भाडेतत्वावर देण्यात आलेले आहे. त्यासाठी संबंधिताकडून प्रती वर्ष र.रु.2,64,000/-, सेवा शुल्क रु.5/- प्रती चौ.मी. प्रतीमहा नुसार र.रु.5,325/-प्रमाणे भाडे आकारणी करणेच्या अनुषंगाने करारनामा क्र. अ.ग.ग./1/4126, दि.17.11.2009 अन्वये 30 वर्षाचा करारनामा झालेला आहे.

संबंधिताकडे दि.16.11.2024 पर्यंत र.रु.23,08,666/ थकीत आहे. तसेच दि.16.11.2024 ते दि.15.11.2025 ची चालू मागणी र.रु.5,49,199/- असून एकूण र.रु.28,57,865/- थकीत आहे. संबंधिताने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम च्या कलम 81 (ब) (2) चा भंग केला आहे. तसेच UDCPR नियमातील कलम 9.11 मधील तरतुदी नुसार तळघरामध्ये शाळेचा वापर देय होत नाही, असे नमुद असून जागा रिक्त करुन महानगरपालिकेच्या ताब्यात देणे बाबत संबंधितास जा.क्र./मनपा/मामअ/1582, दि.28.01.2025 अन्वये कळविण्यात आले होते.

संबंधिताने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम च्या कलम 81 (ब) अन्वये देण्यात आलेल्या नोटीसचा खुलासा सादर केलेला नसल्याने दि.19.03.2025 रोजी मा.आयुक्त महोदय यांच्या दालनात सुनावणी झाली. सदरील सुनावणीत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 च्या कलम 81 (ब) अंतर्गत खालील नमुद तरतुदीचा व करारनामाचा भंग केला आहे.

1. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम च्या कलम 81 (ब) (1) (अ) (एक) अन्वये कायदेशीर येणे असलेले भाडे किंवा कर हे दोन महिन्यांपेक्षा अधिक मुदतीपर्यंत दिलेला नाही. असे नमुद आहे. त्यानुषंगाने संबंधिताकडे दि.16.11.2024 पर्यंत र.रु.23,08,666/- थकीत आहे. तसेच दि.15.11.2025 ची चालू मागणी र.रु.5,49,199/- असून एकूण र.रु.28,57,865/- संबंधिताकडे थकीत आहे. त्याअनुषंगाने संबंधिताने धनादेश क्र.269242 दि.06.12.2024 र.रु.5,00,000/-, धनादेश क्र.269247 दि.28.01.2025 र.रु.6,00,000/-, धनादेश क्र.269246 दि.28.02.2025 र.रु.6,00,000/- व धनादेश क्र.269245, दि.30.03.2025 र.रु.6,08,666/- असे एकूण र.रु.23,08,666/- चे धनादेश कार्यालयात जमा केले होते. सदरील धनादेश बँकेत टाकण्यात आले असता ते न वटता परत आले आहे. त्याची संबंधिता विरुध्द स्वतंत्र फौजदारी कार्यवाही चालू आहे. यावरून माझे निदर्शनास आले आहे की, संबंधिताने महानगरपालिकेचे भाडे भरणा

करणेसाठी असमर्थ ठरला आहात. आपण दोन महिन्यांपेक्षा अधिक मुदतीपर्यंतचे भाडे भरणा केलेले नाही.

2. करारनाम्यातील अट क्र.02 अन्वये तळघराचा वापर शैक्षणिक संस्थेच्या शिक्षणासाठी ट्रेनिंग आणि ट्रेडींग याच प्रयोजनासाठी करणार आहे असे नमुद आहे. परंतु आपण सदरील जागेत शाळेचा वापर सुरु केला आहे. या नुसार संबंधिताने करारनाम्याच्या विसंगत वापर करुन त्याचा भंग केला आहे.

3. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम च्या कलम 81 (ब) (1) (अ) (तीन) जागेच्या उपयुक्ततेस बऱ्याच प्रमाणात नुकसान पोहचण्याचा ज्यामुळे संभव असेल अशी हानिकारक कृत्ये केलेली आहेत किंवा ती करीत आहे. असे नमुद आहे. त्याअनुषंगाने UDCPR नियमातील कलम 9.11 मधील तरतुदी नुसार तळघरामध्ये शाळेचा वापर देय अनुज्ञेय नाही. परंतु संबंधित या मिळकतीच्या तळघरामध्ये शाळेकरीता वापर करीत आहात. सुरक्षेच्या दृष्टीने नगर रचना व अग्निशमन विभागाची परवानगी घेतलेली नाही. सदर बाब विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने थोकादायक असून त्यापासुन विद्यार्थ्यांच्या जिवीतास धोका आहे.

4. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 81 (ब) (1) (ब) नुसार सदीरील जागेची महानगरपालिकेस आवश्यकता आहे.

उपरोक्त बाब विचारात घेता तळघरामध्ये शाळा सुरु असून सुरक्षेच्या दृष्टीने नगर रचना व अग्निशमन विभागाची परवानगी घेतलेली नाही. सदर बाब विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने धोकादायक आहे. तसेच सदरील जागेची महानगरपालिकेस आवश्यकता आहे.

त्याअनुषंगाने मा.स्थायी समिती सभा ठराव क्र. 229, दि.20.02.2009 व करारनामा क्र.अ.ग.ग./1/4126, दि.17.11.2009 रद्द करणे व पर्ल एज्युकेशन ॲन्ड वेलफेअर सोसायटी यांना भाडेतत्वावर देण्यात आलेला न.भु.क्र.13976/77, पैठणगेट येथील सादीया मार्केट व्यापारी संकुलाचा तळ मजला महागनरपालिकेच्या ताब्यात घेणेसाठीचा प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादरमान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1987/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, पर्ल एज्युकेशन ॲन्ड वेलफेअर सोसायटी यांना न.भु.क्र.13976/77, पैठणगेट येथील सादीया मार्केट व्यापारी संकुलावा तळ मजला मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.229, दि.20.02.2009 ठराव व करारनामा क्र.अ.ग.ग./1/4126, दि.17.11.2009 अन्वये 30 वर्षासाठी भाडेतत्वावर देण्यात आलेला आहे.

प्रस्ताव मध्ये दर्शविल्याप्रमाणे संबंधिताने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 च्या कलम 81 (ब) (1) (अ) (एक), करारनाम्यातील अट क्र. 02 व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 च्या कलम 81 (ब) (1) (अ) (3) (तीन) चा भंग केला आहे. सदरील बाब विचारात घेता तळघरा मध्ये शाळा सुरु असून सुरक्षेच्या दृष्टीने नगर रचना व अग्निशमन विभागाची परवानगी घेतलेली नाही. सदर बाब विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने धोकादायक आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 81 (ब) (1) (ब) नुसार सदरील जागेची महानगरपालिकेस आवश्यकता आहे.

त्याअनुषंगाने मा. स्थायी समिती सभा ठराव क्र. 229, दि.20/02/2009 ठराव व करारनामा क्र. अगग/1/4126, दि.17.11.2009 रद्द करुन, पर्ल एज्युकेशन ॲन्ड वेलफेअर सोसायटी यांना भाडेतत्वावर देण्यात आलेला न.भु.क्र.13976/77, पैठणगेट येथील सादीया मार्केट व्यापारी संकुलाचा तळ मजला महागनरपालिकेच्या ताब्यात घेणेसाठी मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1988/2025:-</u> (यांत्रिकी विभाग)** **(दि.09.07.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर कार्यरत वाहन चालकांना शासन निर्णय वित्त विभाग के अकाग-1311 प्रक्र-0/सेवा-6 दि.09.09.2011 नुसार व कार्यालयीन जा.क्र./मनपा/आस्था-1/2011/1462 दि.18.10.2011 नुसार विहीत 09 तास 45 मिनिटाच्या कामाच्या वेळेपेक्षा जास्त काम केल्यास रु40.00 प्रतितास या दराने अतिकालीक भत्ता लागू करण्यात आलेला आहे.

शासन निर्णय क्रमांक अकाभ-2022/प्र.क्र-07/सेवा-6 दि.07.08.2023 अन्वये वाहन चालकांना 9 तास 45 मिनिटापेक्षा जास्त वेळ काम केल्यास व रविवार व सुट्टीच्या दिवशी सुध्दा काम केल्यास दर तासाला रु.100/- (अर्धातास किंवा जास्त काम केल्यास तो पूर्ण तास धरण्यात येईल) या प्रकारे अतिकालीक भत्ता मंजुर करण्यात आला आहे. तथापि, वाहनचालकास एक महिन्यात मिळणारी अतिकालीक भत्याची एकुण रक्कम त्याच्या एकुण पगाराच्या 30% पेक्षा जास्त असु नये अशी अट टाकण्यात आली आहे.

दि.7 ऑगस्ट 2023 च्या शासन निर्णयानुसार शासन निर्णयात समाविष्ठ अटीच्या अधिन राहुन छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील वाहनचालकांना 9 तास 45 मिनिटांपेक्षा जास्त काम केल्यास व रविवार व सुटीच्या दिवशी काम केल्यास प्रतितास रु.100/-अतिकालीक भत्ता देण्याचा व त्यासाठी लागणा-या वाढीव आर्थिक तरतुदीस मान्यता देण्याचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या समोर विचारार्थ सादर.

**<u>ठराव क्रमांक 1988/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर कार्यरत वाहन चालकांना शासन निर्णय वित्त विभाग क्र.अकाभ-1311 प्र.क्र.-9/सेवा-6 दि.09.09.2011 नुसार शासन निर्णयात समाविष्ठअटींच्या अधिन राहुन 9 तास 45 मिनिटापेक्षा जास्त काम केल्यास व सुट्टीच्या दिवशी काम केल्यास प्रतितास रु.100/- अतिकालीक भत्ता हा त्याच्या एकुण पगाराच्या 30% पेक्षा जास्त असु नये. या अटीच्या आधारे देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1989/2025:-</u> (कामगार विभाग)** **(दि.09.07.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, कार्यालयीन आदेश जा.क्र./मनपा/कामगार/2025/ दि.07.07.2025 नुसार छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका करणे कामी गठीत समितीची बैठक दि.08.07.2025 रोजी संपन्न झाली.

सद्यस्थितीत महानगरपालिकेत एकुण तीन एजन्सी (1) मे.महाराणा सेक्युरिटी ॲण्ड लेब सप्लायर्स (2) मे.गॅलक्सी मल्टी सर्व्हीसेस (3) मे.अशोक इंटरप्राईजेस यांचे मार्फत कार्यारंभ आदेश दि.25.09.2023 अन्व्ये सदर आदेशाच्या दिनांकापासुन पुढील तीन वर्षासाठी मनुष्यबळ पुरवठा करणेसाठी नियुक्ती करण्यात आलेली आहे.

मा.आयुक्त महोदयांनी बाह्यस्त्रोताद्वारे नियुक्त कार्यरत कर्मचारी यांच्या समवेत आढावा घेऊन त्यांच्या अडचणी जाणुन घेतल्या ज्यामध्ये कम्रचाऱ्यांचे EPF व ESIC एजन्सीने वेळच्या वेळी भरणा न केल्याचे एजन्सीकडे कर्मचाऱ्यांचे दोन महिन्यांचे वेतन देण्याची क्षमता असली पाहिजे अशी करारनाम्यातील अट असतांना देखील कर्मचाऱ्यांचे वेतन वेळेवर अदा न करणे आदी अनियमितता आढळून आल्या.

तसेच उक्त अनुषंगाने मुख्य लेखा परिक्षक यांनी माहे ऑक्टोंबर-2023 ते माहे डिसेंबर-2023 च्या कालावधीत अदा केलेल्या देयकांची तपासणी केली असता, सर्व संबंधीत एजन्सींना रक्कम अतिप्रदान झाल्याबाबत अहवाल सादर केला. या संदर्भाने कार्यालयामार्फत दि.22.04.2025 रोजी कारणे दाखवा नोटीस देण्यात आली व संबंधीत एजन्सीकडे निश्चित झालेली अतिप्रदान रक्कम भरणा न केल्यास कंत्राट रद्द करणे बाबत कळविण्यात आले.

या नोटीसच्या उत्तरादाखल मे.महाराणा सेक्युरिटी ॲण्ड लेबर सप्लायर्स यांनी मुख्य लेखा परिक्षकांचया अहवालाची प्रत मागवुन तीस दिवसांचा कालावधी मागितला. मे.अशोक एजन्सी यांनी फेर तपासणी करणे बाबत विनंती केली तर मे.गॅलक्सी इंटरप्राईजेस यांनी अतिप्रदान रक्कम भरण्यास पत्र देऊन सहमती दर्शविली.

दरम्यानच्या काळात राष्ट्रीय श्रमिक आघाडी यांचे निवेदनावर मा.उपाध्यक्ष महाराष्ट्र विधान सभा यांनी दि.11.06.2025 रोजी V.C. द्वारे बैठक घेऊन उपरोक्त तीन एजन्सींच्या अनियमिततेबाबत सुचना केल्या जसे की, एजन्सीने कर्मचाऱ्यांना किमान वेतन दरानुसार वेतन अदा करावे, कर्मचाऱ्यांचे EPF व ESIC वेळेवर भरणा करावा, एजन्सींनी बँक खात्याद्वारे कर्मचाऱ्यांचे वेतन अदा करुन त्याबाबतचा

तपशील महानगरपालिकेस सादर करावा व मनुष्यबळ सेवा पुरवठा करणाऱ्या एजन्सीचे मानधन Service Charge नुसार असणे बाबत सुचित केले.

सदरच्या बैठकीत एजन्सी मार्फत होत असलेल्या अनियमितते बाबत चर्चा होऊन सर्वानुमते पुढील प्रमाणे निर्णय घेण्यात आले.

1. सद्यस्थितीत कार्यरत एजन्सींचे कंत्राट रद्द करणे.
2. कार्यरत एजन्सींकडे अतिप्रदान झालेल्या रक्कमेची वसुली करणे, वसुली विहित मुदतीत न झाल्यास एजन्सी धारकाच्या मालमत्तांवर बोजा चढवून अतिप्रदान रक्कम वसुल करणे,
3. बाह्यस्त्रोता द्वारे मनुष्यबळ पुरवठा करण्यासाठी नव्याने निविदा प्रसिध्द करणे.

करीता, वरील प्रमाणे निविदा समितीने घेतलेले निर्णय मान्यतेसाठीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1989/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, निविदा समितीने घेतलेल्या निर्णयांना मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1990/2025:-</u> (आरोग्य विभाग)** **(दि.14.07.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, राज्यात केंद्र शासानाच्या जन्म व मृत्यु नोंदणी अधिनियम-1969 मधील अधिनियम सुधारणा-2023 नुसार करण्यात येते. तसेच महाराष्ट्र विवाह मंडळाचे विनियम आणि विवाह नोंदणी अधिनियम-1998 व महाराष्ट्र विवाह मंडळाचे विनियमआणि विवाह नोंदणी नियम-1999 करण्यात येते.

त्या अनुषंगाने छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेतर्फे झोन कार्यालय झोन क्र.01 ते 10 मार्फत जन्म व मृत्यु घडणाऱ्या घटना ज्या उपनिबंधक तथा सहाय्यक आयुक्त यांच्या कार्यक्षेत्रा अंतर्गत घडते. तेथील झोन कार्यालयात नोंदणी केली जाते. त्यानुसार जन्म व मृत्यु नोंदणी/प्रमाणपत्रे रितसर कागदपत्रांची पुर्तता करुन त्यांची खात्री करुन झोन कार्यालयामार्फत प्रमाणपत्रे वितरीत केले जाते. तसेच छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका तर्फे झोन कार्यालय झोन क्र.01 ते 10 मार्फत विवाह नोंदणी मनपाचे आरोग्य अधिकारी तथा विवाह निबंधक यांच्या मार्फत प्रमाणपत्रे वितरीत केले जाते.

राज्यात केंद्र शासनाच्या जन्म व मृत्यु नोंदणी अधिनियम-1969 व महाराष्ट्र राज्य जन्म व मृत्यु नोंदणी नियम-2000 करण्यात येत होते. त्या अधिनियम-1969 मधील कलम-13 नुसार जन्म-मृत्यु नोंदणीसाठी आकारण्यात येणारे शुल्क खालील प्रमाणे नमुद करण्यात येत आहे.

| **21 दिवसाचा आत** | **31 दवसानंतर पण 30 दिवसाच्या आत कलम 13 (1)** | **30 दिवसांनंतर परंतु 01 वर्षाच्या आत कलम 13 (2)** | **01 वर्षानंतर कलम 13 (3)** | **प्रमाणपत्र शुल्क** |
|---|---|---|---|---|
| मोफत | विलंब शुल्क रु.02/- | विलंब शुल्क रु.05/- | विलंब शुल्क रु.10/- | शुल्क रु.05/- |

वरील प्रमाणे शुल्क आकारण्यात येत होते.

केंद्र शासनाच्या जन्म व मृत्यु नोंदणी अधिनियम 1969 व अधिनियम सुधारणा 2023 मधील कलम 13 नुसार उशिरा नोंदणी सुधारित तरतुदीनुसार (नियम-09) अन्वये जन्म-मृत्यु नोंदणीसाठी आकारण्यात येणारे शुल्क खालील प्रमाणे नमुद करण्यात येत आहे.

| **30 दिवसाच्या आत कलम 13 (1)** | **30 दिवसांनंतर परंतु 01 वर्षाच्या आत कलम 13 (2)** | **01 वर्षा नंतर कलम 13 (3)** |
|---|---|---|
| विलंब शुल्क रु.20/- | विलंब शुल्क रु.50/- | विलंब शुल्क रु.100/- |

परंतु वरील शुल्काबाबत सुधारित नियम 2023-24 मध्ये प्रस्तावित आहेत. सुधारित नियम महाराष्ट्र शासनाने अद्याप आदेश/परिपत्रक पारित केलेले नाही. त्यामुळे हा नियम लागु झालेले नाही.

महाराष्ट्र शासनाने वरील शुल्काबाबत आदेश/परिपत्रक पारित केल्यानंतर अधिनियमातील तरतुदी नुसार शुल्क आकारणे बंधनकारक राहील.

संदर्भ क्र.03 नुसार मा.उपसचिव सामान्य प्रशासन विभाग यांचे शासन निर्णय नुसार ऑनलाईन सेवा केंद्रांवरुन देण्यात येणाऱ्या सेवांच्या दरात सुधारणा करण्यात आलेले आहे.

त्यानुषंगाने शहरातील नागरीकांना छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेमार्फत जन्म व मृत्यु नोंदणी व प्रमाणपत्र ऑनलाईन पध्दतीने सेवा देण्यात येणार असुन त्यासाठी नागरीकांकडून जन्म व मृत्यु नोंदणी व प्रमाणपत्र शुल्क खालील प्रमाणे आकारणे योग्य वाटते.

| **30 दिवसाच्या आत कलम 13 (1)** | **30 दिवसांनंतर परंतु 01 वर्षाच्या आत कलम 13 (2)** | **01 वर्षानंतर कलम 13 (3)** | **प्रमाणपत्र शुल्क** | **जास्ती प्रती साठी शुल्क** |
|---|---|---|---|---|
| विलंब शुल्क रु.70/- | विलंब शुल्क रु.100/- | विलंब शुल्क रु.150/- | शुल्क रु.50/- | शुल्क रु.50/- |

जन्म व मृत्यु प्रमाणपत्रात दुरुस्ती करावयाची असल्यास खालील प्रमाणे शुल्क आकारणे योग्य वाटते.

| **30 दिवसाच्या आत दुरुस्ती केल्यास** | **30 दिवसांनंतर परंतु 01 वर्षाच्या आत दुरुस्ती केल्यास** | **01 वर्षानंतर दुरुस्ती केल्यास** | **प्रमाणपत्र शुल्क** |
|---|---|---|---|
| शुल्क रु.50/- | शुल्क रु.100/- | शुल्क रु.150/- | शुल्क रु.50/- |

महाराष्ट्र विवाह मंडळाचे विनियम आणि विवाह नोंदणी अधिनियम-1998 व महाराष्ट्र विवाह मंडळाचे विनियम आणि विवाह नोंदणी नियम-1999 करण्यात येते. विवाह नोंदणी अधिनियमातील तरतुदीनुसार खालील प्रमाणे शुल्क आकारण्यात येत आहे.

| **नियम** | **बाब** | **शुल्क रुपये** |
|---|---|---|
| 5(2) | विवाह शास्त्रोक्त पध्दतीने झाल्याच्या दिनांकापासून 90 दिवसांच्या आत विवाह नोंदणी ज्ञापन सादर केल्यास आकारण्यात येणारे विवाह नोंदणी शुल्क | रु.150/- |
| 7(1) | विवाह शास्त्रोक्त पध्दतीने झाल्यानंतरच्या दिनांकापासून 90 दिवसांनंतर परंतु 1 वर्ष पुर्ण होण्यापुर्वी विवाह नोंदणी ज्ञापन सादर केल्यास आकारण्यात येणारे विवाह नोंदणी शुल्क | रु.100/- |
| 7(2) | विवाह शास्त्रोक्त पध्दतीने झाल्यानंतरच्या 01 वर्षाहुन व त्याहुन अधिक कालावधीने विवाह नोंदणी ज्ञापन सादर केल्यास आकारण्यात येणारे विवाह नोंदणी शुल्क | रु.200/- |
| 11(1) | विवाह नोंदवही तपासण्यासाठीच्या अर्जासाठी सोबत द्यावयाचे शुल्क | रु.15/- |
| 11(2) | विवाह नोंदवहीतील उतारांची प्रमाणित प्रत मिळविण्यासाठी अर्जासोबत द्यावयाचे शुल्क | रु.20/- |

वरील प्रमाणे शुल्क आकारण्यात येत आहे

त्यानुषंगाने शहरातील नागरीकांना छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेमार्फत विवाह नोंदणी व प्रमाणपत्र ऑनलाईन पध्दतीने सेवा देण्यात येणार असुन त्यासाठी नागरीकांकडून विवाह नोंदणी व प्रमाणपत्र शुल्क खालील प्रमाणे आकारणे योग्य वाटते.

| **नियम** | **बाब** | **शुल्क रुपये** |
|---|---|---|
| 5(2) | विवाह शास्त्रोक्त पध्दतीने झाल्याच्या दिनांकापासून 90 दिवसांच्या आत विवाह नोंदणी ज्ञापन सादर केल्यास आकारण्यात येणारे विवाह नोंदणी शुल्क | रु.100/- |
| 7(1) | विवाह शास्त्रोक्त पध्दतीने झाल्यानंतरच्या दिनांकापासून 90 दिवसांनंतर परंतु 1 वर्ष पुर्ण होण्यापुर्वी विवाह नोंदणी ज्ञापन सादर केल्यास आकारण्यात येणारे विवाह नोंदणी शुल्क | रु.150/- |
| 7(2) | विवाह शास्त्रोक्त पध्दतीने झाल्यानंतरच्या 01 वर्षाहुन व त्याहुन अधिक | रु.250/- |

| | | |
|---|---|---|
| | कालावधीने विवाह नोंदणी ज्ञापन सादर केल्यास आकारण्यात येणारे विवाह नोंदणी शुल्क | |
| 11(1) | विवाह नोंदवही तपासण्यासाठीच्या अर्जासाठी सोबत द्यावयाचे शुल्क | रु.30/- |
| 11(2) | विवाह नोंदवहीतील उतारांची प्रमाणित प्रत मिळविण्यासाठी अर्जासोबत द्यावयाचे शुल्क | रु.40/- |

वरील प्रस्तावित केल्यानुसार  जन्म व मृत्यु आणि विवाह नोंदणी/प्रमाणपत्र शुल्क वाढविणे बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 1990/2025:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,  शहरातील नागरीकांना छत्रपती संभाजीनगर महानगरपालिके मार्फत जन्म व मृत्यु नोंदणी व प्रामणपत्र ऑनलाईन पध्दतीने सेवा देण्यात येणार असुन त्यासाठी नागरीकांकडून जन्म व मृत्यु नोंदणी व प्रमाणपत्र शुल्क खालील प्रमाणे आकारणे योग्य  राहील.

| 30 दिवसाच्या आत कलम 13 (1) | 30 दिवसांनंतर परंतु 01 वर्षाच्या आत कलम 13 (2) | 01 वर्षानंतर कलम 13 (3) | प्रमाणपत्र शुल्क | जास्ती प्रती साठी शुल्क |
|---|---|---|---|---|
| विलंब शुल्क रु.70/- | विलंब शुल्क रु.100/- | विलंब शुल्क रु.150/- | विलंब शुल्क रु.50/- | विलंब शुल्क रु.50/- |

जन्म व मृत्यु प्रमाणपत्रात दुरुस्ती करावयाची असल्यास खालील प्रमाणे शुल्क आकारणे योग्य वाटते.

| 30 दिवसाच्या आत दुरुस्ती केल्यास | 30 दिवसांनंतर परंतु 01 वर्षाच्या आत दुरुस्ती केल्यास | 01 वर्षानंतर दुरुस्ती केल्यास | प्रमाणपत्र शुल्क |
|---|---|---|---|
| विलंब शुल्क रु.50/- | विलंब शुल्क रु.100/- | विलंब शुल्क रु.150/- | विलंब शुल्क रु.50/- |

तसेच शहरातील नागरीकांना छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेमार्फत विवाह नोंदणी व प्रमाणपत्र ऑनलाईन पध्दतीने सेवा देण्यात येणार असुन त्यासाठी नागरीकांकडून विवाह नोंदणी व प्रामणपत्र शुल्क खालील प्रमाणे आकारणे योग्य राहील.

| नियम | बाब | शुल्क रुपये |
|---|---|---|
| 5(2) | विवाह शास्त्रोक्त पध्दतीने झाल्याच्या दिनांकापासून 90 दिवसांच्या आत विवाह नोंदणी ज्ञापन सादर केल्यास आकारण्यात येणारे विवाह नोंदणी शुल्क | रु.100/- |
| 7(1) | विवाह शास्त्रोक्त पध्दतीने झाल्याच्या दिनांकापासून 90 दिवसांनंतर परंतु 1 वर्ष पुर्ण होण्यापुर्वी विवाह नोंदणी ज्ञापन सादर केल्यास आकारण्यात येणारे विवाह नोंदणी शुल्क | रु.150/- |
| 7(2) | विवाह शास्त्रोक्त पध्दतीने झाल्याच्या 01 वर्षाहुन व त्याहुन अधिक कालावधीने विवाह नोंदणी ज्ञापन सादर केल्यास आकारण्यात येणारे विवाह नोंदणी शुल्क | रु.250/- |
| 11(1) | विवाह नोंदवही तपासण्यासाठीच्या अर्जासाठी सोबत द्यावयाचे शुल्क | रु.30/- |
| 11(2) | विवाह नोंदवहीतील उतारांची प्रमाणित प्रत मिळविण्यासाठी अर्जासोबत द्यावयाचे शुल्क | रु.40/- |

वरील शासनाने निश्चित केलेल्या शुल्क CRS PORTAL वर भरणा करणे योग्य राहील. तसेच मनपाने निश्चित केलेले उर्वरित शुल्क झोन कार्यालयाचे लेखापाल येथे भरणा करणे योग्य राहील. करीता जन्म व मृत्यु आणि विवाह नोंदणी/प्रमाणपत्र शुल्क वाढविणेबाबत  मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1991/2025:-</u> (यांत्रिकी विभाग)** **(दि.14.07.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेकडे अधिकाऱ्यांच्या वापरासाठी एकुण 30 कार वाहने कार्यरत आहेत. कार्यरत 30 कार वाहनांपैकी 02 मांझा कार या सन 2011 व 08 बोलेरो/टाटा सुमो वाहने ही सन 2012 मध्ये खरेदी करण्यात आले असून, सदरील वाहने वारंवार नादुरुस्त होत आहेत. त्यामुळे अधिकारी यांना कार्यालयीन कामात अडथळा निर्माण होत असुन, वाहनांच्या देखभाल दुरुस्तीवर देखील जास्तीचा खर्च होत आहे. या व्यतिरिक्त ही वाहने आगामी 1 ते 1.5 वर्षात शासनाच्या नियमानुसार स्क्रैप देखील करावी लागणार आहेत.

उपरोक्त पार्श्वभुमी पाहता व विविध अधिकारी यांच्याकडुन होत असलेल्या मागणीचा विचार करता नवीन 10 वाहने खरेदी करणे आवश्यक आहे. महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभाग शासन निर्णय क वाहन 2024/प्र.क्र.11/विनियम दि. 02 फेब्रुवारी 2024 नुसार ज्या अधिकारी यांना वाहन अनुज्ञेय आहे त्यांना र.रु.4 लक्ष पर्यंत (वस्तु व सेवा करा शिवाय) वाहन खरेदी करता येऊ शकते. त्यानुषंगाने महिंद्रा या कंपनीच्या स्थानिक अधिकृत मे. रत्नप्रभा मोटर्स यांच्याकडुन बोलेरो वाहनांसाठी दरपत्रक मागविले असता, त्यांनी जीईएम पोर्टलच्या दरानुसार खालील प्रमाणे दरपत्रक सादर केले आहे.

| | | |
|---|---|---|
| 1) महिंद्रा बेलोरो निओ एन-4 (डिझेल) | | रुपये 7,60,763.36 |
| | 14% CGST | रुपये 1,06,506.87 |
| | 14% SGST | रुपये 1,06,506.87 |
| | 03% CESS | रुपये 22,822.90 |
| | एकुण | रुपये 9,96,600.00 |
| | Discount | रुपये 30.000.00 |
| | एकुण | रुपये 9,66,600.00 |

प्राप्त दरपत्रदरानुसार 10 बोलेरो वाहने खरेदी करण्यासाठी रुपये 96,66,000/-खर्च येणार आहे. महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र भांखस-2014 प्र.क्र. 82/ भाग-3/उद्योग-4 दि.1 डिसेंबर 2016 नुसार रुपये 1.00 कोटी पर्यन्तची मोटार वाहने (कार) खरेदी ही निविदा प्रक्रिया न राबविता वाहन उत्पादक/वितरक यांच्या दरपत्रका मार्फत खरेदी करण्याची मुभा आहे. त्यानुषंगाने मे.रत्नप्रभा मोटर्स यांच्याकडुन 10 बोलेरो वाहने रुपये 96,66,000/- रकमेत खरेदी करता येऊ शकतात. सदरील खर्च हा व्हेईकल लिष्टींग रॉयल्टी या मधुन प्राप्त झालेल्या रक्कमेतुन करण्यात येईल.

करीता 10 बोलेरो वाहने महिंद्रा कंपनीच्या स्थानिक अधिकृत मे. रत्नप्रभा मोटर्स यांच्याकडुन र.रु.96,66,000/- रक्कमेत खरेदी करण्यासाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1991/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रमाणे महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभाग शासन निर्णय क्र. वाहन 2024/प्र.क्र.11/विनियम दि. 02 फेब्रुवारी 2024 व उद्योग, उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र भांखस-2014/प्र.क्र82/भाग-3/उद्योग-4 दि.1 डिसेंबर 2016 च्या अधिन राहुन 10 बोलेरो वाहने महिंद्रा कंपनीच्या स्थानिक अधिकृत मे. रत्नप्रभा मोटर्स यांच्याकडुन रुपये 96,66,000/- रकमेत खरेदी करण्यासाठी मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1992/2025:-</u> (आरोग्य विभाग)** **(दि.15.07.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री.पद्माकर तुळशिराम बनसोडे, शिपाई, मा.आयुक्त कार्यालय यानी त्यांच्या पत्नी सौ.सुनिता पद्माकर बनसोडे, यांच्या आजारासाठी एम.जी.एम.रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर येथे उपचार घेतले असुन त्याकरीता र.रु.1,76,000/- इतका झालेल्या खर्चाची देयके सादर केलेली आहे.

श्री.पद्माकर बनसोडे, शिपाई, मा.आयुक्त दालन यांनी त्यांचे पत्नी सौ.सुनिता पद्माकर बनसोडे, यांच्या आजारावरील उपचाराचे विहित नमुन्यात माहितीसह सर्व आवश्यक कागदपत्राची पूर्तता केलेली

असुन (तीव्र उदर वेदना) या आजारावर उपचारार्थ एकुण र.रु.1,76,000/- इतका खर्च झाला आहे. तथापि, कार्यालयीन परिपत्रक दि.14.05.2013 चे अनुषंगाने कर्मचाऱ्यास वैद्यकीय परतावाचे उपचारा करीता शासन मान्य रुग्णालयाचे यादीत सदरील रुग्णालयाचे नाव समाविष्ठ नसल्याने संबंधीतास शासन निर्णया नुसार र.रु.1,00,000/- वैद्यकीय परतावा मंजुर करता येतो. सबब संबंधितास अनुज्ञेय र.रु.1,00,000/- वैद्यकीय परतावा म्हणून मंजुर करण्यात येऊन त्याचे 5% रक्कम मनपा फंडात जमा करुन उर्वरीत र.रु.95,000/- वैद्यकीय परतावा म्हणून मंजुर करणे योग्य. करीता मा. स्थायी समिती समोर मान्यतेस्तव तथा विचारार्थ प्रस्ताव सादर.

**ठराव क्रमांक 1992/2025:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.पदमाकर बनसोडे, शिपाई, मा. आयुक्त कार्यालय मनपा यांनी त्यांचे पत्नी सौ. सुनिता पदमाकर बनसोडे, यांच्या आजारावरील उपचाराचे विहित नमुन्यात माहितीसह सर्व आवश्यक कागदपत्राची पूर्तता केलेली असुन (तीव्र उदर वेदना) या आजारावर उपचारार्थ एकुण रक्कम रु. 1,76,000/- इतका खर्च झाला आहे. तथापि कार्यालयीन परिपत्रक दिनांक 14/05/2013 चे अनुषंगाने कर्मचा-यास वैद्यकीय परतावाचे उपचारा करीता शासन मान्य रुग्णालयाचे यादीत सदरील रुग्णालयाचे नाव समाविष्ठ नसल्याने संबंधीतास शासन निर्णयानुसार रक्कम रु.1,00,000/- वैद्यकीय परतावा मंजूर करता येतो. सबब संबंधितास अनुज्ञेय रक्कम रु.1,00,000/- वैद्यकीय परतावा म्हणुन मंजुर करण्यात येऊन त्याचे 5% रक्कम मनपा फंडात जमा करून उर्वरीत रक्कम रु. 95,000/- वैद्यकीय परतावा म्हणून मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1993/2025:- (उद्यान विभाग)** **(दि.18.07.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेचे सिडको एन-1 (पी. एफ कमिशनर ऑफीस समोर) येथे कपबशी उद्यान आहे. सदर उद्यानाची देखभाल दुरुस्ती व संगोपन कामाचे पालकत्व/प्रायोजकत्व मिळणे करीता श्री देविदास तुळजापुरकर, सदस्य सचिव, महाराष्ट्र स्टेट बँक इम्प्लाईस फेड्रेशन, फोर्ट, मुंबई-23 यांनी दि.10.02.2025 च्या अर्थान्वये महानगरपालिकेस प्रस्ताव दिला आहे.

करीता, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेचे सिडको एन-1 (पी.एफ.कमिशनर ऑफीस समोर) येथे कपबशी उद्यानाचा विकास, देखभाल दुरुस्ती व संगोपन कामाची परवानगी महाराष्ट्र स्टेट बैंक इम्प्लाईस फेड्रेशन, फोर्ट, मुंबई-23 यांना खालील अटी शर्तीस अधिन राहुन देण्याचे प्रस्तावीत करण्यात येते.

1. प्रायोजकत्व तीन वर्षासाठी देय राहील.
2. उद्यानाची देखभाल दुरुस्ती व संगोपन कामे स्वखर्चाने या संदर्भातील प्रचलीत कायदे पाळुन करण्याची जबाबदारी विकासकाची राहील.
3. उद्यानाची देखभाल दुरुस्ती व संगोपन करताना किरकोळ सर्वसाधारण स्वरुपाचे कोणतेही नागरिक करु शकतो. अशा स्वरुपाची कामे (उदा. स्वच्छता, शोभीवंत लहान स्वरुपाच्या झाडांची लागवड, संगोपन इ.) विकासकाने महानगरपालिकेच्या संबंधीत उद्यान सहाय्यक/कृषी सहाय्यक यांचे मार्गदर्शनाखाली करावीत.
4. मनुष्यबळ या करीता सर्व खर्च विकासक यांना करावा लागेल.
5. वृक्ष व हिरवळ व इतर साधन सामुग्री आणणे, लागवड करणे तसेच लागवडीसाठी लागणारे ओषधी, खत, कापणीचे साहित्य, मजुर यासाठी येणारा सर्व खर्च विकासकास करावा लागेल.
6. विकासकास उद्यानात कोणत्याही प्रकारे जाहीरात / फलक लावता येणार नाही.
7. विकासकास उद्यानाचे नाव बदलता येणार नाही.
8. प्रायोजकास उद्यानासाठी कोणतेही प्रवेश शुल्क आकारता येणार नाही. महानगरपालिकेने निर्धारीत केलेल्या वेळेत उद्यान जनतेसाठी खुले ठेवावे लागेल.
9. उद्यानात निर्माण होणा-या कच-याचे 'जैविक खत निर्माण करुन त्याचा वापर उद्यानासाठी करावा लागेल.

10. उक्त परिसरातील कामे करताना प्रचलीत कामगार कायदे पालनाची जबाबदारी विकासकावी राहील.
11. सदर पालकत्व हे अहस्तांतरणीय असून, विकासक सदर पालकत्व अन्य कोणाकडे ही हस्तांतरीत करु शकणार नाहीत.
12. सदर कामामुळे कोणाही नागरिकाची कोणत्याही प्रकारे राजकीय, सामाजिक अथवा धार्मिक भावना दुखावली जाणार नाही अशा प्रकारे जागेचा विकास/सौंदर्याकरण करावे लागेल.
13. विकासक यांना उक्त परिसराचा वापर कोणत्याही व्यापारी/आर्थिक फायद्यासाठी करता येणार नाही.
14. ठिकाण/परिसर विकसीत करताना सार्वजनिक वाहतूक नियमांचा भंग होणार नाही याची दक्षता विकासक यांनी घ्यावी.
15. विकासक यांच्या दि.10.02.2025 चा अर्ज/प्रस्तावातील बाब क्र.7 (Once this project taken final shape we can plan for permanent showcasing of product of SHG groups and sales counter also.) मान्य करता येणार नाही.
16. उक्त नमूद प्रयोजनासाठी विकासक पांना सदर परिसरांचे पालकत्व देण्यात येत असून, त्यावर त्यांचा मालकीहक्क राहणार नाही/देण्यात येणार नाही/सांगता येणार नाही. जागेची मालकी महानगरपालिकेची राहील.
17. करार कालावधीत कोणताही वांद उद्भवल्यास छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका आयुक्त यांचेकडे प्रकरण सादर करण्यात येईल व त्यांचा निर्णय अंतीम राहील तसेच तो उभय पक्षकारांना बंधनकारक राहील. न्यायीक स्वरुपाचे वादांसाठी छत्रपती संभाजीनगर न्यायीक क्षेत्र राहील.
18. कोणत्याही कारणावरुन विकासकाचे काम समाधानकारक न वाटल्यास कामात सुधारणा करण्या संदर्भात 2 महिन्याची नोटीस देण्यात येईल. तरीही कामात सुधारणा न झाल्यास एक महिन्याची नोटीस देऊन सदर करार संपुष्टात आणण्यात येईल.

करीता उक्त अटी शर्तीस अधीन राहून छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेचे सिडको एन-1 (पी.एफ.कमिशनर ऑफीस समोर) येथील कपबशी उद्यानाचा विकास, देखभाल दुरुस्ती व संगोपन कामाची सशर्त परवानगी विकासक श्री देविदास तुळजापुरकर, सदस्य सचिव, महाराष्ट्र स्टेट बँक इम्प्लाईस फेड्रेशन, फोर्ट, मुंबई-23 यांना देणे तसेच आवश्यकतेनुसार अटी/शर्ती मध्ये बदल करुन निर्णय घेणे व अनुषंगिक कार्यवाही करणेसाठी आयुक्त, महानगरपालिका यांना प्राधिकृत करण्यास मान्यता होणे बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1993/2025:-</u>**

प्रस्तावात सविस्तर दर्शविल्याप्रमाणे, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेचे सिडको एन-1 (पी.एफ.कमिशनर ऑफीस समोर) येथील कपबशी उद्यानाचा विकास, देखभाल दुरुस्ती व संगोपन कामाची सशर्त परवानगी विकासक श्री देविदास तुळजापुरकर सदस्य सचिव, महाराष्ट्र स्टेट बैंक इम्प्लाईस फेड्रेशन, फोर्ट, मुंबई-23 यांना देण्यास तसेच आवश्यकतेनुसार अटी/शर्ती मध्ये बदल करुन निर्णय घेणे व अनुषंगीक कार्यवाही करणेसाठी आयुक्त, महानगरपालिका यांना प्राधिकृत करण्यास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1994/2025:-</u> (मालमत्ता विभाग)** **(दि.18.07.2025)**

आयुक्त, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका प्रस्ताव सादर करीत आहे की, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिके मार्फत स्मशानभूमीमध्ये सेवा पुरविण्यात येते. तथापि, यामध्ये नागरिकांचा सहभाग असण्याच्या दृष्टीने सामाजिक संस्थेमार्फत स्मशानभूमीचा विकास करण्याचा महानगरपालिके चा मानस आहे.

पूर्वी मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.797, दि.20.06.2012 अन्वये शहरातील मुख्य रस्त्यावरील दुभाजक व वाहतुक बेटे यांचे नियमीत देखभाल दुरुस्तीसह विकास करणे आवश्यक असल्याने, यासाठी शहरातील उद्योजक, बँकेचे प्रतिनिधी, बिल्डर्स असोसिएशन, संस्था यांची प्रायोजक म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे.

याच धर्तीवर कैलासनगर स्मशानभूमीचा विकास करणे, देखभाल दुरुस्ती व त्यातुन नागरिकांना सुविधा मिळणेच्या दृष्टीने सदर स्मशानभूमी सामाजिक कार्याचा उद्देश असणाऱ्या संस्थेस विकास तथा देखभाल दुरुस्ती व नियमीतपणे नागरिकांना आवश्यक असलेल्या सुविधा देणे करीता नेमणुक करणे करीता स्वारस्य प्रगटन (E.O.I.) च्या अटी शर्ती खालील प्रमाणे

1. छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेमार्फत स्मशानभूमीमध्ये सेवा पुरविण्यात येते. तथापि, यामध्ये नागरिकांचा सहभाग असण्याच्या दृष्टीने सामाजिक संस्थेमार्फत स्मशानभूमीया विकास करण्याचा महानगरपालिकेचा मानस आहे. त्याअनुषंगाने स्वारस्य प्रगटन मागविण्यात येत आहे. स्मशानभूमीचा विकास करणेसाठी ना नफा ना तोटा अंतर्गत सेवाभावी कार्य करणाऱ्या पंजीकृत संस्थेस भाग घेता येईल.
2. स्मशानभूमीचा विकास व सौंदर्यीकरण करणेसाठी अग्निसंस्कार करणे करीता रोड, आकर्षक प्रवेशद्वार, आकर्षक लॅण्डस्केप, श्रध्दांजली वाहणे, करीता स्टेज, इ. सुविधेचा समावेश असणे आवश्यक राहील.
3. स्मशानभूमीमध्ये करण्यात येणाऱ्या विकासा संदर्भाने संपूर्ण विकासाच्या प्रारुप आराखडयाचे सादरीकरण करुन सर्वात उत्कृष्ठ विकास करणाऱ्या संस्थेची गुणवत्तेनुसार निवड करण्यात येईल.
4. स्मशानभूमी असलेले अग्निसंस्कार केंद्र सुस्थितीत ठेवणेची जबाबदारी स्वारस्य धारकावर राहील.
5. स्वारस्य धारक यांना कैलास नगर येथील स्मशानभूमीचा विकास व सौंदर्यीकरण करणेसाठी 30 वर्षा करीता पालकत्व देण्यात येईल.
6. स्मशानभूमीचा विकास व सौंदर्यीकरण करताना स्वच्छता, शोभिवंत लहान स्वरुपाच्या झाडांची लागवड इत्यादी वगळता इतर कोणतेही बांधकाम, धातूंची मोठी स्ट्रक्चर्स इत्याती उभारणेपूर्वी त्याचा आराखडा महानगरपालिकेकडून मंजूर करुन घ्यावा.
7. स्मशानभूमीचा विकास/सोदयीकरण कामी आवश्यक साहित्य, वस्तु, मनुष्यबळ या करीता सर्व खर्च स्वारस्य धारक करतील,
8. उक्त करार कालावधीत स्मशानभूमीचे कामे करताना प्रचलित कायदे पाळून करण्याची जबाबदारी स्वारस्य धारक यांची राहील.
9. स्मशानभूमीचे पालकत्व हे अहस्तांतरणीय असून, सदर पालकत्व स्वारस्य धारक हे अन्य कोणाकडेही हस्तांतरीत करता येणार नाही.
10. सदर स्मशानभूमीचा विकास/सौंदर्यीकरण पूर्ण झाल्यानंतर, सदर ठिकाणी त्यांना केवळ आपली संस्था/कंपनी फलक लावता येईल, आर्थिक उत्पन्न मिळविणेसाठी वा इतर कोणत्याही कारणास्तव त्रयस्थ संस्था/कंपनी/फर्म इत्यादीची जाहिरात फलक लावता येणार नाही. तसेच सौदीकरणामुळे कोणात्याही नागरिकांची कोणत्याही प्रकारे राजकीय/सामाजिक अथवा धार्मिक भावना दुखावले जाणार नाही. अशा प्रकारे जागेचा विकास/सौंदर्यीकरण करणे बंधनकारक राहील.
11. स्मशानभूमीच्या परिसराचा वापर कोणालाही व्यापारी/आर्थिक फायद्यासाठी करता येणार नाही
12. स्मशानभूमीचे विद्युत देयक स्वारस्यधारक यांना भरणा करावा लागेल.
13. ठिकाण/परिसर विकसित करतांना सार्वजनिक वाहतूक नियमांचा भंग होणार नाही याची दक्षता यावी, आवश्यकतेनुसार शहर वाहतूक पोलीस यांचे ना हरकत पत्र घ्यावे. त्यास्तव स्वारस्य धारक यांना सहकार्य केले जाईल.
14. सदर परिसर/स्मशानभूमी केवळ वर नमूद प्रयोजनासाठी दत्तक देण्यात येत असून, त्यावर स्वारस्य धारक यांना मालकी हक्क राहणार नाही/देण्यात येणार नाही. सांगता येणार नाही.
15. स्मशानभूमी मधोल दहन/दफनविधी करणे कामी स्मशानजोगी व इतर कर्मचाऱ्यांचा व्यवस्था महानगरपालिकेमार्फत करण्यात येईल.
16. स्मशान परवाना, मृत्यूची नोंद ठेवणे. सदर व्यवस्था महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांमार्फत करण्यात येईल, या कामांमध्ये स्वारस्य धारक यांना हस्तक्षेप राहणार नाही.
17. स्मशानभूमीमध्ये कोणतही रक्कम आकारण्याचा/वसूल करायाचा अधिकार राहणार नाही

18. श्रध्दांजली सभा, भावभक्ती गीते याकरीता ध्वनी प्रक्षेपण व्यवस्था उपलब्ध करुन देणे व या करीता ची व्यवस्था करणे स्वारस्य धारक यांना बंधनकारक राहील.
19. स्मशानभूमीमध्ये पुरविलेल्या सर्व साहित्याची मालकी नेहमी करीता महानगरपालिकेची राहोल, यासाठी महानगरपालिका कोणताही खर्च/देय करणार नाही.
20. वृक्ष व हिरवाळ व इतर साधन सामुग्री आणणे, लागवड करणे, तसेच लागवडीसाठी लागणारे औषधी, खत, कापणीचे साहित्य, मजुर यासाठी येणारा खर्च स्वारस्य धारक यांना करावा लागेल.
21. स्मशानभूमीमध्ये अस्थि ठेवणे करीता लॉकरची व्यवस्था करणे आवश्यक राहील.
22. करण्यात येणाऱ्या बांधकाम संदर्भाने काही अपघात झाल्यास, त्याची सर्वस्वी जबाबदारी संस्थेची राहील. त्यास महानगरपालिका कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही.
23. नमूद केलेल्या कामांव्यतिरिक्त इतर कोणतेही काम महानगरपालिकेच्या परवानगी शिवाय करता येणार नाही.
24. करार कालावधीत कोणताही वाद उद्‌भवल्यास छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका आयुक्त यांचेकडे प्रकरण सादर करण्यात येईल व त्यांचा निर्णय अंतिम राहील आणि तो उभय स्वारस्य धारक यांना बंधनकारक राहील, न्यायीक स्वरुपाचे वादांसाठी औरंगाबाद न्यायीक क्षेत्र राहील,
25. कोणत्याही कारणावरुन महानगरपालिकेस काम समाधानकारक न वाटल्यास कामात सुधारणा करणे संदर्भात 03 महिन्यांची नोटीस देण्यात येईल, तरीही कामात सुधारणा न झाल्यास एक महिन्याची नोटीस देऊन सदर करार संपुष्टात आणण्यात येईल.

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या मालकीच्या व ताब्यातील कैलासनगर स्मशानभूमीचा विकास, सौंदर्यीकरणा व भविष्यामध्ये देखभाल दुरुस्ती करीता स्वारस्य (E.O.I.) प्रस्ताव मागविणे बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव तथा मंजुरीस्तव सविनय सादर.

**<u>ठराव क्रमांक 1994/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या मालकीच्या व ताब्यातील कैलासनगर स्मशानभूमीचा विकास, सौंदर्यीकरण व भविष्यामध्ये देखभाल दुरुस्ती करोता 30 वर्षापेक्षा अधिक नसेल, इतक्या कालावधी करीता स्वारस्य (E.O.I.) प्रस्ताव मागविणे बाबतचा प्रस्ताव मागविणे साठी मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1995/2025:-</u>** **(मालमत्ता विभाग)** **(दि.26.05.2025)**

आयुक्त, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका प्रस्ताव सादर करीत आहे की, सिडको कार्यालयाकडून छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेकडे हस्तांतरीत झालेल्या सिडको एन-7 रामलिला मैदान समोरील उर्वरीत 744.00 चौ.मी.खुली जागा "आम्हाला खेळू द्या" अभियाना अंतर्गत जागा भाडेतत्वावर देणेसाठी मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.1831, दि.25.02.2025 अन्वये मान्यता झाली आहे.

त्याअनुषंगाने स्वारस्य प्रगटन मागविण्यात आले असता त्यात दोन स्वारस्य धारकांनी सहभाग घेतला आहे. 1. श्री.विक्रमसिंग राजेंद्र जाधव, 2. श्री.ऋतुपर्ण भाम्परवी कुलकर्णी प्राप्त दोन स्वारस्य धारक पैकी श्री.विक्रमसिंग राजेंद्र जाधव यांनी दि.02.04.2025 रोजी सादरीकरण केले. प्राप्त दोन स्वारस्य धारकांचे आर्थीक बिठ खुले करण्यात आले असून त्याचा तपशील खालील प्रमाणे

| अ.क्र. | निविदा धारकाचे नांव | स्वारस्य प्रगटनात प्राप्त दर |
|---|---|---|
| 1 | श्री.विक्रमसिंग राजेंद्र जाधव | रु.2,00,000/- |
| 2 | श्री.ऋतुपर्ण भाग्यरवी कुलकर्णी | रु.1,70,000/- |

स्वारस्य प्रगटनात सर्वाधिक दर नमुद करणारे श्री.विक्रमसिंग राजेंद्र जाधव यांच्या समवेत दि.30.05.2025 रोजी दुपारी 12:30 वाटा घाटीची बैठक संपन्न झाली.

बैठकी अंती असे निदर्शनास आले की, रामलीला मैदान समोरील एकूण 1673 चौ.मी. मैदान पैकी 929 चौ.मी. जागा प्रती वर्ष र.रु.10,89,890/- अन्वये श्री.विक्रम राजेंद्र जाधव यांना भाडेतत्वावर देण्यात आली आहे. बांधकाम परवानगी प्रमाणे जागेच्या 10 टक्के बांधकामात संबंधिताचा प्रकल्प तयार होत नाही. बांधकाम परवानगी प्रमाणे जागेच्या 10 टक्के बांधकाम अनुज्ञेय असल्याची बाब विचारात

घेता एकूण जागा 1673 चौ.मी. च्या 10 टक्के म्हणजेच 1673 चौ.मी.क्षेत्रफळावर बांधकाम संबंधितास अनुज्ञेय असेल.

त्याअनुषंगाने एकूण क्षेत्रफळ 1673 चौ.मी. पासून संबंधिताकडून एकूण र.रु.12,89,890/- प्रात्प होईल. करीता श्री.विक्रमसींग जाधव यांना 744 चौ.मी. मैदान प्रती वर्ष र.रु.200,000/- प्रमाणे भाडे आकारणी करुन त्यांच्या सोबत 10 वर्षाचा करारनामा करणेसाठीचा प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1995/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, रामलीला मैदान समोरील एकूण 1673 चौ.मी मैदान पैकी 929 चौ.मी. जागा प्रती वर्ष र.रु.10,89,890/- अन्वये श्री.विक्रम राजेंद्र जाधव यांना भाडेतत्वावर देण्यात आली आहे. बांधकाम परवानगीची बाब विचारात घेता एकूण जागा 1673 चौ.मी. च्या 10 टक्के म्हणजेच 1673 चौ. मी. क्षेत्रफळावर बांधकाम संबंधितास अनुज्ञेय असेत.

त्याअनुषंगाने एकूण क्षेत्रफळ 1673 चौ.मी. पासून संबंधिताकडून एकूण र.रु.12,89,890/- प्राप्त होईल. करीता श्री.विक्रमसींग जाधव यांना 744 चौ.मी.मैदान प्रती वर्ष र.रु.2,00,000/- प्रमाणे भाडे आकारणी करुन त्यांच्या सोबत 10 वर्षाचा करारनामा करणेसाठीचा प्रस्ताव विचारार्थ मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1996/2025:-</u> (कार्यकारी अभियंता रस्ते विभाग)** **(दि.21.07.2025)**

आयुक्त, महानगरपालिका प्रस्ताव सादर करीत आहे की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 79 नुसार छत्रपती संभाजीनगर महानगरपालिके ची कांचनवाडी येथील गट क्र.07 व 08 मध्ये महानगरपालिकेची 2000 चौ.मी.जागा असून, या जागेवर महानगरपालिका वॉर्ड कार्यालया करीता इमारत बांधल्यामुळे पूर्ण FSI चा वापर होत नाही.

त्याअनुषंगाने सामाजिक संस्थेमार्फत महानगरपालिका इमारतीचे किमान 650.00 चौ.मी. क्षेत्राची जागा बांधकाम करुन घेऊन, उर्वरित बांधीव क्षेत्रामध्ये सामाजिक संस्थेस सामाजिक कार्य करणे करीता जागा भाडेतत्वावर देणेसाठी इच्छुक पंजीकृत सामाजिक संस्थेकडून यांच्याकडून स्वारस्य प्रगटन (E.O.I.) मागविणे बावतचा प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव तथा सादर.

**<u>ठराव क्रमांक 1996/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेची कांचनवाडी येथील गट क्र.07 व 08 मधील 2000 चौ.मी. जागामध्ये पंजीकृत सामाजिक संस्थेमार्फत महानगरपालिका इमारतीचे किमान 650.00 चौ.मी. क्षेत्राचे बांधकाम करुन घेऊन, उर्वरित बांधीव क्षेत्रामध्ये सामाजिक संस्थेस सामाजिक कार्य करणे करोता जागा इच्छुक पंजीकृत सामाजिक संस्था यांना स्वारस्य प्रगटनाव्दारे (E.O.I.) भाडेतत्वावर देणेसाठी मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1997/2025:-</u> (कार्यकारी अभियंता रस्ते विभाग)** **(दि.21.07.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.13 भिमनगर (उत्तर) अंतर्गत साकेतनगर, पेठेनगर मंजूर रेखांकनातील रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटींग करणे या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या राज्य दरसुची सन 2022-23 नुसार र.रु.79,78,115/-(18% GST सह) चे तयार करण्यात आले आहे. यास मा.सर्वसाधारण सभा मंजुर ठराव क्र.1813/2025. दि.12.02.2025 अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. यानुसार निविदा र.रु.64,38,926/- च्या मर्यादित ई-निविदा प्रसिध्द करण्यात आली असता, यामध्ये पात्र L1 निविदाधारक मे.पद्मावती कन्स्ट्रक्शन, कंत्राटदार हे असून त्यांनी भरणा केलेले दर हे मंजुर निविदा रक्कमेपेक्षा 35.99% कमी दराने म्हणजेच र.रु.40,09,983.26/-(GST वगळून) चे प्राप्त असून सदर काम संबंधीत कंत्राटदारा कडून करुन घेणेस व करार करण्यास मा.स्थायी समिती सभा, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेची मान्यता घेणे आवश्यक आहे.

संदर्भ :- टेन्डर क्र.आय.डी. 2025_AMCA_1165232_01. सन 2025-2026

| | | |
|---|---|---|
| 1. | खात्याचे नाव | उप अभियंता झोन क्र.01 |
| 2. | कामाचे स्वरुप | वॉर्ड क्र.13 भीमनगर (उत्तर) अंतर्गत |

| | | |
|---|---|---|
| | | साकेतनगर, पेठेनगर मंजुर रेखांकनातील रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे बाबत. |
| 3. | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रक्कमेचे मान्यतेचे ठराव? | होय, मा. सर्वसाधारण सभा मंजुर ठराव क्र. 1813/2025 दि.12.02.2025 नुसार र.रु.79,78,115/- यास प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. |
| | आ) त्यापैकी किती रक्कमेचे टेंडर मागविण्यात आले? | र.रु.64,38, 926/- |
| 4. | ज्या वृत्तपत्रात जाहिरात देण्यात आली होती त्यांची नावे व प्रसिध्दीची दिनांक | • संकेतस्थळ-महा-ई-टेंडर<br>• प्रसिध्दी दि.19.03.2025 |
| 5. | अ) टेंडर स्विकारण्याची मुदत दिनांक | दि.26.03.2025 ते दि.02.04.2025 |
| | ब) टेंडर उघडल्याचा दिनांक | दि.17.06.2025 |
| 6. | टेंडर किती वेळेस मागविल्या? | प्रथम |
| 7. | एकुण किती टेंडर आल्या? | 04 (चार) |

(त्यापैकी पात्र टेंडरदाराची माहिती )

| अ. क्र. | **ठेकेदाराचे नाव व पत्ता** | टेंडर **रक्कम रुपये** | **पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त** |
|---|---|---|---|
| 1. | सहारा कन्स्ट्रक्शन | र.रु.46,35,192.34/- | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 26.04% कमी दराने |
| 2. | प्रियंका नावंदर | र.रु.61,95,082.72/- | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 1.11% कमी दराने |
| 3. | मे.गुदगे कन्स्ट्रक्शन | र.रु.50,61,812.96/- | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 19.20% कमी दराने |
| 4. | पद्मावती कन्स्ट्रक्शन | र.रु.40,09,983.26/- | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 35.99% कमी दराने |

| | | | |
|---|---|---|---|
| 7. | सर्वात कमी रक्कमेच्या निविदेची शिफारस करण्यात आली आहे काय? | | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | | होय |
| | ब) जास्त दराच्या निविदेची शिफारस करण्यात आली आहे काय? असल्यास कारणे नमुद करावीत. | | नाही |
| 8. | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमुद करावे. | अर्थसंकल्प सन 2025-26 पान क्र.E-40 अनु.क्र.02 मधील लेखाशिर्ष :विकास योजनेअंतर्गत रस्ते मजबुती करणे अंतर्गत उपलब्ध तरतुद र.रु.48.51 कोटी निधी मधुन | |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | | होय |
| 9. | सदरचे काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | | ---- |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा केली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर- पान क्रमांक द्यावा) | | ---- |
| 10. | सोबत मान्य पूर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे? | | होय |

तरी उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे नमुद कामाचे L1 निविदाधारक मे.पद्मावती कन्स्ट्रक्शन, कंत्राटदार, छत्रपती संभाजीनगर यांची निविदा मंजुद निविदा रक्कमेपेक्षा 35.99% कमी दराची म्हणजेच निविदा र.रु.40,09,983.26/- (जीएसटी वगळून) ची असुन त्यांची निविदा मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

**<u>ठराव क्रमांक 1997/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.13 भिमनगर (उत्तर) अंतर्गत साकेतनगर, पेठेनगर मंजुर रेखांकनातील रस्त्याचे सिमेंट कॉंक्रोटीग करणे या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या राज्य दरसूची सन 2022-23 नुसार र.रु.79,78,115/- (18% GST सह) चे तयार करण्यात

आले आहे. सदर कामासाठी L1 निविदाधारक मे.पद्मावती कन्स्ट्रक्शन, कंत्राटदार हे असून त्यांनी भरणा केलेले दर हे मंजूर निविदा रक्कमेपेक्षा 35.99% कमी दराने म्हणजेच र.रु.40,09,983.26/- (GST वगळून) चे प्राप्त असून सदर निविदेत बाबतच्या प्रस्तावास मान्यता व तद्नुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1998/2025:-</u>** **(कार्यकारी अभियंता रस्ते विभाग)** **(दि.21.07.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.13 भिमनगर, भावसिंगपूरा (उत्तर) अंतर्गत जेतवन कॉलनी येथे पोहोच रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या राज्य दरसूची सन 2022-23 नुसार र.रु.55,13,753/- (18% GST सह) चे तयार करण्यात आले आहे. यास मा. सर्वसाधारण सभा मंजुर ठराव क्र.1813/2025, दि.12.02.2025 अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. यानुसार निविदा र.रु.45,66,239/- च्या मर्यादित ई-निविदा प्रसिध्द करण्यात आली असता यामध्ये पात्र L1 निविदाधारक मे.पद्मावती कन्स्ट्रक्शन, कंत्राटदार हे असून त्यांनी भरणा केलेले दर हे मंजूर निविदा रक्कमेपेक्षा 36.51% कमी दराने म्हणजेच र.रु.27,80,449.95/- (GST वगळून) चे प्राप्त असून सदर काम संबधीत कंत्राटदाराकडून करुन घेणेस व करार करण्यास मा. स्थायी समिती सभा, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेची मान्यता घेणे आवश्यक आहे.

संदर्भ: टेन्डर क्र.आय.डी. 2025_AMCA_1165213_01. सन 2025-2026 मान्यतेस्तव सादर.

| | | |
|---|---|---|
| 1. | खात्याचे नाव | उप अभियंता झोन क्र.01 |
| 2. | कामाचे स्वरुप | वॉर्ड क्र.13 भीमनगर, भावसिंगपुरा (उत्तर) अंतर्गत जेतवन कॉलनी येथे पोहोच रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटी करण करणे बाबत. |
| 3. | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रक्कमेचे मान्यतेचे ठराव? | होय, मा. सर्वसाधारण सभा मंजुर ठराव क्र. क्र.1813/2025 दि.12.02.2025 नुसार र.रु.55,13,753/- यास प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. |
| | आ) त्यापैकी किती रक्कमेचे टेंडर मागविण्यात आले? | र.रु.45,66,239/- |
| 4. | ज्या वृत्तपत्रात जाहिरात देण्यात आली होती त्यांची नावे व प्रसिध्दीची दिनांक | • संकेतस्थळ-महा-ई-टेंडर<br>• प्रसिध्दी दि.19.03.2025 |
| 5. | अ) टेंडर स्विकारण्याची मुदत | दि.26.03.2025 ते दि.02.04.2025 |
| | ब) टेंडर उघडल्याचा दिनांक | दि.17.06.2025 |
| 6. | टेंडर किती वेळेस मागविल्या? | प्रथम |
| 7. | एकुण किती टेंडर आल्या? | 04 (चार) |

(त्यापैकी पात्र टेंडरदाराची माहिती )

| अ. क्र. | ठेकेदाराचे नाव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त |
|---|---|---|---|
| 1. | सहारा कन्स्ट्रक्शन | र.रु.32,40,281.80/- | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 26.01% कमी दराने |
| 2. | प्रियंका नावंदर | र.रु.43,30,740.20/- | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 1.11% कमी दराने |
| 3. | पद्मावती कन्स्ट्रक्शन | र.रु.27,80,449.95/- | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 36.51% कमी दराने |
| 4. | नंदकिशोर सखाराम कोडे | ररु.49,06,994.30/- | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 10.79% कमी दराने |

| | | |
|---|---|---|
| 7. | सर्वात कमी रक्कमेच्या निविदेची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या निविदेची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |

| | | | |
|---|---|---|---|
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | | ---- |
| 8. | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमुद करावे. | अर्थसंकल्प सन 2025-26 पान क्र.E-40 अनु.क्र.02 मधील लेखाशिर्ष :विकास योजनेअंतर्गत रस्ते मजबुती करणे अंतर्गत उपलब्ध तरतुद र.रु.48.51 कोटी निधी मधुन | |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | | होय |
| 9. | सदरचे काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | | ---- |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा केली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर- पान क्रमांक द्यावा) | | ---- |
| 10. | सोबत मान्य पूर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे? | | होय |
| तरी उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे नमुद कामाचे L1 निविदाधारक मे.पद्मावती कन्स्ट्रक्शन, कंत्राटदार, छत्रपती संभाजीनगर यांची निविदा मंजुद निविदा रक्कमेपेक्षा 36.51% कमी दराची म्हणजेच निविदा र.रु.27,80,449.95/- (GST वगळून) ची असुन त्यांची निविदा मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव व विचारार्थ सादर. | | | |

**ठराव क्रमांक 1998/2025:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र. 13 भिमनगर, भावसिंगपूरा (उत्तर) अंतर्गत जेतवन कॉलनी येथे पोहोच रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या राज्य दरसुची सन 2022-23 नुसार र.रु.55,13,753/- (18% GST सह) चे तयार करण्यात आले आहे. सदर कामासाठी L1 निविदाधारक मे.पद्मावती कन्स्ट्रक्शान, कंत्राटदार हे असून त्यांनी भरणा केलेले दर हे मंजूर निविदा रक्कमेपेक्षा 36.51% कमी दराने म्हणजेच र.रु.27,80,449.95/- (GST वगळून) चे प्राप्त असून सदर निविदेत बाबतच्या प्रस्तावास मान्यता व तद्नुषंगाने पुढील कार्यवाही मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1999/2025:-** **(कार्यकारी अभियंता, ड्रेनेज व इमारत विभाग)** **(दि.21.07.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या स्थापत्य विषयक कामात जसे की, रस्ते, पुल व इमारतीच्या संकल्पनांसाठी, बांधकामासाठी अपुऱ्या तांत्रिक कर्मचारी संख्येमुळे अथवा काही प्रसंगी गुंतागुंतीचे तांत्रिक प्रश्न, आधुनिक तंत्रज्ञानाची गरज, पर्यावरण विषयक अभ्यास व तत्सम बाबी, सुसाध्यतेची पडताळणी, संशोधनात्मक अभ्यास तसेच खाजगीकरणातून करावयाच्या प्रकल्पांसाठी कायदेविषयक, अर्थविषयक अन्वेषण अशा बाबीसाठी सल्लागार किंवा तज्ञ नेमण्याची आवश्यकता भासते. त्यानुषंगाने विषय क्र.902/2023 दि.08.08.2023 नुसार, ठराव क्र.1442/2024 दि.25.06.2024, ठराव क्र.1477/2024 दि.10.07.2024, ठराव क्र.1621/2024 दि.01.10.2024 व ठराव क्र.1961/2025 दि.23.06.2025 अन्वये नियुक्तीबाबत ठराव मंजुर करण्यात आले आहेत.

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेने शासन निर्णयातील 2.1.1 सर्वसाधारण सल्लगार सेवा साठी महापालिका कार्यक्षेत्रासाठी नामिका प्रवेशाकरीता (Empanelment) सल्लागारांकडून जाहीर प्रस्तावाद्वारे विहीत नमुन्यात माहिती मागवून वर्गनिहाय सल्लागार सुची तयार करण्यासाठी निविदा सुचना क्र.2023_AMCA_9187851 अन्वये महानगरपालिकेस आवश्यक असलेल्या खालील 10 बाबी साठी पीएमसी/आर्किटेक्ट व इतर सल्लागार तज्ञांची नियुक्ती पाच वर्षासाठी करण्याकरीता RFQ निविदा मागविण्यात आल्या होत्या.

| Sr.No. | Consultancy Services |
|---|---|
| 11. | Structural Designer (Building) |
| 12. | Structural Designer (Road) |
| 13. | Road/Bridge Survey, design drawing levelling and surveying Expert |
| 14. | Architect |
| 15. | Landscaping Designer, Gardening Horticulture |

| | |
|---|---|
| 16. | Mechanical, Electrical and Plumbing (MEP) & Heating, Ventilation & Air Conditioning (HVAC) Consultant. |
| 17. | Green Building Consultants With Rainwater Harvesting |
| 18. | Water Supply, Sanitary and Sewage Treatment Consultant |
| 19. | H.A.M./P.P.P. Project Specialist /Annuity/Annuity & Toll/ V.G.f. Consultant |
| 20. | Quantity Survey and Valuer Expert |

यासाठी मागविण्यात आलेल्या निविदेच्या अनुषंगाने व तद्नंतर प्राप्त प्रस्तावांबाबत निविदेतील अटी शर्तीनुसार छाननी करुन त्या-त्या सर्विसेससाठी नियुक्त करण्यात आलेल्या कन्स्लटंटची संख्या खालील प्रमाणे आहेत.

| Sr. No. | Consultancy Service | ठराव क्र.902/2023 दि.08.08.2023 अन्वये नियुक्त | ठराव क्र.1442/2024 दि.25.06.2024 अन्वये नियुक्त | ठराव क्र.1477/2024 दि.10.07.2024 अन्वये नियुक्त | ठराव क्र.1621/2024 दि.01.10.2024 अन्वये नियुक्त | ठराव क्र.1908/2024 दि.07.05.2025 अन्वये नियुक्त | ठराव क्र.1961/2024 दि.26.06.2025 अन्वये नियुक्त |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 12. | Structural Designer (Building) | 10 | 1 | -- | -- | -- | -- |
| 13. | Structural Designer (Road) | 9 | 1 | -- | -- | -- | -- |
| 14. | Road/Bridge Survey, Design Drqwing Levelling snd Surveying Expert | 21 | 1 | -- | -- | -- | -- |
| 15. | Architect | 27 | 4 | 1 | 2 | 4 | -- |
| 16. | Landscaping Designer, Garadeninig | 16 | 1 | -- | -- | 1 | 1 |
| 17. | Mechanical, Electrical and Plumbing (MEP) & Heating, Ventilation & Air Conditioning | 06 | 0 | -- | -- | -- | -- |
| 18. | Green Building Consultants | 02 | 1 | -- | -- | -- | -- |
| 19. | Water Supply, Sanitary and Sewage Treatment | 14 | 0 | -- | -- | -- | -- |
| 20. | H.A.M./P.P.P. Project Specialist / Annuity/ Annuity & Toll/V.G.F. | 06 | 0 | -- | -- | -- | -- |
| 21. | Quantity Survey and Valuer Expert | 15 | 0 | -- | -- | -- | -- |
| 22. | Survery | -- | -- | -- | -- | 1 | -- |

सदर पात्र ठरलेल्या प्रकल्प सल्लागाराच्या नियुक्तीस ठराव क्र.902/2023 दि.08.08.2023 ठराव क्र.1442/2024 दि.25.06.2024, ठराव क्र.1477/2024 दि.10.07.2024, ठराव क्र.1621/2024 दि.01.10.02024, ठराव क्र.1908/2024 दि.07.05.2024 व ठराव क्र.1961/2025 दि.23.06.2025 नुसार मंजुरी प्राप्त झाल्यानंतर या प्रकल्प सल्लागारांना नियुक्तीचे पत्र देण्यात आली आहेत. परंतु त्यानंतर SBS & ASSOCIATES यांचा Architect, Structural Designer, Landscape Designer स्वरुपाने प्रकल्प सल्लागार सुचीमध्ये समाविष्ट करण्याकरीता विनंती अर्ज सादर केला आहे.

करीता, SBS & ASSOCIATES यांचा अनुभव लक्षात घेऊन त्यांना महानगरपालिकेमार्फत येणाऱ्या विविध प्रकल्पांसाठी प्रकल्प सल्लागार सुचीमध्ये Architect, Structural Designer, Landscape Designer स्वरुपाने समाविष्ठ करणे योग्य वाटते. यापुर्वीच्या मंजुर ठरावानुसार सल्लागारांची कन्सल्टन्सी चार्जेस म्हणुन साठी Pre Tender Activity साठी Projecat Cost च्या 0.60% व Post Tender Activity साठी Project Cost च्या 0.90% एकुण Proaject cast च्या

1.50% मर्यादेत शुल्क अदा करण्यात येतील. करीता छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या सल्लागारांची निवडसुचीत SBS & Associates यांचा Architect, Structural Designer, Landscape Designer स्वरुपाने समावेश करण्यास मान्यतेचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 1999/2025:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, उपरोक्त नमुद केल्यानुसार SBS & Associates यांचा अनुभव लक्षात घेऊन त्यांना महानगरपालिकेमार्फत येणाऱ्या विविध प्रकल्पांसाठी प्रकल्प सल्लागार सुचीमध्ये Architect, Structural Designer, Landscape Designer स्वरुपाने समाविष्ट करणे योग्य वाटते. यापूर्वीच्या मंजूर ठरावानुसार सल्लागारांची कन्सल्टन्सी चार्जेस म्हणून Pre Tender Activity साठी Project Cost च्या 0.60% व Post tender Activity साठी Project Cost च्या 0.90% असे एकुण Project Cost च्या 1.50% च्या मर्यादेत शुल्क अदा करण्यात येतील, करीता छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या सल्लागारांची निवडसूचीत SBS & Associates यांचा Architect, Structural Designer, Landscape Designer स्वरुपाने समावेश करण्यास मान्यतेचा प्रस्तावास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 2000/2025:- (यांत्रिकी विभाग)** **(दि.21.07.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, 15 व्या वित्त आयोगाच्या राष्ट्रीय शुध्द हवा कार्यक्रम अंतर्गत प्राप्त शासन निधीतुन शहरातील विविध मुख्य चौक आणि उद्यानांमध्ये कारंज्यांची उभारणी करण्यात आली आहे. या मध्ये (1) जुना मोंढा चौक (2) दमडी महल (3) रंगीन गेट (4) एन-1 पिरॅमिड (5) सिडको उड्डाणपुल (6) एन-7 सिडको छत्रपती शिवाजी महाराज पुतळा (7) रेल्वे स्टेशन (8) सिध्दार्थ गार्डन संगीत कारंजा (9) नेहरु बाल उद्यान, दिल्लीगेट (10) डॉ.सलिम अली उद्यान (11) स्वामी विवेकानंद उद्यान (12) धुत हॉस्पीटल (13) महावीर चौक बाबा सर्कल (14) हर्सुल टी पॉईंट इत्यादी ठिकाणी कारंजे उभारण्यात आले आहे. सदर कारंजाचा देखभाल दुरुस्तीचा कालावधी मार्च 2025 मध्ये संपुष्टात आला आहे.

उक्त कारंजाची पुढील तीन वर्षांसाठी देखभाल दुरुस्ती व कार्यान्वयन खाजगी कंत्राटदाराकडून करुन घेण्याचे प्रस्तावीत आहे. या मध्ये कारंजांची देखभाल दुरुस्ती, टँकरने पाणी पुरवठा करणे, सर्व प्रकारचे पाईप लाईन/फिटींगस, एलईडी लाईट व इतर विद्युत विषयक बाबी Stainless Steel व Brass Nozzle, Water Proofing, Timer, Chainlink Fencing, Compressor दुरुस्ती, मोटारी व इतर आवश्यक बाबींचा समावेश आहे. सदर कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाची सन 2022-23 मधील स्थापत्य व विद्युत विषयक दरसुची, काही बाबी Quotation Sanctioned BOQ आधारे र.रु.1,67,79,756/-चे तयार करण्यात आले आहे सदर कामाचा खर्च महानगरपालिका अर्थसंकल्प 2025-26 मधील "शहर सौंदर्यीकरण" या लेखाशिर्ष अंतर्गत भागविण्यात येईल.

करीता मनपाची मुख्य उद्याने व चौकांमधील कारंजांची तीन वर्षे देखभाल दुरुस्ती व कार्यान्वन करणे या कामाच्या र.रु.1,67,79,756/- च्या अंदाजपत्रकाचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 2000/2025:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मनपाची विविध मुख्य उद्याने व चौकांमधील कारंजांची तीन वर्षे देखभाल दुरुस्ती व कार्यान्वन करणे या कामाच्या र.रु.1,67,79,756/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर कामाचा खर्च महानगरपालिका अर्थसंकल्प सन 2025-26 मधील "शहर सौंदर्यीकरण" या लेखाशिर्ष अंतर्गत भागविण्यास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

| | |
|---|---|
| **स्वाक्षरित/-** | **स्वाक्षरित/-** |
| **महापालिका सचिव** | **प्रशासक** |
| महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर | महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर |